# निबंधाची पाऊलवाट



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
स. नं. 1023

संपादक
वा. व. बेनोडेकर
एम्. ए. बी. टी.

REFBK-0008531

# निबंधाची पाऊलवाट

मराठा ग्रंथ ... ठाणें स्थळप्रत.
अनुक्रमांक
क्रमांक

संपादक :

वा. ब. बेनोडेकर, एम्. ए., बी. टी.
प्राध्यापक, शिल्प-विद्यालय, औरंगाबाद.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मूल्य २ रुपये

REFBK-0008531

प्रकाशक :
ठाकूर आणि कंपनी लिमिटेड, अमरावती.

प्रथमावृत्ति
२०००

मुद्रक व प्रकाशक :
द. ना. ठाकूर
मॅनेजिंग एजंट
ठाकूर आणि कं. लि.
महेश्वर मुद्रणालय
अमरावती

# हद्गत

★

वाचकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या हातीं ‘ निबंधाची पाऊलवाट ’ ठेवतांना मला आनंद होत आहे. वाचकांचें मन रमेल अशी रंजकता निबंधांना यावी असा प्रयत्न केलेला आहे. इतकेंच नव्हे तर, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने निबंध अभ्यसनीय होतील व त्यामुळे परीक्षेसाठी त्यांना सुलभ मार्गदर्शन होईल ह्याच एका हेतूने हा संग्रह प्रकाशित होत आहे. सामाजिक, राजकीय आणि वाङ्मयीन दृष्टिकोणांतून अद्यावत् विषयांवर मुख्यतः निबंधांची निवड केलेली आहे. मोजक्या शब्दांत आणि ठरीव बंधनांत निबंधाची सजावट रेखीव करण्याचें धोरण ठेवण्याचा या ठिकाणीं प्रयत्न केलेला आहे. आज निबंधवाङ्मयाचा पूर्णपणें कायापालट झालेला आहे. चिपळूणकर–आगरकर यांनी एके काळीं आपल्या निबंधांनी समाज हलवून सोडला असला तरी तीच पद्धत जशीच्या तशी आज आपणांस उचलावीशी वाटणार नाही. मध्यंतरीच्या काळांत केळकर, फडके, खांडेकर इत्यादींच्या निबंधांचे विपुल संस्कार निबंधसाहित्यावर उमटले. त्यामुळे निबंधाची रूपरेषा पालटली. ‘ गुजगोष्ट ’ ह्या नूतन साहित्यप्रकाराने निबंधाची चाकोरी बदलली. अर्थात् गुजगोष्ट हा प्रकार कितीहि खेळकर आणि आकर्षक असला तरी केवळ तेंच स्वरूप विद्यालयीन किंवा महाविद्यालयीन निबंधाला आपण देऊं लागलों तर तें कितपत युक्त ठरेल ? तो शालेय निबंध होईल काय ? गुजगोष्टीपेक्षा हें स्वरूप खचित वेगळें असावयास पाहिजे. ह्याच धोरणाने ‘ निबंधाची पाऊलवाट ’ लिहिण्याचा उपक्रम केलेला आहे. निबंध म्हणजे गुजगोष्ट नव्हे, ही गोष्ट जरी खरी, तरी गुजगोष्टीचें आकर्षण मात्र निबंधाला पाहिजे. ती मनोज्ञता साधण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. भाषासौष्ठव, व्यक्तित्व, सूक्ष्मावलोकन, कलैकदृष्टि, सूचकता हे निबंधरचनेच्या बाबतींत अत्यावश्यक गुण आहेत. निबंधलेखन ही कला आहे असें मानल्यानंतर तिची साधना करणें कठिण आणि प्रयासाचें आहे.

त्याच दृष्टीने हा उपक्रम केलेला आहे. वाचकवर्ग ह्या केलेल्या परिश्रमाकडे सहृदयतेने पाहतील असा विश्वास आहे. विषयाची विविधता व अद्यावत्पणा हा जसा एक दृष्टिकोण निबंध लिहितांना दृष्टिसमोर आहे तसा, एकाच व्यक्तीचे विचार आणि भाषा वाचकांसमोर मांडण्यापेक्षा अनेक अभ्यासू आणि पारंगत व्यक्तींचे विचार, त्यांची शैली, त्यांचें वैशिष्टय ह्यांचें दर्शन घडविल्याने वाचकाचें मन तर रमेलच; पण विद्यार्थ्यांनाहि भाषाशैलीचे अनेक नमुने ज्ञात होतील. ही बहुविधता प्रस्तुत संग्रहांत कटाक्षाने पाळली आहे.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रियांचे प्रश्न स्त्रियाच अधिक उत्कटतेने, स्पष्टपणें, यथार्थतेने लिहूं शकतील असें वाटल्यावरून कांही विषय बुद्धिपुरस्सर मी माझ्या भगिनींकडून लिहून घेतले आहेत. 'संगीत-साधना हा निबंध सौ. मंगला बेनोडेकर यांनी लिहिला आहे. घोटाळा टळावा म्हणून मुद्दाम नामनिर्देश केला आहे. अशा रीतीने संकलन विभाग व स्त्री विभाग हें ह्या पुस्तकाचें वैशिष्टय राहील असा आत्मविश्वास आहे.

विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आत्यंतिक गरज लक्षांत घेऊन ह्या संग्रहांत बहुविध विषयांची मांडणी केली आहे. तात्त्विक विचार सहजतेने आणि खेळकर वृत्तीने विद्यार्थ्यांना प्रगट करतां यावें ह्या दृष्टीनेच 'मौनावरचें भाष्य' हा पत्रात्मक निबंध निवडला आहे.

ज्या माझ्या मित्रांनी आणि भगिनींनी परिश्रमपूर्वक विषय अभ्यासून मागणी करतांच अत्यंत आपुलकीने निबंध लिहून पाठविले त्याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी आहे. केवळ शाब्दिक आभार मानून त्यांचें ऋण थोडेंच फिटणार आहे ?

' त्याचप्रमाणे गुरुवर्य भाऊसाहेब कोलते, एम्. ए., पी एच्. डी., नागपूर महाविद्यालय यांनी कामाचा प्रचंड व्याप बाजूला सारून प्रस्तावना लिहून दिली; तसेंच औरंगाबाद येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य ग. ना. थत्ते, एम्. ए. यांनी मागणी करतांच पुरस्कार लिहून देण्याचें कबूल केलें; डॉ. श्री. म. पिंगे, एम्. ए., पी एच्. डी., औरंगाबाद यांनी मार्गदर्शन

केलें आणि शिल्प-विद्यालयाचे प्राचार्य जी. टी. देशमुख यांनी वेळोवेळीं प्रोत्साहन दिलें. ह्या सर्वांचाच मी ऋणी आहे. त्यांचे आभार मी कोणत्या शब्दांत मानूं ?

त्याचप्रमाणे औद्योगिक शिक्षण-खात्याच्या ( हैदराबाद ) डायरेक्टरां-कडून प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईची परवानगी मिळाली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेंच माझे मित्र श्री. बाळासाहेब ठाकूर यांचे आभार मानल्याशिवाय मला राहवत नाही. मराठीत अशा तऱ्हेचे संकलनात्मक निबंधाचें पुस्तक असावें ही कल्पना मूळ त्यांचीच. अत्यंत निर्दोष व सुबक छपाई करून दिल्याबद्दल मी त्यांचा खरोखरच आभारी आहे.

शेवटी ह्या पुस्तकांत कांही उणीवा असतील. वाचकांनी आणि विद्यार्थ्यांनी त्या कळविल्या आणि पुनर्मुद्रणाचा योग आला तर त्या उणीवा कमी होतील हा भरवसा देऊन ठेवतों; आणि ' न्यून तें पुरतें–अधिक तें सरतें–करुनि घेयावें हें तुमतें–विनवितु असें ' अशी इच्छा प्रदर्शित करतों.

लक्ष्मीनिवास
औरंगपुरा, औरंगाबाद.
दिनांक : ५ मार्च १९५५

**वा. ब. बेनोडेकर**

क्रमांक

# प्रस्तावना

★

सामान्यपणे पारतंत्र्याचा काळ हा देशी भाषांच्या उपेक्षेचा काळ होता. इंग्रजांच्या निकट सहवासामुळेच त्यांच्या आंग्ल भाषेचा आणि त्या भाषेच्या द्वारा केवळ आंग्लच नव्हे तर अनेक पाश्चात्य भाषांतील साहित्याचा आम्हाला परिचय झाला व त्यामुळे आमचे साहित्य चांगले समृद्ध झाले ही गोष्ट खरी आहे. तरीहि आपल्या विशिष्ट धोरणानुसार देशी भाषांना जाणूनबुजून डावलण्याचा आंग्ल शासकांनी प्रयत्न केला ही गोष्ट नाकारता येत नाही. राज्यकर्त्यांच्या भाषेला असलेल्या महत्त्वामुळे आमच्या तथाकथित प्रतिष्ठित समाजाकडूनहि देशी भाषांची नुसती उपेक्षाच नाही तर अवहेलनाहि झाली. त्यामुळे त्यांच्या अभ्यासाकडे जसे लक्ष्य पुरवायला पाहिजे होते तसे पुरवले गेले नाही. शाळांतून अधिकांश तास इंग्रजी भाषेच्या व वाङ्मयाच्या अध्ययनासाठी राखून ठेवलेले असत. त्या मानाने देशी भाषांसाठी फारच थोडे तास मिळत असत. आणि तेहि दिवसाच्या शेवटी केव्हा तरी कसे तरी उरकून घेण्यासाठी. देशी भाषांत काय ठेवले आहे ? त्यात शिकविण्यासारखे आहे तरी काय ? या कल्पनेमुळे जशी ही उपेक्षा होत असे तशी देशी भाषा म्हणजे मुलांच्या मातृभाषा, त्यांचे शिक्षण त्यांना आपोआपच मिळते, ते मुद्दामहून वर्गात देण्याची गरज नाही, या चुकीच्या युक्तिवादामुळेहि होत असे. या सगळ्यांचा परिणाम असा झाला की विद्यार्थ्यांच्या सर्व शक्ति परभाषेच्या अध्ययनात खर्च होऊन आपल्या मातृभाषेकडे मात्र त्यांना लक्ष देता आले नाही. आंग्ल भाषा सफाईने लिहिणारा विद्यार्थी आपल्या मातृभाषेतून चार वाक्ये सरळ व शुद्धपणे लिहितांना मेटाकुटीला येत असे, त्याचे कारण हे असे आहे.

ही स्थिति आजहि पालटलेली आहे असे मात्र नाही. विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील इंग्रजी भाषेचा दर्जा खालावला अशी ओरड आज वारंवार ऐकू येते. आणि ती खरी आहे. पण परकीय भाषेला आम्ही आजहि

मग भाषा लिहिण्याचा प्रयत्न ह्या मानसशास्त्रदृष्ट्याहि बरोबर नसल्या-मुळे अशी पुस्तके व्यवहारात फारशी उपयोगी ठरत नाहीत ह्याच अनुभव येतो. दुसरा प्रकार म्हणजे विद्यार्थ्यासमोर ठेवण्यासाठी आदर्श पद्धतीने लिहिलेली पुस्तके सामान्यतः विद्यार्थी भाषालेखनाचे ज्ञान प्राप्त करून घेतो ते अशा पुस्तकापासूनच. याच दृष्टीने भाषाविषय शिकविण्यासाठी पुस्तकाची योजना करण्यात येत असते. लहानपणी विद्यार्थ्यांच्या समोर जी पुस्तके ठेवण्यात येतील त्यातील लेखनपद्धतींचा त्याच्या लेखनावर कायमचा परिणाम झालेला आढळून येतो याचे कारण तरी हेच. आणि म्हणून अशा पुस्तकांचे लेखन, संकलन किंवा संपादन फार जबाबदारीचे समजले जाते. विद्यार्थी वयाने जसजसा वाढत जाईल तसतशी त्याची ग्रहणशक्ति, लेखनसामर्थ्य वगैरे हीहि वाढत जातात. अर्थात्, त्यासाठी प्रगत लेखनशैलीचे नमुने त्याच्यासमोर येण्याची किंवा ठेवण्याची गरज असते. निबंधाची पाऊलवाट हे पुस्तक अशाच वाढत्या वयाच्या विद्यार्थ्या-साठी तयार केलेले आहे हे उघड आहे.

हे पुस्तक वरवर चाळले तरी अनेकांच्या मनात एक प्रश्न उत्पन्न होईल. तो असा की भाषाशैलीचे किंवा निबंध—लेखनाचे विद्यार्थ्यांच्या समोर आदर्श नमुनेच ठेवायचे तर ते ' प्रथितयश ' लेखकांचे ठेवायला नको का ? सामान्यतः अशा पुस्तकात हरिभाऊ आपटे, केळकर, कोल्हटकर परांजपे, फडके, खांडेकर, माडखोलकर, माटे वगैरे हीच नावे आपणाला आढळतात. निबंधाच्या पाऊलवाटेत तर यांच्यापैकी एकाचेहि दर्शन होत नाही. असे कां ? पुरस्कार लेखक श्री. थत्ते यांनी याचे चांगले उत्तर देऊन ठेविले आहे. 'प्रथितयश लेखकांचे निबंध काही विशिष्ट विषयावरच असतात. त्यांचा उपयोग परीक्षांतून येणाऱ्या विषयासाठी फारसा होत नाही. ' हे त्यांचे म्हणणे खरे आहे. पण याहून महत्त्वाची गोष्ट अशी की या प्रथितयश लेखकांचे हे लेख विद्यार्थ्यांसाठी खास लिहिले असतात. आणि म्हणून शालेय जीवनांतील सामान्य विषयावर त्यांनी फारसे लिहिलेले आढळत नाही. त्यामुळे इच्छा असली तरी अशा ' प्रथितयश ' लेखकांचे साध्यासाध्या विषयावरील निबंध संकलनासाठी सापडणे फार कठीण होते

म्हणूनच विद्यार्थ्यांना उपयुक्त होतील अशा विषयावर, विद्यार्थ्यांना मार्ग-दर्शन होईल अशा पद्धतीने काही निबंध मुद्दाम लिहून काढावे लागतात. 'निबंधाच्या पाऊलवाटे'त अशाच निबंधाचा अंतर्भाव झालेला आहे. त्यातहि दोन प्रकार आहेत. पहिल्या विभागातील निबंध स्वत: लेखकाने लिहिलेले आहेत, तर दुसऱ्या विभागात, इतरांच्याकडून लिहून घेतलेल्या निबंधाचे संकलन केले आहे. या संकलन–विभागांतील एक पोटभाग खास स्त्रियांसाठी राखून ठेवला आहे. त्यात स्त्रियांना उपयुक्त होतील अशा विषयावर स्त्रीलेखिकांनीच व्यक्त केलेले विचार वाचावयाला सापडतात. पुरुषापासून स्त्रियांना असे वेगळे काढण्यात लेखकाने त्यांच्यावर अन्याय केला आहे की काय अशी शंका येणे स्वाभाविक होईल. आजच्या युग-प्रवृत्तीला ते धरूनहि नाही. त्यापेक्षा स्त्रीविषयक काही प्रश्नावर पुरुषांना आपली मते व्यक्त करू दिली असती किंवा काही सर्वसामान्य विषयावर स्त्रियांनाहि लिहिण्याला सांगितले असते तर ते अधिक बरे झाले असते. उदा: बालकमंदिरे, संगीत–साधना हे विषय काही खास स्त्रियांचे आहेत असे नाही. कदाचित केवळ स्त्रियांनी लिहिलेल्या निबंधांचा हा स्वतंत्र पोटविभाग काढला असावा. पण तसे असेल तर विद्यार्थ्यांच्या दृष्टीने स्त्रियांनी लिहिलेल्या निबंधांचा स्वतंत्र विभाग कल्पिण्याची उपयुक्तता कोणती हे कळणे कठीण आहे.

या गोष्टीकडे दुर्लक्ष केले तर एकंदरीत पुस्तकाची योजना चांगली आहे असे दिसून येईल. सामान्यत: प्रवेश परीक्षेसाठी व मध्यमा ( इंटर ) परीक्षेसाठी विचारण्यात येणाऱ्या विषयांचा यात अंतर्भाव केलेला आहे. या विषयावरील अपेक्षित निबंध कोणत्या स्वरूपाचे असावेत हे ठरविण्याला शिक्षकाव्यतिरिक्त अधिक पात्र अशी व्यक्ति दुसरी कोणती आढळणार ? या दृष्टीने हे निबंध स्वत: लिहिण्यात आणि आपल्या शिक्षकबंधूकडून लिहवून घेण्यात संपादकांनी चांगले योजकत्व दाखविले आहे असे म्हटले पाहिजे. याहि बाबतीत दुर्दैवाने आमच्या तथाकथित प्रति-ष्ठितांच्या अंत:करणात अनेक भ्रम घर करून राहिलेले आहेत. शाळेला उपयुक्त होणारी पुस्तके लिहिण्याला पात्र अशा व्यक्ति म्हणजे शिक्षक होत.

कारण ज्या विद्यार्थ्यांना शिकवावयाचे असते त्यांच्याशी त्यांचा दररोज संबंध येत असतो. त्यांची बौद्धिक कुवत काय आहे आणि ती कशी वाढविता येईल याचे त्याला प्रत्यक्ष अनुभवाने ज्ञान प्राप्त झाले असते. ते लक्षात घेऊन आपल्या पुस्तकाची योजना त्याला आखता येत असते. संकलनात्मक पुस्तक तयार करावयाचे असले तरी त्याची आखणी तोच चांगल्या रीतीने करू शकतो. असे असतांना शिक्षकांनी लिहिलेली किंवा संपादिलेली पुस्तके विद्यार्थ्यांसमोर काय ठेवायची ? असा कुत्सागर्भ विचार व्यक्त होतांना आढळतो. तेहि प्रतिष्ठितपणाचा शिक्कामोर्तब झालेल्यांचे काम आहे असे समजण्यात येते. पण वस्तुस्थिति तशी नाही. 'येथे पाहिजे जातीचे, एरा गबाळाचे काम नाही' हा नियम याहि क्षेत्रात लागू पडतो. या दृष्टीने शाळा व विद्यालये यांच्या कक्षांबाहेर असलेल्या लेखकाकडून निबंध लिहवून न घेण्यात संपादकांनी आपल्या अनुभवाचा चांगला उपयोग करून घेतला आहे असे मला वाटते. स्वत: निबंध लिहून व आपल्या शिक्षकमित्राकडून लिहवून घेऊन ते विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यांत संपादकांनी एक महत्त्वाचे कार्य केलेले आहे आणि त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

या निबंधांचे विषय जसे विविध आहेत तसेच ते विविध शैलींनी लिहिलेले आहेत. त्यामुळे निरनिराळ्या विषयावरील विचार भिन्न भिन्न शैलींनी व्यक्त करता येणे कसे शक्य आहे याची विद्यार्थ्यांना चांगली कल्पना येऊ शकेल. स्वत: संपादक श्री. बेनोडेकर हे चांगले लेखक आहेत. उमरावती येथील विदर्भ महाविद्यालयात ते माझे विद्यार्थी होते, तेव्हापासून त्यांच्या मराठीच्या आस्थापूर्वक अभ्यासाची मला कल्पना आहे. निबंध व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात पण व्यवस्थित रीतीने लिहिण्याची त्यांची पद्धति मला फार आवडत असे. त्या पद्धतीचे प्रत्यंतर त्यांच्या या निबंधात पहावयास सापडते. निरनिराळ्या विषयावरील आपले विचार त्यांनी भावनापूर्णतेने लिहून काढलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या निबंधात जिव्हाळा ओतला गेला आहे. क्वचित ह्या निबंधांची भाषा वाजवीपेक्षा अधिक संस्कृतप्रचुर झाली की काय असे वाटण्याचा संभव आहे. पण प्रवेश परीक्षेसाठी व त्यानंतरच्या इंटर परीक्षेसाठी मराठी विषय घेऊन

असणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होतील अशी या निबंधांची योजना असल्यामुळे ती शंका फार वेळ टिकणार नाही. दोन तीन निबंधांतील ही संस्कृतप्रचुरता सोडली तर त्यांचे इतर निबंध सहजसुंदर शैलीने लिहिले गेले आहेत असे दिसून येईल. त्या दृष्टीने 'पाऊलवाटेतील' माझे घर, नदी म्हणजे जीवन संगीत, संयम, आई, खेड्यात चला, मी शिक्षणमंत्री, झालो तर, आमुची मायबोली इत्यादि निबंध विशेष उल्लेखनीय आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतंत्र शैलीचा निश्चितपणे चांगला उपयोग होऊ शकेल.

संकलन विभागातील निबंधहि अधिकारी शिक्षक-शिक्षिकांनीच लिहिलेले आहेत. त्यातील विषय-विवेचन सहसा कोठेहि रूक्ष झालेले आढळणार नाही. 'मौनावरचे भाष्य' विद्यार्थ्यांना कळेल की नाही याची मला शंका वाटते. पण मूर्त कल्पनावरील निबंध कसे असू शकतात याचा एक नमुना म्हणून तो उपयोगी पडू शकेल. इतर लेखक-लेखिकांचेहि निबंध विद्यार्थ्यांच्या चांगले उपयोगी पडतील याविषयी शंका नाही.

या निबंधातील शैलीसंबंधीहि थोडे लिहिणे अवश्य वाटते. शैलींचे भिन्न भिन्न प्रकार एकत्रित करण्यासाठी का होईना पण कांही गुजगोष्टींच्या शैलीने लिहिलेले निबंध या पाऊलवाटेत समाविष्ट झालेले आहेत. लालित्याच्या दृष्टीने ही शैली रमणीय असली तरी विषय-विवेचनाला ती फारशी पोषक ठरत नाहीत. शिवाय आत्मनिवेदनाचा प्रकार अपरिहार्यपणे तीत येत असल्यामुळेहि निबंधाच्या गंभीरपणाला ती बाधक ठरते. यामुळे सामान्यपणे विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधात या शैलीचा उपयोग करणे 'गुण-ग्रहणा'च्या दृष्टीने फायदेशीर होत नाही. विषयाचे गांभीर्य राखून आत्मनिष्ठ ललित निबंध लिहिण्याला कसलेला कलावंतच पाहिजे. तेव्हा विद्यार्थ्यांनी या शैलीचा जपूनच उपयोग करावा असे सुचविणे आवश्यक वाटते. एरवी निबंधाची सुरवात आकर्षक पद्धतीने कशी करावी याचे अनेक उत्तम नमुने या पाउलवाटेत सापडतील ते विद्यार्थ्यांनी अभ्यासण्यासारखे आहेत. विषय-विवेचनाची पद्धतीहि सूत्रबद्ध पण रोचक कशी असावी याचाहि या पाउलवाटेवरून अभ्यास करता येईल.

प्रस्तुत पाऊलवाट निर्माण करून श्री. बेनोडेकर यांनी विद्यार्थ्यांची फार मोठी सोय केलेली आहे असे मला वाटते. विद्यार्थी व शिक्षकवर्ग त्यांच्या या पुस्तकाचा योग्य तो उपयोग करून घेतील यात शंका नाही. अशा उपयुक्त पुस्तकांची योजना आखून ती अनेक शिक्षक-मित्रांच्या साहाय्याने तडीला नेल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. अर्थात् त्यांच्या इतकेच त्यांना आपल्या विशिष्ट शैलींनी निबंध लिहून देणारे त्यांचे इतर शिक्षक-मित्रहि धन्यवादास पात्र आहेत हे निराळे लिहावयास नकोच.

**वि. भि. कोलते.**

# आराधना

"दररोज लिहितों, पुष्कळ वेळ खर्च होतो; पण निबंध कांही केल्या जमत नाही."

विद्यार्थ्यांचें निबंधाच्या तासाला हें ठराविक उत्तर असतें. विद्यार्थी प्रयत्न करीत नाहीत असें मी म्हणत नाही; पण त्यांचे प्रयत्न अधुरे असतात. निबंध ही एक कला आहे, आणि जी 'दिसते सोपी पण असते कठिण' अशी कलेची व्याख्या केल्यानंतर ती कला साधणें महत्प्रयासाचें आहे. अधाशीपणानें नुसतेंच वाचत राहिलें तर ही कला साध्य होईल काय? अर्थात् नाही. घासण्याचे अनेक संस्कार झाल्यानंतरच हिरा पैलूदार बनतो. त्यांत झाक निर्माण होते; आणि ही तेजाची शलाका एकदा हिऱ्याच्या अंगीं बाणली म्हणजे हिऱ्याचा भाव चढूं लागतो. हिऱ्याचेंच कशाला? लहान मुलांचेंच उदाहरण आपण घेऊं. त्यांना चांगल्या प्रकारचें वळण लावायचें म्हणजे आईवडिलांना कोण यातायात पडते? अनेक गोष्टी वारंवार मुलांच्या मनावर बिंबवाव्या लागतात. चांगल्या गोष्टींचे संस्कार अनेक दिवस घडल्यानंतरच बालमनाची घडण तयार होते. पावसाच्या सतत टपकणाऱ्या थेंबांनी दगडांतहि पोकळी निर्माण होते. अनेक दिवस सातत्याने झालेल्या संस्काराने मुलांच्या मनावरहि परिणाम होतोच. तीं बदलून जातात. निबंधाचेंहि असेंच आहे. आपल्याला चांगला निबंध लिहितां यावा ही ईर्ष्या अगोदर बाळगली पाहिजे. तीच नसेल तर कलेला आवश्यक असणारे प्रयत्न आपल्या हातून होणार नाहीत. पण एकदा का ही ईर्ष्या निर्माण झाली की आपण त्या दृष्टीने प्रयत्न करूं लागतों. अभिजात साहित्याचें विशिष्ट हेतूने वाचन, अनेक सुविचारांची वारंवार आठवण, हृद्य वाक्यांची स्मृति, सुभाषितांची आणि वेंचक शब्दांची जपणूक, प्रतिभावंत साहित्यिकांच्या लिखाणाच्या शैलीचा श्रमपूर्वक अभ्यास, त्यांच्या लेखणीचा डौल आपल्या लेखणीने उचलावा ह्यासाठी तळमळ ह्यांकरिता विद्यार्थी धडपडतो. स्वतःच्या ठिकाणीं वाङ्मयीन आवडी निर्माण करून घेतो. साहित्यिक दृष्टीने त्याची मनोभूमिका तयार होते; आणि मग विचारांना

पाहिजे तसें भाषेंत ओतूं शकतो. घडण तयार होते. आकाराला येण्यापूर्वी धातु तापवावी लागते ना? तसाच हाहि प्रकार आहे. एकदा प्रयोगाची सिद्धता झाली की झरणी थांबत नाही. घाटदार वाक्यें, अर्थपूर्ण शब्द, वाक्यावाक्यांतून उमटणारें संगीत, पायरीपायरीने झालेला निबंधाचा विकास आपल्या अनुभवाला येतो. आपणच आपले निबंध वाचण्यांत रमतों. समाधान लाभतें. सार्थक झाल्याचा आनंद मिळतो. हें समाधान ज्या क्षणीं लाभेल त्या क्षणीं आपल्याला कला हस्तगत झाली असें समजण्यास हरकत नाही.

पण हें समाधान लाभण्याचा क्षण फार दूरचा आहे. त्याकरिता कलाचतुराने योग्य साधनाच करायला पाहिजे. योगसाधनाच म्हणाना. एखादा विषय निबंधलेखनाकरिता जेव्हा समोर येतो तेव्हा आपण कांहीसें भांबावनों. ओळींची मर्यादा, वेळेची मर्यादा, विषयांतराची मर्यादा–ह्या मर्यादेंतच 'अमर्याद ज्ञान' असलें तर बसवायचें कसें? विचारांची अनुरूपता, विकारांचा आविष्कार, लिखाणाची शैली एवढ्या थोड्या वेळांत दाखवायची! एका क्षणांत आपलें अंग आणि प्रत्यंग दाखवायला निबंध काय वीज आहे? बरें, थोडें सीमापार झालें की गुणांना छेद बसलाच. लक्ष्मणानं सीतामाईला रेषा आखून दिली होती. आखलेल्या रेषेबाहेर तिचं पाऊल पडलं आणि 'रामायण' तयार झालं. निबंधाचें रामायण होऊं नये एवढ्याचकरिता ही सीमा पाळणें आवश्यक आहे. ही रेषा विद्यार्थ्यांनी ओलांडली की परीक्षकांनी त्यांची उचलबांगडी केलीच. खेळाडूचें खरें कसब जसें मर्यादेंत, तसेंच निबंध लिहिणाराचें. मर्यादा ओलांडली की खेळाडू जसा बाद होतो तसेंच निबंधाचीं बंधनें तोडून आपण जाऊं लागलों की निबंधाचा अवतार संपलाच म्हणून समजावें.

हें सर्व वाचून विद्यार्थी म्हणतील की निबंधाचें तंत्र इतकें आखीव आहे असें तुम्ही म्हणता तर मग अशा तंत्रनिष्ठ निबंधांत सामान्य विद्यार्थी उत्तीर्ण होणें महाकठिणच म्हटलें पाहिजे? प्रश्न ठीक आहे. परंतु सामान्य विद्यार्थी सामान्यपणें उत्तीर्ण होणें ह्यांत विशेष तें काय आहे? जन्मजात मातृभाषेचा आधार लाभल्यामुळेच विद्यार्थी किनारा 'कसातरी' गाठतात. परंतु कसेंतरी पैलतीर गाठणें हीं काय अभिमानास्पद गोष्ट आहे? मराठी

माझी मायबोली आहे' असा स्वाभिमान बाळगणाराला हें सामान्य यश केव्हाहि शोभा देणारें नाही. त्याकरिता परिश्रमपूर्वक अभ्यास करून विशेष यश संपादन करणें ह्यांतच मराठीचें खरें स्वागत आहे.

आज विद्यालयांतून आणि महाविद्यालयांतून मराठीला माध्यमाचें स्थान मिळालें आहे. तांत्रिक विषयहि प्रादेशिक भाषेंतूनच शिकवावेत असे ठराव संमत होत आहेत. कांही ठिकाणीं प्रयोग सुरू झाले आहेत. अशा संक्रमणाच्या कालांत आपल्याला मराठी चांगलें लिहितां यावें ही हाव प्रत्येकालाच असावयास पाहिजे. निबंध म्हणजे ज्ञानाची कसोटी. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची खरी परीक्षा इथेच होते. निबंधाचें तंत्र सिद्धहस्त होणें कठिण असलें तरी प्रयत्नाधीन आहे एवढें खरें. जसा प्रयत्न होईल तशी कलाहि वश होईल. प्रयत्न मात्र प्रामाणिक व नियमित पाहिजे. ज्ञानाची लालसा हवी. वाचनाचें व्यसन पाहिजे. वाचनाच्या सवयीमुळेच मन आणि बुद्धि ह्यांवर अनेक चांगले संस्कार होतात. बुद्धीची ग्रहण व धारणाशक्ति वाढते. प्रतिभेच्या उद्रेकासाठी अंतरंग तयार होतें. पण त्याकरिता वाचनाची सवय जडविणें अगत्याचें आहे. ह्या सवयींतूनच अभिजात वाङ्मयाच्या अभ्यासाची स्फूर्ति निर्माण होईल. नकळत वाङ्मयाचे गुण अंतरंगाला स्पर्श करूं लागतील. अनेक कल्पना सुचूं लागतील. स्वतःचे विचार बनतील. अनुभूति मिळेल. विचाराचें वजन वाढेल; आणि अशा रीतीने व्यक्तिमत्व तयार होईल. पंडित नेहरूंचें किंवा महात्माजींचें लिखाण जगन्मान्य होण्याचें कारण काय? तर पानापानांतून त्यांचें व्यक्तिमत्व उजळलें आहे म्हणून. आपल्या निबंधांतहि 'आपण' उमटलों पाहिजे. आपली तळमळ, धडपड, आशा, निराशा, विचार, भावनोत्कटता असा सगळा 'आपलेपणा'चा स्पर्श जर निबंधाला झाला तर निबंधाचें सोने व्हायला कितीसा उशीर लागणार?

अर्थात् संस्कार, व्यासंग, अभिरुची व अखंड लेखन ह्यांनीच व्यक्तित्वाचा बनाव बनतो. यशस्वी निबंधाची हीच चतुःसूत्री आहे. ह्या चार गुणांपैकी अव्याहत लेखनावर लक्ष अधिक केंद्रित करा. नेहमी लिहावयाचें याचा अर्थ अगोदर वाचायचें आणि नंतरच लिहायचें. वाचन चालू असतांनाच वाचलेल्या भागाचें मनन आणि स्मरण करा. म्हणजे वाचलेल्या गोष्टींची

स्मृति ठळक होत जाईल. अशा रीतीने निबंधाची पूर्वतयारी होत जाईल. निबंधलिखाणास ही पार्श्वभूमि फार गरजेची आहे. पूर्वतयारीशिवाय लिखाणास जोम येणार नाही. ज्या विषयावर आपणांस लिहायचें त्या विषयासंबंधीं प्रथम साहित्य गोळा करा. उत्तम विचारांचा संग्रह करा. वेंचक शब्द टिपून ठेवा. निरीक्षण सूक्ष्म करा. म्हणजे लिखाणास योग्य ती मनाची बैठक तयार होईल. ही मनोभूमि तयार झाली म्हणजेच लिखाणास उद्युक्त व्हा.

लिखाणास हात घातल्यानंतर अडचण येते ती विचार प्रगट करण्याची. विचारामागून विचार सुचतात; पण ते विचार मांडण्यास अनुरूप भाषा जवळ नसते. त्यामुळे विचारांची अभिव्यक्ति मनाप्रमाणे होत नाही. विषयाच्या अनुरोधाने भाषेचें स्वरूप बदलतां आलें पाहिजे. जसे विचार, जशी भावना, तशी भाषा खेळवतां यायला पाहिजे. शास्त्रीय विवेचनांत भाषेचें स्वरूप थोडें वेगळें राहील. भावनात्मक निबंधांत भाषा अधिक लालित्यपूर्ण होईल. 'जसा निबंध तशी भाषा' हें निबंधाचें सूत्र लक्षांत ठेवलें पाहिजे. अर्थात् अर्थानुकूल भाषा वाकविण्याचें सामर्थ्य लेखणीच्या ठिकाणीं निर्माण होणें ही काय सहजसाध्य गोष्ट आहे? अनेक दिवस भाषेची कमाई केल्यानंतर लिखाणांत शैलीचा धर्म निर्माण होईल. विचारांचा विनिमय स्पष्ट, सुबोध, परिणामकारक रीतीने करायचा म्हणजे स्वत:ची अशी वेगळी भाषा पाहिजे. ही भाषेची गंगाजळी सुंदर व वेंचक शब्दांनी समृद्ध करावयास पाहिजे. आंग्ल कवि कीटस् म्हणतो, 'I look upon lovely words as a lover.' कीटस्प्रमाणेच आपणांसहि सुंदर शब्द वेंचतां आले पाहिजेत. सौंदर्यग्राही दृष्टि वागवितां आली पाहिजे. मधुमक्षिका रस लुटून आणते आणि मधाचें पोळें बनविते. आपल्याहि प्रत्येक वाक्यांतून हा सौंदर्यरस ठिपकायला पाहिजे; आणि प्रत्येक वाक्याला रमणीयत्वाची शोभा आणायला रोचक शब्द तालबद्ध रीतीने आपणांस बसवितां आले पाहिजेत. असें झालें म्हणजेच वाक्यांतून संगीतनाद निर्माण होईल. उपमा आणि उत्प्रेक्षा ह्यांचा विपुल प्रमाणांत वापर केल्यानेच केवळ शैली निर्माण होत नसते. अंतरंग एकदा साहित्यानुकूल झालें म्हणजेच अंत:करणांतले सगळे भावगंध घेऊन

भाषाशैली प्रगट होत असते. त्यांत कमालीची सहजता निर्माण होते. अशा प्रासादिक शैलीमुळेच प्रतिभेच्या संचाराला योग्य तो अवसर मिळतो. केळकर, फडके, खांडेकर, काणेकर इत्यादि भाषाप्रभूंची भाषाशैली पाहा; म्हणजे मी काय म्हणतों त्याचा प्रत्यय येईल. त्यांची सगळी रचना रेखीव. एक शब्दहि इकडचा तिकडे झालेला त्यांच्या शैलीला खपत नाही.

ह्याच गोष्टी निबंध लिहूं इच्छिणाराने प्रयासाने आत्मसात् केल्या पाहिजेत. प्रमाणबद्ध देहाकृति जशी आकर्षक वाटते तसेंच प्रमाणबद्ध निबंधहि वाचनीय ठरतो. विनोदाची लहर, कल्पकतेची चमक, भावनांचा तरंग, कोट्यांची संयमित हालचाल ह्यांचा मधूनमधून उपयोग झाला तर निबंधांतील जडपणा जातो. शुद्ध रागदारीपेक्षा रागांचें मिश्रण करीत गेलें म्हणजे चीज आळवतांना वा ऐकतांना जशी कर्णमधुर वाटते तसेंच निबंधाचें आहे. ह्या सर्व गोष्टी साधल्यानंतर निबंधाचा आरंभ कसा करावा, शेवट सूचक कसा असावा, म्हणी व वाक्प्रचारांचा उपयोग माफक प्रमाणांत कुठे व कसा करावा, प्रसिद्ध पुरुषांचीं अवतरणें घ्यावींत किंवा नाही ह्या गोष्टी लिहूं इच्छिणाराने आपल्या शक्तिनुसार ठरवाव्या. त्याबाबत विशिष्ट असा नियम सांगतां येणार नाही. मात्र ह्या गोष्टींची निबंधांतून एकच गर्दी करूं नये. प्रत्येकाचा वापर योग्य स्थळीं, काळीं केला तरच शोभून दिसेल. एकदा निबंधाची पूर्वतयारी झाली, अंतरंग तयार झालें म्हणजे बाकीच्या गोष्टी कशा उपयोगांत आणाव्यात हें आपोआप सुचूं लागतें. एवढी गोष्ट मात्र खरी की कुटुंबनियोजनाप्रमाणे निबंधाचेंहि नियोजन तयार पाहिजे. काय सांगायचें, कसें सांगायचें, कुठे सांगायचें, किती परिच्छेदांतून सांगायचें ह्या गोष्टींच्या रेषा मनांत ठळक असतील तरच निबंधलिखाणास प्रत्यक्ष सुरुवात करावी. असें झालें तर निबंध कांही कठिण गोष्ट नाही असें विद्यार्थ्यांना वाटूं लागेल. त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण होईल. अशा तऱ्हेने 'आराधना' केल्यानंतर ही कला वश होणार नाही काय?

—संपादक

# पुरस्कार

श्री. वा. ब. बेनोडेकर ह्यांनी 'निबंधाची पाऊलवाट' हें निबंधाचें पाठ्यपुस्तक उच्च वर्गांतील मराठी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातीं देऊन मोठी उणीव भरून काढलेली आहे. मातृभाषा म्हटली की ती आपणास येतेच; ती नीट लिहितां यावी म्हणून विशेष प्रयत्न करण्याचें कारण नाही अशी विद्यार्थ्यांची समजूत झालेली असते. याचा परिणाम असा होतो की विद्यार्थी मराठी निबंधलेखनाकडे फारसें लक्ष देत नाहीत. परकीय भाषा शिकणें हें एक वेळ सोपें; पण मातृभाषा नीट बोलतां आणि लिहितां येणें हें फार कठिण आहे असें माझें मत आहे. चांगलें लिहितां येणें हें दीर्घ अभ्यासानेच शक्य होत असतें. चांगलें मराठी लिहितां यावें यासाठी स्वतःची अशी एक शैली प्रत्येकाने बनविली पाहिजे, आणि ती साधावी म्हणून निरनिराळ्या शैलींतील निबंधांचा सखोल अभ्यासहि केला पाहिजे ही गोष्ट श्री. बेनोडेकर यांच्या ह्या पुस्तकाने विद्यार्थ्यांना आणि सामान्य वाचकांना पटेल असा विश्वास वाटतो.

श्री. बेनोडेकर यांनी हा संग्रह संपादण्यांत मोठें कौशल्य दाखविलें आहे. प्रथितयश लेखकांचे निबंध कांही विशिष्ट विषयांवरच असतात. त्यांचा उपयोग परीक्षांतून येणाऱ्या विषयांसाठी फारसा होत नाही हें जाणून विद्यार्थ्यांना प्रचलित विषयांवर श्री. बेनोडेकर यांनी स्वतः बरेचसे निबंध लिहून दाखविले आहेत; आणि मराठीच्या अनेक शिक्षकशिक्षिकांकडून निबंध लिहून घेऊन तेहि या पुस्तकांत संकलित केले आहेत. यामुळे या संग्रहांत नानाविध शैलींचें दर्शन सहजच घडून आलें आहे. हे निबंध विद्यार्थ्यांना मार्गदर्शक होतील असेच निवडले आहेत.

इंग्रजी भाषेंत असलीं पुस्तकें पुष्कळच आहेत; आणि विद्यार्थी त्यांचा अभ्यास प्रयत्नपूर्वक करीत असतात. मराठी लेखनाच्या अभ्यासांत इतकें कांटेकोरपणाने लक्ष घातलें जाईल तेव्हाच आपल्या भाषेचा उत्कर्ष होईल हें आम्ही ओळखावयास हवें.

शैलीने लेखन प्रभावी होतें. शब्दांची योग्य निवड आणि ठाकठिकीची वाक्यरचना यावर जितका भर द्यावयास पाहिजे तितका भर मराठी लिहितांना देण्यांत येत नाही; तो दिला गेला पाहिजे. प्रस्तुत पुस्तकांत या महत्त्वाच्या गोष्टीवर सामान्यपणें भर दिलेला आहे, आणि त्यामुळे शैली बनविण्यासाठी तें विद्यार्थ्यांना सहाय्यभूत होईल.

भाषेने मनुष्याची रुची कळून येते. ती रुची जितकी अभिजात होईल तितका वाङ्मयाचा उत्कर्ष होईल. यासाठीं शिक्षकाने चांगले विषय आणि शुद्ध मराठी शब्दांचा प्रयोग प्रयत्नपूर्वक करावयास पाहिजे. तसें झाल्यास आपल्या भाषेची समृद्धी वाचकांच्या प्रत्ययास येऊन त्यापासून आपल्या स्वाभिमानांत भर पडेल यांत संशय नाही. ह्या पुस्तकाचा उपयोग करणारांनी ह्या सूचनेकडे अगत्याने लक्ष द्यावें.

श्री. बेनोडेकर यांनी हें पुस्तक विद्यार्थ्यांच्या हातीं देऊन त्यांच्या अभ्यासास सहाय्य केलें आहे. त्याप्रमाणेच मराठी भाषेच्या शिक्षणाला दिशा लावली आहे. यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.

कलाविज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद
ता. ६-३-५५

ग. ना. थत्ते
प्राचार्य

## —अर्पण

चि. कु. शांता

हिचे मंगल

व प्रेमळ

स्मृतीस—

# अनुक्रम

★

## १

वा. ब. बेनोडेकर, एम. ए., बी. टी.
प्राध्यापक, शिल्प-विद्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १. | वंदेमातरम् | १ |
| २. | पंडित जवाहरलाल नेहरु | ४ |
| ३. | भूदान चळवळ | ८ |
| ४. | मराठी असे आमुची मायबोली | १३ |
| ५. | कमळा | १६ |
| ६. | माझी आई | २० |
| ७. | चांगलीं पुस्तकें | २२ |
| ८. | जनसेवा ही प्रभुसेवा | २५ |
| ९. | माझें घर | २९ |
| १०. | नदी म्हणजे जीवन–संगीत | ३१ |
| ११. | मूर्तिपूजा | ३५ |
| १२. | प्राचीन व अर्वाचीन कवि | ३८ |
| १३. | महाराष्ट्रसंतांची कामगिरी | ४० |
| १४. | तुका म्हणे तोचि संत | ४३ |
| १५. | संयम म्हणजेच सौंदर्य | ४५ |
| १६. | माझी आवडती गुजगोष्ट [ दोन मेणबत्त्या ] | ४८ |
| १७. | माझी आवडती गुजगोष्ट [ पहिला पांढरा केस ] | ५० |
| १८. | विनोबाजींची लेखनशैली | ५१ |
| १९. | माझी आवडती कविता | ५३ |
| २०. | मी शिक्षणमंत्री झालों तर | ५५ |
| २१. | स्वातंत्र्यमंदिराच्या दारांत | ५८ |

२२. ध्येय हाच जीवनांतील सुगंध ६०
२३. खेड्यांत चला ६३
२४. भूगोलाचा अभ्यास ६६
२५. कला आणि नीति ७०

# २

१. आपलीं ग्रंथालयें ७५
—डॉ. श्री. म. पिंगे,
एम्. ए., पीएच्. डी., औरंगाबाद
२. मौनावरचें भाष्य ७९
—के. मा. आराधे, एम्. ए., काव्यतीर्थ, नागपूर
३. यंत्र हा शाप की वर ? ८२
—प्रा. म. के. शेटे, एम्. ए., सागर
४. परीक्षेच्या वेळीं ८६
—प्रा. म. के. शेटें, एम्. ए., सागर
५. व्यक्तीचें सुख व सुखी समाज ९०
—प्रा. म. के. शेटे, एम्. ए., सागर
६. विस्मृति ९३
—प्रा. दा. ल. अडोणी, एम्. ए., सागर
७. वृत्तपत्रें ९६
—प्रा. गजानन पाडळकर, एम्. कॉम्., औरंगाबाद
८. एकत्र कुटुंबपद्धति ९९
—प्रा. गं. वि. नेर्लेकर, एम्. ए., मुंबई
९. विमानांतील पहिली सफर १०५
—प्रा. गं. वि. नेर्लेकर, एम्. ए., मुंबई
१०. प्रौढशिक्षण ११०
—प्रा. उत्साहकुमार भेलांडे,
एम्. ए., एम्. एड्., औरंगाबाद

११. साहित्याचें मूल्यमापन ११३
–प्रा. व. व्यं. धारवाडकर,
एम्. ए., डिप्-इन्-एड्., औरंगाबाद

१२. सवयी व मानवी जीवन ११९
–प्रा. ना. न. मांडे, बी. ए., बी. एड्., औरंगाबाद

१३. माझे शेजारी १२४
–ना. ना. मुळे, बी. एस्सी., अमरावती

१४. शीलं परं भूषणम् १२८
–जी. एल्. कुऱ्हेकर, बी. ए., बी. टी., अमरावती

१५. विद्येचें सामर्थ्य १३१
–हिंमत चव्हाण, बी. ए., औरंगाबाद

१६. अणुबॉम्ब व अहिंसा १३४
–पी. जी. देशपांडे, बी. एस्सी., औरंगाबाद

१७. भाषावार प्रांतरचना १३७
–बी. के. भाटीया, बी. ए. ( ऑनर्स ), औरंगाबाद

१८ विद्यार्थी आणि शिस्त १४०
–के. व्ही. पंडित, अमरावती

१९. हिंदी शेतकऱ्याचें जीवन १४४
–के. व्ही. पंडित, अमरावती

२०. ती रम्या नगरी ! १४७
–अ. रा. सुसलादकर, बी. ए., औरंगाबाद

## ३

१. बालकमंदिरांची आवश्यकता १५३
–सौ. नलिनी भेलांडे
बी. ए., बी. एड्., औरंगाबाद

२. स्त्रीशिक्षण १५५
–कु. विमल शुक्रे, बी. ए., नांदेड

३. स्त्री आणि आर्थिक स्वातंत्र्य १६०

—सौ. तारा परांजपे, बी. ए., हैदराबाद

४. माझी शाळा १६४

—कु. उषा गोडबोले, बी. एस्सी., अमरावती

५. संगीत–साधना १६८

—सौ. मंगला बेनोडेकर, संगीत विशारद, औरंगाबाद

६. स्त्री आणि राजकारण १७१

—सौ. माई केसकर, वणी

७. आदर्श गृहिणी १७४

—सौ. सुनंदा कोटेश्वर, नागपूर

# पा
# ऊ
# ल
# वा
# ट

वा. म. बेनोडेकर

अ.क्र. १०५८३ क्रमांक 9023 दि: २८/३/५
द्रा. क्र. ८९३१

## वंदेमातरम् : १

स्वर्गापेक्षाहि अधिक थोर मानलेल्या जन्मभूचें गान कुणाच्या अंतरंगांत आनंदाच्या ऊर्मि उसळविणार नाही! भारतमाता ही माझी जन्मभूमि आणि वंदेमातरम् हें माझ्या भारताचें राष्ट्रगीत आहे. ह्या गीताचा पवित्र नाद ज्या वेळीं माझ्या कानीं पडतो त्या वेळीं माझें अंग अतीव आनंदाने पुलकित होतें. रक्तांतून नवचैतन्याच्या लहरी उसळतात. एका गोड भावनेने माझी सारी अंत:सृष्टि भारली जाते. माझ्या प्रिय भारताचा एक ऐतिहासिक चित्रपट माझ्या मन:चक्षूपुढून सरकतो. ज्या नरवीरांनी स्वातंत्र्यसंग्रामांत आपलीं शिरकमलें मातृभूमीच्या चरणीं अर्पण केली, शत्रूंच्या गोळ्या ज्यांनी हसतमुखाने आपल्या उघड्या छातीवर झेलल्या, अंदमानच्या कोठडींत ज्यांनी जिवंतपणीं मृत्यूला कवटाळलें आणि 'वंदेमातरम्' हा जयघोष करीत जे आनंदाने फासावर लटकले त्या सगळ्या देशभक्तांची आठवण 'वंदेमातरम्' ह्या राष्ट्रगीतामुळे मला होते. ह्या गीताचा शब्द कानीं पडतांच त्वेषाने माझ्या मुठी वळतात; पायांना स्फुरण चढतें; राष्ट्रीय भावनेची दिव्य ज्योत अंत:करणांत प्रज्वलित होते; स्फूर्तीचा संचार होतो आणि माझ्याहि तोंडून 'वंदेमातरम्', 'भारतमाता की जय' असा जयघोष बाहेर पडतो. हात जोडले जातात व मातेच्या चरणीं मस्तक नत होतें.

राष्ट्रभावना ही एक हृदयस्पर्शी भावना आहे. तिच्यांत दिव्यता आहे. तेज आहे. एकत्वाची हाक आहे. प्रेम आणि त्याग ह्यांचें मधुर मीलन आहे आणि विश्वबंधुत्वाचें बीज आहे. 'सर्व माझेंपण' ह्या राष्ट्रभावनेंत एकवटलें आहे. ह्याच राष्ट्रभावनेंत ब्रह्मदेवाचा सारा पसारा एकत्वाच्या विशाल

कल्पनेने नटविण्याची जादू आहे. म्हणूनच ही राष्ट्रीय भावना म्हणजे विश्वगंगेची गंगोत्री म्हटली पाहिजे. ह्या भावनेमुळेच इंग्लंड, रशिया, अमेरिका, जर्मनी, जपान इ. राष्ट्रें कसदार आणि जोमदार बनलीं आहेत. राष्ट्रीय भावना ही त्या राष्ट्रांतील लोकांची स्थायी भावना झालेली आहे. 'Britons never will be slaves' ही ब्रिटिशांची राष्ट्रोक्ति आहे. 'मार्सेलिस' हें फ्रान्सचें आवेशयुक्त राष्ट्रगीत आहे. 'स्वातंत्र्य आणि ऐक्य' ह्या गुणांमुळेच आम्ही काळावरहि विजय मिळविला असें अमेरिका मोठ्या अभिमानानें म्हणते. तात्पर्य, प्रत्येक राष्ट्राचें एक स्वतंत्र राष्ट्रगीत असतें व त्या राष्ट्रगीतामुळे तेथील प्रजेच्या भावना उत्स्फूर्त होत असतात. इतर राष्ट्रांप्रमाणेच भारताचेंहि 'वंदेमातरम्' हें लोकमान्य राष्ट्रगीत आहे. हें राष्ट्रगीत ज्या वेळीं आम्ही गातों त्या वेळीं आमची संस्कृति, परंपरा, उज्ज्वल भविष्य, इतिहास ह्या सान्या गोष्टी डोळ्यांपुढे येतात व आमच्या अंतरंगाचा कोपरा नि कोपरा स्फूर्तीमुळे उजळला जातो; एक प्रकारची दिव्य आशा आमच्या हृदयास स्पर्श करते.

भारताच्या अनेक कवींनी ह्या राष्ट्रभावनेचा गौरव केला आहे. धैर्य आणि आत्मविश्वास ह्यांच्या निर्मितीसाठी राष्ट्रगीतें हीं आवश्यक असतात. ह्याच राष्ट्रीय भावनेच्या प्रभावाने पाश्चात्य राष्ट्रें वैभवगिरीवर आरूढ झालेलीं आहेत. 'वंदेमातरम्' हाच राष्ट्रमंत्र म्हणत अनेक क्रांतिकारकांनी मरणाला कवटाळलें आहे. आशियाचे कविसम्राट रवींद्रनाथ टागोर ह्यांनी 'जनमनगण' हें राष्ट्रगीत गायिलें आहे. उर्दू शब्दसृष्टीचे विधाते महंमद इक्बाल यांनी 'सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा' हें गीत गाऊन भारताचा गौरव केलेला आहे. "Will India be defeated long? It cannot be." ह्या उद्गारांनी कवि वासवानी ह्यांनी राष्ट्राचा रम्य भावी काळ दर्शविला आहे. वीर सावरकर, आनंदराव टेकाडे, गोविंदकवि, देवी सरोजिनी नायडू ह्यांनीहि आपआपल्या परी भारताचीं वैभवशाली गीतें गायिलीं आहेत; परंतु 'वंदेमातरम्' ह्या गीताला भारताच्या लोकमान्य राष्ट्रगीताचा मान मिळाला आहे. वंग साहित्यसम्राट बाबू बंकिमचंद्र हे ह्या एकाच गीताने कवि म्हणून अमर झाले आहेत. 'एकेनापि सुपुत्रेण वंशो याति समुन्नतिम्'

ह्या संस्कृत वचनाप्रमाणे एकुलती एकच कविता रचून बंकिमचंद्रांनी चिरंजीव पद प्राप्त करून घेतलें आहे; आणि 'वंदेमातरम्' हें गीतहि अमरपणा प्राप्त होण्याच्या योग्यतेचेंच आहे.

बंकिमचंद्र चतर्जी हे वंग कादंबरीसृष्टीचे विधाते होत. 'आनंदमठ' ह्या आपल्या कादंबरींतून त्यांनी 'वंदेमातरम्' हें गीत लिहिलें आहे. एकदा बंकिमबाबूंच्या मुलीने त्यांना म्हटलें, तुम्ही नेहमी कादंबऱ्याच लिहिता; काव्य रचीत नाही ? त्यावर बंकिमबाबू आपल्या कन्येला म्हणाले, 'मी एकच गीत आनंदमठ ह्या कादंबरींत रचलें आहे. माझ्या कवित्वशक्तीचा सौरभ वाढविण्यास तें गीत पुरेसें आहे.' हेंच तें 'वंदेमातरम्' गीत होय. गीतेचें पावित्र्य ह्या गीताला प्राप्त झालें आहे. हृदयाशीं भगवद्गीता कवटाळीत आणि मुखाने 'वंदेमातरम्' हा मंत्र म्हणत अनेक देशभक्तांनी आणि क्रांतिकारकांनी मृत्यूला हसत आमंत्रण दिलें. बंकिमचंद्रांना भारता-विषयी वाटणारें प्रेम ह्या गीतांतून ओथंबून ओसंडतांना दिसतें. त्यांच्या कवित्वशक्तीची पौर्णिमा येथे फुललेली वाटते. पावित्र्याच्या सुगंधाने ह्या गीतांतील वातावरण धुंद झालेलें आहे. 'वंदेमातरम्' मधील प्रत्येक शब्द दिव्य सौंदर्याने नटलेला आहे. म्हणूनच ह्या गीताबद्दल प्रत्येकाला ममता, आदर आणि पूज्यभाव वाटतो. हें गीत शिरोधार्य मानूनच गेल्या शतकांत आमच्या भारत देशांत चैतन्याच्या लहरी निर्माण झाल्या. 'थंड गोळा' होऊन पडलेल्या ह्या राष्ट्राला वंदेमातरम् ह्या गीताने 'ऊब' आणली. भारत खडबडून जागें झालें. त्यांत जोम आला आणि आज स्वातंत्र्याचा नंदादीप भारतांत प्रज्वलित करून ती ज्योत अमर राखण्याचें कार्य ह्या राष्ट्र-गीतानेच केलें आहे.

वंदेमातरम् हा आज आमचा राष्ट्रमंत्र बनला आहे. प्रत्येक सभा-समारंभांतून हें राष्ट्रगीत मोठ्या आदराने आम्ही गातों. आमच्या मातेचें आम्ही स्मरण करतों. आम्ही नम्रतेने म्हणतों, "माझी माता सुजला–सुफला आहे. धान्याच्या समृद्धीने तिचा वर्ण सावळा दिसत आहे. येथील रात्री दुग्धचंद्रप्रकाशाने प्रफुल्लित असतात. फुलांच्या बहराने येथील वृक्षराजी

सुंदर दिसतात. माझे मनोरथ पुरविणारी माझी माता आहे. हे माते, तुझे तीस कोटी पुत्र मुक्तकंठाने तुझें यशोगान गातात. त्यांनी आपल्या साठ कोटी हातांत समशेरी धारण केल्या आहेत. तेव्हा तुला अबला कोण म्हणेल? तूं 'बहुबलधारिणीम्' आहेस. माते, आमची विद्या, धर्म, हृदय, सर्व कांही तू आहेस. तूंच आमचा प्राण; तूंच आमची भक्तीची ज्योत, तूंच लक्ष्मी आणि सरस्वती. सोज्वळ, पवित्र, सुहासिनी अशा तुला जगतांत तुलना नाही."

हेंच आमचें राष्ट्रगीत. अंतर्बाह्य गोड. कल्पनांच्या सौंदर्याने नटलेलें. अतीव प्रासादिक. दिव्यतेने सुगंधित झालेलें. उज्ज्वल भावांनी उजळलेलें ज्या वेळीं 'वंदेमातरम्' हें राष्ट्रगीत माझ्या कानीं पडतें त्या वेळीं अष्ट सात्त्विकभावांची माझ्या अंतःकरणांत गर्दी होते. जन्मभूमीला हात जोडले जातात, आणि 'वंदेमातरम्'चा जयघोष केल्याशिवाय मला राहवत नाही.

●

# पंडित जवाहरलाल नेहरु : २

'पंडित जवाहरलाल नेहरु की जय.'

लक्षावधि लोक पंडित नेहरूंचा जयजयकार करीत होते. पंतप्रधानाचीं सूत्रें हातीं घेतल्यानंतर ते प्रथमच नागपूरला येणार होते. त्यांच्या दर्शनासाठी जनता आतुर झाली होती, तहानभूक विसरली होती. विमानतळावर विमान दिसूं लागतांच प्रचंड जयघोष सुरू झाला. फुलांचा पाऊस पडला. आनंदाला सीमा राहिली नाही. देवाच्या दर्शनाला यात्रा लोटावी तसें झालें.

विमानांतून अप्रतीम सौंदर्य नेहरूंच्या रूपाने बाहेर पडलें. नंदनवनच प्रगट होऊन हलूं लागल्याचा भास झाला. भाग्यशाली, भव्य कपाळ, रेखीव दंतपंक्ती, पाणीदार नेत्र, गुलाबी कांति. चालण्यांतली बादशाही ऐट पाहून मी मंत्रमुग्ध झालों. नेहरूंनी जनसागराकडे कटाक्ष फेकला, स्मित केलें आणि नम्रतापूर्वक अभिवादन केलें नेहरूंचें तें स्मित मी कधीहि विसरणार नाही. अंतःकरणांतले सगळे प्रेमळ भाव घेऊन बाहेर पडलेलें तें निरागस

हास्य ! त्या निरुपम रूपावरील तें प्रांजळ हास्य पाहून मला धन्यता वाटली.

पंडित नेहरूंचें जीवन म्हणजे एक विशाल महाकाव्य आहे अनेक पानें उलटावींत त्या वेळीं त्या काव्याचें ओझरतें दर्शन घडणार. भारताचे जगप्रसिद्ध पुढारी, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, आशियाचा नेता, गांधीजींचा वारस, विद्वान पण प्रामाणिक मुत्सद्दी, असामान्य साहित्यक या बहुविध अंगांनी नेहरूंचें जीवन नटलेलें आहे त्यामुळेच जगांतील पंचमहापुरुषांत त्यांची गणना होते आज दुःखदग्ध जगाचें ते आशास्थान बनले

१४ नोव्हेम्बर १८८९ रोजीं अलाहाबाद येथे पं. नेहरूंचा जन्म झाला. गर्भश्रीमंतींत त्यांचें बालपण गेलें. अक्षरशः सोन्याच्या चमच्यांतून त्यांना दूध पाजण्यांत आलें. प्रख्यात राजकारणपटु पंडित मोतीलाल हे जवाहरलाल-जींचे वडील. मोतीलाल नेहरूंवर लक्ष्मीची अपरंपार कृपा होती. ते अत्यंत प्रेमळ पण शिस्तीचे भोक्ते होते. हेच आनुवंशिक संस्कार जवाहरलालजींच्या आयुष्यावर झाले. आधुनिक जगांतिल दुर्मिळ सवलती जवाहरलालजींना मिळाल्या. ब्रुक्ससारख्या सत्त्वशील गुरूच्या सान्निध्यांत जवाहरलालजींचें शैशव गेलें. नंतर १९०५ ते १९१२ पर्यंतचीं सात वर्षें इंग्लंडमधील हॅरो आणि केंब्रिज या ठिकाणीं जवाहरलालजींचा अभ्यासक्रम पूर्ण झाला. ह्या सात वर्षांत ते पाश्चात्य संस्कृतीचे चांगले जाणकार बनले. १९१२ मध्ये बॅरिस्टर होऊन ते भारतांत आले. तेज कुठेहि असलें तरी त्याचा प्रकाश पडतोच. अत्यंत तेजस्वी, बुद्धिमान आणि जिज्ञासु म्हणून अिग्लंडमध्ये जवाहरलालजींचा लौकिक गाजला.

अलाहाबाद हायकोर्टांत प्रथम त्यांनी वकिली सुरू केली. पण त्या धंद्यांत त्यांचें चित्त रमेना. स्वभावतःच झुंजप्रिय अशा त्यांच्या मनाला वकिलीचा कंटाळा आला. अनेक क्षितिजें त्यांच्या डोळ्यांपुढे तरंगू लागलीं. १९१२ सालीं बाकीपूर येथे भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनास ते प्रतिनिधी म्हणून हजर राहिले. नामदार गोखल्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाने त्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यानंतर १९१४ मध्ये मंडालेच्या कारागृहांतून

लो. टिळकांची मुक्तता झाली. तत्कालीन राजकारणाचे एकमेव सूत्रधार म्हणजे टिळक होते. लोकमान्यांच्या प्रभावी नेतृत्वाकडे जवाहरलालजी आकर्षित झाले. आपणहि कांहीतरी भरीव कार्य केलें पाहिजे, ही तळमळ, जाणीव, हुरहुर त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली. त्याच वेळीं 'होमरूल लीग'ची भारतव्यापी चळवळ झाली. नेहरूंनी त्यांत अुडी घेतली.

लोकमान्य टिळकांनंतर राजकारणाचीं सर्व सूत्रें महात्मा गांधींचे हातीं आलीं. महात्मा गांधी म्हणजे त्याग, अनासक्ति आणि कर्म. त्यांचें जीवन म्हणजे व्रतवैकल्याचे प्रयोग. गांधीजींच्या त्यागमय जीवनाचा नेहरूंच्या जीवनावर कायमचा ठसा अुमटला. अर्थात् महात्माजींच्या धार्मिक भूमिकेशीं जवाहरलाल समरस होअू शकले नाहीत. धर्म हा गांधीजींचा आत्मा, तर पंडित नेहरू धर्मासंबंधीं पूर्णपणें अुदासीन. पण पंडितजी नास्तिक असले किंवा रूढ धर्मावर त्यांची श्रद्धा नसली तरी मानवी जीवनास नीतीचा भक्कम आधार पाहिजे ह्यावर मात्र त्यांची पूर्णपणें श्रद्धा आहे. नेहरूंना महात्माजीविषयी वाटणारी अपरंपार भक्ति यांतूनच निर्माण झाली आहे. म्हणूनच महात्माजी त्यांचा प्रिय विषय बनला आहे. निवृत्तिनाथांचें वर्णन करतांना ज्ञानेश्वरांची प्रतिभा जशी 'रसभावफुलीं फुलून' येअी, तसेंच गांधीजीविषयी लिहितांना वा बोलतांना पंडित नेहरूंनी रसोत्कर्षाची सीमा गाठली आहे. 'आपल्या आयुष्यावर म. गांधी, बुद्ध आणि भगवद्गीता ह्यांचा फार मोठा परिणाम झालेला आहे असें स्वतः जवाहरलाल मानतात. जवाहरलालजी मूर्तिमंत कर्मयोगी जे वाटतात ते यामुळेच.

काँग्रेसला आपला पक्ष ठरविल्यानंतर जवाहरलालजी काँग्रेसशीं एकनिष्ठ राहिले आहेत. आज काँग्रेस म्हणजे पंडित नेहरु असें समीकरण झालें आहे. अनेक क्रांतिकारक शक्तींनी काँग्रेसमधून त्याग केला; पण काँग्रेसमध्ये जीव भरण्याचा जवाहरलाल नेहरूंचा प्रयत्न मात्र अखंड चालूं आहे. चिटणिसाच्या पदापासून तों काँग्रेसश्रेष्ठीच्या पदापर्यंतच्या सर्व भूमिका नेहरूंनी अत्यंत यशस्वी रीतीने पार पाडल्या आहेत. लाहोर, लखनौ, फैजपूर, हैद्राबाद, इत्यादि ठिकाणच्या अध्यक्षपदाचा बहुमान नेहरूंना मिळाला आहे. दादाभाई नौरोजीनंतर एवढा बहुमान मिळालेले पंडित नेहरूच होत. अनेक

हालअपेष्टा सोसून, सर्वस्वाचा त्याग करून त्यांनी काँग्रेसमध्ये नवचैतन्य ओतलें आणि राष्ट्राला वैभवास चढविलें. कार्यक्षमता, ऐहिक जीवनासंबंधीं हौस, वक्तशीरपणा, जिज्ञासा, सहकारी वृत्ति, पद्धतशीर कार्य, शिस्तीची आवड, तरुणांनाहि लाजविणारी तडफ ह्या सर्व गोष्टींमुळे पंडित नेहरु हिंदी राजकारणांत आघाडीवर चमकले; महात्माजींचे मानसपुत्र बनले. 'जवाहरलाल स्फटिकाप्रमाणे शुद्ध आहेत. त्यांचा प्रांजलपणा संशयातीत आहे. ते शूर आहेत. राष्ट्र त्यांच्या हातीं सुरक्षित राहील.' अशा तऱ्हेचे उद्‌गार खास महात्माजींनी त्यांच्याविषयी काढले आहेत. जवाहरलालजींचा त्याग अलौकिक आहे. भारताच्या इतिहासांत त्याला तोड नाही; आणि म्हणूनच १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र हिंदचे पहिले पंतप्रधान म्हणून जवाहरलालजींची निवड झाली.

राजकारण हा जवाहरलाल नेहरूंच्या कार्यशक्तीचा एक भाग आहे. निर्मळ राजकारणी, प्रामाणिक मुत्सद्दी आणि भाषेचे शिल्पकार म्हणून पंडित नेहरूंचा दर्जा जगांत श्रेष्ठ आहे. राजकारणाच्या धाऊगर्दीतहि पंडित नेहरूंची प्रतिभा ताजी राहिलेली आहे. नव्या ग्रंथाचा आणि नव्या विचाराचा परिचय करून घेतल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. इंदिरेस पत्रें, जगाचा इतिहास, आत्मचरित्र, भारताचा शोध ही ग्रंथसंपत्ति निर्माण करून भारताच्याच नव्हे तर जगाच्या वाङ्‌मयांत नेहरूंनी अप्रतिम भर घातली आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पत्रपंडित जॉन गुंथर ह्यांनी पंडितजींच्या साहित्यसंपदेची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. इंदिरेस लिहिलेलीं पत्रें सोडून त्यांचें सर्व साहित्यभांडार तुरुंगांत निर्माण झालेलें आहे, हे ऐतिहासिक सत्यहि आपणांस नजरेआड करतां येणार नाही. पंडित नेहरू हे प्रतिभाशाली आहेत. त्यांच्या प्रतिभेंत विद्वत्ता आहे, विद्वत्तेंत काव्य आहे आणि काव्याला विश्वबंधुत्वाचा स्पर्श झालेला आहे.

वाचन हें जसें नेहरूंचें व्यसन, तसेंच लहान मुलांचेंहि त्यांना फार वेड आहे. लहान मुलें दृष्टीला पडलीं की ते आपलें म्हातारपण विसरतात. पंतप्रधानांचा डौल टाकून ते लहान मुलांना उचलून घेतात. त्यांच्या बाललीलांशीं समरस होतात. जीवनांत आनंद लुटतात. मुलांचे लाड करतात. लहान मुलें म्हणजे

त्यांना दिव्यत्वाचा झरा वाटतो. अेका लहान मुलांच्या मेळाव्यांत बोलतांना नेहरु म्हणाले "मी तुमच्या डोळ्यांकडे पाहूं लागलों म्हणजे मला उद्याचा भारत दिसतो. तुम्हीच या देशाचे उद्याचे मालक आहांत! मुलांकडे पाहून नेहरूंचें मन भविष्याच्या आशेने उचंबळून येतें.

पंडित नेहरूंचें जीवन अनेकांगांनी परिपूर्ण आहे. सर्व दृष्टीने त्यांचा विचार केला तर त्याला महाभारताचें स्वरूप येईल. आज जगांत युद्धाचीं बीजें पेरलीं जात आहेत. जगाचें रूप बदलविणारे अैतिहासिक करार होत आहेत. आगीने आग कधीहि शमत नाही. तद्वत् युद्धाने शांति कधीहि नांदूं शकत नाही. यापुढे अहिंसेच्या मार्गाशिवाय शांतीचें साम्राज्य निर्माण करतां येणें शक्य नाही. हा अभिनव प्रयोग असला तरी त्यांत तथ्य आहे, सत्य आहे. शांतीच्या साम्राज्यांत जग सुखाने नांदावें, प्रेमाची देवाणघेवाण व्हावी, विश्वाला कुटुंबाचें रूप यावें, बंधुभाव फुलावा यासाठीच 'शांतिदूत' म्हणून नेहरूंचा अवतार आहे. यामुळेच ते महात्माजींचे वारस ठरतात. शांतीची ज्योत अमर ठेवण्यास आणि पूर्व व पश्चिम अेक करण्यास परमेश्वर ह्या 'भारतभाग्यविधात्याला' आयुरारोग्य देवो हीच प्रार्थना.

●

# भूदान–चळवळ : ३

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असें लो. टिळक म्हणत. 'मीहि म्हणेन की, शेतांत राबायला तयार असणाऱ्या भूमिहीनानं जमीन मागणं हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.'

—विनोबाजी

भूदानयज्ञाची ही विराट चळवळ म्हणजे विसाव्या शतकांतील एक महान् आश्चर्य आहे. शेतावर खपणाऱ्या आपल्या दरिद्री बंधूंना जमिनीचें दान देण्यांत श्रीमंत जमीनदारांना आनंद वाटूं लागला आहे. हृदयपालट होऊन लाखो एकर जमिनीचें दान जमीनदारांनी स्वखुषीने ह्या यज्ञप्रसंगीं अर्पण केलेलें आहे. जगांतील ही एक अघटित आणि विज्ञानयुगांतील सत्य

अशी घटना आहे. भारताच्या पुण्यभूमींत ही घटना उद्भवली व विकास पावली. ह्या भूदान-चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबाजी आहेत. महात्माजींचे ते मानसपुत्र असून, शांततेच्या मार्गावर त्यांची दृढ श्रद्धा आहे. जमिनीचा प्रश्न शांततामय मार्गाने सुटण्यावरच आपल्या देशाची भावी सुखशांति अवलंबून आहे असा विनोबाजींचा विश्वास आहे. कम्युनिस्टांच्या तत्त्व-प्रणालीनुसार वर्गकलहच अशा रीतीची शोषणरहित समाजरचना निर्माण करूं शकेल ह्यावर विनोबांची मुळीच श्रद्धा नाही. हृदयपालट आणि विचारपरिवर्तन ह्यांमुळेच ही नूतन क्रांति शांततामय मार्गाने होऊं शकेल व एक अभिनव सांस्कृतिक समाजरचना घडून येईल. भगवान् बुद्धांनी दिलेला संदेश जसा सर्व जगभर पसरला, तसाच भूदानाचा संदेश जगभर पसरून अहिंसक मार्गाने आर्थिक विषमतेचा अंत होईल. म्हणून विनोबाजी म्हणतात, " जें काम भगवान् बुद्धाकडून ईश्वराने करवून घेतलें, तेंच आज तो माझ्या ह्या दुबळ्या हातांकडून करून घेऊं चाहतो आहे. हें माझें कामहि धर्मचक्रप्रवर्तनाचें आहे. बुद्धाच्या पावलांवर पावलें टाकीत हें धर्मचक्रप्रवर्तनाचें काम पुढे चालविण्याची माझी नम्र आकांक्षा आहे."

कोणत्याहि तऱ्हेच्या पाशवी शक्तीचा उपयोग न करतां किंवा सरकारी मदतीची अपेक्षा न बाळगतां शांततेने आणि हृदयपरिवर्तनाच्या मार्गाचा अवलंब करून भूदान–चळवळीचा संदेश आता खेडोपाडीं पोहचला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळालें; पण स्वातंत्र्योत्तर भारतांत विषमता वाढलेली पाहून विनोबांचें अंतःकरण तुटलें. पंचमहाभूतांपैकी पाणी, प्रकाश, हवा ह्या तत्त्वांचा वापर कोणीहि मानवाने केव्हाहि करावा, असें असतांना या तत्त्वांपैकीच 'एक' असणाऱ्या जमिनीची मालकी कांहीजणांकडेच काय म्हणून? 'जमीन ही माझी माता आणि मी तिचा पुत्र' अशी माझी संस्कृति असतांना दरिद्रीनारायणाला गरजेपुरती जमीन कां मिळूं नये? ह्या विचारांनी विनोबाजींच्या मनःक्षितिजावर वादळ माजविलें. पुरातन भारतांत जमीनदारीची प्रथा नव्हती. गांवांतील जमिनीवर एकाचा मालकी हक्क नव्हता. सर्वजण शेतांत खपत होते. प्रत्येकाचा वांटा प्रत्येकाला मिळत होता. लोक आनंदी होते. परंतु हें जीवन कालांतराने उध्वस्त झालें. खेडीं मोडत गेलीं. शहरें

वसलीं. जीवनाचा ओघ शहराकडे वळला. जमिनीवर मालकी हक्क प्रस्थापित होऊं लागला; आणि पंचतत्त्वांपैकी सर्वांच्या मालकीची असलेली जमीन मूठभर जमीनदारांच्या मालकीची बनली. गरीब श्रीमंत भेद निर्माण झाला. विषमता वाढली. तेलंगणांत तर ह्या विषमतेमुळे धुमाकूळ माजला. कम्युनिस्ट आपलें प्रतिसरकार तेथे स्थापूं पाहत होते. शेकडो लोकांची हत्या होत होती. जनता हवालदील झाली. स्वतः त्या भागांत जाऊन जनतेला अभय देण्याची विनोबाजींची तीव्र इच्छा होती. भारताचे पंतप्रधान पंडित नेहरु यांनीहि विनोबाजींना प्रत्यक्ष परिस्थितीचें अवलोकन करण्याची विनंती केली. त्यानुसार दि. १६ एप्रिल १९५१ ला 'साम्ययोगाच्या प्रयोगांत रमलेल्या ह्या ऋषीने' सर्वांचा निरोप घेतला. तेलंगणाचा मार्ग चालावयास प्रारंभ केला. अभय प्रवर्तनासाठी पदयात्रा सुरू झाली.

हैदराबाद सोडून विनोबाजी तेलंगणांत उतरले. श्रीमंत, गरिबांच्या साठी आपलें धन, बुद्धि व शक्ति खर्च न करतील तर त्यांना धोका आहे असा इषारा विनोबाजींनी आपल्या प्रवचनांतून लोकांना दिला. अंतःशुद्धि, बहिःशुद्धि, श्रम, शांति, समर्पण हीं तत्त्वें त्यांनी जनतेच्या मनावर ठसविलीं. गांवोगांव भूदान-यज्ञाचा हविर्भाग मागत समाजाची मनोवृत्ति पालटण्यासाठी आवश्यक नवविचार पेरीत विनोबाजी फिरत राहिले. सुमारें दोन महिन्यांच्या अवधींत साडेसहाशे लोकांनी तेराहजार एकर जमीन दान दिली. विनोबांच्या शांतिप्रवचनांनी लोकांच्या मनांत अद्भुत परिवतन घडवून आणलें. कम्युनिस्टांना जबरीने जें साधलें नाही तें विनोबाजींनी आपल्या केवळ पदयात्रेने घडवून आणलें.

तेलंगणानंतर उत्तरप्रदेश, बिहार, ओरीसा ह्या प्रांतांत बिनोबा व त्यांचे सहकारी ह्यांची पदयात्रा सुरू झाली. श्री. जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, शंकरराव देव ह्यांसारख्यांनी भूदान-चळवळीसाठी तूर्त आपणास वाहून घेतले आहे. 'भूदान-यज्ञाचा कार्यक्रम आमच्यापुढे ठेवून विनोबाजींनी आम्हाला नवजीवन दिलें' असे जयप्रकाशजींनी उद्गार काढले आहेत. इतकेंच नव्हे तर 'कांही दिवस शाळा बंद ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याने भूदान-चळवळींत आपला वांटा द्यावा' असें त्यांनी बजावलें आहे.

# भूदान–चळवळ

भूदानाची गंगोत्री आता शतमुखांनी देशांतील जनतेंत नवीन आशा निर्माण करीत आहे. भारताच्या जनतेचेंच नव्हे, तर जगांतील सर्व विचारवंतांचें लक्ष या चळवळीने आकर्षून घेतलें आहे. वैचारिक जगतांत त्यामळे मोठें वादळ निर्माण झालें आहे.

भूदान–चळवळ ही विनोबाजींनी पुरस्कारलेली एक नव तत्त्वप्रणाली आहे. विनोबांना भूमिदान हवें; पण भूमिदान देतांना त्या दानामागच्या भावनेचें त्यांना अधिक महत्त्व वाटतें. ते म्हणतात, 'दरिद्रीनारायणाला आपल्या कुटुंबांतला एक समजून त्याचा हिस्सा मला द्या. घरांत चार मुलें असतील तर दरिद्रीनारायण पांचवा मलगा समजून भूमिदान द्या. मी गरिबांचा आणि श्रीमंतांचा मित्र आहे. जी शक्ति प्रेमांत, मैत्रींत आहे ती द्वेषांत नाही. प्रेम आणि विचार यांच्या तोलाची दुसरी शक्ति जगांत नाही. श्रीमंतांनी दरिद्रीनारायणाची सेवा करण्याचे दिवस आता आले आहेत सेवेच्या जोडीला जर आम्ही जीवनाची शुद्धि करीत राहिलों तर ईश्वरी प्रकाशाचे आम्ही वाहक बनूं शकूं" असें विनोबाजींचें प्रतिपादन आहे. भूदान-यज्ञाची त्रिसूत्री विनोबाजींनी खालीलप्रमाणे मांडली आहे.

(१) "आमचा विचार समजून घेऊन जर कोणी जमीन दिली नाही तर त्यांत दुःख नाही. कारण त्याने आज न दिली तर तो उद्या देईल. विचारबीजें उगवल्यावाचून राहत नाहीत."

(२) "विचार समजून घेऊन आपला हविर्भाग कोणी दिला तर त्यांत आनंद आहे, कारण त्यामुळे सर्वत्र सद्भावना पसरेल."

(३) "विचार समजल्यावाचून दडपणामुळे कोणी जमीन दिली तर त्यांत दुःख आहे. कसेंहि करून जमीन मिळविणें हें भूदानाचें उद्दिष्ट नाही." म्हणून विनोबाजी म्हणतात, "जमिनीचें तसें मला फारसें महत्त्व नाही. लोक म्हणतात आम्ही जमिनीचे मालक आहोंत; पण हेच लोक मरून जातात, त्यांची माती होते, आणि जमिनींत मिसळून जाते. जमीन मात्र कायम राहते; आणि तरी ते म्हणतात आम्ही जमिनीचे मालक आहोंत. यासाठी मला जमिनीची कवडीइतकी किंमत वाटत नाही. तरीहि मी जी जमीन मागतों; ती प्रेमभावना वाढविण्यासाठी. लोकांनी प्रेमाने जमिनी

दिल्या ह्या गोष्टीला फार महत्त्व आहे." विनोबाजींनीच प्रचारलेलें हें भूदानाचें तत्त्व आहे. हिंदुस्थानांत एकूण तीस कोटी एकरांच्या आसपास जमीन आहे. प्रत्येक कुटुंबांत पांच भाऊ असतात. दरिद्रीनारायण हा सहावा भाऊ. त्याचा हिस्सा म्हणून पांच कोटी एकर जमीन हस्तांतरित करण्याचें भूदान–चळवळीचें उद्दिष्ट आहे.

भूदान–चळवळीचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. समाजाला कार्यप्रवृत्त करणारी भूदानासारखी व्यापक अशी सामाजिक व आर्थिक चळवळ या देशांत अजून झालेली नाही. भूदान–यज्ञाच्या मार्गानें जर एक नवीन सामाजिक पुनर्रचना करतां आली तर भारतांतले विचार सर्वत्र पसरतील ह्या नवविचारबीजांतूनच नवीन जग अंकुरित होईल. आज सारें जग मोठ्या उत्सुकतेनें या आंदोलनाकडे पाहत आहे. जपानपासून अमेरिकेपर्यंतचे परदेशी लोक ह्या आंदोलनाचें प्रत्यक्ष अवलोकन करून जात आहेत. असें हें विराट आंदोलन पंडित नेहरु म्हणतात त्याप्रमाणे "एका गुतागुंतीच्या प्रश्नाचा उकल करण्याचा एक असाधारण मार्ग आहे."

भूदान-चळवळ ही जमिनीपुरतीच मर्यादित नाही. तींत समाजाच्या कल्याणासाठी लोकांकडून स्वखुशीनें मिळणाऱ्या संपत्तीदान, जीवनदान, प्रेमदान, बुद्धिदान अशा तऱ्हेच्या देणग्यांचाहि समावेश होतो. भूदान कार्यकर्त्यांना जमिनीव्यतिरिक्त मिळालेला पैसा शेतीसाठी आवश्यक लागणाऱ्या गरजांसाठी खर्च होतो. खेड्यांतील निरक्षर लोकांना हे कार्यकर्ते साक्षर बनवीत आहेत. लोकांना एकत्र करून धार्मिक ग्रंथांचें वाचन, भजनें, भाषण इत्यादि मार्गांनी समतेचीं आणि बंधुभावाचीं तत्त्वें लोकांनी स्वीकारावींत असा त्यांचा निरलस उद्योग चालू आहे. ज्ञानज्योति खेड्यापाड्यांतून अखंड तेवत राहिल्या तर हृदयपरिवर्तन घडून येणें शक्य आहे. आणि एकदा हा मानसिक पालट घडून आला तर शांततामय मार्गानें होणारें सामाजिक परिवर्तन घडून येईल. रक्तरंजित क्रांत्या ह्या जगांत आजपर्यंत पुष्कळ झालेल्या आहेत. पण विनोबाजींचा साम्ययोगाचा हा प्रयोग यशस्वी झाला आणि ही शांततामय क्रांति घडून आली तर साऱ्या जगतांतून 'ॐ शांतिः शांतिः शांतिः' ची ललकारी निनादल्याशिवाय राहणार नाही.

# मराठी असे आमुची मायबोली : ४

> [ I am certain that the children of the nation that receive instructions in a tongue other than their own commit suicide. It robs them of their birth-right. A foreign medium means an undue strain upon the youngsters, it robs them of all originality.]
>
> — महात्मा गांधी

'मी दिलाचा मराठा आहे आणि माझी मातृभाषा मराठी आहे' असें सांगतांना प्रत्येक जातिवंत महाराष्ट्रीयाच्या अंतःकरणांत आनंदाच्या ऊर्मि उसळल्या पाहिजेत, डोळयांत स्वाभिमान प्रकट झाला पाहिजे; मातृभाषेच्या अपार प्रेमाने रसवंती फुलली पाहिजे आणि कृतींतून मायबोली-संबंधींचा आदर उमटला पाहिजे. आंग्लभाषा ही पंचखंडांतून बोलली जाणारी आणि साहित्याने कुबेरासारखी समृद्ध असली तरी माझ्या आईपासून मी जी भाषा शिकलों, पहिलाच वर्ण ज्या भाषेंतून मी उच्चारला त्या भाषे-संबंधींच मला प्रेम व ओढ पाहिजे. माझी आई दरिद्री असेल ! पण आई गरीब आहे म्हणून का कुणी आईचा त्याग करतो ? उलट, ज्या माझ्या आईची सर्वस्वी हेळसांड झाली तिच्या डोळयांतील आंसू बघून माझें मन तुटायला पाहिजे; अन्न देखील मला गोड लागायला नको. माझी आई आज हतभागिनी असेल ! पण एके काळची ती भाग्यशालिनी होती, 'शारदेचें लावण्यरत्नभांडार' तिने जगापुढे उघडें केलें होतें, 'अमृताच्या चुळा टाकीत' ती अवतरली होती हें लक्षांत घेऊन प्रत्येक मातृभक्त मुलाने आपल्या आईचें पांग फेडून, तिचें दारिन्द्य नाहीसें करून, अलंकारांनी तिला श्रीमंत बनविण्याची ईर्ष्या बाळगली पाहिजे. 'मातृभाषा आणि स्वातंत्र्य ह्यांतील एकच माग असा सवाल जर कुणी केला तर मी मातृभाषा प्रथम मागेन' असा डी. व्हॅलराने दिलेला जबाब जगप्रसिद्ध आहे. गेलेलें स्वातंत्र्य तलवारीच्या जोरावर प्रस्थापित करतां येईल; पण मातृभाषा का नष्ट झाली तर सर्वच ग्रंथ आटोपला ! दायीच्या दुधावर वाढलेल्या मुलाला आईच्या अंतरंगांतील आत्मीय भावनांचा का स्पर्श होणार आहे ? कुंडींत

वाढलेला खुरटा गुलाब आणि प्रचंड वटवृक्ष ह्यांत जो फरक तोच ह्या दोन मुलांत राहील. 'आई' ह्या शब्दांत जी जादू आहे, काळजाला हात घालून अंत:करण हलविण्याचें जें सामर्थ्य आहे तें का 'मदर' ह्या हाकेने गोळा होणार आहे ? म्हणून तर जननी आणि जन्मभूमि ह्यांची थोरवी स्वर्गा-पेक्षा अधिक मानतात. पण मायभाषेची थोरवी ह्या तिन्हीपेक्षा महत्तम आहे हें नि:संशय.

तसें पाहिलें तर माझ्या मराठी भाषेंत काय कमी आहे ? नवरसांनी दुथडी भरून मराठीची साहित्यगंगा आजपर्यंत वाहत आली आहे. 'विनिमया-करिता संस्कृत हीच काय ती एकमेव भाषा' ह्या पूर्वकालीन कल्पनेला पार लोळवून 'माझी मराठी भाषा देखील अमृतापेक्षा अधिक गोड बोलूं लागेल' असे आत्मविश्वासपूर्ण उद्‌गार प्रथम ज्ञानदेवांनी काढले; आणि 'मराठीच्या नगरींत ब्रह्मविद्येचा सुकाळ' केला. ज्ञानदेवांनी मराठीला ब्रह्मविद्येच्या सिंहासनावर नेऊन बसविलें. कालिदासाच्या उपमा, भारवीचा अर्थगौरव आणि दंडीचें पदलालित्य हे संस्कृत साहित्यांतले सर्व काव्यगुण एकट्या ज्ञानेश्वरींत एकवटले आहेत. ज्ञानेश्वरानंतर झालेल्या संतकवींनीहि आपआपल्या परीने मराठी साहित्याची उत्कृष्ट सेवा केली आहे. ज्याला ज्या रसाची आवड असेल त्याने त्या रसाचें आकंठ पान करून तृप्त व्हावें अशी मराठी आमच्या संत, पंत आणि पंडित कवींनी निर्माण केली. रसराज शृंगाराची तुम्हाला आवड आहे काय ? मग या, आणि रघुनाथपंडितांच्या नलदमयंती स्वयंवराख्यानांत अवगाहन करा. करुण आणि भक्तिरसाचें तुम्हाला वेड आहे काय ? मग नामदेव–तुकारामाची अभंगवाणी तुमच्या चित्ताचें पूर्णपणें समाधान करील. 'लोकोत्तर प्रसाद, दिव्य ओजस्विता, आणि सृष्टिसौंदर्याची अनुपम शोभा' तुम्हाला बघण्याची इच्छा आहे ना ? तर मुक्तेश्वरी भारतांत बुडी मारा. वीररसाची गोडी अनुभवावयाची असेल तर मोरोपंतांच्या आर्या आणि शाहीरांचे पोवाडे ऐका. रणभेरीचा निनाद आणि तलवारींचा खणखणाट कानीं यावा असें वाटत असेल तर समर्थांची ओजस्वी वाणी श्रवण करा. 'अमृतस्नानाने' जी रसवंती मस्त झाली आहे तिच्यांत खरोखर काय उणीव असणार आहे ? संत आणि पंतांच्या

पर्णकुटींतून आजच्या बंगल्यांत जरी आम्ही शिरलों तरी आमची प्रगति अभिमानास्पद नाही असें कोण म्हणेल? गेलीं कांही तपें ज्यांनी आपल्या लेखणीनें गाजविलीं ते 'मराठी भाषेचे शिवाजी' चिपळूणकर, साहित्यसम्राट केळकर, परांजपे, आपटे, फडके, खांडेकर इत्यादि कलावंत म्हणजे मराठी साहित्यभांडारांतील कोहिनूर होत. अशा या भाषेचें तेज पाहून फादर स्टीफन्ससारखे परकीय देखील लोभावले; व त्यांनी—

'पुष्पांमाजी पुष्पमोगरी—परिमळांमाजी कस्तुरी
भाषांमाजी साजरी—मराठिया'—

असे उद्‌गार काढले. परकीयांनाहि माझ्या भाषेने मोह घातला ह्या कल्पनेने कोणत्या मराठी भाषिकाची छाती रुंदावणार नाही?

अर्थात् सूर्याच्या प्रकाशांत वनस्पति अंकुरावी, चंद्राच्या प्रकाशांत चंद्रकांत द्रवावा, वसंतऋतूंतच कोकिळेला कंठ फुटावा हा जसा नियम; तसाच स्वातंत्र्याच्या काळांत स्वभाषेची वृद्धि व्हावी हा नियम आहे. मुसलमानी अमदानींत आमच्या भाषेची पिछेहाट झालेली आहे. अनेक अरबी, फारशी शब्दांची फौज मराठीच्या क्षेत्रांत घुसली. मराठीचें पावित्र्य त्यामुळे मंदावलें. भाषा कलाहीन बनली. धेडगुजरी झाली तोंड आल्यानंतर जिभेचा लोळागोळा व्हावा त्याप्रमाणे त्या वेळीं भाषेचें झालें. अनेक वर्षें मुसलमानांचा सासुरवास मराठीला सहन करावा लागला. त्यानंतर शिवशाही आणि शाहूशाहींत थोडा सुखाचा काळ गेला नाही तोंच ब्रिटिशांच्या सत्तेचें निशाण या भरतभूमींत रोवल्या गेलें. सत्तेबरोबरच भाषेचाहि अंमल जारी झाला. लॉर्ड मेकॉलेच्या आदेशानुसार आंग्लभाषा घरोघर आपले पाठ गाऊं लागली. ह्या विलायती भाषेने प्रथम अनेकांना भारले. अनेकांच्या मनावर 'ह्या बयेने' प्रथम ताबा मिळवला. न्हाव्याच्या दुकानापासून तो थेट उपहारगृहापर्यंत 'इंग्रजी-मराठीची मिसळ' खपूं लागली. गंगाजमनी शब्दप्रयोग झडूं लागले. 'रेडी ग, सॉरी अं, माझी वाईफ' इत्यादि शब्दप्रयोग 'टायमा'नुसार व्हावयास लागले. त्या वेळच्या न्यायालयांत जी मराठी बोलल्या जात होती त्यासंबंधीं चिपळूणकर लिहितात, "न्यायासनीं बसलेल्या अधिकाऱ्याकडून तर तिचा (मराठीचा) उच्चार

नीट होऊं नये. फार तर काय, पण मराठी भाषा जर मूर्तिमंत अवतरली तर सगळ्या कोर्टांवर बेअब्रू केल्याची फिर्याद तिला पहिल्याने करावी लागेल. तिच्या शब्दाचे, वाक्याचे, उच्चाराचे जे प्रत्यहि खून पडतात तितके खरे खून एका वर्षांत साऱ्या पृथ्वीवरहि पडत नसतील."

पण मराठीची ही शोचनीय अवस्था फार काळ टिकली नाही. 'विलायती वाघिणीच्या दुधावर पुष्ट' झालेले अनेक भरदार लेखक गेल्या पिढींत उदयाला आले. मराठी भाषेचा मोडलेला संसार त्यांनी मांडला. हरपलेलें साम्राज्य मराठी भाषाप्रभूंनी स्थापन केलें. अनेक नवीं दालनें साहित्यांत उघडलीं गेलीं. वाङ्मय समृद्ध झालें. आज स्वातंत्र्याची मंगल प्रभात झाली आहे. अशा वेळीं 'वचनिं लेखनींहि गिरा मराठी दिसो' असें मराठीमय आपण बनलों पाहिजे; आणि काव्यपंक्तींतच बोलायचें झालें तर–

"वेचीन वाणी हिच्या वर्णनीं मी अशी गाउनी गोड गाणीं सदा
ऐकूनिया स्फूर्ति खेळेल लोकीं पुन्हा लंघुनी जावया नर्मदा"

असा ध्यास आपल्या मनाला लागला पाहिजे आणि तें तेज आपण आपल्या भाषेंत आणण्याचा पराक्रम गाजविला पाहिजे. ज्या भाषेने उर्दू आणि इंग्रजी भाषा पचवून टाकली त्या भाषेला कोणत्याहि सार्वभौम भाषेची भीति बाळगण्याचें कारण काय?

●

## कमळा [रसावलोकन] : ५

कविवर्य 'बी' ह्यांची 'कमळा' म्हणजे 'नक्षत्रांची चटक फुलांची' टपोरी माळ आहे. ही कविता वाचतांना चहूंकडे 'अम्लान प्रतिभा कळ्या' उमलल्याचा भास होतो. ह्या गीतांत बाह्यसृष्टि आणि अंतःसृष्टि ह्यांचें अद्वैत इतकें मनोज्ञ साधलेलें आहे की, प्रत्यक्ष चित्रपटसृष्टि देखील त्यापुढे रुक्ष वाटावी. 'नभःशिलेवर चढत्या चंद्राची कोर चमकते' आहे, निसर्गाचा धडधडता प्राण अशा निशासमयीं निश्चल झालेला आहे, मात्र शिवनेरी किल्ल्यावरील प्रासादाच्या गवाक्षाचें दार उघडें आहे; व तेथे 'लावण्याची

किशोरगंगा ' अशी थोरातांची कमळा सचित बसली आहे. तिच्या अंगा-प्रत्यंगांतून सौंदर्य ' ओथंबून ओसंडतें ' की काय असा भास कवीला झालेला आहे. बी लिहितात–

' मुसावला नीलिमा तोंच ही नीलदेह रमणी
निळ्या सारणीमधे वाहतें मोत्याचें पाणी '

अशा तऱ्हेची आकाशींच्या चंद्रकोरीला लाजवील अशी तिची कांति व सौंदर्य आहे. कमळा म्हणजे सौंदर्याची जणूं पुनव. पण, संभाजीसारखा ग्रह आडवा आला आणि हां हां म्हणतां पूर्ण चंद्राला ग्रहण लागलें. ' विकसोन्मुख ' असें तिचें लावण्य. स्वर्गस्थ ज्योतींना लाजविणारा असा तिचा गुणप्रभाव. पण, संभाजीचा स्पर्श झाल्याबरोबर सारी सुभगता फुटलेल्या आरशाप्रमाणे छिन्नविच्छिन्न झाली. गतायुष्याचें एकेक पान तिच्या दृष्टीसमोरून सरकल्या जाऊं लागलें. प्रथम तिला ' थोरातांच्या पाक कुळाचे ' कीर्तिमंदिर समोर दिसूं लागलें. आणखी कांही पानें उलटल्या गेलीं. गांवाबाहेर संध्यासमयींची शोभा पाहत जणूं कमळा बसली आहे व इतक्यांत संभाजीची स्वारी तेथे आली असा देखावा तिच्या दृष्टीपुढे तरंगला. त्या वेळची बी कवींची बहारीची स्वभावोक्ति पाहा–

' अबलख वाजी फेस मुखीं उच्छृंखल गति त्याची
घामाने वर डबडबलेली मूर्ती स्वाराची
लाल नयन मुख लाल करीं समशेर लाल लाल
वेष शिकारी उन्मादें मन झालें बेताल '

आणि अशा बेभान स्थितींत संभाजीला कमळा दिसली. टपोर आणि उमलत्या कमळाच्या पाकळीपाकळींतून सौंदर्य ठिबकावें तसें तिच्या अंगांतून सौंदर्य गळत होतें. अशा वेळीं कमळाकडे पाहून भृंग वेडापिसा न झाला तरच नवल! कमळेवर संभाजीची दृष्टि जातांच क्षणांत तिला नजर लागली. संभाजी देहभान विसरला. विकारांच्या स्वाधीन झाला. ताडकन् त्याने घोड्यावरून उडी घेतली आणि कमळेचा हात धरला.

यानंतर कवींनी चितारलेला एकंदर प्रसंग अत्यंत हृदयंगम आणि हृदयविदारक आहे. प्रतिभा, रसोत्कर्ष, भाषा आणि भावना ह्या गुणांना

कवीच्या हातून मुक्तहस्ताने वाव मिळाला आहे. मोहाचा एकच क्षण ! खळ्कन् कांच फुटावी तसें कमळेच्या अब्रूचे शतशः तुकडे तुकडे झाले. अगोदरच संभाजीच्या 'त्या' जहरी डोळ्यांकडे पाहिल्याबरोबर 'घावरल्या रजनीची पट्कन् संध्या बनावी' तशी कमळा लालबुंद झाली. अशा घायाळ झालेल्या कमळेचा संभाजीने एकाएकी हात धरला व जेव्हा त्याचा अनिरुद्ध संचार सुरू झाला तेव्हा कवि [चिडून] लिहितात–

'हिरवे पिवळे लाल गुलाली रजनीचे रंग
पटपट बदलुनि निवळुनि झालें नितळ तिचें अंग'

कवीच्या वर्णनशैलींत कल्पकतेची बहार नाही असें कोण म्हणेल ?

गतजीवनाचीं पानामागून पानें उलटल्या जाऊं लागलीं. 'त्या प्रसंगानंतर' कमळा भानावर आली. काळी रात्र अधिक काजळी भासायला लागली. 'कडक तेज अनुभविलें प्रथमचि ज्योतीचें' अशा तऱ्हेचा विषारी अनुभव कमळेला आला. स्वप्नांत देखील कधी ज्या 'मराठमोळ्या' कमळेने 'वाईट चित्र' पाहिलें नाही त्या 'शुद्ध शालिन्य सगुणशाली' कमळेचें 'गोड स्वप्न' एका क्षणांत दग्ध झालें. स्वप्नाळू आशा जळून गेल्या. आशा-आकांक्षांची चिता पेटून तिच्यासमोर नाचूं लागली. बी कवींनी चितारलेला हा प्रसंग जीवाचा थरकाप करून सोडणारा आहे. त्यांचें 'हें मीलन' परमेशाचे हेर पाहत होते. तारे मिस्किलपणें हसत होते.

क्षणात हेंहि चित्र कमळेच्या नजरेसमोरून अंतर्धान पावलें. गतायुष्याचीं पुढचीं पानें उलटल्या गेलीं. संभाजीने कमळेला शिवनेरी किल्ल्यांत आणून ठेवलें, ह्या दृश्यावर तिची नजर स्थिर झाली. संभाजी राजांनी तिला 'राणी' बनविण्याचें आश्वासन दिलें. संभाजी म्हणजे शिवाजीचें खेळतें रक्त. तो आपल्या वचनाला जागेल हा तिला भरवसा. आणि ह्याच भरवशावर रम्य भावी कालाचें चित्र चितारीत कमळा आपले दिवस कंठूं लागली; पण दुर्दैवाने अखेर दावा साधला. दिलेलीं वचनें संभाजीच्या स्मृतींतून गळून पडलीं. शेवटी संभाजीची रखेली म्हणून त्या क्षात्रकन्येला राहणें प्राप्त झालें. कवि लिहितात—

'सांडुनि गेलें जल दुर्दैवी तसाच तान्हेला
काय होय त्या बहुमोलाचा पाचूचा पेला'

हेंहि चित्र कमळेसमोर उभें राहिलें आणि क्षणांत विरघळलें. तिचा जीव व्याकूळ झाला. भूत, वर्तमान आणि भविष्य काळचीं भूतें दृष्टीसमोर थैमान घालूं लागलीं. अंतरीची ज्वाला अधिकाधिक भडकूं लागली. 'विधिविरहित आलिंगन चुंबन देहाला घडलें' ह्या जाणिवेमुळे तिच्या हृदयाला टांचण्या बोचूं लागल्या. लोक भलभलते बोलत असतील ह्या विचारामुळे ती बेचैन झाली. 'पतिव्रतेचा दिमाख आता मी कसचा मिरविणार ?' म्हणून तिचा जीव तुटूं लागला. ती हताश झाली. प्राण नकोसे झाले, आणि ह्या शेवटच्या घटकेला आपल्या प्रेमळ आईची तिला आठवण झाली. 'आई, सगळं जग मला नांव ठेवेल. ठेवूं दे. पण तूं मात्र कुळबुडवी कारटी कशाला जन्माला आलीस असं म्हणूं नको. अंबेची साक्ष मी पवित्र आहे.' परंतु केवळ भावी ललनांनी कमळेने आपले प्राण 'चित्तशुद्धीच्या ढालेखाली' वांचविले असें म्हणूं नये म्हणूनच मी हें शरीर ह्या खोल दरींत झोकून देत आहे. कवि लिहितात—

'क्षणैक हल्ली शरच्चंद्रिका पुनश्च सहित वन
क्षिप्र अनन्तीं नितान्त विश्व प्राण होय लीन'

हा अभागी कमळेचा शेवट पाहून कुणाचे डोळे ओलावणार नाहीत ? कमळा हें काव्य म्हणजे प्रत्यक्ष करुणरसच. उपमाउत्प्रेक्षांचें अतीव सौंदर्य त्यांत आहे. कवीच्या प्रतिभेला येथे भरती आलेली आहे. प्रदीर्घ समास व संस्कृत प्रचुरता हे क्षुल्लक दोष ह्या काव्यांत दाखवितां येतील; पण गुणांचें प्राबल्य इतकें आहे की, 'दोषांचेहि गुण करणारें' असें हें काव्य आहे. ह्या काव्याचें सौंदर्य पाहून कमलाची कांति न हरपली तरच नवल ! !

●

# माझी आई : ६

God could not be every where and therefore he made mothers. —'Anon'

Mother is the name for God in the lips and hearts of little children. —'Thackery'

'आई'!

माझी आई! आईचें स्मरण झालें म्हणजे मी अति व्याकूळ होतो. माझी 'वात्सल्यसिंधु आई' मूर्तिमंत माझ्या डोळ्यापुढं उभी राहते. ठेंगणी मूर्ति; कष्टांनी काळवंडलेली; संसाराचा भार ओढतांना शेवटीं थकलेली माझी आई जणू माझ्या पाठीवरून हात फिरवून सकाळच्या झोपेंतून 'बाळ, कितीरे झोपलास' म्हणून उठवल्याचा भास मला माझ्या जीवनांत अनेकदा झाला आहे. स्वप्नांतल्या त्या स्पर्शानं एका अननुभूत आनंदाच्या लहरी माझ्या सर्वांगांत खेळतात; पण क्षणार्धांत हा भास होता असं जेव्हा मला कळून चुकतं तेव्हा आईच्या दर्शनासाठी आतुर झालेलं माझं मन हिरमुसलं होतं. डोळ्यांत आसवं उभीं राहतात. तिच्या आठवणीनं मी अस्वस्थ होऊन जातों. भावना अनावर होतात. मी मुका बनतों. कुणाशीं न बोलतांच तो दिवस घालवितों. आज माझ्या वयाची पंचविशी उलटली; माझ्या अवखळ भावनांनाहि थोडीफार स्थिरता आली. पण आईची स्मृति झाली की मी माझा राहत नाही. अंतरंगांतील भाव द्रवरूप बनतात आणि आईच्या चरणावर लोटांगण घालण्यासाठी अश्रूंच्या रूपानं आवेगानं डोळ्यांवाटें बाहेर पडतात.

'न मातुः परं दैवतम्' असं संस्कृत वचन आहे. आई म्हणजे घराचा स्वर्ग. घरांतील चालती बोलती माया. ज्या मुलांना आईनं भरवलं, लहानाचं मोठं केलं, शीण सोसला, कष्ट उपसले, अनेकवार दृष्ट काढली, तीं मुलं धन्य होत. अपार भाग्यवंत होत. आई म्हणजे देवाची दयाच. ही दया, हें प्रेम, ज्यांनी अनुभवलं त्यांना दुनियेचं साम्राज्य उपभोगतां आलं नाही म्हणून वाईट वाटण्याचं कारण नाही. प्रत्यक्ष भगवंतांनीच आईचं रूप घेऊन

ज्यांच्यावर मायेचं छत्र धरलं आहे त्यांना आणखी काय हवं? म्हणून तर आईचं प्रेम म्हणजे सुखाची परमावधी. आनंदाची सावली. मायेचा हात फिरविण्यासाठी आणि कीर्तीचं कौतुक करण्यासाठी ज्यांना माता लाभली ते शिकंदरापेक्षाहि अधिक भाग्यवान समजले पाहिजेत. हत्ती ज्यांच्या दारीं झुलताहेत, छत्रचामरांनी जे सज्ज आहेत, मुजरा स्वीकारतांना ज्यांची मान दुखली आहे, नजराणे घेण्याचाहि ज्यांना शीण आला आहे, अशा सम्राटांना मातेच्या प्रेमाचा अनुभव नसेल तर ते दरिद्री म्हटले पाहिजेत. मानमरातबानं कां कुठं पोट भरतं आणि मनाची भूक शमते? तसं पाहिलं तर राजेश्वरांना काय कमी असतं? सत्तेचं सामर्थ्य त्यांच्या मुठींत; सुखाच्या पायघड्या त्यांच्या पायापाशीं; सेवकजन हात जोडून सदैव उभे; लक्ष्मीचा सारा खेळ त्यांच्या प्रासादांत; दौलतीच्या बळावर वाटेल तीं सुखं खरीदण्याची त्यांची उमेद; पण अशा राजेश्वरांनी पैशाच्या राशीच काय पण दौलतीचा हिमालय जरी ओतला तरी आईची ममता त्यांना लाभेल काय? फार तर हिरेमाणकांच्या तेजांत त्यांनी राजमंदिरांत व्यवहार करावेत; पण मातेच्या प्रेमाच्या चांदण्याचा स्पर्श त्यांच्या अंतःकरणाला कुठला व्हायला? 'बाहेर वैभवाची दिवाळी आणि आंत होळी' असं त्यांचं जीवन.

आणि आईची महती आहेहि तशीच. पुत्र कसाहि असो, आईजवळ भेदभाव नाही. प्रेम करायचें हें एकच तिला ठाऊक. 'पुत्राचे सहस्र अपराध— माता काय मानी तयाचा खेद' अशी तिची वत्सलता. आपल्या मुलाचं कल्याण व्हावं म्हणून तुळशीवृंदावनापाशी आईच मोठ्या ममतेनं 'शुभं करोति कल्याणम्' हा चरण मुलाला शिकवते. वृंदावनापाशी लावलेल्या निरांजनाचं पावित्र्य तिच्या प्रत्येक कृतींतून झरतं. आपल्या मुलाच्या डोळ्यांत ती उद्याचा भविष्य काळ पाहते. 'होशील कां तूं उद्याचा जवाहर मला वाटे' ही तिची पुत्रासंबंधीची आशा असते.

माता ही देवतासदृश असल्यामुळेच ती अनेक कवींच्या स्फूर्तीचा विषय झाली आहे. अनेक कलावंतांच्या प्रतिभेचं सामर्थ्य बनली आहे. लेखणीला तिच्यामुळेच तेज चढलं आणि पराक्रमाला धार आली. चक्रवर्ति नेपोलियन म्हणत असे, 'जगांतील सर्व माता एका पारड्यांत आणि माझी

माता एका पारड्यांत तोलली तर माझ्या आईचंच पारडं जड होईल." नेपोलियनची आईवर केवढी ही श्रद्धा! 'माझ्या आईच्या डोळयांतला एक अश्रु जर माझ्या मागे गळला तर मी मिळवलेलं हें साम्राज्य आणि जगज्जेता ही माझी किताबत मातीमोल होय' असा जबाब जग जिंकायला निघालेल्या शिकंदरानं मॅसिडोनियाच्या आपल्या मंत्र्याला कळवला होता. जिजामातेनंच छत्रपति शिवाजीला स्वातंत्र्याकरता तयार केलं आणि मातेचा आशीर्वाद घेतल्यानंतर एक वेगळच तेज छत्रपतींच्या डोळयांत लकाकत असे हें इतिहासप्रसिद्ध सत्य आहे.

अशी माता ज्याला लाभली त्याला ह्या जगांत आणखी काय मिळायचं राहिलं? कैलास आणि वैकुंठहि त्याच्या सुखावरून ओवाळून टाकावेत असा सुखी तो मानला पाहिजे. 'मांगल्याचं माहेर, धरेचं औदार्य, ऋषीमुनींचं अद्वैत, चंद्रिकेची दृष्टि, सागराची गभीरता' ह्या सर्व गुणांची एकवट ज्या मातेच्या ठिकाणीं एकवटली ती माता म्हणजे ह्या भूतलावरील प्रेमाचं निरागस स्वरूपच होय. प्रत्यक्ष देवाचीच ती हालचाल. अशा मातेच्या कुशींत प्रसंगीं ज्यांना डोकं ठेवतां येतं तें खरोखर धन्य होत.

●

# चांगलीं पुस्तकें : ७

'A Good Book is the Precious life-blood of a master spirit'.

—Milton

'ज्ञानासारखें पवित्र ह्या जगांत दुसरें काय आहे?'— अर्थात् कांही नाही. ज्ञान जर पवित्र, तर शंकराच्या जटेप्रमाणं ज्ञानगंगा धारण करणारें पुस्तक किती पवित्रतम असेल? भगिरथानं आपल्या अचाट सामर्थ्यानं स्वर्गीय गंगा इहलोकीं आणली. तिनं उद्धाराचं कार्य केलं. जगाचा दाह शमविला. ग्रंथांतून प्रकट झालेल्या प्रतिभावंतांच्या ज्ञानगंगेमुळेंहि अनेकांना शांति लाभली. समाधान मिळालें. जर्मन कवि गटे तर शाकुंतल डोक्यावर घेऊन आनंदानं नाचला. भवभूतीच्या करुण रसानं अनेक रसिक अंतःकरणं

द्रवलीं. शेक्स्पिअरच्या नाटकांनी अनेकांना वेड लावलं. 'श्यामच्या आईनं' घरोघर प्रेमाची शिकवण दिली. महात्माजी गीतेच्या वाचनानं कर्मयोगी बनले. रामायण–महाभारताचं असामान्यत्व आजच्या विज्ञानयुगांतहि आपण मानतों. अनाथांची मायमाउली ज्ञानेश्वरी आजपर्यंत असंख्य वारकरी लोकांना समाधान देत आली आहे. ह्या साऱ्या ग्रंथांत अशी कोणती जादू आहे की त्या ग्रंथांनी कालावरहि विजय मिळवावा ? कोणत्या कारणामुळे हीं सर्व पुस्तकें मृत्युंजय बनलीं आहेत आणि चिरंतन पदाचा लाभ त्यांना झाला आहे ?

कारण उघडच आहे. देहाला मरण असलें तरी आत्मा मात्र अमर आहे हें चिरंतन तत्त्व आहे. अलौकिक प्रतिभावंतहि मरणाधीन असला तरी त्याचे ग्रंथ दिव्यतेचा साक्षात्कार घेऊन प्रगट झाल्यामुळे अमर झालेले असतात; त्रिकालाबाधित असतात. वाल्मीकि, व्यास, ज्ञानेश्वर, टॉलस्टॉय, टागोर इत्यादि साहित्यसम्राट मरूनहि अमर कशामुळे बनले ? तर असंख्य जीवांना त्यांतील तत्त्वामुळं समाधान मिळालं, आनंदाचा लाभ झाला म्हणून. असे हे ग्रथ म्हणजे जीवनाच्या सौंदर्यानं नटलेले, प्रतिभेच्या उन्मेषानं टवटवलेले, आत्मानुभवाच्या जाणिवेनं ओथंबलेले, कलेच्या विलासानं फुललेले आणि सत्याच्या अधिष्ठानानं पवित्र झालेले असतात. तुकारामाच्या अभंगावर आपली दृष्टि रोखली तर मी काय म्हणतों ह्याचा अनुभव येईल. अभंगवाणींतून प्रत्यक्ष तुकारामच आपल्याशीं बोलत आहे आणि एका महान् आत्म्याचा साक्षात्कार आपणांस घडत आहे असं नाही का वाटत आपल्याला ?

अमोल ग्रंथ वाचतांना हरघडी ही जाणीव आपल्याला होते. नव्हे, ती व्हावयालाच पाहिजे. असा ग्रंथ म्हणजे थोर अंत:करणांतून पाझरलेला जीवनरसच असतो. अशाच ग्रंथांचं विद्यार्थ्यांनी सदा अवलोकन केलं पाहिजे; प्रयत्नपूर्वक त्यांचा अभ्यास केला पाहिजें; आणि त्यांतील तत्त्वें आत्मसात् करून तीं आचरणांत आणण्यासाठी झटलें पाहिजे. विद्यार्थीदशा ही जीवनांतील एक मोलाची अवस्था आहे. ह्याच अवस्थेंत बरेवाईट संस्कार मनावर घडत असतात; स्वभावाचा बनाव बनत असतो; संवयीची घडण होत असते. अशा वेळीं नीट संवयी लागण्यासाठी, नेटके संस्कार होण्यासाठी आणि

योग्य स्वभाव बनण्यासाठी विद्यार्थ्यांनी ग्रंथ पारखून वाचले पाहिजेत. वयानुरूप वाचनाकरिता कोणतीं पुस्तकें निवडायचीं ह्यासंबंधीं जागरूक राहिलें पाहिजे. अनेक सामान्य पुस्तकाचं वाचन करण्यापेक्षा एका असामान्य पुस्तकाचं पारायण करणं केव्हाहि श्रेयस्कर ठरतं. सर्वसाधारण पुस्तकें हीं पुष्कळ वेळा आपली करमणूक करतील; पण त्यापायी आपण आपला किती वेळ वाया घालवितों याचाहि विचार आपणांस करावयास नको काय? पुष्कळांना रहस्यमय कथांचें अथवा चटकदार गोष्टींच्या वाचनाचें वेड असतें; पण केवळ अशा पुस्तकांच्या वाचनांत जर आपण आपली अमोल घडी घालवली तर आपल्या जीवनाची उधळपट्टी व्हायला कितीसा उशीर लागणार? म्हणून, वाचावयास जीं पुस्तकें घ्यावयाचीं तीं परिश्रमपूर्वक पारखून घ्यावयास पाहिजेत. त्याचप्रमाणे पुस्तकाच्या योग्यायोग्यतेचा विचार करून कोणतें पुस्तक एकदा व कोणतें अधिक वाचावयास पाहिजे त्याचाहि अंदाज घेतां आला पाहिजे. वर्तमानपत्रें सारखीं चाळत बसणें आणि मासिक पुस्तकांचें फिरून फिरून वाचन करणें हें कितपत शहाणपणाचें ठरेल? आणि ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ एकदा वाचून हातावेगळा केला तर त्यांतील तात्त्विक विचार कितपत आपल्या पचनीं पडूं शकतील?

तेव्हा पुस्तकांची नीट निवड झाल्यानंतर उत्तम ग्रंथांचं वाचन वारंवार व्हावयास पाहिजे. अशा ग्रंथांच्या वाचनाने आणि मननाने मनुष्य उदात्त बनतो. ज्ञानाचे संस्कार अंतःकरणांत जिरत जातात. मनुष्याच्या रीतिरिवाजांतून, वागण्याच्या पद्धतींतून ते उमटतात. ह्या संस्कारामुळे बोलण्याला आणि वागण्याला एक प्रकारची धार येते; कृतींत डौलदारपणा दिसतो. म्हणून तर सद्ग्रंथसहवास हा मित्रसहवासापेक्षा अधिक श्रेष्ठ मानला आहे. कारण आज ह्या जगांत खरं मित्रत्व लाभणं दुर्लभ झालेलं आहे. पाऱ्यासारखीं चंचल मनं मित्रत्वाच्या नात्यानं एकत्रित जुळलीं तरी कोणत्या घटकेला तीं विचलित होतील ह्याचा नियम नसतो. अनेकदा 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतु हलाहलम्' अशा तऱ्हेची दुटप्पी वृत्ति आपल्या अनुभवास येते. जग हें असें असतांना आपल्याला खऱ्या मैत्रीचा लाभ होईलच हें कुणी सांगावें? जीवनांतील ही उणीव मात्र ग्रंथ भरून

काढतात. त्यांचा सहवास आपल्याला आनंद देतो. त्यांची सोबत आपल्याला चंद्रप्रकाशाप्रमाणं सुखदायी वाटते. आपल्या आयुष्याच्या अंधारमय मार्गावर प्रकाशकिरणें उधळण्यासाठी सूर्याप्रमाणं ते आपल्या मदतीला येतात. म्हणून तेच आपले ह्या जीवनांतील खरे सोबती होत. आपली शक्ति, संपत्ति, समाधान आणि स्फूर्ति म्हणजे आपले ग्रंथच होत खरा मित्र देखील ह्यापेक्षा आपल्याला अधिक काय देऊं शकतो ?

●

# जनसेवा ही प्रभुसेवा : ८

' God is Love and he that dwelleth in Love dwelleth in God and God in him. '

हिरण्यकशिपूने प्रल्हादाला प्रश्न केला, ' बोल, या खांबांत आहे तुझा नारायण ? '

' जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं मी नारायणच पाहत आहे ' असं प्रल्हाद उत्तरला ? '

लागलीच हिरण्यकशिपूची गदा खांबावर आदळली. नरसिंहमूर्ति प्रगट झाली. दैत्याचा नाश झाला. भक्ति फळाला आली. सेवेचं सार्थक झालं.

परमेश्वर सर्वत्र आणि सर्वज्ञ आहे ही गोष्ट वरील दाखल्यावरून सिद्ध होते. परमात्मा सृष्टीहून वेगळा नाही. भूतमात्राच्या ठायीं तो नटला आहे. अनेक रूपानं सृष्टींत त्याचा विलास झाला आहे. खरे भक्त सृष्टीशीं एकरूप होतात. भूतमात्रावर प्रेम करतात. सगळीकडे त्यांना परमतत्त्व दिसतें. सेवेनं ते परमेशाला आपलंसं करून घेतात.

' देव भावाचा भुकेला ' असं आपण मानतों. भाव म्हणजे प्रेम; आणि प्रेम म्हणजे सेवा. प्रेम आणि सेवा ह्या गोष्टी भिन्न नाहीत. आईवर आपण प्रेम करतों म्हणजे काय करतों ? तर तिची जीवाभावाने सेवा करतों. सेवेंतून प्रेम प्रगट होतें. ' प्रेम हें सदैव राबत असतें. ' पुंडलिकानं आईबापांची अखंड सेवा केली. त्याची सेवा म्हणजे जिव्हाळ्याची ईश्वरभक्तीच; पण त्या महान्

सेवेमुळं प्रत्यक्ष परब्रह्म पुंडलिकाचे भेटीसाठी धावून आलें आणि विटेवर उभें राहिलें. आईवर जसें आपण प्रेम करतों तसेंच परमेश्वरावरहि करतों. त्याची भक्ति करतों. कुणी नामसंकीर्तनानं ईश्वराला आळवतात. योग-साधना करून योगी परमेश्वराची उपासना करतात. घरादारावर तुळशीपत्र ठेवून कुणी संन्यासी बनतात. कुणाला हें जग सोडून हिमालयांतील शांततेंत शंकराची आराधाना करावीशी वाटते. प्रत्येकजण आपल्या आवडत्या मार्गाचें अवलंबन करतो. उपासतापास करून परमेश्वरप्राप्तीसाठी धडपडतो. परब्रह्माला कवटाळण्यास अधीर होतो.

पण सृष्टीहून वेगळा नसणारा आणि भूतमात्रांत प्रगट झालेला परमेश्वर आपणांस कसा प्राप्त होईल ? सृष्टीला तोडलें आणि भूतमात्राला सोडलें तर परमेश्वराची प्राप्ति होईल का ? अर्थात् होणार नाही. ही सृष्टि म्हणजे परमेश्वराची माया आहे. या मायेंतहि ईश्वरी अंश आहेत. 'पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे' अशी पूर्णाकडे जाण्याची जगाची धडपड चालूं आहे. सूर्य, चंद्र, सरिता, पर्वत, मेघ, धरा, वृक्ष ह्या सर्व गोष्टी म्हणजे ह्या सृष्टींत प्रगट झालेला परमेश्वरी विलासच आहे. मानवजातीला 'प्रेमाचे पाठ' शिकवण्यासाठी आणि सेवाभावानं जग फुलवण्यासाठीच ह्या गोष्टींचें अवतारकार्य आहे. दुसऱ्याला जगवण्यासाठी सूर्य स्वतः जळतो. संतप्त जगावर अमृतमय किरणांचा वर्षाव करण्या-साठी कलेकलेनं चंद्र वाढतो. जगाचें जीवन बनावें आणि पापताप हरण करावें ह्यासाठीच सरितांची सारखी धावपळ सुरू असते. तापलेल्या धरणीवर 'जीवनसर्वस्व' अर्पून तिला शांत करण्यासाठीच मेघ मंत्रघोष करतात; आणि ही धरणी एवढी तापते ती कशासाठी ? तर प्राणि-मात्रांच्या तोंडांत अन्नाचे घास पडावे म्हणून. हे विशाल पर्वत ! देवाची दयाच जणू पर्वताच्या रूपानं अचल उभी आहे असं वाटतं. पृथ्वीसाठी स्वतःची सारखी झीज सोसून कसदार गाळाची देणगी अर्पण करण्यांत पर्वताची 'उभी' हयात जात आहे. वृक्षांचेंहि तसेंच. परोपकारासाठी अखंड तत्पर असलेले जणूं हे संतच. ते छाया देतात; फळांनी भारावतात; परिमळानं दरवळतात. 'मला जाळा, पण तुम्ही जगा' असं म्हणतात. ह्या सृष्टींत

सगळीकडे ही देवाची करुणा भरली आहे. सेवा चालली आहे. तें प्रेम आणि ती सेवा आपण शिकलों तर परमेश्वराच्या स्वरूपाचं ज्ञान आपल्याला झालं असंच म्हटलं पाहिजे.

'भूतांची दया हें भांडवल संता' असं सांगून जे 'रंजले, गांजले आहेत अशांना आपलं मानणारा जो असेल' तो संतच आहे; प्रत्यक्ष भगवंताची मूर्तीच आहे असं तुकाराम आपल्या अभंगवाणींतून सांगतात. भूतमात्राची सेवा केल्यानं परमेश्वराच्या सेवेचंच पुण्य लाभतं असंच तुकारामांना म्हणायचं आहे. केवळ ईश्वराचें नांव घेऊन जर कुणी ईशसेवा करूं म्हटलें तर ती बहुधा नांवाचीच सेवा होण्याचा संभव असतो. हें जग पापतापाने भरलेलं आहे; दुर्जनांनी वेढलेलं आहे. म्हणून जगावर रुसून हिमालयांतल्या एकांतांत जाऊन आपण बसलों तर जगनिर्मात्या परमेश्वराला तें रुचेल काय? ज्याने जग निर्माण केलें त्या जगावर रागवावयाचें म्हणजे परमेश्वरावरच रागावण्यासारखें आहे. जगांत पाप आहे ना? मग दूर रानींवनीं जाऊन बसल्यानंतर तें पाप नाहीसें होईल काय? आपल्या पावित्र्याच्या तेजानंच तें पाप आपल्याला जाळलं पाहिजे. दिवा लावला म्हणजे अंधार पळतो ना? तसंच आहे हें. दुर्जनाला घाबरून पळत सुटणें म्हणजे शुद्ध भ्याडपणा झाला. दुर्जन ही संतांची कसोटी आहे. कसोटीवर सोनं घासल्याशिवाय सोन्याचा कस कळत नाही. दुर्जनाशीं वागणं त्रासदायक असेल; पण जगांत त्रासाशिवाय काय आहे? जनताजनार्दनाची अखंड सेवा करणं हीच ह्या जगांतील खरी पूजा आहे. ह्याच पूजेनं परमेश्वर अनेकांना वश झाला आहे. 'वनवासी फूल' म्हणून टिळकांची कविता आहे. त्या कवितेंत जगावर रुसून रानांत संन्यस्त वृत्तीनं राहणाऱ्या फुलाला उद्देशून कवि म्हणतात--

'चल जगतीं तूं, रम उद्यानीं, भिऊं नको जगताला
सेव जनाला, तेणे होशिल मान्य, फुला! देवाला'

जनसेवा करण्याचा कवीने फुलाला उपदेश केलेला आहे. 'दीपज्योतीस' ह्या कवितेंतहि कविवर्य 'बी' नी 'सोन्यासारखें आपलें शरीर पाषाणमूर्तीपुढे जाळणाऱ्या मुग्ध विधवेला गुन्हेगार ठरविलें.' 'Abou Ben Adhem' ही सर्वपरिचित इंग्रजी कविता आहे. अबू आपला सर्व काळ जनसेवेंत घालवी.

ईश्वराची पूजाअर्चा करायला त्याला वेळ कुठला? पण ईश्वराचें नांव न घेतांहि ईश्वरभक्तांच्या यादींत अवूचें नांव पहिलेंच निघालें. जनता-जनार्दनाला आपण आपलीं सर्व कर्मे अर्पण केलीं की प्रभुपूजा होते. प्रभु-पूजेसाठी इतर धडपड कशाला? जगावर आपण प्रेम केलें; जगासाठीं कष्ट उपसले म्हणजे परमेश्वराची सेवाच झाली. फ्लॉरेन्स नाइटिंगेल रात्रीं-अपरात्रीं रोग्याची शुश्रूषा करी. जखमा बांधी. इतरांनी बरं व्हावं म्हणून ती जगली. अशा व्यक्तीबद्दल परमेश्वराला आदरच वाटणार नाही का?

संत ज्ञानदेवांना लोकांनी वाळीत टाकलें. ज्ञानेश्वर जगावर रागावले नाहीत; तर सामान्य जनांना 'अमृतानुभव' सांगण्यासाठी ते जगले. समत्वाचें आचरण आणि भूतमात्रावर दया करण्यासाठीं एकनाथांचा अवतार झाला. धर्माचें खरें स्वरूप लोकांना कळावें म्हणून तुकारामांच्या आचरणांतून धर्म प्रगटला. मोडलेलीं तीर्थक्षेत्रें आणि लोकांचे भ्रष्ट झालेले संसार मांडण्याकडे समर्थांनी आपलं आयुष्य वेचलं. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, कर्वे यांनीहि अनंत हाल सोसले; पण जनसेवा सोडली नाही. महात्माजींचें अवतारकार्य तर आपल्या डोळ्यांसमोर ताजें आहे. अखेरच्या क्षणापर्यंत सेवेचं व्रत! महात्माजींच्या रूपानंच सेवा भारतांत नांदली. ह्या थोर विभूतींकडे पाहून जगावर प्रेम करण्यास आपण शिकलें पाहिजे; सेवाधर्म स्वीकारला पाहिजे. यापेक्षा प्रभूची आणखी चांगली सेवा कोणती?

'Love Conquers all—
Let us too yield to love' हेंच खरें.

# माझें घर : १

‘ जगीं उपमा कोणती त्या गृहातें ’

माझें घर! दोनच शब्द; पण किती अपार जादू भरली आहे ह्या दोन शब्दांत! ह्या जादूमुळेच तर एखाद्या राजप्रासादापेक्षाहि माझी झोपडी मला बहुमोलाची वाटते. अपार वैभव, सौंदर्याचा विलास, अमर्याद शोभा, लोळण घेणारी संपत्ति, राजेंद्राला मिळणारा मानमरातब ह्या सगळ्या गोष्टींना प्रासादांत खरोखर काय कमी आहे? अद्यावत् सुखसोयींनी राजवाडा गजबजून गेला असेल. कोकिळकंठांतून निघालेल्या संगीताच्या आलापांनी श्रवणसुखाला जिथं भरती आली असेल आणि मुजऱ्याकरिता जिथं दासदासी जागोजाग उभ्या असतील असा राजवाडा मला आवडत नाही. माझी आई ज्या पर्णकुटींत राहते ती जागा मला लाख मोलाची वाटते. माझ्या शैशवांतील स्मृति ज्या झोपडीला चिटकून बसलेल्या आहेत ती माझी झोपडी माझ्या अंतरंगांत कायमचं घर करून बसली आहे. माझ्या घरांत मी स्वतंत्र आहे. राजवाड्यांत कदाचित् माझी ही स्वतंत्रता गुदमरून जाईल. तिथला रमणीय पण निर्जीव कलाविलास मला बघवणार नाही. केवळ श्रीमंतांच्याच वर्दळीमुळं मला तिथं चुकल्यासारखं वाटेल. राजेसाहेबांचा कुर्निसात स्वीकारण्याची ती ऐट माझ्या दृष्टीला बोचक होईल. ‘ मला तुमच्यापेक्षा वेगळा माना ’ ह्या त्यांच्या भावनेनं माझी त्यांच्या संबंधीची आपुलकीची भावना नष्ट होईल. दिसायला डोलदार, पण ज्यांतून प्रेमाचा एकहि बिंदु पाझरत नाही, अशा वागण्याच्या रीतीभातीमुळं क्षणभरहि मला तिथं राहावसं वाटणार नाही. कागदी फुलं दिसायला सुबक दिसलीं म्हणून खऱ्या फुलांचा रस आणि सुवास त्यांत निर्माण का होणार आहे?

माझं घर! घर कसचं, एक चंद्रमोळी झोपडी. इंद्राच्या ऐरावताची आणि गवळ्याच्या म्हशीची तुलना का होणार आहे? तरी पण मला वाटतें की, माझी झोपडीच बरी. माझ्या मनांत कधी कधी येतं की, कविवर्य दत्तांना आमच्या झोपडीकडे पाहून तर ‘ नीज नीज माझ्या बाळा ’ ही कविता स्फुरली नसेल ना? माझं घर म्हणजे मूर्तिमंत दारिद्र्याची जागती

ज्योत. पण असं आहे तरी त्या माझ्या घराबद्दल मला अभिमान आहे. सगळं 'माझेंपण' ह्याच चंद्रमौळी घरांत एकवटलं आहे. ह्याच पर्णकुटींत आईनं मला 'शुभं करोति' म्हणायला शिकवलं. रामरक्षेची संथा दिली. निरांजनाप्रमाणं जगण्याचा मंत्र दिला. आज माझे बाबा ह्या जगांत नाहीत; पण दारिद्र्यांतहि जगण्यांत मौज आहे ह्याचे संस्कार त्यांच्यामुळेच माझ्या भावनाप्रधान मनावर घडलेले आहेत. प्रसंगीं अर्धपोटीं राहून त्यांनीच माझं शिक्षण पुरं केलं. माझ्या वडिलांच्या यातना ह्या घरानं पाहिल्या. माझ्यासाठी त्यांनी काय करायचं ठेवलं? मी मोठं व्हावं, नांव मिळवावं म्हणून माझी आई आणि बाबा ह्याच घरांत चंदनाप्रमाणं झिजले आहेत; उदबत्तीप्रमाणं जळले आहेत. एखादे वेळीं माझ्या नजरेंत उमटणाऱ्या खिन्नतेमुळं माउलीनं मला पोटाशीं घेतलं, कुरवाळलं आणि माझ्या सुखासाठी आपल्या जीवाचं रान केलं. इतकीं वर्षे लोटलीं; पण त्या स्मृति अजून ताज्या आहेत. त्या स्मृतींना पारिजातकाचा सुगंध आहे. याच घरांतून माझी आक्का प्रथम सासरीं गेली. तो प्रसंग मला आजहि चांगला आठवतो. घर सोडताना तिनं ढाळलेले अश्रू माझ्या डोळ्यांत आजहि तरळून राहिलेले आहेत. त्या प्रेमाश्रूंनी पुनीत झालेलं हें माझं घर आहे. मग भूपतीच्या गृहापेक्षाहि तें मला भव्य आणि उदात्त कां वाटू नये?

घर म्हणजे खरोखर आपलेपणाची एक भावना आहे. किंमत देऊनहि आईचं प्रेम विकत घेतां यायचं नाहीं; तसं घरांतील 'माझेंपण' पैसे खर्च करूनहि आपणाला मिळणार नाही. 'माझेंपण' ही कांही बाजारी वस्तु नाही. दगड, विटा, चुना, माती ह्या वस्तूंनी घर निर्माण होईल; पण आपुलकी निर्माण होणार नाही. केवळ ह्या बाह्य वस्तूंमुळेच माझेंपणाची भावना निर्माण झाली असती तर स्टेशनवरील वेटिंग रूमबद्दल ममता वाटली असती; धर्मशाळेंत राहण्यासाठी मन आतुर झालें असतें; आणि वसतिगृहांत जाण्याकरिता शाळकरी लहान मुलें आईला सोडून पळत सुटलीं असतीं. पण असें होत नाही. स्टेशनवर गाड्या येतात, क्षणभर विसावतात आणि जातात; तशींच इथं माणसं येतात, विश्रांति घेतात आणि परत फिरतात. कोणत्याहि तऱ्हेचा आपलेपणाचा भाव त्यांच्या क्रियेंतून प्रगट होत

नाही. दगडविटा ह्यांना सांधणारा प्रेमाचा चुना त्यांच्याजवळ दुर्मिळ झालेला आहे. इथं एकमेकांची सेवा नाही; त्यागाची भावना नाही आणि म्हणूनच अशा जागा पाहून 'Home, sweet home' ह्या गोड भावनेनं मन उचंबळून येत नाही. जिथं पूर्णपणें प्रेमाची देवाणघेवाण आहे, घरांतलें सारे माझे आहेत ही भावना जिथं रुजली आहे, एकाचं दुःख तें दुसऱ्याचं दुःख जिथं मानल्या जातें, स्वार्थाला जिथं थारा नाही, एकमेकांच्या सुखासाठीच ज्या ठिकाणीं धडपड सुरू असते, अनेक डोळे असून जेथील दृष्टि एक आहे, ज्या ठिकाणीं कर्ता पुरुष प्रेमळ, शांत, क्षमाशील, नीतिमान आहे आणि गृहिणी सुशील, समंजस, आनंदी आणि दुसऱ्यांचं भलं करणारी आहे त्यालाच खरं घर म्हणतां येईल. अशा घरांतच स्वर्ग निर्माण होईल आणि जगाला वंदनीय अशा थोर विभूति जन्म घेतील. असें घर म्हणजे देवाचें मंदिरच. ज्ञानाचे पाठ देण्याची तीच खरी शाळा. अशा घराला जगांत सार्थ अशी उपमा कोणती देतां येईल? म्हणून ज्या वेळीं माझ्या लहानशा घराचें स्मरण होतें त्या वेळीं न कळत खालील ओळी मी गुणगुणूं लागतों—

"I remember, I remember
The house where I was born,
The little window where the sun
Came peeping in at morn."

●

# नदी म्हणजे जीवनसंगीत : १०

पंचमहाभूतें गुण्यागोविंदानें एकत्रित नांदूं लागलीं आणि सृष्टीचा उद्भव झाला असें आपण मानतों. आप् म्हणजे पाणी हें त्या पांच तत्त्वांपैकी एक होय. नदीला आपगा म्हणतात; कारण ती जलवाहिनी असते. नदी जीवसृष्टीचा जीवनाधार असल्यामुळे अनेक कविसम्राटांनी नदीचीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत. मानवी संस्कृतीच्या इतिहासाची घडण नदीमुळे बनली आहे. अमेरिकेचा भूत, वर्तमान आणि भविष्य काळ गात मिसुरी आणि मिसिसिपी ह्या नद्या वाहत आहेत. इजिप्तच्या पूर्वसंस्कृतीचे पोवाडे

गात नाईल नदी धावत आहे. ऱ्हाईन आणि डॅन्यूब ह्या युरोपांतील नद्यांनी सारें राजकारण आपल्या भोवती केंद्रित केलें आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय मानाच्या नद्या म्हणून त्या ओळखल्या जाऊं लागल्या. रशियन संस्कृतीची जोपासना केल्यामुळे व्होल्गा नदी त्या राष्ट्रांतील उपासनेची नदी बनली आहे. यांगत्सी नदी तर चिनी लोकांच्या पूजेचा विषय झालेली आहे. सिंधु, गंगा, यमुना, नर्मदा, गोदा, कृष्णा, कावेरी ह्या भारतीय नद्या म्हणजे भारताची अपार संपत्ति आहे, सौंदर्य आहे. वायव्येकडून आर्यांच्या ज्या टोळ्या भारतांत प्रथम घुसल्या त्या टोळ्यांना सिंधु नदीनेच विसावा दिला. सिंधु आणि तिच्या उपनद्या ह्यांमध्ये टोळ्यांना वसाहतीचें रूप आलें. नंतर गंगेने त्यांना पोटाशीं धरून प्रेमाने कुरवाळलें आणि लोकांना लागलेली अध्यात्मिक भूक शांत केली. सिंधु आणि गंगा ह्या नद्या म्हणजे आर्यसंस्कृतीची फुलबाग आहे. ह्या नद्यांनी बरोबर आणलेल्या कसदार काळ्या मातींतून शेतकऱ्यांचीं शेतें अमाप पिकलीं, शहरें वसलीं, लोक कलावंत बनले, धर्म वाढला, संस्कृति निर्माण झाली. रामायण आणि महाभारत ह्या ग्रंथांतून तत्कालीन संस्कृतीचें दर्शन आजहि आपणांस घडतें. महाकवि कालिदासाच्या 'रघुवंशांत' गंगाकिनारीची अपूर्व शोभा प्रतिबिंबित झालेली आहे. आजहि सिंधु आणि तिला मिळणाऱ्या पंचनद्यांनी पंजाबचे मळे पिकविले. पंजाब समृद्ध बनला, गंगेनेहि लोकांना जीवन दिलें, त्यांना पापमुक्त केलें. 'गंगामाता' म्हणून लोकांनी तिचा गौरव केला. गंगेचें हे दैवी सामर्थ्य पाहून कविवर्य मोरोपंतांनी तिचा 'अमरतटिनी' म्हणून उल्लेख केला. 'सर्व जीव सृष्टिचे अनंत भव्य संपदे' असा गंगेचा गौरव करून 'दीन मयूर गळां पडला शरणागत हा अभयोचित गंगे' असें म्हणून मोरोपंत गंगेला शरण गेलेले आहेत. जगन्नाथपंडितांनीहि 'गंगालहरी' गाऊन गंगेची स्वर्गीय शोभा अगोदरच प्रगट केलेली आहे. वामनपंडितांनीहि 'विलोकीता जीतें भवभय जनांचें परिहरी' अशी गंगेची महति गायिली आहे. अशी ही लोकमाता गंगा—

'फेडीत जगाचे पापताप
पोषीत तीरींचे पादप
जाय जैसे आप–जान्हवीचें!'

अनु. क्र. ९ ... ग्रं. क्र. ७०२३ दि.



अशा तऱ्हेने आपली कर्ममय उपासना करण्यांत आणि जीवसृष्टीला सुखविण्यांत गढून गेलेली आहे.

गंगेप्रमाणेच नर्मदा, गोदा, इंद्रायणी, कृष्णा, कावेरी ह्या सरिता भारतीयांचीं पूजास्थानें झालेलीं आहेत. विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील भाग ह्या नद्यांनी धनधान्यसमृद्ध केलेला आहे. संगमरवरी शिलाखंडांतून उडी घेणाऱ्या 'दूधधारा' ओंकारेश्वराचा धावा करीत धावत गेलेल्या आहेत. नर्मदेचा निर्मळपणा पाहूनच 'नमामि देवि नर्मदे' म्हणून संस्कृत कवींनी नर्मदेची महति स्तोत्रबद्ध केलेली आहे. गोदेचा महिमा प्रख्यातच आहे. गोदेचा कांठ म्हणजे महाराष्ट्रीय संतांची तपोभूमि आणि कर्मभूमि. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास ह्यांसारख्या संतांची वाणी गोदाकांठींच बहराला आलेली आहे. संस्कृतीचें माहेरघर म्हणून एके काळीं गाजलेलें प्रतिष्ठान गोदेकांठींच आपल्या वैभवानें उभें होतें. ह्याच गोदातीरावर 'अमृताशी पैजा जिंके' असें वाङ्मय निर्माण करण्याची प्रेरणा निवृत्तिनाथांनी आपला भाऊ आणि अद्वितीय शिष्य ज्ञानदेव यांस केली. ह्याच तीरावर एकनाथी भागवत ओवीबद्ध झालें आणि अर्वाचीन कवि चंद्रशेखरांनी 'जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे भवतापहरी' असें म्हणून 'गोदागौरव' गायिलेला आहे. गोदावरी आमच्या मराठीचें माहेर आहे. तिच्याच कांठी ज्ञानदेवापासून 'ब्रह्मविद्येचीं फुलें' फुललीं आहेत. तीच मराठीचें पोषण करीत आहे.

जशी गोदा तशीच इंद्रायणी. तुकारामाचे अभंग गात गात ही वाहते आणि चंद्रभागा पंढरपूरला 'घालिन लोटांगण वंदिन चरण' असें म्हणत विठ्ठलापुढे नम्र भावाने वाकली आहे. 'ज्ञानबा तुकाराम' ह्या नाममंत्राचा जयघोष करीत अद्वैतीं रंगणारे वारकरी भवसागराला झिडकारून ह्याच चंद्रभागेच्या विशाल वाळवंटांत 'टाळ-मृदंगाच्या ध्वनीने' देहभान विसरून जातात. नादब्रह्मांत रंगलेल्या भक्तांचें प्रेम अनुभवण्यासाठी प्रत्यक्ष 'पंढरीचा राणा' देखील शतकानुशतकापासून ह्याच पुण्यतटिनीच्या कांठीं कटीं हात ठेवून उभा आहे. जो महिमा चंद्रभागेचा तोच कृष्णेचा. धौम्य-महाबळेश्वराला नमन करून सह्याद्रीच्या सामर्थ्याचें गाणें गात कृष्णा

पूर्ववाहिनी बनली. कांठीं राहणाऱ्या लोकांना तिने कसदार बनविलें. कृष्णा-कांठच्या ठेंगण्या घोड्यांनी ह्याच पाण्याने मस्त बनून यावनी सत्तेला पाणी पाजले. नदीचें महात्म्य आणि सामर्थ्य हें असें अगाध आहे. नदीकिनारा म्हणजे मानवी विकासाची रमणीय पताका आहे. मानवाच्या विज्ञानशाहींतील सक्कर, मेत्तूर, तुंगभद्रा हीं धरणें मानवी जीवनाला उन्नत आणि प्रगत करीत आहेत. एके काळीं उजाड असलेला सिंध आज हिरवागार दिसत आहे. तुंगभद्रा आणि कावेरी ह्यांच्या पाण्यामुळे शेतें डोलूं लागलीं आहेत. गोकाक आणि शिवसमुद्र ह्या धबधब्यांना मुरड घालून विद्युत्प्रवाह खेडोपाडीं खेळविण्यांत आलेला आहे. 'तमसो मा ज्योतिर्गमय' ह्या तत्त्वाचाच जणू साक्षात्कार ह्या नद्यांमुळे आपणास घडून येत आहे.

नदीला जीवनसंगीत म्हणतात, तें यामुळेच. ती कर्मयोगाची जागती ज्योत आहे. मानवाची अमर आशा आहे. मानवी संस्कृतीचा बहर आहे. अनेक राजघराणीं भूत काळांत गडप झालीं. पाटलीपुत्र, अयोध्या, कनोज, उज्जयनी, प्रतिष्ठान हीं एके काळचीं रम्य नगरें कालौघांत घायाळ होऊन धरणीवर कोसळलीं. पण त्या ठिकाणाहून वाहत जाणाऱ्या नद्या मात्र अद्यापि जिवंत आहेत. 'जगा आणि लोकांना जगवा' हा संदेश देत, त्या महासागराला मिळण्यासाठी आतुर होऊन लगबगीने वाहत आहेत. अथांग जलाशयांत आपलें अस्तित्व विलीन करण्यासाठी त्या उड्या घेत घेत जात आहेत. पूर्णाला आलिंगन देण्यासाठी तिचें हृदय उचंबळून येत आहे. अनेक राज्यें आलीं, नांदलीं आणि नष्ट झालीं; पण त्या वैभवाचें दृष्टिसुख घेतलेली नदी मात्र वाहतच आहे. आंग्ल कवि टेनीसनने म्हटल्याप्रमाणे 'माणसें येतील, आणि माणसें जातील, पण नदी मात्र अखंड वाहत राहील.' म्हणून नदी ही अमर-वाहिनी झाली आहे. 'दिव्य रसीं विरणें जीव, जीवित हें त्याचें नांव' अशा तऱ्हेचें नदीचें जीवन स्वर्गीय आहे. असें जीवन मनुष्यमात्राला जोंपर्यंत जगतां येत नाही तोंपर्यंत त्याला सुख कसलें ?

●

# मूर्तिपूजा : ११

मूर्तिपूजा ही भारतीय संस्कृतींतील एक हृद्य कल्पना आहे. जगांतील सारे धर्म हे मूर्तिपूजकच आहेत. बुद्धमूर्ति, ख्रिस्ती क्रॉस, मुस्लीमांचा काबा हीं सर्व मूर्तिपूजेचींच प्रतीकें होत. मात्र हिंदुधर्म हा इतर धर्मांपेक्षा अधिक सहिष्णु, उदात्त आणि उदार वृत्तीचा आहे. कोणत्याहि धर्मांतील मूर्ति असो; ज्या मूर्तीवर परमेश्वराचा आरोप झालेला आहे ती मूर्ति परकीय असली तरी हिंदु लोक त्या मूर्तीला नमन करतात. बुद्धाला शरण जातात. प्रार्थनामंदिरांत जाऊन प्रार्थना म्हणतात. याउलट मुसलमानांना मूर्तिपूजा मान्य नाही. राम–रहीम आम्ही एक मानतों. ‘ ईश्वर अल्ला ’ एकाच परमात्म्याचीं नांवें आहेत ही कल्पना फुलवण्यांत महात्माजींची हयात खर्च झाली.

खरें पाहिलें तर मूर्ति ही मानवाच्या विकासाचें एक अमोघ साधन आहे. मूर्ति म्हणजे आकार. मूर्तिपूजा म्हणजे आकारपूजा. मूर्तीवर परमेश्वरी तत्त्वांचा आरोप करून अंत:करणाचे सर्व भाव ईश्वराला अर्पण करायचे, नि:संग बनायचें, द्वैतभावनांचीं निरांजनें पेटवून अद्वैतांत विलीन व्हावयाचें ह्यासाठी मूर्तीची आपण प्रतिष्ठापना करतों; पूजाअर्चा करतों. चित्रें दाखविलीं की लहान मुलें रमतात. एकतानतेने चित्राशीं खेळतात. स्वतःला विसरतात. लहानलहान दगड त्यांना दिले की ते मोजत बसतात. त्यावरून लहान मुलांना आकड्यांचा बोध होतो. थोड्या सवयीनंतर आकडेशास्त्र जाणण्यासाठी त्यांना खड्यांची आवश्यकता भासत नाही. ते प्रगल्भ बुद्धीचे बनतात. तसेंच मूर्तीचें आहे. ह्या सृष्टींत सर्वत्र परमेश्वर भरलेला आहे. तो अनादि आणि अनंत आहे. चर्मचक्षूंना तो दिसत नाही. तर्काने त्याला जाणतां येत नाही वाचेने त्याच्या रूपाविषयी बोलतां येत नाही. म्हणजेच तो अव्यक्त, अक्षर, अचिंत्य आणि निराकार आहे. अशा रूपरसगंधरहित अमूर्त परमेश्वराचें ‘ सुंदर तें ध्यान ’ कल्पून त्याला मनोभावें शरण जाणें हेंच मूर्तिपूजेचें उद्दिष्ट आहे. मूर्तीतहि तें परमेश्वरी तत्त्व जाणण्यासाठी बुद्धानंतर ही मूर्तिपूजा हिंदूंनी उचलली. डोळ्यांना दिसणाऱ्या स्वरूपाचे ठिकाणीं प्रथम आपण आपलें मन केंद्रित केलें तरच हळूहळू सृष्टींत असलेल्या

अमूर्त परमेश्वराचें दर्शन आपणांस घडेल हा मूर्तिपूजेचा हेतु आहे. तो आपण ओळखला पाहिजे. मूर्ति म्हणजेच सारसर्वस्व नव्हे, तर त्या दगडी आकारांत निराकार परमेश्वर, दडून बसलेलें सौंदर्य आपणांस हुडकून काढतां आलें पाहिजे. असें झालें तरच खरी मूर्तिपूजा घडली असें म्हणतां येईल. जोंपर्यंत ही जाणीव होत नाही तोंपर्यंत 'दगडाला देव' मानण्यांत काय स्वारस्य आहे? दगडांत 'राम' आहे, पण तो शोधतां आला पाहिजे. त्याकरता त्या मूर्तीच्या अंतरंगांत आपणांस शिरलें पाहिजे. 'लहान मुलांना आई सदोदित जवळ हवी असते. थोडी दृष्टिआड झाली तर मूल रडतें. पण त्या मुलाला आईपासून दूर ठेवण्याची सवय आपणास करावीच लागणार; आईची भावना मनांत ठेवून जगांत वावरावें लागणार. तसेंच मूर्तींत कोंडलेल्या परमेश्वराचें रूप ओळखून साधकाने वागलें तरच पलीकडचा अमूर्त परमेश्वर त्याला जाणतां येईल; त्याकरता मन निर्मळ केलें पाहिजे. कर्म निर्दोष ठेवलें पाहिजे. वासना नष्ट केल्या पाहिजेत. अहंकार जाळला पाहिजे. म्हणजे आपली मूर्तीची संकुचित कल्पना सुटेल; आणि अनंत परमेश्वराला आपण मिठी मारूं शकूं. आत्मा हाच परमात्मा हें तत्त्व ओळखण्यास शिकूं.

आज मूर्तिपूजेची प्रतिष्ठा नाहीशी झालेली आहे. याला अनेक कारणें आहेत. विज्ञानयुगाने आपणांस 'संशयात्मा' बनविलें. आपल्या पूर्वीच्या निष्ठा हादरल्या. गीतेंत 'संशयात्मा विनश्यति' असें वचन आहे. संशयखोराला हा लोक नाही, परलोक नाही आणि सुखहि नाही. आज जगांतलें प्रेमच नासलें. भक्तिभाव आटला. देवावरील श्रद्धा ढळली. 'दुर्बिणीने सर्व नभोमंडळ बारकाईने शोधून पाहिलें; पण देव कांही कुठे दिसला नाही' असें आता आपण म्हणायला शिकलों. शून्याकार देवावरील आपली भक्तीहि शून्यच बनली. दगडांत देव आहे ह्या कल्पनेचें वारेंहि आपणास सहन होत नाही. त्यांतलें सौंदर्य अनुभवणें तर दूरच राहिलें. यंत्राच्या संहारक शक्तीमुळे परमेश्वरी श्रद्धेचे बुरूज पार कोसळले. दोन महायुद्धांमुळे मानवता संपूर्ण नष्ट झाली. सौंदर्य गेलें, सत्य लोपलें. 'मूर्तिपूजेंत काय अर्थ?' म्हणून संशय निर्माण झाला. दगड एक कःपदार्थ; त्या दगडालाहि मी तुच्छ लेखणार नाही. ती 'सुंदर मूर्ति' मी त्यांत पाहीन ही कल्पना भंग पावली. मूर्तिपूजेंतहि

काळा बाजार निर्माण झाला. पुजारी पूर्ण बाजारी बनले. हरिजनांच्या दर्शनाने देव बाटतो ही कल्पना वाढली. एखाद्या मोठ्या क्षेत्रीं आपण गेलों म्हणजे ह्या सगळ्या गोष्टींचा अनुभव आपल्याला तेथे येतो. पैसा पेरला तर देवदर्शन सुलभ होतें. तांबूल मिळतो. नाहीतर कुठला तांबूल आणि कुठलें दर्शन ?

पण असें जरी आहे तरी मूर्तिपूजेंतील शुद्ध हेतु आपण ओळखला पाहिजे. गंगा ही ह्या भूतलावरील अत्यंत पवित्रतम नदी. पण लोकांनी तिला घाण बनविले तर तो तिचा दोष का मानतां येईल? स्वामी विवेकानंद म्हणत, 'ज्या मूर्तिपूजेने जगाला रामकृष्ण परमहंस दिले त्या मूर्तिपूजेंत सहस्र दोष शिरले तरी ती मी उराशीं धरीन.' विनोबाजी म्हणतात की 'माझी मूर्तीच्या दर्शनावर श्रद्धा आहे. ज्ञानदेवांच्या विचार-संगतींत माझा आतापर्यंतचा जन्म गेला, पण अजून मी इच्छा असूनहि पांडुरंगाचें स्वनेत्रांनी दर्शन करूं शकलों नाही. जोंपर्यंत हरिजनांना तुझ्या राऊळीं प्रवेश नाही तोंपर्यंत मीहि माझ्या जागीं बरा असें मी पांडुरंगाला म्हणत असतों. माझी तळमळ तो जाणतो.'

तेव्हा मूर्तिपूजेचा खरा अर्थ काय हें आपण ओळखलें पाहिजे. ह्या चराचरांत भरलेल्या परमात्म्याच्या रूपाचें दर्शन मूर्तीच्या ठिकाणीं आपणांस घडलें पाहिजे. सोन्याच्या एका कणांत जे गुणधर्म तेच सोन्याच्या लगडींत असतात, अमृताच्या चुळीची जी चव तीच अमृताच्या सागराची. गुणधर्मांत फरक नाही, तसेंच मूर्त आणि अमूर्त परमेश्वराचें नातें अभेद आहे. दोन्ही ठिकाणचा परमात्मा एकच. अंश हा पूर्णांशाचाच एक भाग हें ओळखणें हेंच मूर्तिपूजेचें उद्दिष्ट आहे. "ह्या सृष्टीच्या पुस्तकांत सुंदर अक्षरांनी सर्वत्र लिहिलेल्या परमेशाचें" दर्शन मूर्तीच्या ठिकाणीं आपणांस घेतां आलें पाहिजे. ह्या भूतलावरील पवित्र सरिता, गंभीर सागर, वत्सल गाई, जीवाला जीव देणारे घोडे, वसंत ऋतूंत गाणाऱ्या कोकिळा, गर्जणारे मेघ, तरल वायलहरी, वात्सल्यसिंधु माता, रंगदेवता उषा, हिऱ्यामाणकांनी नटलेलें आकाश ही सर्व परमेश्वराचींच रूपें नव्हेत तर काय? ईश्वराचीं हीं स्थूल रूपें आहेत. त्या स्थूलांतच परमेशाच्या सूक्ष्म रूपाचें दर्शन आपणांस घेतां आलें

पाहिजे. मूर्तिपूजा आपणांस हेंच शिकवते. दृष्टिसमोर असलेल्या मूर्तींत चराचराला व्यापून असणारा निर्गुण, निराकार परमेश्वर पाहणें हें विवेचनाचें तात्पर्य आहे. जे योगी असतात ते योगसाधना करून निर्गुण परमेश्वराची प्राप्ती करून घेतात. त्यांना मूर्तिपूजेची गरज नाही. पण जे योगी नाहीत त्यांची काय वाट? तर त्यांच्याकरता मूर्तिपूजा हाच एकमेव उपाय आहे- निर्गुणाची आराधना साध्याभोळ्यांना शक्य नाही. दर्शनीय स्वरूपावर अंत:करण लवकर केंद्रित होतें. साध्याभोळ्यांना अशा स्वरूपाची आराधना पटते आणि पचते. अर्जुन देखील 'सगुणाची आराधना करून मी मोक्ष मिळवीन' असें म्हणतो. मात्र ह्या सगुणांत, ह्या मूर्तींत परमात्मा कसा पाहावयाचा, 'सद्भावांची अंजुली' विश्वरूपाच्या चरणयुगुलीं कशी वाहावयाची हें जाणतां आलें तरच मूर्तिपूजेंतील सौंदर्य प्रगट झालें, रहस्य उकललें, अनंताची पूजा कळली असें म्हणतां येईल.

●

# प्राचीन व अर्वाचीन कवि : १२

ज्ञानेश्वरापासून श्री समर्थ रामदासापर्यंतचे कवि प्राचीन म्हणून मानण्यांत येतात व केशवसुतापासून जे अलिकडचे कवि आहेत त्यांना अर्वाचीन कवि म्हणून संबोधण्यांत येते. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम हे संत कवि, आणि वामन, मोरोपंत, रघुनाथपंडित हे पंडित कवि म्हणून मानण्यांत येतात. जनतेंत वैराग्यवृत्तीचा परिपोष करणें, परमेश्वरी तत्त्वांचें त्यांना ज्ञान करून देणें, 'पांडुरंग ध्यानीं-पांडुरंग मनीं' ह्या अनन्य भक्तिभावानें परमेश्वराशीं एकरूप होणें, संसारासंबंधीं जनतेंत विरक्ति निर्माण करणें, पौराणिक कथांचें मराठीकरण करून रामायण-महाभारतांतील उच्च तत्त्वांची सामान्य जनाला ओळख करून देणें आणि हीं उच्च तत्त्वें काव्यांतून मांडतांना कल्पनासौंदर्याचें बहारदार प्रदर्शन घडविणें ह्याच उद्देशानें प्राचीन कवींनी आपलीं काव्यें रचलेलीं आहेत. 'रसराज शृंगाराला' आपल्या काव्यांत अत्यंत गौण स्थान प्राचीन कवींनी दिलेलें आहे; आणि शांत व भक्ति हे दोन रस

प्रामुख्याने आपल्या काव्यांतून बहारदार रीतीने प्रगट केले आहेत. ज्ञानेश्वरांनी तर 'शांतु शृंगाराते जिणे' अशा रीतीने शांत रस प्रगट करून 'माझा मराठाची बोलु कवतुके–अमृता तेही पैजा जिंके' अशी रसिकांकडून मराठी काव्याला मान्यता मिळविण्याची केलेली प्रतिज्ञा सर्वश्रुत आहे. मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत ह्यांनी पौराणिक कथांच्या द्वारें लोकांना उच्च नीतितत्त्वें शिकवलेलीं आहेत. तुकारामाचे अभंग तुकारामाच्या अंतरंगाची व्यथा स्पष्टपणें प्रगट करून दाखवितात. अनन्य भक्तिभाव, सहजसुंदर भाषा, मार्मिक दृष्टांत, सडेतोड विचार इत्यादि गुणांचा प्रकर्ष जुन्या काव्यांतून आपल्याला पाहावयास मिळतो. जुन्या काव्याचें अंतरंग अत्यंत निर्मळ आहे.

परंतु ही जुन्या काव्याची धाटणी कविवर्य केशवसुतापासून बदललेली आहे असें आपणांस दिसून येईल. आर्य व आंग्ल हा संस्कृतिसंगम ज्या वेळीं घडून आला त्या वेळीं अनेक नवविचारांची देवघेव झाल्यामुळे काव्याचें मूळ स्वरूप पालटलें. 'जेणे भक्तिमार्ग कळे–त्या नांव कवित्व' ही काव्या-संबंधीची संत कवींची विचारसरणी बदलली. संतकवींच्या पर्णकुटींत वाढलेल्या आणि चंद्रभागेच्या सिकतेवर खेळलेल्या कविताकामिनीचा पदविन्यास, अंगभूषा, वेषभूषा १८८० सालानंतर पार पालटून जाऊन तिच्या विचारांत अंतरबाह्य क्रांति घडून आली. ईश्वरचिंतन हाच कांही काव्याचा एकमेव हेतु नाही, तर दररोजच्या जीवनांतले साधे भावप्रसंगहि काव्यांत सौंदर्य आणूं शकतात, अशी विचारसरणी संमत होऊं लागली.

'अंतःकरणांतील भावनांचा सौंदर्यपूर्ण आविष्कार' अर्वाचीन कवींनीं नाना छंदांतून, भावगीतांतून आणि मुक्तछंदांतून, प्रगट केला. पंडित कवींच्या वेळीं अलंकाराने भारावलेली कविताकामिनी साधी पण डोळ्यांत भरण्या-सारखी दिसूं लागली. अंगावरील अलंकाराचें ओझें उतरल्यामुळे व एखादाच पण ठसठशीत अलंकार धारण केल्यामुळे अर्वाचीन कविता–वधू चित्तवेधक झाली. सहजसुंदर भाषा व 'अंतरंग ओथंबून ओसंडणारी' एखादीच भावना ह्यामुळे तिला नाविन्य प्राप्त झालें. कविवर्य केशवसुतांनी सुनीताचा प्रकार हाताळून नवीन प्रकारचीं भावगीतें रचण्याचा प्रघात सुरू केला. टिळकांच्या कवितेंतून प्रसाद आणि प्रेम ह्या काव्यगुणांचा उत्कृष्ट आढळ दिसून आला.

'बी' कवींनी तत्त्वज्ञान काव्यमय करून सोडलें, कविवर्य तांबे यांनी आपल्या अनन्यसाधारण भावगीतांनी काव्याच्या कीर्तिमंदिरावर कळस चढविला, आणि अनिलांनी मुक्तछंदांतून रचना केल्यामुळे काव्याची आंगलटच पालटून टाकली. अर्थात् कवितेचा हा कायापालट एकदम न होतां तो हळूहळू झालेला आहे एवढी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

●

# महाराष्ट्रसंतांची कामगिरी : १३

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति'

महाराष्ट्र म्हणजे संतांची तपोभूमि आणि कर्मभूमि. ज्ञानदेवांनी ह्या 'मराठीच्या नगरींत' ब्रह्मविद्येचा सुकाळ केला, आणि संत तुकारामांनी आपल्या अभंगगंगेतून भक्तीचा पूर वाहविला. 'निवृत्ति-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताबाई-एकनाथ-नामदेव-तुकाराम' ही वारकऱ्यांची आरोळी महाराष्ट्राच्या वाङ्मयाचा, महाराष्ट्र धर्माचा आणि परंपरेचा इतिहास एका ओळींत सांगते, 'रूप पाहतां लोचनी' ह्या ज्ञानदेवाच्या अभंगाने भजनाचा प्रारंभ आणि 'हेचि दान देगा देवा' ह्या तुकारामाच्या अभंगाने कीर्तनांतली शेवटली आरती जोंपर्यंत कथाकीर्तनांतून होत आहे तोंपर्यंत महाराष्ट्राला संतांचा व त्यांच्या कामगिरीचा विसर पडणें शक्य नाही.

महाराष्ट्राची भूमि ही अनेक संतांच्या चरणस्पर्शाने पावन झालेली आहे. अनेक संत येथे उदयाला आले आणि त्यांनी 'हरिनामवेलीचा' विस्तार केला. ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास हे संत म्हणजे महाराष्ट्राचा वाङ्मयीन, अध्यात्मिक आणि राष्ट्रीय इतिहासच होय. शके १२१२ मध्ये ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीची रचना पूर्ण केली. ज्ञानेश्वरीच्या रचनाकाळीं 'यदुवंशविलास' असा नीतिमान राम राजा राज्य करीत होता. प्रजा स्वतंत्र आणि सुखी होती. यावनी सत्तेचा वरवंटा अजून महाराष्ट्रावर फिरला नव्हता. परंतु सामान्य लोकांमध्ये मात्र धर्माच्या वेडगळ कल्पनांनी घर केलें होतें. तत्कालीन परिस्थितीचें ज्ञानेश्वरांनी नीट अवलोकन केलें

तेव्हा त्यांच्या लक्षांत आलें की भगवद्गीता ही केवळ पढिक ब्राह्मणांची मिरास बनली होती. धर्मनिष्ठ म्हणविणारे लोक स्वत:लाच धर्मतत्त्व न कळल्यामुळे धर्मभ्रष्ट झाले होते. रूढींचा पसारा अफाट वाढला होता. संस्कृतांतील ज्ञानभांडाराला तत्कालीन ब्राह्मणांनी कुलुपें ठोकून जनतेला तें अलभ्य केलें होतें. स्त्रियांना आणि शूद्रांना वरिष्ठ वर्गाने दूर सारले आणि विद्येपासून अलग राखले. ज्ञानेश्वरांनी ही सर्व स्थिति अचूक ओळखली; आणि बहुजन समाजाला न कळणारी संस्कृत भाषा बाजूला सारून त्यांनी लोकांच्या बोलभाषेंत 'भावार्थ-दीपिका' उजळली व लक्षावधि जनतेची धार्मिक भूक शांत केली. तत्कालीन परिस्थितींत सुधारणा घडवून आणणारे ज्ञानेश्वर हे पहिले सुधारक आणि संत होत.

'ज्ञानी, योगी, द्रष्टा आणि सत्पुरुष' या नात्याने ज्ञानदेवांची थोरवी अद्वितीय आहे. अठरापगड जातींचे लोक त्यांनी आपल्या झेंड्याखाली गोळा करून महाराष्ट्रांत सांस्कृतिक क्रांति घडवून आणली. चोखामेळा, गोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, भागू महारीण हे सर्व ज्ञानदेवांच्या परिवारांतील संत होते. ह्या सर्व संतांनी तेराव्या शतकांत नवचैतन्याची उभारणी केली; जनतेंत धैर्य निर्माण केलें. नीतीचें संरक्षण केलें. संस्कृतची थोरवी मराठीला प्राप्त करून दिली. मराठीच्या क्षेत्रांत 'ब्रह्मविद्येचा बगीचा' फुलल्यामुळे जनतेला आत्मिक समाधान लाभलें, विवेकाचें साम्राज्य नांदलें.

परंतु लवकरच यवनांची टोळधाड महाराष्ट्रावर आली. यादवांचें राज्य नष्ट झालें. स्वातंत्र्य लोप पावलें. धर्म हादरला. हें राष्ट्रीय अध:पतन ज्ञानदेवानंतर घडून आलें. यवनांच्या फौजा साऱ्या महाराष्ट्रभर धुडगूस घालूं लागल्या. अनेक 'शाह्या' निर्माण झाल्या. महाराष्ट्र पूर्ण स्वराज्य-भ्रष्ट बनला. 'दैत्याचेनि भारे दाटली अवनी' अशी महाराष्ट्राची स्थिति झाली. अशा प्रसंगी महाराष्ट्राला जर कोणी सावरलें असेल तर तें संतांनीच. जातीजातीतील बंधनें नाहीशी करून समतेचा त्यांनी संदेश दिला. लोकांना खरा धर्म शिकवला. त्यांना संस्कृतिभ्रष्ट होऊं दिलें नाही. संतांनी केलेली ही कामगिरी अत्यंत श्रेष्ठ दर्जाची नाही असें कोण म्हणेल ?

ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत सर्व संतांनी महाराष्ट्राला अधिक धर्मरत केलें; संस्कृतिनिष्ठ बनविलें; भक्तिमार्ग शिकवला. संतशिरोमणि तुकाराम म्हणजे भागवत धर्ममंदिराच्या भक्तीचा कळसच होय. पण यवनाक्रांत झालेल्या महाराष्ट्रीय जनतेला भक्तिमार्गाचा एकेरी उपदेश केल्यामुळे लोक प्रारब्धवादी बनले. परमार्थ अधिक बोकाळला. 'ध्यानीं मनीं' देवाचेंच नांव झाल्यामुळे देशाच्या नांवाकडे लोकांचें दुर्लक्ष झालें. ही संधि साधून औरंगजेबाने सर्व महाराष्ट्रभर देवस्थलांचा उच्छेद मांडला आणि

'तीर्थक्षेत्रें मोडलीं–ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं
सकल पृथ्वी आंदोळली–धर्म गेला'

अशी परिस्थिति निर्माण झाली. महाराष्ट्राची ही भग्नावस्था पाहून समर्थ रामदास अत्यंत तळमळले. बदललेला काळ त्यांनी ओळखला. अध्यात्माच्या व हरिभक्तीच्या जोडीला राजकारण आणून बसविल्याशिवाय परिस्थिति पालटणार नाही, हें समर्थांनी जाणलें; आणि प्रारब्धवाद खोडून टाकून 'केल्याने होत आहे रे–आधी केलेंचि पाहिजे' अशी प्रयत्नवादाची शिकवण जनतेला दिली. त्यांच्यांत स्फूर्ति, धृति आणि शक्ति निर्माण केली; 'जयजय–रघुवीर समर्थ' हा राममंत्र सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून घुमवला; राष्ट्र जागें केलें.

म्हणून महाराष्ट्रीय संतांची कामगिरी केवळ अलौकिक आहे. महाराष्ट्रांतील संत म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचें प्रत्यक्ष निधान. त्यांनी निर्माण केलेल्या वाङ्मयाला जगांत तुलना नाहीं. प्रभूची ती प्रत्यक्ष वाङ्मयमूर्तीच. 'अमृताशी पैजा जिंके', हा त्यांच्या साहित्याचा अधिकार. ह्या संतश्रेष्ठांनी महाराष्ट्राची मनोभूमि नांगरून तयार केल्यामुळेच पुढे शिवछत्रपतीला त्या राकट भूमींत राष्ट्रीय बीज सुलभतेने पेरतां आलें असें म्हटलें तर खास अतिशयोक्ति होणार नाही.

●

# तुका म्हणे तोचि संत : १४

> 'थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा
> आपण त्यांच्या समान व्हावें हाचि सापडे बोध खरा.'

'तुका म्हणे तोचि संत–सोशी जगाचे आघात' असे तुकारामांनी संतांसंबंधीं उद्‌गार काढले आहेत. संत हेच खरे जगाचे उद्धारक होत. संत ह्याचा खरा अर्थ ज्ञानी, योगी, सत्पुरुष. त्रिविध तापांनी तापलेल्या ह्या जगांत जे लोक 'रंजले गांजले' आहेत, अशांना जो आपलं मानतो तोच खरा संत. जगाच्या कल्याणासाठी झटणारा, चंदनाप्रमाणे देह कष्टविणारा, 'भूतांची दया' हेंच स्वतःचें भांडवल समजणारा, 'मुखीं अमृताची वाणी' असणारा, प्रयागतीर्थासारखें पवित्र अंतःकरण ठेवणारा जो असेल तो संतच होय. अशा ज्या थोर विभूति या जगांत नांदतात त्या म्हणजे परमेश्वराचें आकाराला आलेलें रूपच. ज्ञानदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, आगरकर, महात्मा गांधी, विनोबाजी हे सर्व महापुरुष म्हणजे संत होत; युगपुरुष होत. 'लोकांनी अंधारांतून बाहेर यावे, असत्यांतून बाहेर यावे आणि प्रकाश अनुभवावा' ह्या तत्त्वाची शिकवण देण्यालाच ह्या संतांचा अवतार झालेला आहे. 'मानवी समाजाला क्षुद्र जीवनाच्या अंधारमय बोगद्यांतून प्रकाशाने भरलेल्या अनंत जीवनांत आणून सोडण्यासाठी संतांची नितांत आवश्यकता असते.'

संत म्हणजे ह्या भूतलावरील परमेश्वराचें तेज. स्वार्थाने, मदाने अंध झालेल्या मनुष्याच्या डोळ्यांत विवेकाचें अंजन घालणें हेंच संतांचें कर्तव्य. स्वतःच्या आचरणाने परमेश्वरी तत्त्वाची जाणीव मानवी जीवनाला करून देणें, सत्याचा मार्ग त्यांना दाखविणें, सौजन्य त्यांच्या कृतींत उतरविणें ह्याचकरिता संतांचें सारें जीवन असतें. लोक रागावले तरी संत समता सोडीत नाहीत. अहंभावाचा त्यांना स्पर्शहि होत नाही. 'विश्वरागे झाले वन्हि–संतसुखे व्हावे पाणी' अशी संतांची कृपादृष्टि पाहिजे. घाव सोसल्याशिवाय दगडांना देवकळा येत नाही; तद्वतच संतांनी लोकांचे आघात पचवल्याशिवाय त्यांच्यांत विभूतिमत्व निर्माण होणार नाही. ज्ञानदेवांनी हे

आघात सोसले. 'संन्याशाचें पोर' म्हणून वाळींत टाकलें असतांहि ज्ञानदेव जगावर रुसले नाहीत. उलट ज्ञानेश्वरीसारखा अद्वितीय ग्रंथ निर्माण करून जनतेला त्यांनी खरा मार्ग दाखविला. 'ज्ञानदेव माउली' म्हणून लोकांनी त्यांचा जयजयकार केला. एकनाथांनीहि तेंच केलें. अंत्यजाचें पोर उचलून कडेवर घेतलें, गाढवाला पाणी पाजलें, यवन थुंकला तरी तोल सांभाळला, समतेची शिकवण जगाला दिली, भूतदया सांगितली. अशा महात्म्यांना उद्देशूनच तुकाराम 'तेचि भगवंताची मूर्ति' असें म्हणतात; आणि प्रत्यक्ष तुकारामाचें आचरण तरी कसें होतें? केवळ संतांचें वागणें. संताचीं सगळीं लक्षणें तुकारामाच्या ठिकाणीं होतीं. समर्थ रामदासांनी तर 'केल्याने होत आहेरे–आधी केलेंचि पाहिजे' असा संदेश देऊन लोकांना जागृति आणली; आणि 'सर्व अर्पावे शेवटी प्राण तोहि वेंचावा' ह्या पुरस्कारलेल्या तत्वानुसार त्यांनी स्वत: आचरण केलें; आयुष्याचा यज्ञ केला. म्हणून तर रामदास 'समर्थ' ह्या पदवीला पोहचूं शकले. अर्वाचीन काळांत आगरकरांनीहि अशीच जनसेवा केली. 'मोठमोठे धुरीण चिवट रूढींच्या कचाटींत कुचंबत पडले आहेत' असें जेव्हा त्यांना दिसून आलें तेव्हा ते तळमळले. स्वत: 'सुधारक' बनून लोकांना अज्ञानांतून बाहेर काढण्यासाठी आपली लेखणी आमरण चालविली. स्वत: त्याप्रमाणे वागले. अपार कष्ट सोसले. दारिद्र्याशीं झुंजले. प्रखर टीका गिळली. पर्वतासारखे अचल राहिले. जसें आगरकर तसेंच महात्मा गांधी आणि विनोबाजी. गीतेंत जीं 'स्थितप्रज्ञा'चीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं महात्माजींच्या आणि विनोबाजींच्या जीवनांत पाहून घ्यावींत. महात्माजी म्हणजे अनासक्ति, प्रत्यक्ष कर्मयोग आणि प्रचंड त्याग. असे हे संत भूमंडळावर पाहिले म्हणजे आदरांजलीसाठी माथा खाली लवतो. त्यांच्या तेजापुढे मनुष्य दिपून जातो.

असे थोर महात्मे जगांत अवतीर्ण होतात म्हणून जगांत आनंद नांदतो. विश्वाला शांति मिळते. 'सर्वांचा विकास व्हावा, दैन्य दूर व्हावें, अंधार नाहीसा व्हावा म्हणून सूर्यासारखे ते तळपतात.' त्यांना सुख कुठलें? दुसऱ्यासाठीच ते जगतात. इतरांचें जीवन फुलवण्यासाठीच ह्यांचें जीवनपुष्प विकास पावलेलें असतें. मेघांना आणण्यासाठी वारे धावतात, मेघ जळत्या

धरेला शांत करण्यासाठी आत्मसमर्पण करतो, ही धरा लोकांना अन्न देण्यासाठी जगते, तसेंच संतांचें आहे. संतांना स्वतःचें जीवन नाही. संपूर्ण विश्व हें माझं घर ही त्यांची समता आणि औदार्य. अशा संतांच्या जीवन-चरित्राचा जेव्हा मी विचार करतों, तेव्हा

> ' Lives of great men all remind us,
> That we may make our lives sublime. "

ह्या ओळी मला स्मरतात. माझ्या अंधारलेल्या जीवनाला त्यामुळे उजळा मिळतो.

●

# संयम म्हणजेच सौंदर्य : १५

परमेश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीकडे मी निरखून पाहूं लागलों म्हणजे एका विशिष्ट नियमांनी बांधल्यामुळंच हें सृष्टिचक्र अबाधित चाललं आहे असं मला वाटतं. जीवसृष्टि निर्माण करून ब्रह्मदेवानं संख्याबल वाढविलं; संख्येला छेद न बसतां ही संख्या अशीच वाढली असती तर जगावर केवढी आपत्ती कोसळली असती ? आणि किती चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाली असती ? नियोजनाचं काम आपल्याकडे घेऊन शिवानं ह्या संख्याबलाचं नियमन केलं म्हणून सगळ्यांचंच कल्याण झालं संयमाच्या विशिष्ट सूत्रांत ही जन्ममृत्यूची साखळी ओवल्यामुळंच हें मानवी जीवन आपल्याला सुसह्य झालं आहे. मरणानंच जीवनांत मौज निर्माण केली. रात्रीच्या प्रशांत वेळीं आकाशांत चकाकणाऱ्या ग्रहगोलां-कडे आपण दृष्टि फेकली तर आपणांस काय आढळेल ? गतीच्या एका विशिष्ट संयमाने ते बद्ध आहेत म्हणूनच हें कालचक्र चालू आहे असं दिसेल. त्यामुळच 'नवटिकल्यांची ही चंद्रकला' आपणांस सुंदर भासते. डोंगरमाथ्यावरून धडाधड उड्या घेऊन सागरमीलनास आतुर झालेल्या सरिता काठांच्या बंधनामुळंच प्रवाही बनल्या, विकासशील झाल्या आणि ह्या तप्त जगाला 'जीवनाचें' दान देत देत अखेरीस महासागरांत विलीन

झाल्या. आपल्या सभोवताली रानावनांतून उभी असणारी ही वृक्षराजीच पाहा. ती फुलांनी फुललेली, फळांनी भारावलेली, हिरवीगार असल्यामुळं नेत्रांना सुखविणारी आहे; याचं कारण काय ? तर ती मुळांच्या बंधनांनी जखडली आहे हेंच ना ? आपल्या हजारो लाटांनी जगाचा घोट करूं पाहणारा तुफान दर्या मर्यादेनं आखला गेल्यामुळंच मानवी जीवनाला स्थैर्य आलं आहे. सागराचें तें तांडवनृत्य आणि भीषण संगीत श्रवण करीत गजान्तलक्ष्मीच्या मदानं धुंद झालेलीं शहरं सागराच्याच कडेवर निर्भय-पणानं मोठ्या ऐटींत उभीं असलेलीं आपण पाहतों की नाही ? अचलत्वाच्या नियमनांनी पर्वतांची शोभा वाढली आहे. रात्रीच्या गर्भाचं आवरण आहे म्हणून त्यांतून जन्म घेणारा उषःकाल अधिक रमणीय झालेला आपणाला भासतो. सारी सृष्टीच जणू कांही संयमांनी सांधलेली आहे असं आपणांस दिसतं. संयम आहे म्हणून सृष्टींत प्रमाणबद्धता निर्माण झाली आणि रेखीवपणा आला; पण ज्या वेळीं हा संयम तुटतो त्या वेळीं एकच आकांत घडून आलेला आपल्या अनुभवास येतो. तट सोडून स्वैर धावणाऱ्या नद्या, भूकवचाचं आवरण फोडून उद्रेक घेणारे ज्वालामुखी, आंतरराष्ट्रीय नियमनं गुंडाळून युद्धाकडे धावणारीं राष्ट्रें हीं 'बंधनाच्या पलीकडे' गेल्यामुळंच किती संहारक ठरलीं आहेत ? गेल्या महायुद्धामुळं मानवी जीवन किती उध्वस्त झालं याचा अनुभव आपण प्रत्येकानं घेतलाच की नाही ? आपले निर्वासित बंधू या अनुभवाची मूर्तिमंत साक्ष आहेत.

निसर्गाकडून मानवी जीवनाकडे वळलें म्हणजे तरी आपल्या दृष्टीला काय पडतें ? ज्या जीवनांत संयम साधला आहे तेंच जीवन अमर झालेलें आहे, कीर्तीनें सुगंधित झालेलें आहे. 'मनच मनुष्याला तारतें व तेंच त्याला मारतें' हा गीतेचा सिद्धांत आहे म्हणून मनोजय साधा असं गीता सांगते. मन हें वाऱ्याप्रमाणं गतिमान आणि पाऱ्यासारखं चंचल आहे. अशा अस्थिर मनाला हुकुमांत ठेवणं कठिणच आहे. ती एक मोठी साधना आहे. तरी पण ज्याला माणूस म्हणून जगायचं आहे, सेवेसाठी आपलं आयुष्य वेचायचं आहे, आणि ज्ञानाची उपासना करावयाची आहे त्यानं आपल्या मनावर हुकमत चालविली पाहिजे; इंद्रियनिग्रह साधला पाहिजे.

जगाचे स्वामी होण्याची इच्छा असेल तर आधी स्वतःचे स्वामी बनले पाहिजे. विकारवश होऊन मनुष्य म्हणून कुणालाच ह्या जगांत जगतां येत नाही. त्या विकारावर जो खरा जय मिळवितो तोच खरा मृत्यूला जिंकतो. बुद्धानं वासनांचा क्षय करून संयम साधला म्हणून बुद्ध खरा ज्ञानी झाला. सत्यासाठी विषाचा प्याला हसत पिणारा सॉक्रेटीस मृत्यूनंतर चिरंजीव बनला. 'संन्याशाचीं मुलं' म्हणून वाळींत टाकलीं असतांहि आणि पैठणच्या ब्रह्मवृंदांनी शुद्धिपत्र देण्याचें नाकारतांहि राग गिळून, अचल धैर्य राखून 'योगियांचे राजे' जे ज्ञानदेव त्यांनी जगाच्या कल्याणासाठी योगसाधना केली; 'भावार्थ–दीपिका' उजळली आणि म्हणूनच 'ज्ञानदेवमाउली' असा सर्वजण त्यांचा गौरव करतात. वारकऱ्यांचे ते देव बनले. ज्ञानदेवा-प्रमाणेच तुकारामांनीहि मनोजय साधला. उकळीचें पाणी अंगावर पडलें आणि अभंगाच्या वह्या इंद्रायणी नदीच्या डोहांत बुडविल्या तरीहि तुकाराम अविचल राहिले. मनाचा तोल त्यांनी सांभाळला. महात्मा गांधींचा संयम तर जगप्रसिद्धच आहे व तो बहुतेकांच्या परिचयाचा आहे. महात्माजींचें सर्व कांही मोजूनमापून. जेवणावर त्यांची हुकमत. निद्रेवर त्यांचा ताबा. वाणींतहि समतोलपणा. ह्या संयमित वृत्तीमुळंच ते 'महात्माजी' बनले; सगळ्या जगाच्या आदराचा आणि भक्तीचा विषय झाले.

म्हणून जीवनांत संयमाचें स्थान फार मोठें आहे. लक्ष्मणानं घालून दिलेल्या रेषेचं सीतामाईकडून उल्लंघन झालं. साधी चूक तिच्याकडून घडली. पण त्या चुकीमुळं पुढं केवढं प्रायश्चित्त तिला भोगावं लागलं! तसंच आपल्या जीवनाचं आहे. लहानसहान गोष्टींत जर आपल्याला इंद्रियनिग्रह साधतां आला नाही आणि मनावर ताबा ठेवतां आला नाही, तर ही जीवननौका स्वैर होऊन खडकावर केव्हा आपटून फुटेल ह्याचा काय नियम? आजच्या यंत्रयुगांत वेगवान वाहनांना ब्रेक्स दाबून आपण आपल्या इच्छेप्रमाणं त्यांना थांबवितों आणि वळवितों. मनाचंहि असंच आहे. मनावर जय मिळविला की त्या मनाला आपण आपल्या इच्छेनुसार वळवूं शकतों, वाकवूं शकतों. मनाचं सामर्थ्य फार प्रचंड आहे, पण संयमाशिवाय त्या सामर्थ्याला तेज नाही. आचार्य विनोबाजी संयमासंबंधीं म्हणतात की, "जीवनांतल्या लहानसहान

गोष्टींतहि नियमन पाहिजे. खाणें, पिणें, बोलणें, बसणें, निजणें वगैरे सर्व बाबतींत नियमन पाहिजे. कसेंहि वागूं आणि इंद्रियनिग्रह साधूं ही आशा व्यर्थ आहे. घड्याला बारीकसें छिद्र असलें तर तो पाणी ठेवायला निरुपयोगी होतो. तसेंच चित्ताचें आहे."

म्हणून संयम हें जीवनाचें सूत्र आहे–आधार आहे. संयमाशिवाय जीवन म्हणजे शिडीशिवाय वर चढणं आहे. सतारीच्या तारा खुंट्यांनी आवळल्या असतात म्हणून तर सतारींतून संगीत निर्माण होतं. पेटीचे सप्तसूर सुरांत वाजले तरच त्यांतून सुस्वर ऐकूं येतो. जीवनसंगीतहि अशा संयमाच्या तारांनी आवळल्या गेलं तरच जीवनाच्या सतारींतून नादमधुर स्वर कानीं पडतील. म्हणून संयमाच्या सीमारेषेवरच जीवनाची उभारणी व्हावयास पाहिजे. 'मन हें ओढाळ गुरूं' म्हणून आपले संत वारंवार विकारवश मनाची आपल्याला ओळख पटवून देतात. वाईट प्रवृत्तीकडे मन अगोदर खेचलं जातं आणि एकदा ह्या मनानं ही वाईट प्रवृत्ति चाखली की त्या मनाला पुन्हा परत फिरवणं कठिण आहे; आणि वाईट विषयांत मन रमलं म्हणजे मग जीवनांत काय उरलं? जीवनांतला 'राम' संपलाच; जीवन-पुष्पाचं सौंदर्य गेलं; परिमल गेला; जीवनाचं निर्माल्य झालं असंच म्हटलं पाहिजे.

●

# माझी आवडती गुजगोष्ट [दोन मेणबत्त्या] : १६

दोन मेणबत्त्या हा काणेकरांचा चिमुकला पण अतीव सुंदर लघुनिबंध आहे. तो लघुनिबंध जितका अधिक वाचावा तितकी अधिक गोडी त्यांत वाचकाला वाटते. काणेकरांचें असामान्य व्यक्तिमत्व ह्या निबंधांत पुरेपूर उमटलें आहे. मोहक व्यक्तित्वाचा मार्मिक आणि मनोहर आविष्कार ह्या लघुनिबंधांत झालेला आहे.

प्रथम निबंधाचें नांवच अत्यंत कुतूहलजनक वाटतें. तें वाचतांच वाचकांची कल्पना त्या नांवाभोवती घिरट्या घालूं लागते. वाचकांच्या मनांत येतें की, काणेकरांनी ह्या 'दोन मेणबत्त्या' कुठे पाहिल्या असतील?

आणि एखाद्या सुंदर तत्त्वाचें प्रतिपादन करतां यावें असें त्यांना ह्या दृश्यांत काय दिसलें असेल ?

वाचकांच्या कल्पनेचा हा अंदाज 'दोन मेणबत्त्या' ह्या लघुनिबंधांत अगदी बरोबर ठरतो. स्वाक्षरी मागायला आलेल्या मुलाला नुसती स्वाक्षरी नको असते. त्याला 'मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता' ह्याचें उत्तरहि पाहिजे असतें. हा ह्या लघुनिबंधाचा साधा विषय आहे. परंतु काणेकरांनी हा साधा विषय अत्यंत मार्मिक प्रसंगांनी उठावदार केलेला आहे. इन्कमटॅक्स चुकवून पंधरा लाखांचे सोळा लाख करण्याकरिता जीव पाखडणारा काणेकरांचा श्रीमंत मित्र आणि आलेली नोकरी लाथाडून व स्वतःच्या जीवनासंबंधीं उदास राहून दलित जनतेच्या जीवनासाठी जागरूक असलेला गरीब मित्र ह्या दोघांच्या जीवनांतील विरोध काणेकरांनी प्रस्तुत निबंधांत थोडक्यांत आणि मार्मिकपणें मांडलेला आहे. काणेकरांनी चित्रित केलेलीं स्वभावचित्रें जिवंत झालेलीं आहेत. श्रीमंत मित्राचें स्वभावचित्र रेखाटून काळ्या बाजाराची सूचना लेखकाने न कळत दिलेली आहे. कॉमरेडच्या चित्रांतून स्वतः लेखकच डोकावून पाहत असल्याचा आपल्याला भास होतो.

ह्या दोन मेणबत्त्यांच्या प्रकाशांत काणेकरांना एका अत्यंत सुंदर सत्याचें दर्शन होतें. तें सत्य म्हणजे 'शेवटच्या घटकेपर्यंत आपण सर्वांना प्रकाश दिला या सुखदायी तंद्रींत संपणारा आयुष्याचा शेवटचा क्षण हा खरा सुखाचा क्षण ! 'मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता ?' असा प्रश्न विचारणाऱ्या मुलाच्या वहीवर लगेच काणेकर लिहितात, 'स्वतःसाठी जगलास तर मेलास. दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास !'

प्रस्तुत निबंधाचा आरंभ आणि शेवट अत्यंत आकर्षक आहे. सहज साधलेली सुबोधता, चटकदार उत्कटता आणि गोड आटोपशीरपणा हे काणेकरांचे गुण येथे प्रकर्षाने उतरलेले आहेत. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत समंजसपणाचा आहे. लघुनिबंधाची भाषा देखील साधी पण अत्यंत आकर्षक आहे.

प्रो. फडके ह्यांच्या हस्तस्पर्शाने वाटेल त्या विषयाचें सोनें होतें असें म्हणतात तें अगदी यथार्थ आहे. 'पहिला पांढरा केस' हा लघुनिबंधाचा विषय अगदीच साधा. दररोजच्या व्यवहारांतला आणि अनुभवांतला. पण फडक्यांनी तो विषय रंगवितांना वापरलेले रंग कोण बहारीचे आहेत! या लघुनिबंधांत काय कमी आहे?

'आकर्षक सुरुवात, वेधक शेवट, सूक्ष्म विनोदाची चमक, किंचित् विषयान्तर करण्याचें कसब, मधेच एखादी गोष्ट सांगून आणलेली रंजकता, हसतखेळत प्रगट झालेलें तत्त्वज्ञान, भाषेची मधुरता, वाचकांबरोबर हितगुज करण्याची चतुराई' इत्यादि सर्व गुणांचा समुच्चय येथे आढळतो. पण जें सहसा गुजगोष्टींत सापडत नाही तेंहि येथे आहे; आणि तें म्हणजे शेवटच्या वाक्यांत रहस्यमय मानवी मनाचें केलेलें ओझरतें प्रकटीकरण.

'पांढरा केस' हा लघुनिबंध, दाढी करतांना नजरेस आलेल्या पांढऱ्या केसाने मनांत उठविलेल्या विचारांचें काहूर व विवेकाचें त्यावरील नियंत्रण यांच्या आंदोलनाने फारच उत्कृष्ट उतरला आहे. निबंधाचा विषय अगदीच साधा आणि दररोजच्या जीवनांतला. पण साध्या विषयांत फडक्यांनी काढलेला आशय बहुमोलाचा आहे. डोक्यावर कांहीशा उर्मटपणाने चमकणारा पांढरा केस दृष्टीस पडतांच फडक्यांना विस्मय वाटला. अंतःकरण किंचित् कंपितहि झालें व काळ्या केसवाल्यांतून आपण उठलों असें त्यांना वाटूं लागले. आपल्या काळ्या केसवाल्याची जात बदलल्याबद्दल त्यांना विषाद वाटला. कारण लोक आता आपल्यासंबंधीं आदर दाखविणार! क्षणांत कलप वापरण्याची कल्पना त्यांच्या मनांत डोकावली; पण लगेच त्याहि विचाराने उलट खाल्ली आणि 'जवानी अगर म्हातारपण केसाच्या रंगावर का अवलंबून आहे? .....शहाणपण जसं केसांत नसतं तसंच तारुण्यहि केसांच्या रंगांत नाही.' अशा तऱ्हेचें तत्त्वज्ञान पांढऱ्या केसाशीं खेळतां खेळतां अत्यंत हळुवार हाताने, कलात्मक भाषेंत त्यांनी प्रगट केलें. लघुनिबंधाचे शेवटीं प्रो. फडके उमेद राखून म्हणतात 'ह्या पहिल्या पांढऱ्या केसानें

एक उपकार केला आहे माझ्यावर. तो हा की आता पुढं कितीहि पांढरे केस माझ्या डोक्यावर दिसले तरी आश्चर्याचा अगर विषादाचा धक्का मला पुन्हा बसावयाचा नाही ' पण दाढी करतां करतां त्यांच्या विचारांना कलाटणी मिळते, तेव्हा ते लिहितात, ' दहादा माझ्या मनांत आलं की तो पहिला पांढरा केस आजच न दिसतां आणखी पांच दहा वर्षांनी दिसला असता तर बरं झालं असतं. ' हे विचार मनांत येण्यापूर्वीच त्यांनी मोठ्या उत्साहाने निश्चय केला, तो असा की, ' तारुण्य केसांत नाही. मला माझी जवानी कायम ठेवावयाची असेल तर खरी काळजी घेतली पाहिजे माझ्या अंत:करणाची. तरुण पिढीच्या विचारांशीं, महत्त्वाकांक्षांशीं समरस होण्याचीं माझी हौस नि ताकद मी कायम ठेवली पाहिजे. '

प्रो. फडके ह्यांच्या तत्त्वज्ञानाला काव्यामुळे अवीट गोडी प्राप्त झालेली आहे. विषयाचा विकास हळूहळू होतांना तत्त्वज्ञानाचे ओझरत्या नाजुक किरणांचा निबंधाला जो स्पर्श झाला तो मनोज्ञ आहे. ह्या लघु-निबंधांतील विचार, भावना, कल्पना आणि सहजसुंदर भाषा यांचा संगम अत्यंत आकर्षक आहे. जीवनाकडे पाहण्याचा फडक्यांचा दृष्टिकोन पूर्णपणें खेळकरपणाचा आहे.

•

८६३९ १८

# विनोबाजींची लेखनशैली

विनोबाजींच्या जीवनाचा, तपश्चर्येचा, कर्ममार्गाचा आणि तत्त्व-निष्ठेचा त्यांच्या भाषाशैलीवर परिणाम झालेला आहे. विनोबाजी हे गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे उपासक. गांधीवादावरच त्यांचें लिखाण आधारलेलें. प्रत्यक्ष महात्माजीपेक्षाहि त्यांनी आपले विचार अत्यंत कलात्मक आणि शास्त्रशुद्ध रीतीने मांडून दाखविले आहेत. त्यांच्या लेखनशैलींत विचारांची निश्चितता, तर्कशुद्धता, प्रसाद हे गुण विशेषत्वाने उतरले आहेत. एकहि वाक्य, किंबहुना एकहि शब्द त्यांत वायफळ आलेला नसतो. सुवर्णकारानें घडविलेल्या साखळीची घडण त्यांच्या प्रत्येक वाक्याला झालेली आहे. एकएक वाक्य कसें प्रमेयांतील पदाप्रमाणे एकांतून दुसरें स्फुरलें आहे. त्यांतील

शब्दांची ठेवणहि ठरलेली. थोडीदेखील हालचाल व बदल त्यांच्या वाक्याला सहन होत नाही. सगळें लिखाण हृदयस्फूर्त. उदाहरणादाखल त्यांची काही वाक्यें पाहा—'काबडकष्ट करणाऱ्या गरीब जनतेच्या आत्म्यांत आमचा आत्मा मिसळून गेला पाहिजे. असा जेव्हा आमचा आत्मा दरिद्रीनारायणाच्या आत्म्याशीं समरस होईल तेव्हा पुंडलिकासाठी परब्रह्म धावून आलें त्याप्रमाणे स्वराज्यहि आमच्यासाठी धावून येईल.'

'शेतकऱ्यांचें जीवन म्हणजे नम्र प्रयत्नवादाचें शिक्षण.' 'शेतकऱ्याच्या दर एक कणांत साक्षात् लक्ष्मीचा निवास आहे.' 'विष्णूच्या कृपेचा पाऊस पडेल तेव्हाच लक्ष्मी प्रगट होईल; पण शेतकऱ्याच्या प्रयत्नांचा नांगर चालल्याशिवाय विष्णची कृपा होणेंहि अशक्य आहे.' 'अंगांतून घामाच्या धारा काढाव्या तेव्हाच पर्जन्याच्या धारांची वाट पाहावी.' 'आज विद्वानांची विद्या लिलावांत निघाली आहे.' 'सहित म्हणजे संगतीने चालणारें ह्यावरून साहित्य शब्द बनला. साहित्याची राष्ट्राच्या उज्ज्वल आकांक्षेशीं संगति पाहिजे. त्याने राष्ट्रीय मनोगत बोललें पाहिजे.'

वर उल्लेखलेल्या वाक्यखंडांतून विनोबाजींची भाषाशैली किती साधी, प्रासादिक, अर्थभरित, तर्कशुद्ध, विचारसौंदर्याने नटलेली, आचारधर्माची, उद्बोधक आहे हें आपल्या प्रत्ययास येईल. काव्य आणि तत्त्वज्ञान ह्यांचा मिलाफ त्यांच्या गद्यांतून झालेला आहे. तपश्चर्येमुळे प्रयागतीर्थाचा महिमा त्यांच्या लिखाणाला प्राप्त झालेला आहे. विनोबाजी स्वतः संस्कृत पंडित आहेत; पण त्यांचें लिखाण मात्र पांडित्याने भारावलेलें नाही. त्यांच्या भाषेंत पांडित्य आहे, पण त्या पांडित्यांत गंगाजलाचा ओत्र आहे, सुलभता आहे. अंतरंगांतील सगळे गुणधर्म बरोबर घेऊन त्यांची सरस्वति प्रकट झाल्यामुळे त्यांच्या भाषेंत सहजता आणि आत्मीयता उतरली आहे. त्यांच्या उपासनेमुळे, ऋषितुल्य आचारणामुळे तीर्थाचा महिमा आणि प्रसन्नता त्यांच्या भाषाशैलीला लाभली आहे. त्यांच्या लिखाणांत जें पावित्र्य उतरलें आहे तें यामुळेच.

'फुलराणी 'ही बालकवींची अनुपरम्य कविता मराठी वाङ्मयांत अमर झालेली आहे. ही कविता रूपकात्मक आहे. रविप्रतिभेमुळे फूल फुललें ह्या साध्या गोष्टींतून ' ी गोड कहाणी ' निर्माण झाली आहे. निसर्गातील गोष्टींवर मानवी भावनांचा आरोप करण्याकडे बालकवींची नैसर्गिक प्रवृत्ति होती. त्या प्रवृत्तीचें 'फुलराणी' हें एक सुंदर उदाहरण आहे. 'फुलराणी'तील नाजूक कल्पना म्हणजे जणू कांही यौवनांत पदार्पण करणाऱ्या कुमारिकेच्या अंतःकरणांतील भावनाच होत अशी कल्पना ही कविता वाचतांना आपल्याला येते.

मखमलीप्रमाणे मृदुल अशा हिरव्यागार गालिच्यावर फुलराणी खेळत होती. त्या 'गोड निळ्या वातावरणांत' अव्याज मनाने ती डोलत होती. तिचें मन कुमारिकेचें होतें. अजून यौवनाच्या उंबरठ्यावर ती उभी राहिली नव्हती आणि म्हणून 'प्रणयचंचला त्या भ्रूलीला अवगत नव्हत्या कुमारिकेला' अशी तिची अजाण स्थिती होती. आईच्या मांडीवर बसून झोके घ्यावे, गाणीं गावीं, ह्यापेक्षा अधिक त्या 'साध्या भोळ्या' फुलराणीला ठाऊक नव्हतें.

बालकवींनी कवितेच्या प्रारंभीं निर्माण केलेलें वातावरण अत्यंत मनोहर आहे. 'हृदयांतील सौंदर्य' मुक्तहस्ताने बालकवि उधळत आहेत असा भास ह्या कवितेची प्रत्येक ओळ वाचतांना होतो. नाजूक कल्पना चित्रित करण्यांत तर बालकवि सिद्ध-हस्त आहेत. पुढील कल्पना पाहा—

'छानी माझी सोनुकली ती। कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून। हळुच पाहतें डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा। आवडला अमुच्या राणींना
लाजलाजली या वचनांनी। साधी भोळी ती फुलराणी '—

यौवनांत पदार्पण करूं पाहणाऱ्या 'फुलराणी 'च्या मुग्ध भावनांना कोण हा नाजूक स्पर्श ? सुंदर कल्पनांची पखरण पसरल्याचा प्रत्यहि भास होतो. जणू कांही जाईजुईच्या फुलांचा सडाच कल्पनेच्या रूपाने ह्या संपूर्ण

कवितेंत पडलेला आहे. 'मध्यरात्रीच्या निवांत समयीं' जेव्हा 'वनदेवता खेळत होती, निर्झर गात होता, सगळें रान त्या तालावर झुलून राहिलें होतें' तेव्हा 'प्रणयचिंतनीं विलीन' झालेली ही कुमारिका फुलराणी डुलत होती; व डुलतां डुलतां गुंग होऊन तिने जें स्वप्न पाहिलें तें अत्यंत बहारदार आहे. आकाशांतील 'प्रणयखेळ' पाहून फुलराणी 'विरहार्त' झाली. 'व्योमींच्या प्रेमदेवता' फुलराणीबरोबर खेळण्याकरिता खाली आल्या व एकमेकांना आपसांत खुणा करून 'हीच बरं का अमुची राणी' असं म्हणाल्या.- हें कल्पनाचित्र किती मधुर, प्रणयरम्य आणि कुमारिकेच्या हृदयाला गुदगुल्या करणारे आहे !

त्यानंतरचें चित्र उषःकालचें आहे. तितकेंच रम्य आणि नाजूक.. प्रभातवात नाचत होता. खेळून दमल्यामुळे ग्रहमाला लपायला लागल्या. 'आकाशाची गंभीर शांति' पृथ्वीवर हळूहळू पसरत होती. 'शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवून' ही अवनी अत्यानंदाने नटली होती. फुलराणी मात्र अजून स्वप्नांतच रंगत होती. त्यानंतर प्रभातकाल झाला. 'तेजोमय मंडप' आकाशांत उभारला गेला. चहूंकडे दवबिंदूचे मोती उधळीत स्वर्गीय मंडळी लग्नाकरिता आकाशांत जमा झाली. चंडोलपक्षी वाङ्निश्चय करण्याकरता आकाशांत वर जाऊं लागला; कारण साध्याभोळ्या फुलराणीचें थाटाचें लग्न होणार होतें. आणि त्या लग्नप्रसंगीं 'सृष्टीच्या भाटांनी' मंगलाष्टकें म्हटलीं, वाऱ्याने सनई वाजविली, 'भारद्वाज' नाचूं लागले, आणि निर्झरांनी पखवाज वाजविले. 'नवरदेव सोनेरी रविकर। नवरी ही फुलराणी सुंदर' असा हा अनुरूप जोडा होता. सावधान होतांच 'दवमय अंतःपट' दूर झाला. 'रविकर आणि फुलराणीं' ह्यांचें मीलन झालें. अशी ही फुलराणीची गोड कहाणी आहे.

ही कविता वाचून वाचक मंत्रमुग्ध न झाला तरच नवल! ह्या कवितेच्या प्रत्येक ओळीओळींतून कवीच्या ठिकाणीं असलेल्या असामान्य प्रतिभेचें दर्शन आपल्याला घडतें. नाजूक कल्पना, लयबद्धता, शब्दांची जादू, रम्य वातावरण, नादमाधुर्य ह्यांचा इतका सुंदर मिलाफ इतरत्र क्वचितच पाहावयास सापडतो.

●

क्रमांक

# मी शिक्षणमंत्री झालों तर–



त्या दिवशीं माझ्या भाग्याला सीमाच उरणार नाही. शब्दांमध्ये आनंदाचें माप करतां येणार नाही, कारण उराशीं बाळगलेलें स्वप्न साकार झालेलें त्या क्षणीं मी पाहणार आहे. माझ्या जीवनाची हौस त्या घटकेला पुरी होणार आहे. जीवनांत ह्यापेक्षा भाग्याचा क्षण कोणता ?

पण जेव्हा, मी अधिक विचार करूं लागतों तेव्हा वाटतें की मंत्रीपद भूषविणें हें इतरांच्या दृष्टीनें महद्भाग्य असले तरी त्या क्षणापासून लोक-हिताच्या विशिष्ट कर्तव्याने मी बांधला जाईन. जनतेने ज्या विश्वासानें मला आपला शिक्षणमंत्री मानलें त्या जनतेचा विश्वास पुरा करायचा म्हणजे मंत्रीपदावर आरूढ झालेल्या घटकेपासून अनेक जबाबदाऱ्यांचा स्वीकार करणें होय. ' मुकुट धारण केला की चिंता वाढतात ' अशा अर्थाची इंग्रजी म्हण सरोखर सार्थ आहे.

असें जरी असलें तरी जबाबदारीचें ओझें दूर सारून त्यांतून पळवाट काढायची ही माझी मनोवृत्ति नाही. लहानपणापासून रामायणमहाभारताच्या कथा ऐकून माझी मनोवृत्ति मुळांतच झुंजार बनलेली आहे. रामप्रभूचा त्यागाचा आदर्श आणि लोककल्याणाचें ध्येय माझ्या डोळ्यांपुढे आहे. मी शिक्षणमंत्री झालों तर लोककल्याणाचें ब्रीदवाक्य अंतःकरणांत कोरून राष्ट्रांत शैक्षणिक क्रांति घडवून आणण्याचें माझें धोरण राहील.

भारतांत अनेक योजना आखल्या जात आहेत. केंद्रसरकारपुढे अनेक समस्या असल्यामुळे केवळ शिक्षणाकडेच लक्ष देण्यास केंद्रसरकारला तूर्त सवड नाही. भारत स्वतंत्र होतांच भारतांतील जनतेवर राज्यशकट हाकण्याची जबाबदारी येऊन पडल्यापासून शास्त्रज्ञ, मुत्सद्दी, शासनप्रवीण, विधिज्ञ, युद्धनीति जाणणारे अशा विविध प्रकारच्या नेकीच्या माणसांची आवश्यकता भारतांत प्रचंड प्रमाणांत भासूं लागली आहे. त्यांतून भारत सरकारने पंचवार्षिक योजना हातीं घेतल्यापासून तर नियोजनतज्ज्ञांची आणि तंत्रज्ञांचीं गरज ही फार निकडीची झालेली आहे. तेव्हा मंत्री झाल्या-बरोबर अशा तऱ्हेची लायक व नेकीचीं माणसें विद्यापीठांतून कशीं तयार

होऊं शकतील व विद्यापीठांतून बाहेर पडणारे विद्यार्थी राष्ट्राचा गाडा कसा सावरून घेऊं शकतील ह्यासंबंधीच्या योजना मी प्रथम आखेन.

आज राष्ट्राचा शैक्षणिक दर्जा फार खालावलेला आहे. अलाहाबादच्या भाषणांत पंडित नेहरु विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणतात, " विद्यार्थ्यांत कोणत्या तरी मूलभूत गोष्टीची उणीव भासत आहे. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविणें आणि त्यांना नीतिमान बनविणें हेंच विद्यापीठाचें कर्तव्य आहे. परंतु विद्यार्थी तसे बनत नाहीत. तेव्हा शिक्षणाच्या पद्धतींत आमूलाग्र बदल करणें अवश्य आहे. राष्ट्राला उपयोगी असे नागरिक बनण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची सिद्धता व्हावी हाच शिक्षणाचा प्रधान हेतु असला पाहिजे. " शिक्षणासंबंधीं पंडित नेहरूंनी काढलेले हे उद्गार खरोखर सार्थ आहेत. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे जबाबदार नागरिक होणार आहेत. परंतु आजचा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा, त्यांची कुवत, त्याचप्रमाणे समाजांत शिक्षकांच्या संबंधीं असलेली अनास्था ह्या गोष्टी डोळ्यापुढे आल्या म्हणजे एकंदर परिस्थिति मोठी निराशाजनक वाटते. ज्या शिक्षणावर साऱ्या भारताची मदार आहे तें शिक्षणच आज खालच्या पातळीवर गेलें आहे. मी जर शिक्षणमंत्री झालों तर राष्ट्रहिताच्या दृष्टीने प्रचलित शिक्षण आमूलाग्र बदलून नवीन जोमदार राष्ट्र ज्यामुळे घडून येईल अशा तऱ्हेची अभिनव शिक्षणपद्धति मी रूढ करीन. शारीरिक शिक्षणाला शिक्षणांत प्रथम स्थान राहील. विद्यार्थ्यांचें आरोग्य वाढून ते आनंदी व कार्यक्षम कसे बनतील ह्यासंबंधीच्या योजना प्रथम आखण्यांत येतील. सांघिक व्यायामाची अभिनव व तंत्रशुद्ध पद्धत अमलांत आणीन व व्यायामाच्या आणि खेळांच्या वेळांहि वैद्यकीय सल्ल्यावरून हितावह अशाच ठेवण्यांत येतील. एकदा विद्यार्थी शरिराने कणखर झाला तर इतर कामें तो अधिक चिकाटीने व मेहनतीने करूं शकेल. हे करीत असतांनाच शिक्षणक्रम असा आखण्यांत येईल की विद्यार्थ्यांची नीतिमत्ता, त्यांचा मानसिक खंबीर-पणा वाढीला लागेल. त्यानंतर शिक्षणक्रमांत महत्त्वाचा बदल म्हणजे ज्ञानार्जन अथवा कलाशिक्षण व औद्योगिक शिक्षण ह्यांची एकवाक्यता सांधण्यांत येईल. प्राथमिक शिक्षण हाच शिक्षणाचा खरा पाया समजून

प्राथमिक शिक्षणाचा व शिक्षकाचा दर्जा बराज वाढविण्यांत येईल. प्राथमिक अवस्थेंतच विद्यार्थ्यांना उद्योगधंद्याची पूर्ण गोडी लागेल ह्यावर विशेष कटाक्ष राहील. प्राथमिक शिक्षण सक्तीचें राहीलच; पण त्याचबरोबर प्रात्यक्षिक ज्ञानाने त्यांच्यांत जिज्ञासा, आवड, कृतिशीलता ह्या गोष्टी विशेषत्वाने निर्माण व्हाव्यात ह्या दृष्टीने शिक्षणक्रम आखण्यांत येईल. प्रवासाला विशेष महत्त्व दिलें जाईल. रामायणमहाभारताचीं नीतितत्त्वें ह्याच वयांत त्यांच्या मनावर रुजावींत अशी माझी योजना राहील. त्यानंतर दुय्यम शिक्षण विनामूल्य देण्यांत यावें या मताचा जरी मी असलों तरी; पण तें आजच्या परिस्थितींत विनामूल्य जरी झालें नाही तरी कमीत कमी खर्चांत हें शिक्षण विद्यार्थ्याला कसें मिळेल ह्यावर कटाक्ष राहील. अर्थात् ह्या शिक्षणांत औद्योगिक शिक्षणाला प्राधान्य राहील व. शिवाय विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या औद्योगिक वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्याकडे सरकारला मी लक्ष द्यावयास लावेन. त्यामुळे शिक्षणाचा खर्च सरकारवर किंवा संस्थांवर पडणार नाही. ह्या शैक्षणिक क्षेत्रांत जे शिक्षणाधिकारी नेमल्या जातील ते शिक्षणतज्ज्ञ, प्रामाणिक, अनुभवी व मुळांतच शिक्षणासंबंधीं आवड असलेले असे नेमण्यांत येतील. शिक्षण हेंच आपल्या आयुष्याचें ध्येय मानणारे लोकच ह्या अधिकारपदावर रूढ होऊं शकतील. असें केल्यानें शिक्षणाचें आमूलाग्र स्वरूप बदलेल व विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासंबंधीं आपलेपणा व स्वावलंबी वृत्ति निर्माण होईल. आज जी विफलतेची दष्टि विद्यार्थ्यांत दिसून येत आहे ती यामुळे नष्ट होईल; आणि कमीत कमी खर्चांत विद्यार्थ्यांना असें स्वावलंबी शिक्षण दिल्यास राष्ट्रांतील बहुसंख्य विद्यार्थी ह्या शिक्षणाने तयार होतील. मात्र हें सर्व करीत असतांना विशिष्ट पद्धत व शिस्त विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी ह्यासंबंधीं पूर्ण विचार केला जाईल. अशा शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, धैर्य, आकांक्षा, निर्भयता निर्माण होईल. सुशिक्षितांनाहि आज ज्या बेकारीने नागविले आहे त्यामुळे शिक्षणासंबंधीं व शिक्षण देणाऱ्या शिक्षकासंबंधीं आज जो अनादर वाढला आहे तो अशा स्वावलंबी शिक्षणामुळे कमी होईल. शिक्षकांना योग्य मान व प्रतिष्ठा मिळावी, त्यांचा आर्थिक दर्जा वाढावा, पूर्णपणें ज्ञानदानांत

रंगून जाण्याइतपत त्यांची वेतनश्रेणी व्हावी, राष्ट्राचें आधारस्तंभ ह्या दृष्टीने जनतेने त्यांच्याकडे पाहावें ह्या दृष्टीने अभिनव शिक्षणपद्धतीचें स्वरूप राहील.

सारांश आजचा विद्यार्थी स्वावलंबी कसा बनेल, राष्ट्रीय वृत्तीचा परिपोष त्याच्या ठिकाणीं कसा निर्माण होईल, त्याचें शील कसें उंचावेल, जीवनांत हरघडी येणाऱ्या शास्त्रीय शोधाचें त्याला ज्ञान कसें मिळेल, त्याचें शरीरसौष्ठव कसें वाढीला लागेल, सहकारी वृत्तीची जोपासना कशी होईल ह्या सर्वांगीण दृष्टीने विद्यार्थ्याला शिक्षण मिळावें ह्याकडे शिक्षण-मंत्री झाल्याबरोबर मी लक्ष पुरवीन आणि शहरच नव्हे तर खेडीं देखील अशा शिक्षणाने खुलून दिसावीं हे माझे प्रयत्न राहतील. त्याचबरोबर उच्च शिक्षण देखील मातृभाषेंतूनच मिळावें ह्यासंबंधीं माझ्या योजना राहतील. अर्थात् हें सर्व करण्यासाठी प्रथम मला शिक्षणमंत्री बनलें पाहिजे हीच गोष्ट खरी; कारण डोळ्यांपुढे योजना पुष्कळ आहेत, पण मंत्रीपदाचा लाभच झाला नाही तर ह्या योजना अस्तित्वांत येणार कशा ?

●

# स्वातंत्र्यमंदिराच्या दारांत [१५ ऑ. १९४७] : २१

' पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ ' ही विनायकांची काव्योक्ति त्या दिवशीं सार्थ झाली. दीडशे वर्षांच्या गुलामगिरीच्या शृंखला भारत-मातेच्या पायांतून तटातट तुटल्या. स्वातंत्र्याच्या जयजयकाराने भारताचा कानाकोपरा गर्जूं लागला. आनंदाने सीमा सोडली. जनता हर्षाने वेडी झाली. ' यूनियन जॅक ' हे ब्रिटिश साम्राज्यशाहीचें निशाण खाली आलें, लाल किल्ल्यावर तिरंगी ध्वज लहरूं लागला. इतिहासांतील ही अपूर्व घटना होती. पारतंत्र्याचा अंधार जाऊन दिशा उजळल्या होत्या. तो मंगल दिवस होता. हुतात्म्यांच्या साधनेची ती पूर्णता होती. क्रांतिकारकांनी जागविलेल्या ज्योतींचा तो प्रकाश होता. भारताच्या महान् विभूतींनी अंतःकरणांत बाळगलेल्या स्वप्नाचा तो साक्षात्कार होता. जणू देवकीच कंसाच्या

जाचांतून मुक्त झाली होती. त्यामुळे दाही दिशांमध्ये हर्षाच्या लाटा खेळूं लागल्या. सूर्याचीं किरणें अधिक प्रकाशाचा संभार घेऊन आलेलीं आहेत असा भास झाला. पक्षी मजेने गाऊं लागले. निसर्ग अधिक चैतन्यमय भासूं लागला. ह्याच चैतन्याच्या लहरी अंगावर घेऊन सरिता अधिक वेगानें धावूं लागल्या. नभोवाणीवरून वैदिक ऋचांचे मंगल स्वर कानीं आले. तो क्षण अपूर्व होता. 'त्या क्षणीं जिवंत असणें हें मोठें भाग्य आणि तरुण असणें म्हणजे तर प्रत्यक्ष स्वर्गसुखच' असें जें एका आंग्ल कवीने म्हटलें त्याची सार्थकता पटली. कारण त्या क्षणीं मी जिवंत होतों एवढेंच नव्हे, तर भर तारुण्यांत होतो.

१५ ऑगस्टचें महात्म्य राम आणि कृष्ण ह्यांच्या जन्माइतकें आहे. गेल्या १८५० पासून ह्या भारतांत राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने ज्या चळवळी झाल्या आणि ह्या चळवळींत ज्यांनी आपलें शरीर, मन व धन झिजवलें त्यांना ह्या स्वातंत्र्याच्या घडीला झालेल्या आनंदाचें वर्णन कोण करूं शकेल ? ९ ऑगस्ट १९४२ ला 'छोडो भारत' हा ठराव झाला त्या वेळीं ब्रिटिशांनी तात्काळ महात्मा गांधी, पंडित नेहरु, वल्लभभाई पटेल ह्या भारताच्या पुढाऱ्यांना कारागृहांत कोंडले. जनतेच्या जागृतीचा अदमास ब्रिटिशांना घेतां आला नाही. पण जनताजनार्दनाने जागृत होऊन जो हादरा त्या वेळीं ब्रिटिश सत्तेला दिला त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यशाही क्षणभर कांपली, साम्राज्यशाहीच्या डोळ्यांतील धुंद पार उतरून गेली. तिचें धाबें दणाणलें. त्या वेळचे भारतमंत्री लॉर्ड पेथिक लॉरेन्स शोध घेण्याकरता भारतांत आले. 'फाळणीसह स्वातंत्र्य पत्करा, नाही तर पारतंत्र्याचें आहे तेंच जोखड कायमचें चालवून घ्या' असा पेंच लॉर्ड मौंटबॅटन ह्यांनी भारतीय पुढाऱ्यांना घातला. पंडित नेहरूंनी फाळणीसह स्वातंत्र्य पत्करलें. इतिहासाला कलाटणी देणारा निर्णय घेण्यांत आला. हिंद स्वतंत्र झाला. ह्या स्वतंत्र हिंदचे महामंत्री म्हणून पंडित जवाहरलाल नेहरु ह्यांची निवड झाली.

१४ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजतां घटनासमितीचें अधिवेशन झालें. सौ. कृपलानी यांनी 'वंदेमातरम्' हें राष्ट्रगीत म्हटलें. समितीचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनी "आजपर्यंत स्वातंत्र्यसंग्रामांत ज्या अज्ञात

नरवीरांनी आपलीं शिरकमलें मातृभूमीच्या चरणीं वाहिलीं, ज्यांनी हसत-मुखाने शत्रूच्या गोळ्या आपल्या छातीवर झेलल्या, ज्यांनी अंदमानच्या कोठडींत जिवंत मृत्यूला कवटाळले " त्या सर्वांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर पंडित नेहरूंनी देशसेवेचा प्रस्ताव सभेंत मांडला. राष्ट्रजनक महात्मा गांधी त्या वेळीं हयात होते. भारताचे पोलादी पुरुष कै. वल्लभभाई पटेल ह्यांची भारताचे गृहमंत्री म्हणून निवड झाली होती. पंडित नेहरूंनी त्या दिवशीं आपल्या भाषणांत सांगितलें, "मध्यरात्रीच्या प्रशांत समयीं जेव्हा जग झोपलेलें आहे तेव्हा भारत जागा होत आहे. स्वतंत्र होत आहे. हिंदुस्थानची सेवा म्हणजे हिंदुस्थानच्या असंख्य जनतेची सेवा." जोंवर जगांत यातना आणि अश्रु कायम आहेत तोंवर आपलें काम सतत चालू राहिलें पाहिजे."

त्या दिवशीं सर्व राष्ट्र अंधारांतून प्रकाशांत आलें होतें. स्वातंत्र्याच्या मंगल मंदिरांत उषा हसत होती. त्या दिवसाचें स्वागत करण्यांत लहानथोर गुंतले होते. शाळाशाळांतून त्या दिवशीं उत्सव झाला. विद्यार्थ्यांचीं तोंडें मिठाईने गोड झालीं. घराघरावर तिरंगी झेंडे उभारण्यांत आले. सरकारी कचेऱ्यांवर तिरंगी ध्वज फडफडूं लागले. रात्रींच्या वेळीं लोकांनी पणत्या लावून दिवाळी साजरी केली. मंदिरांतून त्या दिवशीं उत्साहाने प्रार्थना झाली. घंटानाद जोराने घणघणला. जणू उत्साहाने त्या दिवशीं मूर्त स्वरूपच स्वीकारलें होतें. तो भाग्याचा दिवस मी पाहिला. प्रत्यक्ष अनुभवला. माझ्या जीवनांतला तो अविस्मरणीय दिवस होता.

●

# ध्येय हाच जीवनांतील सुगंध : २२

'ध्येय हाच देव' अशा तऱ्हेचे उद्गार मराठींतील एका प्रथितयश लेखकाने काढल्याचें मला स्मरतें. ध्येयाची सिद्धि म्हणजेच परमेश्वरसिद्धि आहे. ध्येयप्राप्तीचा आनंद म्हणजे खरोखर ब्रह्मानंदच होय. पण हा आनंद कुणाला? तर ज्याच्या आयुष्यांत कांही ध्येय आहे, आयुष्यांत ज्याला कांही साधावयाचें आहे, ज्याला जीवनाची सफलता करावयाची आहे त्याला.

एकदा जन्म घेतल्यानंतर जगण्याला विशेष महत्त्व नाही. सगळेच जगतात. पण स्वत: जगून दुसऱ्याला जे स्फूर्ति देतात, जीवनांत आशा निर्माण करतात तेच खरे जगले असें म्हणायचें. सूर्य प्रकाशतो. प्रकाशणें हें त्याचें जीवनकार्य आहे; आणि हें करीत असतां हजारो जीवांना तो प्रकाश देतो; जीवन देतो. त्यालाच खरें जगणें म्हणायचें. सरिता जीवनसंगीत गात वाहतात त्या कशासाठी ? तर लोकांचे मळे फुलावे ह्या एकाच ध्येयासाठी ना ? विशिष्ट ध्येय साध्य व्हावें ह्यासाठीच पर्वतांनी अचलत्व स्वीकारलें आहे. तापलेल्या धरित्रीचा दाह शांत करावा ह्या हेतूनेच मेघ गर्जना करतात. इतकेंच काय पण घरांत जळणारी लहानशी उदबत्ती माझ्या जीवनांतला सुगंध इतरांनी लुटावा म्हणून स्वत: जळत राहते. एका विशिष्ट ध्येय-सिद्धीच्या मागे लागल्यामुळेच प्रत्येक वस्तूच्या जीवनाचें सोनें झालें असें आपणांस दिसेल. मग मनुष्यच याला अपवाद कसा असू शकेल ?

जीवनांत ध्येय होतें म्हणूनच अलेक्झांडर बादशहा जगज्जेता ही किताबत मिळविण्यासाठी, जग पादाक्रांत करण्याकरितां निघाला होता. सत्याच्या प्रकाशाने लोकांचें जीवन उजळावें म्हणून येशू ख्रिस्त सुळावर चढला आणि सॉक्रेटिसाने विषाचा प्याला आनंदानं झोकला. राजसत्तेची यत्किंचितहि अभिलाषा न बाळगतां सर्वसंगपरित्याग करून बुद्धाने संन्यास कां घेतला ? अहिंसेचा महामंत्र जगाला शिकवावयाचा होता म्हणूनच ना ? गुलामगिरी नष्ट व्हावी ह्याच एका ध्येयाने अब्राहाम लिंकनने स्वत:च्या जीवनाचें मोल देऊन अमेरिकेचें अध्यक्षपद भूषविलें. 'त्राही भगवान' झालेल्या जनतेला यवनांच्या जाचांतून सोडविण्यासाठी आणि महाराष्ट्र-धर्माची स्थापना करण्यासाठीच शिवरायांनी आपल्या आयुष्याची इति-कर्तव्यता मानली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तें मिळवीनच' हें ब्रीदवाक्य हृदयांत बाळगून लोकमान्य टिळकांनी आमरण ब्रिटिश सत्तेशीं झुंज घेतली. 'अहिंसा, सत्य आणि शांति' हेंच ध्येयवाक्य मानून महात्मा गांधींनी आपल्या जीवनाचा यज्ञ केला आणि जगाच्या जीवनाचा ओघ भौतिकाकडून सात्त्विक सुखाकडे वळविला. महान् ध्येयें उराशीं बाळगल्यामुळेच आजपर्यंत मनुष्यजीवनाची प्रगति झालेली आहे.

तें विकास पावलें आहे. मानवी जीवनाची उत्क्रांति झालेली आहे. अश्मयुगांतील माणूस रानटी अवस्थेंत होता; ध्येयाची त्याला जाणीव नव्हती म्हणून त्या माणसाचें आपण स्मरण करीत नाही. परंतु रानटी अवस्थेंतून उत्क्रांत झाल्यानंतर बुद्धिजीवी माणसाने जेव्हा नीतिमत्ता, पराक्रम, उदात्तता ह्या गुणांचा विकास केला, जीवन उन्नत केलें तेव्हा त्यांचे पोवाडे आम्ही गाऊं लागलों. रामायण–महाभारतांतील राम आणि कृष्ण ह्या पुरुषोत्तमांना आम्ही देवस्वरूप मानूं लागलों; असें कां? तर एका सात्त्विक ध्येयाने त्यांनी आपलें जीवन फुलविलें, त्यागाने समृद्ध केलें, जीवनाचा आदर्श जगापुढे ठेवला, म्हणूनच ना? ध्येय आहे म्हणून जीवनांत प्रगति आहे, विकास आहे. जीवनाला प्रकाशमान करण्याचें सामर्थ्य ध्येयांत आहे. म्हणून ज्याच्या आयुष्यांत कोणतेंच ध्येय नाही त्याच्या आयुष्यांतला प्रकाश संपलाच म्हणून समजावा. दीपगृहाच्या आधाराने जाणारें जहाजच किनाऱ्याला लागतें. दीपगृह सोडून तें सैरावरा जाऊं लागलें तर एखाद्या खडकावर आदळून त्याचे तुकडे होण्याचा संभवच अधिक असतो. जीवनाचें देखील असेंच असतें.

म्हणून शरिरांत प्राणाला जेवढें महत्त्व, तेवढेंच जीवनांत ध्येयाला आहे. सद्ग्रंथांचें वाचन, सदाचाराची वागणूक, थोर पुरुषांचा सहवास यांमुळेच उत्तम ध्येयांचें पोषण होतें. विद्यार्थीदशेंतच जीवनांत ध्येयबीजांची पेरणी व्हावयास पाहिजे. माती ओली असेपर्यंतच तिला वाटेल त्या वस्तूचा आकार देतां येतो. विद्यार्थीदशेंतल्या कोवळ्या मनावरच ध्येयाची रंगवल्लिका उमटली तरच जीवन सुंदर होईल. ध्येयाचा सुगंध दरवळून जीवनाची सार्थकता होईल.

# खेड्यांत चला : २३

'खेड्यांत चला' ही आपल्या राष्ट्रजनकाची हाक होती. भारताचें खरें स्वरूप पाहावयाचें आहे ना? मग तें मुंबईंत दिसायचें नाही अथवा भारताच्या राजधानींत त्याचें दर्शन घडावयाचें नाही. त्या स्वरूपाचें यथार्थ दर्शन खेड्यांतच होईल. खेडें हेंच खरें निसर्गाचें अपत्य आहे. भारतांतील अशा सात लक्ष खेड्यांतूनच जनताजनार्दन नटला आहे. स्वतःचें सत्य स्वरूप त्याने उघडें केलें आहे आणि हें उघडेंनागडें स्वरूप पाहून महात्मा गांधी तळमळले; विनोबाजी हळहळले. ह्या दरिद्रीनारायणाच्या सेवेसाठीच महात्माजी सेवाग्राम येथे येऊन राहिले. अज्ञान, दारिद्र्य आणि ऋण यांच्या ओझ्याने वाकलेल्या शेतकऱ्यांची सुखदुःखें महात्माजींनी पाहिलीं. पाहिलीं म्हणण्यापेक्षा ग्रामस्थांच्या जीवनाशीं एकरूप होऊन अनुभवलीं. विनोबाजींनी देखील परंधाम येथे आश्रम स्थापला. हें परंधाम म्हणजेच विनोबांची तपोभूमि आणि कर्मभूमि. ग्रामीण जीवन उन्नत झाल्याशिवाय भारताचा खरा भाग्योदय नाही हें त्यांनी जाणलें. भौतिक सुखाच्या मागे लागलेलीं कृत्रिम शहरें हें भारताचें खरें वैभव नाही किंवा संस्कृति नाही. तर खेड्यांतून राहणारी ३१ कोटी जनता हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. त्यांचे प्रश्न हेच खरे भारताचे प्रश्न आहेत. ग्राम हेंच खरें भारताचें हृदय आहे. ही हृदयक्रिया सुरळीत झाली तरच भारताचा सर्वांगीण विकास होणार आहे.

हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीसाठी म्हणून अनेक खेडीं येथे अस्तित्वांत आलीं. आर्यांच्या वेळेपासून ह्या ग्रामांना फार महत्त्व होतें. गुप्त राजांच्या कारकीर्दींत तर ग्रामव्यवस्था विशिष्ट पद्धतीची असून प्रत्येक ग्रामाचा कारभार स्वतंत्र होता. खेड्यांतील जनता सुखी होती; आपसांत बंधुभाव होता; खेडीं गोकुळासारखीं नांदत होतीं. परंतु ब्रिटिश राजवटीपासून खेड्यांचें महत्त्व कमी झालें. खेड्यांत राहणारा तो खेडवळ अशी भावना निर्माण झाली. शहरांतील नवीन वातावरणाला लोक भाळले. व्यापाराच्या निमित्ताने भारतांत शिरलेल्या ब्रिटिशांना खेडीं नको होतीं.

त्यांना व्यापार चालवावयाचा होता. त्याकरिता शहरांची भरभराट होणें आवश्यक होतें. शहरांत उद्योगधंदे वाढले. शहरें शिक्षणाचीं केंद्रें बनलीं. तुटपुंज्या शिक्षणानंतर नोकरींत मिळणाऱ्या लठ्ठ पगाराकडे सामान्य जनता आकर्षिली गेली. त्यामुळे खेडीं ओस पडूं लागलीं. सगळा ओघ शहराकडे वळला. खेड्यांतील लक्ष्मी दरिद्री बनली. लोकांचें जीवन बदललें. जीवनाला कृत्रिमता येऊं लागली. शेतकीप्रधान भारत पंगु बनला.

आज खेड्यांची स्थिति अत्यंत शोचनीय झालेली आहे. लोकांमध्यें शिक्षणाचा प्रसार नाही आणि खेड्यांतून व्यवस्थित शाळांची सोयच नाही तर हा प्रसार व्हावा कसा व शिक्षणासंबंधीं आवड निर्माण व्हावी कशी? ग्रामसुधारणेच्या दृष्टीने आज प्रयत्न होत आहेत. पण विशाल भारतांत ते प्रयत्न फार अपुरे पडतात. शिक्षण नसल्यामुळे ग्रामीण जनतेच्या अंगीं इतके दोष शिरले आहेत की ते दोष अनेक वर्षे मुरल्यामुळे त्यांना जीर्ण झाल्यासारखें झालें आहे. तात्पुरती उपाययोजना करून हे दोष निघण्यासारखे नाहीत. ह्या दोषांकडे सरकारची पूर्ण नजर पाहिजे. विद्यार्थ्यांनीहि स्वयंस्फूर्तीने संघटित होऊन आपल्या सुटीचा उपयोग खेड्यांत जाऊन तेथील लोकांना साक्षर बनवण्याकडे व त्यांना उपयुक्त माहिती देण्याकडे केला पाहिजे. हल्ली शेती सुधारणेचीं तांत्रिक साधनें निघालीं आहेत. त्यांचा उपयोग कसा करावा, जगांत काय चाललें आहे, त्याचा आपल्या जीवनावर काय परिणाम होतो ह्याची ग्रामस्थ बंधूंना जाणीव करून द्यावयास पाहिजे. अर्थात्, हें कार्य प्रामुख्याने ग्रामसंस्थांचें आहे. पण आज ह्या ग्रामसंस्था म्हणाव्या तेवढ्या कार्यक्षम नाहीत. ग्रामसंस्थांच्या सभासदांना सुधारकाची दृष्टि नाही. भवितव्य नाही. स्वतःच्याच प्रतिष्ठेकडे अधिक लक्ष. कांही ग्रामसंस्था आदर्श आहेत हें कबूल; पण केवळ 'कांहींनी' ह्या विराट भारतांतील खेड्यांची स्थिति कशी बदलेल? तेव्हा सरकारनेच पूर्णपणें हा प्रश्न हातीं घेतला पाहिजे, व तळमळीच्या व जाणत्या लोकांची खेड्यांतून नेमणूक केली पाहिजे. ह्याकरिता खेड्यांतील शाळा आदर्श करावयास पाहिजे. ही शाळा केवळ सरकारमान्य असून चालणार नाही; तर ती पूर्णपणें सरकारी पाहिजे. असें झालें तरच खेड्यांतून मुलांना चांगलें

शिक्षण देतां येईल. शाळेंतील शिक्षक हे आदर्श असून ते शिक्षणशास्त्र जाणणारे पाहिजेत. ह्या शिक्षकांकडेच संपूर्ण ग्रामजागृतीचें कार्य द्यावयास पाहिजे. असे तज्ज्ञ शिक्षकच शाळेचें आकर्षण इतकें वाढवितील की रात्रीच्या फावल्या वेळीं शेतावरून आलेले लोक 'आम्हाला शिकवा' असें म्हणूं लागतील. नेमलेले विषय योग्य रीतीने शिकविण्यासाठी शाळेंत सर्व सोयी उपलब्ध असल्या पाहिजेत. तेथे जगाचें ज्ञान देणारा रेडिओ असावा. मॅजिक लॅंटर्नची सोय शाळेंत असावी. म्हणजें जगांतील पुष्कळ गोष्टी करमणुकीच्या साहाय्याने खेड्यांतील लोकांना सांगतां येतील. जातीय वाद, द्वेष, मत्सर, दारु, जुगार इत्यादि व्यसनांनी तूर्त खेडीं पोखरून निघालेलीं आहेत. त्यांमुळे खेड्यांतला आनंद मावळला. बंधुभाव लोपला. हा आनंद आणि हा बंधुभाव पुन्हा निर्माण व्हावा ह्यासाठी कथा, कीर्तन, सभा, संमेलन ह्यांच्या द्वारें शेतकऱ्यांना दर आठवड्याला एकत्रित आणण्याची सोय असावी. शाळेंत वाचनालयाचा विभाग स्वतंत्रच असावा म्हणजे अनेक लोकांना त्याचा फायदा होईल. शाळेला लागूनच दवाखाना असावा. सूतिकागृहाची सोयहि दवाखान्यांत असावी. गुरांसाठीहि खेड्यांत उत्तम दवाखाना असावयास पाहिजे. त्या ठिकाणीं गुरांच्या रोगांबद्दल व जोपासनेविषयी ग्रामस्थांना माहिती देण्यांत यावयास पाहिजे. त्याचप्रमाणे सहकारी संस्थांकडून शेतकऱ्यांच्या कर्जाचें ओझें दूर होण्यास मदत व्हावयास पाहिजे. आज सर्व खेड्यांचा ओघ शहरांकडे वळण्याचें एक प्रमुख कारण म्हणजे खेड्यांत उद्योगधंदे नाहीत. हे उद्योगधंदे पुन्हा जर खेड्यांत चालविण्यांत आले तर खेडीं पुन्हा वसूं लागतील. शेतकरी शेतांतून तीळ, जवस, भुईमूग निर्माण करतो. त्याने स्वतःचा घाणा ठेवून तेलहि खेड्यांतच काढलें पाहिजे. ज्याची उसाची शेती आहे त्याने तेथेच गूळ तयार करावयास पाहिजे. ज्याला खंडोगणती कापूस होतो त्याने गांवांतील कोष्टी जगविले पाहिजेत. चांभार, सुतार, लोहार, कोष्टी, रंगारी ह्या सर्वांच्या पोटाचा प्रश्न सुटण्याइतपत त्यांचा धंदा खेड्यांत चालूं झाला तर खेड्यांत पुन्हा लक्ष्मी नांदूं लागेल. आज मात्र ह्या लक्ष्मीने खेड्याकडे पूर्णपणें पाठ फिरवली आहे. बहुतेक खेड्यांतून

अज्ञानाचेंच साम्राज्य दिसून येत आहे. जातीय वादांनी तीं पछाडलीं आहेत. परस्परांचा द्वेष करणें हाच त्यांचा एक जोडधंदा बनला आहे. हीं खेडीं अशींच राहिलीं आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीची कांहीच योजना जर आपण आखली नाही तर भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल होणर कसा? भारतांतील खेडीं म्हणजे ३१ कोटी लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे. बहुसंख्य जनतेचा तो प्रश्न आहे. ह्या बहुसंख्य जनतेची प्रगति आपल्याला जर साधतां आली नाही तर आपला देश प्रगतीची पाऊलवाट चालणार कशी? म्हणूनच 'खेड्यांचा प्रश्न' ही भारतापुढील फार मोठी समस्या आहे. सरकारने तें ओळखूनच पंचवार्षिक योजनेंत ही समस्या सोडविण्याचें ठरविलें. खेड्यांची ही शोचनीय स्थिति बदलण्याच्या दृष्टीनेच आपले सर्व प्रयत्न पाहिजेत. परमपूज्य विनोबाजींच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे आपणांस "खेडीं भरलें गोकुळ करावयाचें आहे. स्वावलंबी, आरोग्यसंपन्न, उद्योगशील, प्रेमळ अशीं करावयाचीं आहेत. उसाचें गुऱ्हाळ चाललें आहे, चरखा चालला आहे, पिंजारी पिंजीत आहेत, तेलाचा घाणा कुरं करीत आहे, विहिरीवर मोट चालली आहे, चांभार जोडा शिवीत आहे, गुराखी गाय राखीत आहे व पावा वाजवीत आहे असें भरलें गांव करायचें आहे. आपल्या चुकांनी आपण खेड्याचा मसणवटा केला. आता फिरून त्याचें गोकूळ करूं या."

●

# भूगोलाचा अभ्यास : २४

शालेय विषयांत अत्यंत अनास्थेने शिकविला व शिकला जाणारा विषय कोणता असेल तर तो भूगोल होय. ज्याला कसेंतरी उत्तीर्ण व्हावयाचें आहे अशा सामान्य मुलानेच हा विषय परीक्षेसाठी घ्यावा अशी समजूत रूढ झालेली आहे; आणि ज्या शिक्षकाने विद्यालयाचा उंबरठा ओलांडून शाळेच्या जगांत नुकतेंच पदार्पण केलें आहे अशा अननुभवी शिक्षकाच्या माथीं हा विषय मारण्यांत येतो. शिक्षणक्षेत्रांत मुरलेल्या शिक्षकांचा जणूं हा विषयच नव्हे, कारण त्यांत शिकवण्यासारखें काय आहे अशी त्यांची

समजूत झाल्यास न कळे! खरें पाहिलें तर भूगोल हा विषय अत्यंत व्यापक आहे. हरघडी मानवी जीवनाशीं ज्याचा संबंध येतो असा आहे. पण हा विषय शिकवण्याच्या आमच्या पद्धति आजपर्यंत इतक्या रुक्ष होत्या की, त्यांमुळे विद्यार्थ्यांच्या मनांत ह्या विषयासंबंधीं भीति बसली व अढी निर्माण झाली. ज्याला आपल्या बुद्धीबद्दल खात्री नसेल त्याने फार तर हा विषय घ्यावा अशा तऱ्हेने विद्यार्थी आपसांत बोलायला लागले. अर्थात् ह्या विचारसरणींत दिवसानुदिवस बदल होत आहे; नाही असें नाही. पण जो आदर व जी आवड ह्या विषयासंबंधीं निर्माण व्हावयास पाहिजे ती मात्र अजून झालेली नाही. माझा लहान मुलगा प्राथमिक शाळेंत जातो. भूशिरांचीं नांवें, नद्यांची लांबी, समुद्रांची खोली, शिखरांची उंची ह्यांसंबंधीं शाळेंत उतरवून दिलेली माहिती तो घरीं घोकीत बसतो. ह्या मुखोद्गत झालेल्या माहितीमुळे भूगोलविषयक त्याच्या ज्ञानांत त्यामुळे कांही भर पडत असेल काय? हीच परिस्थिति कांही अंशीं माध्यमिक शाळेंत असते. कांही ठिकाणीं तर भूगोलाचीं पुस्तकें क्रमिक पुस्तकांसारखीं वर्गांत वाचून घेण्यांत येतात. ह्या पद्धतीमुळे ह्या विषयासंबंधींची आवड वाढेल की कमी होईल? म्हणून तर विद्यार्थ्यांना हा विषय रुक्ष वाटतो आणि 'नको तो विषय' असा त्यांचा ग्रह बनतो.

अर्थात् शिक्षणक्रम जसजसा बदलेल व भूगोल विषयाला दृश्य अशा साधनांची परिपूर्णता जशी वाढेल तसें ह्या विषयाचें स्थान उच्च होईल यांत शंका नाही. परंतु आज तरी शाळांतून ह्या सोयी उपलब्ध झालेल्या नाहीत. म्हणून तर फावल्या वेळांत अभ्यास करण्याचा हा विषय आहे अशी ह्या विषयासंबंधीं विद्यार्थ्यांनी समजूत करून घेतली आहे. अनेक विषयांच्या ज्ञानाचा पाया भूगोल हा विषय असतांना विद्यार्थी मात्र भूगोलाविषयी पूर्णपणें उदासीन आहेत आणि ते उदासीन बनले तर तो त्यांचा दोष मानतां येईल काय? दोन नद्यांच्या मीलनाला संगम म्हणतात. ही व्याख्या नुसती पाठ केल्यानेच बालविद्यार्थ्यांना संगमाची कल्पना स्पष्ट होईल काय? संस्कृत विषयांत पाठांतर आवश्यक म्हणून भूगोलहि पाठ केला तर पाठांतरानेच त्यांतील प्रमेयें सुटतील काय? 'चारहि बाजूंनी वेढलेल्या

जमिनीच्या भागाला बेट म्हणतात.' ही बेटाची व्याख्याच मुखपाठ झाल्याने बेटासंबंधीं स्पष्ट कल्पना प्राथमिक शाळेंतल्या विद्यार्थ्याला आली असें मानायचें की काय? अर्थात् नाही. तर सहलींचा आश्रय घेऊन विद्यार्थ्यांना नद्या, पर्वत, दरी, वनस्पती इत्यादींची माहिती प्रत्यक्ष करून दिल्यास विद्यार्थ्यांना भूगोल विषयाचें खरें आकलन होईल. दोन नद्या एकत्र कशा मिळतात हें प्रत्यक्ष दाखविल्यानेच संगमाची कल्पना स्पष्टतर होईल. प्रत्यक्ष धबधबा दाखविला तर धबधबा असा असतो हें ज्ञान लहान विद्यार्थ्यांना होईल. हायस्कूलमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ह्या प्राथमिक गोष्टींच्या प्रत्यक्षपणाची गरज नाही; पण प्राथमिक शाळांतील मुलांना तर हें प्रात्यक्षिक ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. तरी पण, प्रवाह, निरनिराळ्या देशांतील लोकांची राहणी, त्यांच्या राहणीचें मान, निरनिराळ्या तऱ्हेचीं पिकें, त्यांना लागणारी जमीन व हवामान, खाणींचें स्वरूप, समुद्राची भरती-ओहटी ह्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना तरी स्पष्ट होऊं शकतील काय? प्रत्येक वेळीं प्रत्येक गोष्ट प्रत्यक्ष जाऊन पाहणें म्हणजे तें एक अवडंबर होईल ही गोष्ट खरी आणि तें शक्यहि नाही. पण मॅजिक लँटर्नच्या सहाय्याने भूगोलांतील अनेक गूढ गोष्टी विद्यार्थ्यांना अधिक स्पष्ट करून सांगतां येणार नाहीत काय? अमेझॉन नदी, नायगारा धबधबा, अमेरिकेंतील प्रचंड कुरणें, यंत्रांच्या सहाय्याने चालणारी प्रेअरीजमधील शेती, खाणींचें अंतर्गत स्वरूप, वनस्पतींनी युक्त असा समुद्राच्या आंतील भाग, झांबेजी नदीचा प्रचंड असा व्हिक्टोरिया धबधबा व त्या धबधब्याचे तुषार अंगावर घेत त्या ठिकाणाहून धावणारी आगगाडी, चीनची प्रचंड भिंत, वालुकामय प्रदेश, नद्या अडवून बांधलेलीं प्रचंड धरणें, बर्फमय प्रदेश, ग्रीनलंडमधील एस्कीमो लोकांची राहणी ह्या गोष्टी विद्युद्दीपाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना समजतील एवढेंच नव्हे तर निसर्गासंबंधीं त्यांच्यामध्ये आवड उत्पन्न होईल. केवळ अंधश्रद्धेने परमेश्वर हा जसा नेहमीकरिताच काल्पनिक स्वरूपांत राहतो तसेंच न समजतां भूगोल-विषय पाठच करीत सुटलों तर तोंडपाटीलकीपलीकडे अधिक ज्ञान विद्यार्थ्यांना होणार नाही. अगाध सृष्टीच्या विविधतेबद्दल त्यांच्यांत

आवड निर्माण होणार नाही. अर्थात् विद्युद्दीपाच्या साहाय्याने अभ्यासक्रम शिकवणें हें आजच्या काळीं शाळांतून शक्य नसलें तरी ती एक अत्यंत विचार करण्यासारखी गोष्ट आहे. भूगोलाच्या पाठाकरिता त्यासाठी एका स्वतंत्र खोलीची आवश्यकता भासेल. भौगोलिक माहिती, आराखडे, भिंतीला टांगलेले नकाशे, विषयास अनुसरून तयार केलेल्या प्रात्यक्षिक गोष्टी, ह्यांनी भूगोलाचा वर्ग सज्ज असावयास पाहिजे. असें शिकवलें तर भूगोल हा विषय विद्यार्थ्यांना खासच आवडेल. एवढेंच नव्हे तर ह्या विषयाच्या अनुषंगाने अनेक विषयांचें ज्ञानहि त्यांना आपोआप मिळेल. पिकांची लागवड ही जमीन आणि पाऊस ह्यांवर अवलंबून आहे असें सांगतांना जमिनीच्या जातींची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाईल. त्यायोगें भूगर्भशास्त्राची माहिती विद्यार्थ्यांना होईल. पाऊस पडतो कसा व सूर्यावर पाऊस कसा अवलंबून असतो हें शिकवतांना खगोलशास्त्राची माहिती त्यांना करून देण्यांत येईल. पिकांची विविधता सांगतांना वनस्पतिशास्त्रांत प्रवेश होईल. एस्कीमो लोकांचीं घरें व जपानी लोकांचीं घरें चित्रांत दाखवितांना स्थापत्यशास्त्रा-संबंधीं वर्णन देतां येईल. स्टॅलिनग्रॅड, बर्लिन, मिलन ह्या शहरांची माहिती देतांना दुसऱ्या महायुद्धाची कथा त्यांना सांगावी लागेल व भूगोलविषयक ज्ञानाशिवाय युद्धशास्त्र कसें लंगडें पडतें हेंहि समजावून सांगतां येईल. सारांश, भूगोल ह्या विषयाच्या अनुरोधानें अनेक विषयांची माहिती विद्यार्थ्यांना देतां येईल. असा हा व्यापक विषय असतांना साधनसामुग्रीच्या अभावीच ह्या विषयाचें स्वरूप आकुंचित व्हावें ही गोष्ट अनिष्ट नव्हे काय ? हें स्वरूप पालटून हा विषय शिकवण्याची पद्धत आमूलाग्र बदलून विद्यार्थ्यां-मध्ये ह्या विषयासंबंधीं आवड निर्माण करणें आज आवश्यक झालें आहे.

खरें पाहतां भूगोल हा विषय राष्ट्राच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. राष्ट्रीय भावनांच्या विकासाला ह्या विषयाची केवढी आवश्यकता आहे ? पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या प्रकारच्या प्रदेशांतील मानवी घडामोडी ज्ञात होण्यासाठी ह्या विषयाचें ज्ञान पाहिजे. अश्मयुगांत मनुष्य जसा रानटी होता तसा तो आज ह्या विद्युत्युगांत नाही. मानवाची उत्क्रांति झालेली आहे. विजेला भिणारा, श्वापदांना पाहून पळणारा, पूर पाहून स्तंभित

होणारा, रोगांच्या सांथीमुळे हतबुद्ध होणारा मनुष्यप्राणी आज राहिला नाही. आपल्या सामर्थ्यानें मानवानें निसर्गाला वाकविलें आहे. निसर्ग ताब्यांत आणला आहे. हा मानवी प्रयत्नांचा इतिहास भूगोलाच्या द्वारें आपणांस शिकावयास नको काय ? हा इतिहास किती मनोरंजक आहे ! इतकेंच काय, प्रत्येक गोष्टींतील कार्यकारणभाव लक्षांत घेतला तर भूगोल विषय कितीतरी सुगम होऊं शकेल. भूगोलाची मनोरंजकता त्यामुळे वाढल. नैसर्गिक परिस्थिति, तिचा मानवी जीवनावर होणारा परिणाम, निरनिराळ्या पदार्थांचें उत्पादन, त्याला लागणारी विशिष्ट परिस्थिति, उद्योगधंदे, कारखान्यास लागणारी शक्ति, ती उत्पन्न करण्याचे प्रकार, लोकसंख्येची विभागणी, आंतरराष्ट्रीय व्यापार, वाहतुकीचीं साधनें व मार्ग ह्या सर्व गोष्टी भूगोलाच्या कक्षेंत येतात. भूसृष्टींतील प्रत्येक गोष्टीचा कार्यकारणसंबंध लक्षांत घेऊन अभ्यास करणें म्हणजेच भूगोलाचा खरा अभ्यास होय आणि गेल्या दोन महायुद्धांमुळे संपूर्ण जग इतकें एक झालें आहे की एका कोपऱ्यांत घडत असलेल्या घडामोडीचा परिणाम जगांतील सर्व भागावर होतो. तेव्हा जगाची माहिती नसेल तर आजच्या जीवनांत केवढी उणीव निर्माण होईल हें निराळें सांगावयास नको.

●

# कला आणि नीति : २५

साहित्याचा हेतु कोणता असावा, तें सहेतुक असावें की निर्हेतुक, मनोरंजनाकरिता कलेनें नटावें, की जीवनाची पाऊलवाट तिनें उजळावी ह्यासंबंधानें अनेक भाषणांतून आणि लेखांतून आजपर्यंत बरीच चर्चा झालेली आहे. ' कलेकरिता कला ' की ' जीवनाकरिता कला ' हा वाद दोन तपांपूर्वी फार गाजला. अनेक कलाकारांनी हट्टानें आणि हिरीरीनें आपलीं मतें प्रतिपादिलीं आणि रंगविलीं. " सौंदर्यविलासाच्या रम्य वातावरणांत नेऊन उभा करणें हाच साऱ्या कलेचा मूळ हेतु आहे; नीति–अनीतीचा प्रश्न कलाविलासाच्या बाबतींत आगांतुक आहे " अशा तऱ्हेचें प्रतिपादन प्रा. फडके यांनी मोठ्या चतुराईनें ' प्रतिभासाधनांतून ' केलेलें

आहे. त्यांच्या 'साहित्यसंसाराची' मांडणीच ह्या कल्पनेंतून झालेली आहे. ललितसाहित्यासंबंधीं त्यांचीं कांही विशिष्ट मतें आहेत. 'ललितलेखक हा कलेचा उपासक आहे; शंकराचार्यांचा चोपदार नाही. नीतीचा बोध करणें हें कलाचतुराचें कामच नव्हे. सौंदर्यविलास हाच कलेचा हेतु असावा' असें अट्टाहासानें प्रा. फडके यांनी वारंवार सांगितलें आहे.

कलेविषयीचा हा दृष्टिकोण बहुतेक साहित्यिकांना मान्य नाही. 'कला म्हणजे मानवी भावनांचा सौंदर्यपूर्ण आविष्कार' हें मान्य करूनहि हा आविष्कार एका विशिष्ट ध्येयासाठी व्हावयास पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. 'All great art is propaganda' ह्या बर्नार्ड शॉ ह्यांच्या मताप्रमाणे नामवंत कादंबरीकार आणि नाटककार मामासाहेब वरेरकर यांनी कलेच्या बाबतींतील आपली भूमिका सर्वथैव प्रतिपादकाची ठेवलेली आहे. 'तत्त्वप्रतिपादनाच्या बाबतींत ते संयम, सौंदर्य सत्यनिष्ठा किंवा सदभिरुची यांपैकी कशाचीहि चाड बाळगत नाहीत.' कला ही प्रचारासाठी आहे ह्याच हेतूने त्यांनी आपलें संपूर्ण लिखाण केलेलें आहे. डॉ. केतकर यांनीहि 'वादकंडु शमविण्यासाठीच' मुख्यत्वें कादंबऱ्यांचें तंत्र अवलंबिलें आहे. 'रागिणीकार' वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबऱ्यांतून कला आणि जीवन यांची तात्त्विक सांगड घातली आहे. प्रा. फडके यांच्या मताप्रमाणे 'जीवनाच्या जंजाळांतून निसटण्याकडे किंवा प्रमत्त मयूरपिच्छांच्या सुबक सिंहासनावरच सरस्वतीने बसलें पाहिजे' असें वामन मल्हार जोशी मानत नाहीत. उलट 'कलेची आवड ठीक, पण कलेपायीं नीति नावडती होणें चांगलें नाही' असें त्यांचें प्रतिपादन आहे. 'कलेच्या राज्यांत कला ही राणी आणि नीति ही दासी' असावी हें फडक्यांचें मत त्यांना मान्य नसून "नैतिक तारेच्या सुराशीं कलेच्या तारेचा सूर जर जुळला नाही तर जीविताची सतार बदसूर वाजूं लागेल; आणि कोणालाच आनंद व्हावयाचा नाही. जीवन हें केवळ कलामय नाही. जीवनांत ज्या अनंत रम्य गोष्टी आहेत त्यांत कलेबरोबर नीतीचा आणि सत्याचाहि समावेश होतो" अशा विचारांनी वा. म. जोशी प्रेरित झाले आहेत. खांडेकरांनीहि 'कला ही जीवनाची सावली असून नदी जशी समुद्राला कुठे ना कुठे तरी मिळालीच पाहिजे त्याप्रमाणे कला ही जीवनांत

मिसळली पाहिजे ' असें प्रतिपादण्यांत आपलें लिखाण सजविलें आहे. खांडेकरांच्या 'दोन ध्रुव' आणि 'उल्का' ह्या कादंबऱ्यांची रचनाच मुळी 'जीवनाकरिता कला' असावी ह्या उद्देशानेच झालेली आहे.

प्रा. फडके यांच्या मताशीं कांहीसा जुळणारा दृष्टिकोण साहित्यसम्राट केळकरांचा आहे. केळकरांनी कलेविषयी जें मत प्रगट केलें तें असें, "कलाविलासाच्या मागे हेतुसंशोधनाचा गुप्त पोलीस लावून दिला तर अनर्थकारक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. ताजमहालाच्या पांढऱ्या शुभ्र दगडांत जी रंगीबेरंगी कुसर बसविली आहे तिचा नैतिक हेतु शोधून काढणाराने ताजमहाल पाहण्यास जाण्याचे श्रम न घेतलेले बरे. चित्रकार पौराणिक किंवा ऐतिहासिक चित्रें रंगवितो तेव्हा त्याचा हेतु कलेच्या दृष्टीने सुंदर चित्रें रंगविण्याचा असतो की नीतिबोध करण्याचा असतो ? गवई दीपराग आळवितो तो अर्थदृष्टचा मशालजीचा खर्च वाचविण्याकरिता नव्हे. शुद्ध निरपेक्ष आनंद हाच कलेचा हेतु व तेंच तिचें फळ होय." अशा तऱ्हेचें सुंदर प्रतिपादन बडोदा साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षीय व्यासपीठावरून केळकरांनी केलेलें आहे. साहित्यसम्राटांचें हें मत प्रा. फडक्यांच्या मताशीं मिळतेंजुळतें वाटत असलें, तरीपण 'आनंद' ह्या शब्दामागे 'शुद्ध' शब्द लावून कलेने 'औचित्य' पाळलेंच पाहिजे असें म्हटलें आहे.

कलेविषयी अनेक साहित्यिकांचीं मतें वर दिलीं आहेत. साहित्याकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोण कसा आहे हें त्यावरून कळून येईल. जीवनाच्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर कलेने प्रकाश टाकणें आवश्यक आहे काय, ह्यासंबंधीं विचार करतांना एक गोष्ट ठळकपणें आपण लक्षांत ठेवली पाहिजे ती ही की वाङ्मयकला ही इतर कलेसारखी समजली जात असली तरी इतर कलेंत व ललितकलेंत महत्त्वाचा फरक आहे. ललितकलेचें माध्यम 'शब्द व अर्थ' हे इतर कलांच्या माध्यमापेक्षा भिन्न स्वरूपाचें आहे. स्वरांचे आरोहअवरोह यांना गायनकलेंत महत्त्व आहे. नृत्यकलेचें माध्यम अभिनय हें आहे; आणि चित्रकला, रंग आणि आकृति ह्यांच्याच द्वारें प्रगट होणारी आहे. ह्या कलांचा परिणाम नेत्रकर्णादिकांच्या द्वारें मनुष्याच्या मनावर होतो. उलट 'शब्द आणि अर्थ' हेंच

ललितकलेचें माध्यम असल्यामुळे बुद्धीच्या द्वारेंच वाचकांच्या भावनेवर साहित्य परिणाम करूं शकतें. काव्य, कादंबरी, नाटक, लघुकथा हे ललित-साहित्याचे भिन्नभिन्न प्रकार मानले तरी त्यांचा संबंध भावना आणि विचार ह्या दोहोंशींहि येतो. गायन, चित्र, शिल्प, नृत्य ह्या कलांचा हेतु आनंद देण्याचा आहे म्हणून ललितकलेचाहि तोच हेतु आपण ग्राह्य मानावा हें मत एकांगी वाटतें. रशियन साहित्यिक आंतान शेको म्हणतो, "ज्याला कांही साधावयाचें नाही, एखाद्या वस्तूच्या प्राप्तीविषयी ज्याला तळमळ नाही तो खरा कलावंतच होऊं शकत नाही." म्हणूनच रंजनाकरताच कला प्रगट व्हावी हें प्रा. फडके यांचें मत तितकेसें युक्त वाटत नाही. फडक्यांनी निर्माण केलेले नायक आनंदराव, अविनाश, चारुदत्त, सुधीर, निरंजन, हे 'खडिसाखरेचे खडे' वाटतात; आणि इंदुमती, रजनी, निर्मला, मंदाकिनी, विद्या, आशा, मीनाक्षी ह्या नायिका 'मधुमंजिरी' वाटतात. त्यांचे नायक व नायिका 'दैवी सृष्टींतील आहेत, या भूतलावरील नाहीत' असें वाटूं लागतें. जीवनांतील अटीतटींच्या सामन्यांत फडक्यांच्या पुरुष आणि स्त्री पात्रांनी कधीच प्रवेश केला नाही. म्हणून प्रा. फडके यांच्या कलेविषयी उद्गार प्रगट करतांना माडखोलकर लिहितात, "लालित्य ही जीवनाची कलाकुसर आहे, त्याचें सारसर्वस्व नव्हे. पण हें सत्य ज्याला पटत किंवा पचत नाही त्या कलावादी लेखकाने लालित्याच्या भलत्याच कल्पनेच्या आहारीं जाऊन मेणाच्या पुतळ्यांचे दिवाणखान्यांतील शोभिवंत बिलोरी कपाटांत मांडून ठेवायला अगदी योग्य असें आरसपानी चिमणें जग निर्माण करण्यांत धन्यता मानावी ह्यांत नवल काय ?"

सारांश, जीवनांतील अनेक गुंतागुंतीचे प्रश्न हाताळण्याकडे कला-चतुराने आपली कला फुलवावी. पृथ्वी ही स्वत:भोवती फिरण्यांतच धन्यता मानीत नाही, तर प्रकाशमान सूर्याभोवती फिरण्यांतच तिच्या जीवनाचें सार्थक आहे असें तिला वाटतें. तद्वतच जीवनांत आनंद फुलविणें व हताश जीवनाला हसविणें ह्यासाठी कला नटली तरच कलेने खरें कार्य केलें असें म्हणतां येईल. केवळ प्रचाराचेंच धोरण जसें कलेला घातक, तसेंच 'रंजनाकरताच कलेचा अवतार आहे' असें म्हणणेंहि युक्त ठरणार नाही.

●

# संकलन–विभाग

# आपलीं ग्रंथालयें

डॉ. श्री. म. पिंगे,
एम्. ए., पी एच्. डी.

आज कोणत्याहि देशांत ग्रंथालयाचें फार महत्त्व मानलें जातें. ग्रंथालयें म्हणजे ज्ञानाचीं सदावर्तें होत अशी आपली विचारसरणी आहे; पण याच्याहि पुढे जाऊन ग्रंथालय हें त्या त्या विभागाचें सांस्कृतिक केंद्र म्हणून समजलें जाऊं लागलें आहे व त्यामुळे नुसताच ग्रंथसंग्रह म्हणजे ग्रंथालय असा समज राहिलेला नसून संस्कृतिसंवर्धनाच्या कार्यासाठी रेडिओ, टेलिव्हिजन व शैक्षणिक चित्रपट यांचेंहि साहाय्य मोठमोठीं ग्रंथालयें घेत असून जनतेची मानसिक व नैतिक पातळी उंचावण्याचें कार्य करीत असतात.

आपला भारत देश हा अधात्म विद्येचें माहेरघरच आहे! अनेक विद्या, कला व शास्त्रें यांचें उत्पत्तिस्थान म्हणून हा भारतवर्ष फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे; पण दुर्दैवाने आपल्या देशांत प्राचीन कालांतील ग्रंथालयें नाहीत. इंग्रजांच्या अमदानीच्या सुरुवातीस आपल्या देशांत ग्रंथालयें निघूं लागलीं. १८०४ मध्ये सर जेम्स मॅकिंटोश यांनी एका डॉक्टरकडून वैयक्तिक ग्रंथसंग्रह विकत घेऊन ग्रंथसंग्रहाचा पाया घातला आणि त्यानंतर पंचवीस वर्षांनी १८२९ मध्ये बॉंबे क्युरियरचे संपादक स्टॉकेलर यांच्या प्रयत्नाने जनरल लायब्ररी स्थापन झाली. हेंच आपलें पहिलें ग्रंथालय होय. यानंतर सवाशे वर्षांनंतर आज आपणांला प्रत्येक शहरांत ग्रंथालयें दिसूं लागलीं आहेत. ही जशी ग्रंथालयांच्या संख्येंत वाढ झाली, तसाच ग्रंथालयाच्या उद्देशांत बदल होत गेला. पूर्वीचीं ग्रंथालयें बड्या लोकांसाठी असल्याने सर्वसाधारण युरोपियन व देशी लोकांच्या उपयोगाकरिता अशा ग्रंथालयाची स्थापना होत असे. आज ग्रंथालयाचा उपयोग निरक्षर, साक्षर व सुशिक्षित

अशा तिन्ही वर्गांतील लोकांना झाला पाहिजे असा उद्देश ग्रंथालयस्थापनेचा आहे. निरक्षर लोकांना सुशिक्षित करणें हें ग्रंथालयाचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे महत्त्वाच्या अशा प्रश्नांची माहिती त्यांना मिळेल असें ग्रंथालयांनी केलें पाहिजे. आधुनिक, सार्वजनिक व वैयक्तिक जीवनांतील सर्व गोष्टी त्यांना अवगत केल्या पाहिजेत व त्यांच्याशीं संबंध येणाऱ्या सरकारी व बिनसरकारी व्यक्तींचे हक्क व कर्तव्यें व त्यांच्या स्वतःच्या कर्तव्याची जाणीव या ग्रंथालयाद्वारें या निरक्षर लोकांना झाली पाहिजे. जे लोक साक्षर आहेत त्यांना आपल्या ज्ञानांत भर घालणें—काय वाचावें व कसें वाचावें, योग्य आचार व विचार करण्यास कसें शिकावें— हें ग्रंथालयाचें ध्येय झालें पाहिजे. जो सुशिक्षितांचा तिसरा वर्ग आहे त्यांना अधिक सुशिक्षित, विचारवंत व कार्यक्षम ग्रंथालयाच्या द्वारें होतां आलें पाहिजे. ज्या ग्रंथालयाचा अशा प्रकारें तिन्ही वर्गांतील लोकांना उपयोग होईल, तेंच ग्रंथालय आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावीत आहे असें म्हटलें पाहिजे. थोडक्यांत ग्रंथालयें म्हणजे पुस्तक साठविण्याची कोठी नसून ज्ञानप्रसाराचें तें एक माध्यम आहे ही भावना लोकांत बळावली पाहिजे. असंख्य निरक्षरांत ज्ञानाची ही पाणपोई वाहती राहील व ते साक्षर, सज्ञान, सुशिक्षित बनतील असा प्रयत्न ग्रंथालयांनी केला पाहिजे.

ग्रंथालयाचे महत्त्वाचे तीन घटक आहेत. ग्रंथ, वाचक आणि सेवक. या तीन घटकांचा ग्रंथालयाशीं संबंध येत असल्याने त्यांच्या समृद्धीशिवाय ग्रंथालयाचा उत्कर्ष होणार नाही. ग्रंथालय जर राष्ट्रीय, प्रांतिक किंवा जिल्हानिहाय करावयाचें असेल तर त्यांत राष्ट्रीय, प्रांतिक आणि भाषिक असे सर्व विषयांवरचे ग्रंथ पाहिजेत. अलिकडे सर्वसामान्य महत्त्वाप्रमाणे विषयवार अशीं ग्रंथालयें आहेत. अर्थात् त्या त्या विषयाची जशीं पुस्तकांची संख्या वाढेल तसतशीं विषयवार ग्रंथालयें तयार होतील. ललित वाङ्मय व शास्त्रीय ग्रंथ यांचें वर्गीकरण ग्रंथालयांत आपणांस दिसतें, मात्र यापुढे स्वतंत्र शास्त्रीय ग्रंथालय व ललित ग्रंथालय असे विषयवार ग्रंथालय होण्याचा काळ फार दूर नाही असें वाटतें. हस्तलिखितें हीं सुद्धा ग्रंथालयांत जमा होतात. अशा हस्तलिखितांचा स्वतंत्र विभाग असतो; पण अशीं सर्व

हस्तलिखितें एका ठिकाणीं गोळा करण्यांत आलीं तर हस्तलिखितांचें एक स्वतंत्र ग्रंथालय निश्चित होईल. ग्रंथसंख्या वाढल्याने विषयवार जशीं ग्रंथालयें तयार होतील तशींच दुसऱ्याहि प्रकारचीं ग्रंथालयें होतील. साधारण वाचतां येऊं लागल्याबरोबर बालकें वाचनालयांत जातात. त्यांच्यासाठी बालवाचनालयें, त्याचप्रमाणे शालेय, कॉलेजीय, विद्यापीठीय, संशोधन-संस्थांचीं व राष्ट्रांतल्या जीवनावर आणि राजकारणावर प्रकाश टाकणारीं राष्ट्रीय ग्रंथालयें अशा विविध प्रकारचीं ग्रंथालयें 'ग्रंथ' या घटकापासून तयार होतील.

ग्रंथालयाचा दुसरा घटक वाचक हा होय. वाचकांचे तीन वर्ग मागें सांगितलेच आहेत. कोणत्याहि वर्गातला वाचक असो, त्याच्या मुळाशीं ज्ञान किंवा रंजनलालसा असलीच पाहिजे. ज्याला नवीन माहितीची गरज वाटते तो आपल्या परिस्थितिनुरूप किंवा उद्देशानुरूप त्या त्या वाङ्मयप्रकाराकडे वळेलच; पण ज्याला वाचतां येतें व मनोरंजनाशिवाय दुसरा मोठा उद्देश नाही असे असंख्य वाचक असतात. अशा लोकांना ताज्या बातम्यांची चुरचुरीत वृत्तपत्रें पुरविणें, व मनोरंजक साप्ताहिकें, मासिकें पुरवून त्यांची करमणूक करणें हेंच ग्रंथालयाचें नुसतें कार्य नाही, तर असल्या वाचकांची दृष्टि ग्रंथाकडे वळविणें हेंच त्यांचें खरें कार्य आहे. त्यासाठी त्यांना वाचकांची अभिरुचि बदलावी लागेल व असे ग्रंथ वाचण्यासाठी त्यांचीं मनें तयार करावीं लागतील; तर ग्रंथालयें आपलें कार्य योग्य रीतीने करीत आहेत असें म्हणतां येईल.

तिसरा घटक सेवकांचा. ग्रंथालयांत नेमलेले पुष्कळसे सेवक ग्रंथालय-शास्त्र जाणत नसल्याने वाचकांना त्यांचेबद्दल आदर वाटेनासा होतो व त्यांना वाचक आकर्षित करतां येत नाहीत किंवा त्यांना वाचकांना मार्गदर्शनहि करतां येत नाही. त्यामुळे कळत नकळत वाचकांकडून सतत ग्रंथालयाचें नुकसान होत असतें. ग्रंथालयांत ठिकठिकाणीं ग्रंथांचे ढीग पडलेले असतात; तर आळसामुळें किंवा कपाटें नसल्यामुळे पुष्कळसे ग्रंथ माळ्यावर टाकून दिलेले असतात. याच्या मुळाशीं निष्काळजी व ग्रंथालयशास्त्र न जाणणारा सेवकवर्ग आहे. याचा दोष आर्थिक परिस्थितीकडे जातो. ग्रंथपालाच्या व्यवसायाला जेव्हा सामाजिक व आर्थिक दर्जा प्राप्त होईल तेव्हा लायक

ग्रंथालयाची आवड असणारे व ग्रंथालयशास्त्र पढलेले लोक यांत येतील व ग्रंथालयाची उन्नति व उत्कर्ष साधतील. यासाठी सर्वांनीच–विद्यापीठांपासून सार्वजनिक संस्थांपर्यंत–जबाबदारी आपल्यावर घेतली पाहिजे. सरकारने ग्रंथालयासंबंधीं कायदा करून पैसे उभारले पाहिजेत व राष्ट्रीय ग्रंथालय हें तर संपूर्ण सरकारी जबाबदारीनेच चालविलें पाहिजे.

एखाद्या राष्ट्राचें शहाणपण पाहावयाचें असल्यास त्या राष्ट्रांतील ग्रंथसंग्रह हेंच खरें ज्ञानमापक यंत्र होय. रा. ब. गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनी ही च गोष्ट निराळ्या शब्दांत फार उत्कृष्ट रीतीने मांडली आहे. ते आपल्या एका निबंधांत म्हणतात, "हरएक राष्ट्राची ज्ञानाची गणती त्या राष्ट्रांतील ग्रंथांचे सामग्रीवरून करतां येते. जसें इंग्रजी भाषेंत अनंत ग्रंथ आहेत त्याप्रमाणे इंग्रजांचें शहाणपणहि आहे. संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत त्याप्रमाणे हिंदु लोकांचें शहाणपण आहे. फारशी भाषेंत ग्रंथ आहेत त्याप्रमाणे इराणचे लोक शहाणे आहेत व त्याचप्रमाणे मराठी भाषेंत जितके ग्रंथ आहेत तितकेच मराठे शहाणे आहेत. तेव्हा ग्रंथसमुदाय वाढविणें हें लोकांचें शहाणपण वाढविणें असें आहे आणि भाषेंत ज्ञानवृद्धीकर ग्रंथ असावे, हेंच भाषेस व राष्ट्रास भूषण आहे. आपले भाषेंत याहून अधिक चांगले ग्रंथ जों जों होतील तों तों आपणा महाराष्ट्रजनास अधिक श्रेष्ठपणा येईल."*

लोकहितवादी यांच्या या उताऱ्यावरून राष्ट्राचें मोठेपण व वैभव यांत ग्रंथांना केवढें मानाचें स्थान आहे हें आपणांस दिसून येईल व त्याबरोबरच ग्रंथालयाचें केवढें महत्त्व आहे तेंहि स्पष्ट होईल.

●

* लोकहितवादी–निबंधसंग्रह १८६६ पृ. ७३०

# मौनावरचें भाष्य

[राधास्वामी सहाय]

के. मा. आराधे, एम्. ए.
काव्यतीर्थ, नागपूर
नागपूर, दि. २३ सप्टेंबर १९४६

सप्रेम राधास्वामी.

कांही कांही प्रसंगच असे असतात, माणसाला तेव्हा आपल्या मुळांतल्या प्रवृत्तींचा उमज पडतो. पत्र लिहिण्याचा प्रसंग माझ्या दृष्टीने त्यांतलाच एक. मागच्या खेपेला निमित्त मिळालें होतें आणि मी पत्रहि ताबडतोब लिहिलें. आता तसें कांही नव्हतें. तुमच्या पत्राला उत्तर लिहावयाचें एवढेंच. पत्रोत्तराची अपेक्षा तुम्ही करीत होतां हें स्पष्टच आहे. अर्थातच शिष्टाचार म्हणून नव्हे; तर स्नेहाचें अगत्य म्हणून. तें अगत्य मलाहि जाणवतें. याहि वेळीं जाणवलें. तरीपण पत्र लिहिणें लांबणीवर पडत होतें. असें नेहमी घडत आलें आहे. जिव्हाळ्याच्या माणसांचीं मनें मी पुष्कळदा त्यामुळे दुखविलीं आहेत. स्नेहभावाची–प्रेमाची–उपेक्षा केल्याचा आरोप स्वतःवर ओढवून घेतला आहे. स्नेहाची उपेक्षा! मन ग्वाही देत असतं की, हें खरं नाही. स्नेहाची उपेक्षा करण्याइतकं माझं हृदय खचित थिजलेलं नाही. आळसांत ह्याचं मूळ कदाचित् कुणी शोधील; पण आत्मीयापासून दुरावूं शकेल एवढा आळसहि मी पोसला नाही. मग कां घडावं असं? तुम्ही विश्वास ठेवा अगर ठेवूं नका. पत्रं लिहायला म्हणून कितीदा तरी मी बसलों आहे, पण तीं पत्रं पूर्ण लिहून होतच नाहीत. मिनिटामागून मिनिटं नि तासामागून तास जातात. आठवणींचीं तरळ फुलपाखरं त्यांचा मागोवा घेतात. मन भटकत असतं कसल्यातरी अबोध भावनेचा शोध घेत, आणि लिहून होते एखादीच ओळ. शब्दहीन एकताननेंत जें गवसलं तें प्रगट करण्यासाठी शब्द धडपडत असतात. पण अर्थाला मौनाची मर्यादा मोडवत नाही. मी सुरवातीला म्हटलं तें हेंच. माझी मुळांतली प्रवृत्ति मौनाची आहे. प्रियजनांना पत्रं लिहायला घेतलीं की हिचा उमज पडतो.

मौन हा माझ्या जीवनाचा स्थायीभाव असावा हेंच खरं. तुमची साक्ष काय असेल ती तुम्ही जाणा. पण तुमच्याहि सहवासांतले कित्येक क्षण मी अबोल वृत्तीनंच घालविले आहेत. मित्रांच्या संगतींत माझी वाचा अनावर

झाल्याचे प्रसंग विरळा. वावदूकतेचें मला वावडें आहे असें नाही म्हणत मी. वादाचीं रणं मीहि कित्येकदा हिरीरीने लढविलीं आहेत. त्या जाणूनबुजून बौद्धिक चकमकी. तिथे हार मानायला मन तयार नसतं. पण भावनांना कुणी साद घातली तर नेहमीच हार मानली आहे मी. ओठावर धडपडणारे शब्द, अशा वेळी कां कोण जाणे, माघारे फिरतात. मौनाशिवाय मग दुसरी भाषा बोलतां येत नाही; आणि साहजिकच नाही का हें? भावनांच्या यक्षभमींतील प्राजक्त फुलांची ही पखरण. सारं अंतरंग दरवळून सोडते; पण तीं फुलं मात्र कोणीहि वेचूं शकत नाही.

नुकतंच कुठंतरी वाचलं मी–तुमच्या प्रेमाचं स्मृतींत रूपांतर होऊं द्या. मीहि तसंच म्हणेन. तुमच्या भावनांची परिणती मौनांत व्हायला हवी. प्रेम काय किंवा भावना काय; त्यांची उत्कटता हीं सतत विशाल होत जाणाऱ्या क्षितिजासारखी असते. तिच्या अखेरच्या सीमांचा बाहेर कोणीहि शोध घेऊं शकलं नाही. ज्यांनी अंत शोधण्याचा प्रयत्न केला त्यांना मात्र स्मृतींच्या दूरवर्ती आलोकानं उजळलेल्या व मौनाच्या नीरव संगीतानं निनादित झालेल्या त्या सीमारेषा पुसटशा दिसल्या. जाणवत्या मध्यरात्रीं तुम्ही कधी एकटेच बाहेर पडला आहांत का? चंद्रहीन आकाशांत असंख्य तारे लुकलुकत असतात. सर्वदूर निःशब्दतेचं संगीत स्रवत असतं. भावनाशील माणसाचं अंतःकरण जर तुम्ही पाहूं शकलांत तर तें ह्याहून वेगळं दिसेल काय?

आत्मीयतेच्या स्मृती आणि भावनोत्कटतेचं मौन. माणसाच्या जीवनयात्रेंतील हें एवढंच पाथेय. हें बरोबर घेऊन त्याला आपली एकाकी वाट चालायची असते. न संपणाऱ्या प्रवासाचा एक टप्पा गाठला, शिणलेल्या देहाला विश्रांति दिली की, पुन्हा वाटचालीला सुरवात. माघारलेल्या प्रियजनांसाठी थांबायचं नसतं. 'जननान्तर सौहृदाचा' शोध घेत ते पुन्हा केव्हा तरी येऊन मिळतात. तुम्ही आम्ही नाही का मिळालों? आणि जीवनयात्रा चालूंच राहते. कंटाळा येत नाही. गंमत वाटते. तुम्हीच निर्वाळा दिला आहे. पण कधी कधी कंटाळाहि येतो. स्नेहाच्या स्मृती पुसट होऊं लागल्या म्हणजे मग ह्या मुशाफरींतली मौज हरपूं लागते. तेव्हा त्या स्मृतींची अत्यंत कृपणपणानं जपणूक करायला हवी.–

निर्हेतुक प्रेमाच्या त्या प्रश्रब्ध स्मृती तुम्हाला केव्हा ना केव्हा मुशाफरीच्या मुक्कामावरहि नेऊन पोचवितील. मरणाच्या काजळी छायेनं अंधारलेलीं अनंत आयुष्याचीं दालनं—त्यामधलीं प्रकाशाचीं गवाक्षं—म्हणजे ह्या स्मृती. तेजाचा अफाट दर्या बाहेर हेलावत असतो. त्यांतल्या प्रकाशलहरी ह्या गवाक्षांतून आंत येतात. आत्म्याला साद घालतात. ती साक्ष एकदा पटली की तुम्ही आळवूं लागतां—

'तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योर्मा मृतं गमय' (ह्या अंधारांतून मला प्रकाशाकडे ने. मृत्यूंतून मला अमरत्वाकडे ने) आणि मग तो श्रेय-सिद्धीचा क्षण येतो. जीवनमरणाच्या जुनाट बंदिशाळेचं दार सताड उघडतं. समोर प्रकाशाचा अथांग सागर उफाळत असतो. त्यांतल्या अनंत लाटा विमुक्त आत्म्याला पालवीत असतात. त्या सांगत सुटतात—

'कतरए-तुनुकमाया बहरे-बेकरां है तूं :
अपनी इफ्तदा होकर अपनी इन्तहा हो जा :'
(इवलासा तूं बिंदु आणि बघ महासिंधु तूं स्वतः
जिथे आदि तव तोच अंतही, नवलपरीची कथा)

इथेच श्रेयप्रेमाची मिळणी होते. मुशाफरीचा मुक्काम सापडतो. जीवनयात्रेचा शेवट होतो.

ह्या स्मृतिरामायणाचाहि आता इथेच शेवट करतों. मौनावरचं हें प्रदीर्घ भाष्य म्हणजे 'वदतो व्याघाताचा' एक अजब मासलाच. तुम्ही कदाचित् हसालहि. तुम्हाला हसविण्याचा याहून दुसरा प्रकार मला तरी कुठे ठाऊक आहे? तें कांहीहि असलं तरी मौनाची महति मात्र तुम्हाला पुरतेपणीं कळेल हें नक्की. आवर घातलेल्या माझ्या मौनाचा बांध फुटल्या-मुळं त्यांत तुम्हाला ज्या बुचकळ्या मिळाल्या आणि तत्त्वज्ञानाचं पाणी तुमच्या नाकातोंडांत शिरलं त्याचा तुम्हाला खचित विसर पडणार नाही. आपण जर कार्डावर चार ओळी लिहिल्या तर त्याचं उत्तर एवढं! मग पुढचं त्रैराशिक न करतांच 'मौनं सर्वार्थ साधनम्' असं म्हणून तुम्ही एक ओळहि लिहिण्याचं धाडस करणार नाही. पण तें धाडस तुम्ही एकदा करून पाहाच.

हो. हें एवढ्यावरच संपलं नाही. ही झाली ह्या पत्राची प्रस्तावना. ( आता मात्र तुमच्यासारख्या अतिशयोक्तिबहाद्दराची धिवसा सुटूं लागला असेल ) ह्यापुढं लौकिक अर्थानं व प्राकृत भाषेंत ज्याला पत्र म्हणतात त्यांतला राहिलेला मजकूर लिहावयाचा. तेव्हा तोच आता लिहितों.

तुमचीं दोन्ही कार्डें—पेन्सिलने लिहिलेलीं—मिळालीं. मजकूर समजला. आपण तिथे खुशाल आहांत व शाळा वगैरे ठीक चालली आहे हें वाचून समाधान वाटलें. इथल्या हवामानांत मध्यंतरी बराच उष्मा वाढला होता; पण कालपरवा पाऊस शिंतोडला. तुमच्याकडे हवापाणी वगैरे कसें काय आहे? आताशा माझी प्रकृति नीट राहते. तुमचें शरीरस्वास्थ्य चांगलें असेलच. आपली एतद्ग्रामस्थ मित्रमंडळी कुशलपूर्वक आहेत. अधिक काय लिहावें? पत्राचें उत्तर जरूर जरूर पाठवावें. कळावें. लोभ असावा ही विज्ञापना.

आ. स्नेहांकित,
केशव (राव) आराधे

---

# यंत्र हा शाप की वर ?

प्रा. म. के. शट,
एम्. ए., सागर

मानवी सुधारणेला कारणीभूत होणाऱ्या गोष्टींत यंत्राला मुख्य स्थान द्यावें लागेल. यंत्रामुळेच जगाची आर्थिक उन्नति होऊं शकली. मोठमोठ्या कारखान्यांत अव्याहत काम करणाऱ्या यंत्रामुळेच, नूतनतम मोटारी, तरत्या राजवाड्यांप्रमाणे आधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण आगबोटी, एका मिनिटाला एका मैलापेक्षाहि जास्त वेगानें धावणाऱ्या आगगाड्या, पक्षिराज गरुडालाहि मागे टाकणारीं वेगवान विमानें तयार करणें शक्य झालें आहे. पुराणांतील दाखला देऊन असेंहि म्हणतां येईल की, भगवान श्रीकृष्णाचें सुदर्शनचक्र ज्याप्रमाणे सर्वशक्तिमान होतें त्याप्रमाणे आधुनिक कारखान्यांतील यंत्राचें चाकहि परम शक्तिशाली असून जगांतील सुखसोयी वाढविण्याचें वरदान त्याला मिळालें आहे.

ज्या यंत्राने आमच्या जीवनांत एवढें महत्त्वाचें स्थान प्राप्त केलें आहे तें यंत्र आहे तरी काय ? यंत्र कशाला म्हणायचें? 'ज्याच्यामुळे मानवी श्रम वांचून कोणतेंहि काम कमी वेळांत व अधिक चांगल्या रीतीनें होतें तें यंत्र,' अशी यंत्राची सोपीशी व्याख्या करतां येईल. ह्या दृष्टीने पाहिलें तर, नांगर किंवा चरखा ह्यांनाहि यंत्र म्हणतां येईल. साधारणतः आपण विशेष गुंतागुंतीच्या व पोलादी बनावटीच्या अवजारांनाच यंत्र म्हणतों, पण तें चूक आहे. ज्यामुळे आपले श्रम वाचतात किंवा कमी होतात आणि काम कमी वेळांत जास्त सुबक होतें त्याला यंत्र म्हणावें असें आताच सांगितलें आहे. म्हणूनच नेहमीच्या वापरांतल्या अनेक वस्तूंना यंत्र म्हणणें योग्य होईल. कित्येक टन ओझें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं लीलेने नेऊन ठेवणारी यारी ( क्रेन ) हें जसें यंत्र आहे तसेंच कापणीच्या वेळीं शेतकऱ्यांना उपयोगी पडणारा साधा कोयता हेंहि यंत्रच आहे, ह्यांत शंका नाही.

यंत्रामुळे खरोखर कितीतरी फायदे आपल्याला मिळतात. हजारो टन ओझें एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशांत नेणें म्हणजे कोण त्रास? पण आज मालगाड्या हें प्रचंड ओझें सहज वाहून नेतातच ना? यंत्रामुळे जो माल उत्पन्न होतो त्यांत एकरूपता येते. एकाच वेळीं उत्पन्न केलेल्या मालांत अगदी एकजिनसीपणा येतो. प्रत्येक वस्तूचा आकार अगदी सारखा; त्यांत फरक म्हणून नांवालाहि आढळणार नाही. कारागिराला जर आठदहा वस्तू तयार करायला सांगितल्या तर प्रत्येक नगांत थोडातरी फरक सहजच आढळून येईल, पण यंत्राच्या एकाच सांच्यांत तयार झालेल्या वस्तूंत असा फरक आढळायचा नाही. एकजिनसीपणा हा गुण तर यंत्रांत आहेच; पण आणखीहि इतर गुण यंत्रांत आहेत. यंत्राला आळस माहित नाही. तें कधीहि कामचुकारपणा करीत नाही. पगार कमी म्हणून अडून बसत नाही. सारखें नियमित काम करीत असतें.

यंत्राचा आणखी एक फायदा म्हणजे यंत्रामुळे श्रमविभागाला जास्त वाव मिळतो. कामाचे लहानलहान भाग पडतात, व प्रत्येक भाग वेगवेगळ्या मजुराच्या वांट्याला येतो. ह्यामुळे प्रत्येक मजुराला तेंच तें काम पुनःपुन्हा करावें लागून साहजिकच त्याला निपुणता प्राप्त होते. यंत्राचा आणखी एक

लाभ म्हणजे यंत्रामुळे पूर्वी गरीब लोकांच्या आटोक्यांत नसणाऱ्या अनेक गोष्टी आता त्यांच्या आटोक्यांत आल्या आहेत. इंग्लंडमध्ये दोन तीन शतकांपूर्वी जो चहा विकला जात असे त्याची किमत जबर असल्यामुळे अत्यंत धनिक लोकच चहा विकत घेऊं शकत. त्या वेळीं दळणवळणाचीं साधनें चांगलीं नसल्यामुळे चहाची एवढी जास्त किमत असे. आता प्रचंड मालवाहू बोटी कित्येक टन चहा एकाच वेळीं वाहून नेतात. पूर्वी जेव्हा मोटारी प्रथमच तयार होऊं लागल्या तेव्हा त्या फारच महाग असत. हेन्री फोर्डने अशी प्रतिज्ञा केली की, मी अमेरिकेंतल्या गरीब लोकांनाहि विकत घेतां येतील अशा स्वस्त मोटारी तयार करीन. ही प्रतिज्ञा त्याने पूर्ण केली. त्याने फिरत्या पट्ट्याची कल्पक योजना अंमलांत आणली. ह्या पट्ट्याची विशेषता म्हणजे मजूर आपल्या जागींच उभे असतात. मोटारीचें भाग पट्ट्यावर हळूहळू पुढेपुढे सरकत जातात व प्रत्येक मजूर ते भाग पट्ट्यावर जवळ आल्यावर आपल्याजवळ असलेले भाग त्यांत बसवतो. ह्यामुळे प्रत्येक मजुराकडून जास्त काम होतें. हेन्री फोर्डच्या ह्या नव्या युक्तीमुळे मोटारीचें उत्पादन तिप्पट वाढलें व गरीब लोकांना स्वस्त मोटारी पुरवण्याची फोर्डची कल्पना सफल झाली. ह्या फिरत्या पट्ट्याची युक्ति इतरहि कारखानदारांनी निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनांत अमलांत आणली व वस्तूंच्या उत्पादनखर्चांत कपात केली आहे. उत्पादनाच्या पद्धतींत ह्याप्रमाणे नवीन नवीन यंत्रांची भर पडत आहे व त्यामुळे पूर्वी धनिक लोकांच्याच आटोक्यांत असणाऱ्या फौंटन पेनसारख्या वस्तू आता गरिबांनाहि परवडण्यासारख्या झाल्या आहेत. ह्यामुळे साधारण मनुष्याचें जीवनहि सुखावह होऊन आयुष्यांत विविधता आली आहे. रेडिओ, सायकल, विजेचे दिवे, इ. वस्तूंमुळे आता जीवनांतील कष्ट कमी होऊन आराम वाढला आहे. हा काय यंत्रामुळे कमी लाभ झाला आहे?

पण यंत्र म्हणजे केवळ फायद्याच्या वस्तू देणारी कामधेनूच आहे, असा मात्र गैरसमज करून घेऊं नये. जशा प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात तसेंच यंत्रामुळे फायद्याबरोबर तोटेहि होतात हें निःसंशय! उत्पादनांत जास्त यंत्रांचा उपयोग होऊं लागला म्हणजे मजुराला लहानसेंच काम बरेच वेळां करावें लागतें. ह्यामुळे आपल्या कामांत तो वाकबगार

होतो खरा, पण त्याच्या कामांत निरसता उत्पन्न होते. एकसारखें तेंच तें काम करून तो कंटाळून जातो. कामांतील कुशलतेचा भाग यंत्र करीत असल्यामुळे अनेकदा केवळ कळ फिरविण्यापेक्षा त्याला दुसरें कामच नसतें. ह्यामुळे उत्पादनांत जेव्हा यांत्रिकता निर्माण होते, तेव्हा एखादी कला-कौशल्याची वस्तू तयार केल्यावर जसा अभिमान कारागिराला वाटतो तसा तो यांत्रिक उत्पादनांत मजुराला वाटत नाही. मजूरहि एखादें कळ दावण्याचें यंत्रच होऊन बसतो. अमेरिकेंत एका कारखान्यांत पंचवीस वर्षें एका मजुराने काम केलें. कोणतें काम म्हणाल, तर तयार झालेल्या यंत्रावर केवळ नंबराची पोलादी पट्टी ठोकण्याचें. म्हणूनच पंचवीस वर्षें काम केल्यावरहि यंत्र कसें तयार करतात, ह्याचे वेगवेगळे भाग कसे बसवतात, इत्यादि बाबतींत तो पूर्णत: अज्ञानीच राहिला. केवळ यंत्रावर पट्टी ठोकण्याचें काम त्याचें. अशा मजुराची जर नोकरी सुटली तर केवढी अनावस्था ! त्याला इतर कोणतेंच काम येत नसल्यामुळे इतर कार-खान्यांत काम मिळणेंहि कठिणच. यंत्रामुळे श्रमविभाग होतो खरा; पण अनेकदा मजुराच्या वांट्याला इतकें थोडें व कल्पकतेला वाव नसणारें काम येतें की, त्याची ती नोकरी सुटल्यास दुसरी नोकरी मिळणें कठिण पडतें.

यंत्रामुळे बेकारी निर्माण होते असा आक्षेप आहे. यंत्रामुळे अल्प वेळांत अतिशय उत्पादन होत असल्याने जास्त मजुरांना काम मिळत नाही. पूर्वी दहा मजूर असत तेथे एक मजूर चालूं शकतो; कारण उत्पादनाचा बहुतेक भार यंत्रच उचलतें. ही विचारसरणी वरवर बिनतोड वाटत असली तरी ती तेवढीशी बरोबर नाही. यंत्रांमुळे एखाद्या विशिष्ट वस्तूच्या उत्पा-दनांत कमी मजूर चालूं शकतात पण यंत्रामुळे वस्तूंचें उत्पादन वाढून उत्पादनखर्च बराच कमी येतो. ह्यामुळे तयार केलेल्या वस्तू अल्प किंमतींत विकतां येतात. म्हणून गरीब लोकहि ह्या वस्तू विकत घेतात व मालाची मागणी वाढते. मागणी वाढली की, ‘ मागणी तसा पुरवठा ’ ह्या न्यायाने उत्पादनहि वाढतें व जास्त मजुरांना काम मिळतें. सारांश, यंत्रामुळे वस्तू स्वस्त होऊन बऱ्याच मजुरांना काम मिळतें. तेव्हा यंत्रामुळे बेकारी वाढते हें तितकेसें बरोबर नाही.

आता एवढें खरें की, ' अति सर्वत्र वर्जयेत् ' ह्या म्हणीनुसार यंत्राचा अतिरेक टाळला पाहिजे. मनुष्य यंत्राचा दास बनतां उपयोगी नाही. वस्तू स्वस्त करून साधारण मनुष्याच्या जीवनांत विविधता व सुखावहता आणण्याची यंत्राची कामगिरी फार मोठी आहे. कुशलतेने कोणत्याहि गोष्टीचा उपयोग केल्यास तिच्यांतले दोष टळूं शकतात. यंत्राचाहि कुशलतेंने उपयोग करून मनुष्यापेक्षा यंत्राला वरचढ होऊं देऊं नये. असें केलें तर यंत्र हा शाप नसून वरच आहे हें अनुभवास येईल.

# परीक्षेच्या वेळीं

प्रा. म. के. शेटे,
एम्. ए., सागर

' लग्न पाहावें करून ' अशी आपल्यांत एक म्हण आहे. लग्नाच्या वेळचा आटापिटा, वाढत जाणारा अवाढव्य खर्च व एकंदर मनावर पडणारा असह्य ताण, ह्याची कल्पना इतरांना होणें शक्य नाही. ' परीक्षेला पाहावें बसून ' अशी दुसरीहि म्हण तयार करतां येईल. खरोखर, परीक्षेला बसणाऱ्यांच्या मनाची धांदल व ' लगीनघाई ' ह्यांत बरेंचसें साम्य आहे. लग्नाच्या वेळीं मुहूर्त चुकूं न देण्याची भटजींची तत्परता व पेपर ठराविक वेळीं सुरू करण्याची निरीक्षकांची (Invigilators) घाई, ह्यांचें स्वरूप जवळजवळ एकच असतें. मुहूर्त बरोबर साधला म्हणजे जसा भटजींचा जीव भांड्यांत पडतो, तसेंच पेपर वेळेवर सुरू झाला म्हणजे निरीक्षकांनाहि हायसें वाटतें. अंतरपाट दूर होण्याच्या आधी वधूवरांची एकमेकांना पाहण्याची उत्सुकता कळसाला पोचते; तर पेपर सुरू होण्याच्या पूर्वी विद्यार्थीहि पेपर पाहण्यासाठी उतावळे झालेले असतात.

सील लावलेल्या मोठ्या लिफाफ्यांतल्या प्रश्नपत्रिका जेव्हा बाहेर काढल्या जातात, तेव्हा तर परीक्षेच्या मंडपांत अगदी शुकशुकाट होतो. आतापर्यंत आपापसांत ' काय येणार ' ह्याची जोराने चर्चा करीत असलेलीं मुलें एकदम गप्प होतात. त्यांच्या नजरा आता प्रश्नपत्रिकांवर खिळून राहतात. लिफाफ्यांतून प्रश्नपत्रिका काढणें, त्या मोजणें, प्रमुख निरीक्षकाने

दुय्यम निरीक्षकांना त्या वांटून देणें, इ. हालचाली मुलें अगदी डोळ्यांत तेल घालून पाहत असतात.

मानवी स्वभावाच्या निरनिराळ्या बाजू जशा परीक्षेच्या वेळीं दिसतात, तशा इतर वेळीं क्वचितच दिसत असतील. उत्साही, आनंदी, घाबरट, निष्काळजी, नीटनेटके असे अनेक नमुने दृष्टीला पडतात व निरीक्षकांची चांगलीच करमणूक होते. प्रश्नपत्रिका वांटल्यानंतर कांही विद्यार्थी त्या शेवटपर्यंत काळजीपूर्वक वाचतात, तर इतर कांही विद्यार्थी एकदोन प्रश्न वाचून 'हा पेपर कोणी काढला असावा' ह्याचाच विचार करण्यांत दंग होतात. त्यांतल्या त्यांत निरीक्षकांपैकीच कोणी परीक्षकहि आहे की काय, हें पुनःपुन्हा पडताळून पाहण्याचा ते आटोकाट प्रयत्न करतात. पण सामान्यतः पहिला प्रश्न वाचून अडणारेच फार.

उत्तरपत्रिका कठिण असली म्हणजे मग मुलांच्या हालचाली मोठ्या मजेशीर होतात. समोर टांगलेल्या घड्याळाकडे किंवा अंतराळांत ह्यांची दृष्टि वारंवार जाते किंवा उत्तरपत्रिकेवर फौन्टनपेन ठेवून उगीचच ते इकडेतिकडे पाहत बसतात निरीक्षकांच्या हालचालींकडे ते वारंवार दृष्टिक्षेप करूं लागतात. दर पंधरावीस मिनिटांनी पाणी मागतात किंवा बाहेर जाण्याची परवानगी मागून, बाहेरच्या थंड हवेने कांही सुचतो का विचार, ह्याचा अंदाज ते घेऊं लागतात. आपल्याच माळेचा मणी हॉलमध्ये आणखी एखादा आहे का, हें पाहण्यासाठी ते सभोवताली नजर फिरवतात व असाच कोणी 'समानधर्मा'चा दिसल्यास त्यांना जरा बरें वाटतें व त्यांची नजरानजर झाल्यास नकारात्मक हात हालवून किंवा मान हालवून ते आपली असहायता प्रगट करतात. कोणी जादा उत्तरपत्रिका मागितली म्हणजे हे 'अडेलतट्टू' त्याच्याकडे मोठ्या कौतुकाने पाहतात. एकाच प्रश्नावर आपल्या लिहिण्याची गति थांबली असतां, इतकें जास्त लिहिणारे बहादूर असावेत ह्याचें त्यांना सादर आश्चर्य वाटतें. ह्यांत क्वचित् असूयेचा भावहि असतो, नाही असं नाही.

अशा 'अडल्या नारायणां'च्या डोक्याची गति थांबली की इतर अवयवांची गति हटकून वाढते. बसल्या जागींच पायांच्या मजेदार हालचाली

सुरू होतात. हात एकदा गालांवर तर एकदा उत्तरपत्रिकेवर ठेवले जातात. कित्येक लोक तर कपाळ जोरजोराने चोळूं लागतात. अशाने मेंदू अधिक कार्यक्षम होतो असें त्यांना वाटत असावें, किंवा कपाळावर हात ठेवून ब्रह्मदेवाने त्यावर काय लिहून ठेवलें आहे ह्याचा ते अंदाज घेत असावेत. केसांच्या (न आलेल्या) बटा सावरणें किंवा बांगड्यांची उगीचच चाळवाचाळव करणें ही झाली मुलींची तऱ्हा.

परीक्षा ही जर शर्यत मानली तर तींत धावणारे सर्वच अरबी घोडे असतात असें नाही. अनेक 'चुकार तट्टें'हि ह्या शर्यतींत (चुकून) सामील झालेलीं असतात. जरासंधाच्या हाडांचे फासे जसे पांडवांना तसे परीक्षेचे फासे आपल्याला नक्कीच पतिकूल पडणार ही ह्यांची ठाम समजूत झालेली असते. म्हणून लिहिण्याची फारशी तसदी घेण्याच्या ते भानगडींत पडत नाहीत. निकाल काय लागणार हें तर उघडच आहे, मग उगीच जिवाला शीण देण्यांत काय अर्थ, अशी यांची सोइस्कर विचारसरणी असते. 'सुखदुःखे समे कृत्वा' असें शांत आचरण ठेवणाऱ्या स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणे ते निश्चित वृत्तीने वागतात. ते इतरांची लिहिण्याची गडबड पाहत बसतात, किंवा नांवालाच दोन ओळी लिहून, विशेष कौशल्याने व धीमेपणाने एखादी आकृति रंगवीत वेळ घालवतात. हातरुमालाने वारंवार घाम पुसणें, किंवा त्याची घडी करून ती पुनःपुन्हा विस्कटणें, एकदा त्रिकोणी, तर एकदा चौकोनी अशा निरनिराळ्या आकाराच्या घड्या करीत राहणें हा त्यांचा छंदच होऊन बसतो.

परीक्षेच्या मंडपांत क्वचित् 'गाळीव रत्नें'हि असतात. निरीक्षकांची नजर चुकवून नक्कल करणें हीच त्यांची महत्त्वाकांक्षा असते. अशा 'रत्नाची' पारख करायला 'रत्नपारखी' निरीक्षकच हवेत. ते मात्र अशा रत्नांची योग्य ती 'कदर' करतात. नक्कल करणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांची सारी नजर निरीक्षकांच्या हालचालीकडे असते. निरीक्षक आपल्या जवळून दुसरीकडे गेला म्हणजे मग ते सुटकेचा निश्वास सोडतात. निरीक्षक जवळ आला की त्यांची जी धांदल उडते ती विचारूंच नका. लांडगा जवळ आला म्हणजे कोकरांची जी अवस्था होते तीच ह्यांचीहि होते. आपली चलबिचल लपविण्यासाठी ते

प्रश्नपत्रिका एकाग्र दृष्टीनें पाहण्याचें ढोंग करतात. एवढ्यानेंहि साधलें नाही तर टिपकागदानें वरचेवर लेखणीचें टोक पुसण्याचा आव आणतात किंवा पेनवर लिहिलेलें नांव पुन:पुन्हा वाचण्यांत गर्क होतात. निरीक्षकाची व आपली नजरानजरसुद्धा होऊं नये म्हणून ते अगदी दुसरीकडे तिऱ्हाइता-सारखी टक लावून बसतात; पण ह्या सर्व खाणाखुणांमुळे बिचारे हटकून निरीक्षकांच्या जाळ्यांत सापडतात.

मनावरचे संस्कार कधीहि व कोठेहि लोपत नाहीत. कशाहि परिस्थितींत ते आपलें डोकें वर काढतातच. धार्मिक विद्यार्थी आपला धार्मिकपणा परीक्षेच्या वेळींहि विसरत नाहीत. 'ईश्वराचें नामस्मरण करून कोणत्याहि कामाला आरंभ करावा' हा नियम ते बिनचूक पाळतात. उत्तरें लिहिण्याच्या पूर्वी पहिल्याच पानावर 'ॐ' किंवा '॥ श्रीराम ॥' असें लिहून ते प्रथमच देवाला वश करून घेतात; म्हणजे परीक्षेच्या निकालाच्या वेळीं, पुन्हा देवाची वेगळी आळवणी करायला नको. नीटनेटकेपणाची आवड असणाऱ्या मुलांची वेषभूषा परीक्षेच्या मंडपांतहि आकर्षक अशीच असते. सुव्यवस्थित उत्तरपत्रिका लिहिण्यांतहि कांही विद्यार्थी पटाईत असतात. निरनिराळ्या रंगांच्या पेन्सिली वापरून वळणदार अक्षर काढून व फारशी खाडाखोड न करतां परीक्षकाचें मन जिंकण्याचें कसब ह्यांना नीट साधलेलें असतें. ह्यांच्या अगदी उलट प्रकार निष्काळजी विद्यार्थ्यांचा. स्वत:ची लेखणी विसरून आयत्या वेळीं धावपळ करणारे हे लोक असतात. उत्तरपत्रिका लिहीत असतांना मध्येच इतरांना फूटपट्टी, कंपास किंवा पेन्सिल मागतात व आपलें काम भागवण्याची कोशीस करतात.

नीटनेटक्या व निष्काळजी विद्यार्थ्यांप्रमाणेच आवेशानें लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचाहि एक वर्ग असतो. परीक्षा हें रणमैदान समजून अदृश्य अशा परीक्षकाशीं लढण्याच्या तयारीनेच ते येतात. लिहितांना दातओठ खात लिहिणें हें ह्यांचें मुख्य लक्षण. ह्याशिवाय लिहितांना पान खाणारे रंगेल विद्यार्थीहि अनेक सापडतात. येतांना लिहिण्याच्या इतर सरंजामाबरोबर पानाचे विडे, तंबाखू, विशेष शौक असल्यास सिगारेटचें पाकीट आणण्यासहि ते चुकत नाहीत. विडा खातांना उत्पन्न होणाऱ्या मुखरसाबरोबर त्यांची प्रतिभाहि जागृत होत असल्यास न कळे!

याप्रमाणे परीक्षेचा मंडप म्हणजे निरनिराळ्या मानवी स्वभावांचें एक चालतेंबोलतें प्रदर्शनच होऊन बसतें. ह्यांत सायकलची क्लिप पायांतून काढायला विसरणाऱ्या वेंधळ्या विद्यार्थ्यापासून चार चार पेन्स बाळगणाऱ्या अति सावध विद्यार्थ्यांचा समावेश होतो. मानवी स्वभावांतल्या भिन्न भिन्न छटा व वैचित्र्य ह्यांचा असा नमुनेदार संग्रह दुसरीकडे क्वचितच आढळेल.

●

## व्यक्तीचें सुख व सुखी समाज

प्रा. म. के. शेटे, एम्. ए.,
सागर विश्वविद्यालय

समाजांतल्या कोणत्याहि व्यक्तीला विचारा, सुख मिळविणें, हेंच तिचें ध्येय आढळून येईल. मग हें सुख कोणत्याहि प्रकारचें असो. प्रत्येकाची सुखाविषयी आपली स्वत:ची अशी एक कल्पना असते; व त्या कल्पनेप्रमाणे तो सुखामागे धावत असतो. आपण इतरांप्रमाणे पैसे मिळवावें, संसार करावा असें बहुतेकांना वाटतें; तर, स्वत: निरिच्छ राहून इतरांच्या उपयोगी पडावें, त्यांच्या सुखांत स्वत:चें सुख मानावें अशीहि कांहींची मनीषा असते. म्हणजेच, प्रत्येकजण सुख मिळविण्यासाठी आपापल्या कल्पनेप्रमाणे धडपडत असतो. समाज व्यक्तींचा बनतो. तेव्हा व्यक्तीप्रमाणेच समाजाचेंहि सुखप्राप्ति हें ध्येय ठरतें. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' हा न्याय मान्य करूनहि समाज-जीवनाच्या कांही क्षेत्रांत तरी प्रत्येकाची सुखसाधना समान पातळीवर येते. आपला नेहमीचाच अनुभव घ्या. कोणी लेखक असो, कवि असो, किंवा कारकून असो, मोठा अमलदार किंवा गरीब मास्तर असो, आपल्याला अन्नवस्त्राची, खाण्यापिण्याची अडचण पडूं नये असें सर्वांनाच वाटतें. म्हणजेच आर्थिक दृष्टीने आपण सुखी असावें अशी सर्वांचीच इच्छा असते.

आणि ह्याला सबळ कारणहि आहे. आर्थिक स्थैर्य हा मानवी जीवनाचा पाया आहे. हें चिरंतन, अविनाशी सत्य आहे. अनेक लोक केवळ वादाच्या भरीस पडून हें नाकारतात. पण असें करणें चूक आहे. व्यक्तीचें जीवन बऱ्याच अंशांनी आर्थिक नियमांनी बद्ध असतें हेंच खरें! आपण केवळ आर्थिक दृष्टीनेच जीवन जगत नाही हें मान्य करूनहि, जीवनांतील आर्थिक बाजूचें

वर्चस्व कबूल केलें पाहिजे. आपल्या जीवनाला अनेक पैलु असतात. समाजांतील इतर व्यक्तींशीं आपले निरनिराळे संबंध असतात व ह्या संबंधांतूनच आपलें सामाजिक जीवन विकसित होतें. इतरांशीं सचोटीने वागावें म्हणून आपण नैतिक दृष्टीने विचार करूं लागतों. इतरांवर अन्याय होऊं नये म्हणून आपण कायदेकानूचें उल्लंघन करीत नाही. परस्पर संबंधांतून होणाऱ्या अशांतीपासून मुक्त होण्यासाठी नकळत धर्माची किंवा अध्यात्माची कांस धरूं लागतों. असें हें मानवी जीवन विविध भावांनी व विचारप्रवाहांनी युक्त असतें, म्हणजेच मानवी जीवनाला अनेक दालनें असतात; व ह्या सर्व दालनांनी मिळूनच आपल्या जीवनाची भव्य इमारत पूर्ण होते.

मात्र ह्या सर्व दालनांत, एक दालन फार महत्त्वाचें आहे. तें म्हणजे आर्थिक जीवनाचें. घराच्या इतर खोल्या कितीहि सुशोभित असल्या तरी त्याला खरी शोभा येते ती सुसज्जित दिवाणखान्यानेच. त्याचप्रमाणे, जीवनाचे इतर पैलू कितीहि महत्त्वाचे असले तरी व्यक्तीच्या व समाजाच्याहि जीवनावर खरा प्रभाव पडतो तो आर्थिक मूल्यांचाच.

म्हणूनच आर्थिक दृष्टीने सुखी नसलेल्या व्यक्ति इतर दृष्टीनेहि असमाधानीच राहतात. पोटांत भुकेचे कावळे ओरडूं लागले म्हणजे नीतिनियमांचा मंजुळ कलरव कुठला ऐकूं येणार? 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' असें म्हटलें आहे तें याच अर्थाने. घरीं मुलेंबाळें उपाशी आहेत, स्वतःच्याहि पोटांत अन्नाचा कण नाहीं, असा मनुष्य वाटेल तें साहस, चोरीहि करण्यास प्रवृत्त होतो. नीतिनियमांची त्याला चाड राहत नाही, इतर वेळीं समाजांतील कायदे योग्य रीतीने पाळणारी व्यक्तीहि अशा वेळीं त्यांचें उल्लंघन करते. शिवाय आर्थिक दृष्टीने अपंग असलेल्या व्यक्तीची देवाधर्मावरचीहि श्रद्धा ढळूं लागते. "आम्हाला एवढ्या हालअपेष्टांत ठेवणारा हाच का धर्म?" याची त्यांना शंका येऊं लागते. धर्मावरची श्रद्धा उडाली म्हणजे मनाची शांति ढळते व हे लोक नेहमी असमाधानाच्या वणव्यांत होरपळत राहतात. आर्थिक दृष्टीने असंतुष्ट असलेली व्यक्ति ह्याप्रमाणे धर्म, नीतिनियम, कायदेकानू व सामाजिक जबाबदारी ह्यांना हळू हळू पारखी होत जाते. आर्थिक दृष्टीने वंचित असलेले लोकच पुढे संप,

बंडें, क्रांत्या करण्यास प्रवृत्त होतात. तेव्हा आर्थिक बाजूने समाज सुखी राहील अशी तजवीज करणें हेंच इष्ट ! हीच समाजाच्या सर्वांगीण उन्नतीची गुरुकिल्ली आहे. आर्थिक स्थैर्यावरच व्यक्तीचा व समाजाचाहि विकास अवलंबून असतो. कारण, आर्थिक दृष्टीने सुखी असलेल्या व्यक्तीच समाधानानें जीवन कंठूं लागतात. ह्याला अपवाद असतील, नाही असें नाही; —पण सामान्यत: हाच नियम लागूं पडतो. आर्थिक दृष्टीने सुखी असलेल्या व्यक्तीच शास्त्र, कला व संस्कृति ह्यांच्या विकासासाठी हातभार लावतात.

कोणती व्यक्ति आर्थिक दृष्टीने सुखी मानतां येईल ? ह्या बाबतींत मात्र थोडक्यांत उत्तर देतां येणें कठिणच आहे. तरी पण मूलभूत गरजा पूर्णपणें तृप्त होत असलेली व्यक्ति आर्थिक दृष्टीने सुखी असते, असें स्थूल-मानाने म्हणतां येईल. खायाला अन्न, राहण्याला निवाऱ्याची जागा व आच्छा-दनाला कपडा ह्या मनुष्याच्या प्राथमिक गरजा आहेत; व नवल हें की, सुधारणेचा अभ्युदय होऊनहि ह्या गरजांचें महत्त्व कमी झालें नाही. ह्या गरजांचीं क्वचित् स्वरूपें बदललीं असतील, पण त्यांचा आत्मा कायमच राहिला. अर्धेकच्चें मांस जाऊन आता, मसालेदार व चमचमीत पक्वान्नें आलीं; पण ह्यांचें कार्य एकच. पूर्वी एखाद्या गुहेचा निवास मनुष्याला पुरत असे. आता आधुनिक सोयींनी परिपूर्ण व जरूर तें उष्णतामान कायम राखणारीं नवीन धर्तीचीं टुमदार घरें दिसूं लागलीं. पण कार्य तेंच; त्यांत फरक नाही. आच्छादनासाठी झाडांच्या साली जाऊन नूतनतम फॅशनचे कपडे स्त्री–पुरुषांच्या अंगावर दिसूं लागले. म्हणजेच, मनुष्य सुधारणेच्या शिखरावर पोचला तरी ह्या गरजांपासून मुक्ति नाही. म्हणूनच गरजांची किंवा आवश्यकतांची तृप्ति करण्यासाठी जे कष्ट करावे लागतात त्यांना आपण ‘जीवनकलह’ असें प्रतिष्ठित नांव देतों. ह्या गरजा पूर्णपणें तृप्त होणाऱ्या व्यक्तीलाच आर्थिक दृष्टीने सुखी व्यक्ति म्हणतां येईल. इतर चैनीच्या वस्तु मिळोत, किंवा न मिळोत ह्या प्राथमिक आवश्यकता पूर्ण झाल्याच पाहिजेत.

वरील न्याय समाजालाहि लागूं आहे. स्वत:च्या प्रमुख गरजा पूर्ण करणारा सुसंघटित समाजच पुढे उन्नतीचें शिखर गाठूं शकतो. येथे समाज

म्हणजे बहुसंख्य व्यक्ति, बहुजन समाज. कांही अपवाद सोडल्यास, बहुतेक लोक सुखी असले तर समाज सुखी मानतां येईल. उलट, थोडे लोक सुखी असून बहुसंख्य जनता दुःखाच्या गर्तेत पडली असेल तर तो समाज सुखी म्हणतां येणार नाही. एखाद्या संस्थानिकानें—गेलेत ते दिवस, विसावी मोटर विकत घेतली, तर तो फार तर संतुष्ट होईल. पण त्याची प्रजा? तिचें दुःख कायमच राहतें. एखाद्या गर्भश्रीमंताने प्रासादाचें सुख अनुभवलें तरी इतर गरीब लोक चंद्रमौळी झोपडींतच कुडकुडत राहतात. बुट्टीदार बनारसी शालू एखाद्या तन्वंगीच्या अंगावर शोभत असेल, तरी हजारो गरीब बायांना फाटक्या ठिगळांनी लाज झाकावी लागते. म्हणजेच, थोड्या व्यक्ति सुखी व इतर सर्व दुःखी असतील तर तो समाजहि सुखाला पारखा होतो. अपवादात्मक व्यक्तीच्या सुखामुळे समाज सुखी होत नाहीं. समाज म्हणजे बहुसंख्य व्यक्ति; त्या सुखी झाल्या तरच समाज सुखी होतो. मग त्यांच्या सुखासाठी थोड्या व्यक्तींना दुःख भोगावें लागलें तरी हरकत नाही. मूठभर लक्षाधिशांवर जबर कर बसवला तर ते फार तर नाराज होतील; पण त्या पैशाचा गरिबांच्या हितासाठी उपयोग करून त्यांना संतुष्ट राखतां येईल. तेव्हा थोड्या लोकांना दुःखी करूनहि, समाजांतील बहुसंख्य लोकांचें सुख साधलें पाहिजे तरच सुखी समाजाचें स्वप्न साकार होईल.

●

# विस्मृति

प्रा. दा. ल. अडोणी, एम्. ए.,
सागर

"अरे, खरंच, विसरलों की; आठवण कशी ती राहिलीच नाही. अगदी विस्मृति झाली पाहा! कसा विसर पडला!" असे उद्गार काढण्याचे प्रसंग जिच्या आयुष्यांत येत नाहीत अशी व्यक्ति निराळीच. स्मरणशक्तीप्रमाणे विस्मृति ही सुद्धा एक शक्ति आहे आणि तिचें कार्य अविरतपणें चालू असतें ही गोष्ट इतकी स्पष्ट व नित्य अनुभवास येणारी आहे की, वानगीदाखल उदाहरणें देण्याची आवश्यकता नाही. नियमित, व्यवस्थित, आठवणीचे धड म्हणून प्रसिद्ध असलेल्या आपल्या भोवतालच्या लोकांना वरच्यासारखे उद्गार काढतांना कोणी ऐकलें नसेल?

सबब किंवा कारण म्हणून विस्मृतीचा मोठ्या प्रमाणांत वापर करण्यांत येतो. त्यामुळे तिला हीन लेखतात. पण यांत तिचा तरी काय अपराध ? अग्नीचा किंवा विजेचा नाही का लोक इच्छेला येईल तसा उपयोग करीत ? वस्तूचें महत्त्वमापन तिच्या अंगभूत गुणांनी न करतां ज्यांच्याकडून ती हाताळली जाते त्यांच्यावरून बहुधा करण्यांत येतें हेंच खरें. आळशी व कामचुकार लोकांनी आश्रय घेतल्यामुळे विस्मृतीला कमी लेखण्यांत येऊं लागलें व तिची दोषांत गणना होऊं लागली. विस्मृति–विशारद गोकुळ (विसरभोळे--गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यासां'तील पात्र) सर्वांच्या उपहासाचा विषय होतो.

विस्मरणाबद्दल लहानसहान व्यक्तीला आपण दोष देतों, पण मोठ्यांना मात्र कार्यबाहुल्यामुळे विसर पडला असेल असें मानून समाधान करून घेतों. फार थोर व्यक्ति असल्यास तिचें कौतुकसुद्धा करतात. श्री. च. राजाजींना आपलें वय किंवा पं. नेहरूंना आपला पगार आठवत नाही. या वार्ता कौतुकवती म्हणून ठळक ठशांत वृत्तपत्रांनी छापल्या होत्या. पण बाळचा-बेबीला किंवा रामा गड्याला एखाद्या वेळीं सांगितलेल्या कामाची आठवण राहिली नाही की त्यांना तंबी मिळते.

कोर्टकचेऱ्यांशीं संबंध येणाऱ्या लोकांची, विशेषत: साक्षीदारांची, पाठ-राखण करायला विस्मृति नेहमी तयार असते. अशीलांची सतत साथ करणारी ही शीलवती सहचारिणी आहे. स्मृति जर दुसऱ्यावर आघात करणारी तलवार असेल, तर विस्मृति ही बचाव करूं पाहणाऱ्या ढालेसारखी आहे. 'आठवत नाही, विसरलों' या ढालीआड लपून स्वसंरक्षण करणारे खंदे वीर कांही कमी नसतात ! 'उधार–उसनवार' योजनेचा स्वीकार करणाऱ्या ऋणी व्यक्तींना काय किंवा राष्ट्रांना काय, हिचें अमोल साह्य होत असतें.

स्मृति आणि विस्मृति या सवती आहेत असें पुष्कळांना वाटतें. त्यांचा एका ठिकाणीं, एका कालीं आढळ होत नाही; म्हणून त्यांचे एकमेकींशीं पटत नसावें या समजुतीवर ही कल्पना आधारलेली दिसते. तथापि त्या जुळ्या बहिणी असाव्या असें मला तरी वाटतें. कारण दोघींचेंहि कार्य एकमेकीला पूरक आहे, विरोधी नाही.

महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवण्याचा राजमार्ग म्हटला म्हणजे कमी महत्त्वाच्या गोष्टी विसरणें हा होय. नित्योपयोगाच्या व महत्त्वाच्या वस्तू तेवढ्या वापराच्या जागेंत ठेवून बाकीच्या अनावश्यक, अवांतर वस्तू आपण अडगळीच्या खोलींत ठेवून देतो ना? त्याचप्रमाणे गौण गोष्टींचीहि विल्हेवाट लावली पाहिजे. निरुपयोगी सामानच जर दिवाणखान्याची जागा वळकावूं लागलें तर महत्त्वाच्या वस्तूंची व्यवस्थित मांडणी कशी करतां येईल व हवी ती वस्तु चटकन् कशी सापडेल? चाळणीसारखी असलेली आपली धारणाशक्ति जीवनांतील घटनांना चाळून स्मृति व विस्मृति या दोन भागांत विभक्त करते. महत्त्वाचा सत्त्वांश तेवढा शिल्लक राहतो आणि बाकीचा पाहतां पाहतां 'अगात् स्मृतिपथम्' होतो.

सांसारिक दुःखावर तर विस्मृतिसारखें रामबाण औषध दुसरें नाही. गतकाळांतील झाडून साऱ्या गोष्टींचीं भूतें सदासर्वदा आपल्यासमोर थय्थय् नाच करूं लागलीं, तर वर्तमान काळांत वावरणें किंवा भविष्य काळाच्या अज्ञात [व बहुधा म्हणूनच] रमणीय मरुद्यानांत विहार करणें अशक्यप्राय होऊन बसेल. विस्मृतीने भरून काढली नाही अशी बहुधा एकहि जखम नसेल. पीडलेल्या जीवाच्या आधीव्याधींवर विस्मरण हा बधिरी-करणाचा परिणामकारक तोडगा आहे. "सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें" अशी स्थिति असलेल्या आपल्या आयुष्यांत विस्मृति म्हणजे एक चिन्तामणि.

जीवनाच्या भिन्न भिन्न आघाडीवरील समरप्रसंग संपुष्टांत आले म्हणजे 'क्षमस्व नि विसरणें' (Forget and forgive) या दोन साधनांनी सलोखा करतात. क्षमाशस्त्र प्रत्येकाने धारण करावें असें निःशस्त्री-करणवादी तुकारामबोवांनादेखील वाटतें. तेव्हा विस्मृतीच्या अस्त्राचा उपयोग आवश्यक आहे हें ओघाने आलेंच. या जोडीने कितीतरी अंतराय पडलेलीं अंतःकरणें एकत्र आणलीं असतील!

विस्मृतीच्या श्रेणीहि अनेक आहेत. ग्राह्यांश लक्षांत ठेवून अवांतर विसरणाऱ्या नीरक्षीरविवेक करणाऱ्या राजहंसाचा एक वर्ग, ग्राह्यांशाला लक्ष्य करून व इतर गोष्टींचें विस्मरण झालें असें भासवून, दुसऱ्यांना

फसविणाऱ्या स्वार्थी पल्वल–हंसाचा–बगळ्यांचा दुसरा वर्ग, तर परब्रह्मांत मन विलीन व्हावें म्हणून स्वत:ला सुद्धा विसरणाऱ्या व लक्ष्याशीं सायुज्य पावणाऱ्या साधकांचा–परमहंसाचा–एक तिसराच प्रकार.

विस्मृतीचें स्मृतीइतकेंच महत्त्व आहे. गतज्ञानाच्या–'पूर्वदिव्या'च्या–स्मृतींत डुंबणारे आपण मागे पडत चाललों, तर विस्मृत अज्ञाताच्या क्षेत्रांत प्रवेश करून पाश्चात्य संशोधक प्रगतीची वेगाने वाटचाल करीत आहेत.

स्वत:कडे कमीपणा घेऊन स्मरणशक्तीचा महिमा वाढविणाऱ्या अशा विस्मृतीचा आपणाला विसर पडला तरी तिला खचित दु:ख होणार नाही !

●

# वृत्तपत्रें

प्रा. गजानन पाडळकर, एम्. कॉम्.
पी. ई. एस्. कॉलेज, औरंगाबाद.

मानवाचें मन खरोखर जरा विचित्रच आहे. ईश्वराने आपणांस निर्माण केलें आहे, तेव्हा त्याच्या सूत्राने चालणारें आपलें जीवन शांतपणाने व्यतीत करावें अशी समाधानी वृत्ति त्याच्या जवळ नाहीच. सदा जिज्ञासा जागृत ठेवणें व सद्यस्थितींत असमाधान मानून अधिकाधिक उत्कर्षाकरिता धडपड करीत राहणें हा त्याचा स्वभावधर्मच आहे. फार प्राचीन काळीं, ज्या वेळेस आधुनिक यंत्रादि साधनांचा शोध लागलेला नव्हता तेव्हा ज्ञानप्रसाराचीं साधनें फार सीमित होतीं. गुरूंच्या मुखांतून निघालेलें ज्ञान शिष्याने आत्मसात् करून घ्यायचें व तीच परंपरा पुढे चालवायची अशी त्या वेळची स्थिति होती. इतर सहायक साधनांच्या अभावामुळे मनुष्याचा मोठा कोंडमारा झाल्यासारखा होता. पण सतत परिश्रमाने व दीर्घोद्योगाने, त्यांतूनहि मार्ग काढून मनुष्याने लेखनकला साध्य केली व मानवाच्या मनांतील ज्ञान अक्षरांत व्यक्त होऊं लागलें. परंतु विशाल समाजाच्या वर्धमान आवश्यकतांपुढे हस्तलेखनाची ही कमकुवत पुंजी कितपत पुरेशी पडणार ? जिज्ञासू व प्रयोगक्षम मन अधिक गतीने विचार करूं लागलें व छापण्याच्या कलेवर मनुष्याने प्रभुत्व मिळविलें. तो दिवस मानवाच्या प्रगतीच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखाच होय. एका मोठ्या महान् शक्तीवर

मनुष्याने विजय मिळविला व प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्रा-प्रमाणे तो या यशाकडे अभिमानाने पाहूं लागला. विधात्याने मानवप्राणी निर्माण करून त्यांत मनें ओतलीं; परंतु या मनांतील विचारशक्तींना चालना देण्याचें कार्य, एकाच वेळीं अनेक मनें कार्यप्रवीण करण्याचें सामर्थ्य मुद्रण-कलेमध्ये सामावलें गेलें व मानवाच्या प्रगतीचीं सर्व दालनें भराभर खुलीं झालीं.

असें म्हणतात की, मुद्रणकलेचा मूळ आविष्कार भारतांतीलच आहे, परंतु कालाच्या प्रवाहांत ती कलाहि येथे लुप्त झाली व नंतर पाश्चात्यांनी ती तेथे नेऊन तिचें पुनरुज्जीवन केलें. नंतर अनेक शास्त्रीय शोधांप्रमाणें हाहि शोध पुन्हा भारतांत आला. हळूहळू मुद्रणाचा प्रसार व अवलंब मोठ्या प्रमाणावर होऊं लागला व थोड्याच अवधींत सामाजिक जीवनांत त्याला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. मुद्रणकलेच्या भरभक्कम आधारावरच नियत-कालिकांच्या प्रकाशनाची मुहूर्तमेढ रोविली गेली आणि या नियतकालिकांनीच पुढे अनेक स्वरूपें धारण केलीं. दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, वार्षिक हीं सर्व एकाच मातेचीं अपत्यें होत. भारतांतील पहिलें नियतकालिक २९ जानेवारी १७८० रोजी कलकत्त्याजवळील श्रीरामपूर येथे जेम्स ऑगस्टस हिकी या गृहस्थाने 'बंगाल गॅझेट' या नांवाने प्रसिद्ध केलें; आणि तेव्हापासून दिवसानुदिवस नियतकालिकांचा संसार वाढूंच लागला. आज आपणांस भारतांतील असें एकहि गांव आढळणार नाही की जेथें वर्तमानपत्र दृष्टीस पडणार नाही. वर्तमान-पत्रांचा प्रसार म्हणजे सुसंस्कृत राष्ट्राच्या प्रगतीचें द्योतकच होय. अर्थात् पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेने भारत या बाबतींत बराच मागे आहे असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांवरून दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहणार नाही. प्रत्येक १००० व्यक्तींमध्ये वर्तमानपत्र वाचणारांची संख्या अमेरिकेमध्ये ८०७, इंग्लंडमध्यें ७८१, जर्मनीमध्ये ७६० तर भारतामध्ये फक्त ११२ याप्रमाणे आहे. शिवाय स्वतः वर्तमानपत्र विकत घेऊन मग तें वाचणें ही गोष्ट तर वेगळीच. पुढारलेल्या या पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये एका व्यक्तीने वाचलेलें तेंच वर्तमान-पत्र पुन्हा दुसऱ्या व्यक्तीने वाचावयास घेणें हें थोडेसें दोषास्पद मानतात.

त्या दृष्टीने या ११२ व्यक्तींपैकी स्वत: वर्तमानपत्र विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या तर केवळ १७ च आहे. अर्थात् यामागे अनेक कारणेंहि आहेत. साक्षरतेचें प्रमाण, साधनांची उपलब्धता, आर्थिक परिस्थिति, वाचकांची क्रयशक्ति, आवश्यकतेची तीव्रता, या व अशा अनेक कारणांमुळे जरी हें संख्यादर्शन दुर्बल भासत असलें तरीपण परिस्थितीमध्ये सुधारणा व्हायला पाहिजे हें कोणीहि नाकबूल करणार नाही.

मुद्रणकलेचा हा अद्वितीय आविष्कार मनुष्याच्या सर्वांगीण प्रगतीला परिपोषक असाच ठरलेला आहे. नियतकालिकांच्या प्रकाशनामुळे मनुष्यास झालेले अगणित लाभ अतुलनीयच आहेत. समाजाच्या प्रत्येक थरांतील प्रत्येक व्यक्तीस कांही ना कांही लाभ झाल्यावांचून राहत नाही. ज्ञान प्रसाराच्या अनेक साधनांपैकी सहजासहजी प्राप्त होऊं शकणारें व सर्वांच्या सर्वांगीण आवश्यकता पूर्ण करणारें अधिक प्रभावी साधन वर्तमानपत्राशिवाय दुसरें कोणतें असूं शकणार ? पृथ्वीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत, जगाच्या कुठल्याहि कानाकोपऱ्यांत कोणतीहि विशेष घटना घडतांच तिचें इत्थंभूत वृत्त, राजकारणांतील एकूणएक हालचालींचा संपूर्ण अहवाल, मोठमोठ्या तज्ज्ञांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीवर विदारक प्रकाश टाकणारे तर्कशुद्ध व टीकात्मक विचार, ललित साम्राज्यांतील कथाकाव्यादि मनोरम रचनांचें दर्शन, देशांतील किंवा जगांतील आर्थिक हालचालींचें व बाजारांतील उलाढालींचें सत्यचित्रण, क्रीडाक्षेत्रांतील निरनिराळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनांचें संपूर्ण वर्णन, कलेच्या प्रांगणांतील विविध कृतींचें ज्ञान व भूत आणि वर्तमानावरून हळुवार हात फिरवून पुढे येणाऱ्या भविष्याचें ज्ञानपूर्ण कथन, या ना त्या, अनेक प्रकारच्या मानवी मनांना शतविध मार्गांनी आकृष्ट करणाऱ्या कृतींचें सुंदर व सजीव प्रतिबिंब सहजासहजी सहस्रावधि व्यक्तींपर्यंत पोचविण्याचें अफाट सामर्थ्य मुद्रणकलेंत सामावलेलें पाहिलें म्हणजे नकळत मुखांतून 'धन्योद्गार' बाहेर पडल्यास आश्चर्य नाही. एक आदर्श समाजरचना निर्माण करण्याचें, भारतीय घटनाप्रणीत आपलें उज्ज्वल ध्येय पूर्ण करण्याकरिता योजिल्या जाणाऱ्या अनेक साधनांपैकी मुद्रणाचें हें सामर्थ्यवान साधन किती प्रभावी

१८१५८ दि २१.१२...

क्रमांक दि: २८-१२-५
आहे हें गतकालाकडे थोडासा दृष्टिक्षेप करतांच सहज उमजण्यासारखें आहे. भारतमातेला परदास्यशृंखलांतून मुक्त करण्याकरिता, अविरत सुरू असलेल्या संग्रामांत मुद्रणाने बजावलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीची व लोकजागृतीच्या महान् कार्याची साक्ष इतिहासच देईल. कै. आगरकरांचे 'सुधारक', शिवरामपंत परांजप्यांचा 'काळ', लोकमान्य टिळकांचा 'केसरी', अच्युत बळवंत कोल्हटकरांचा 'संदेश' हीं व अशासारखींच अनेक उदाहरणें म्हणजे मुद्रणाच्या सेवेचीं मूर्तिमंत प्रतीकेंच होत. प्रचाराच्या कार्यांत देखील मुद्रणाचें सामर्थ्य सर्वमान्यच आहे. अधिक नफा मिळविण्याच्या दृष्टीने आपल्या मालाच्या अधिक विक्रीकरिता व्यापाऱ्यानें चालविलेला प्रचार असो, की सत्तेच्या अभिलाषेने एखाद्या राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी हातीं घेतलेला प्रचार असो, मुद्रणाच्या सहकार्याशिवाय त्यांत पूर्तता येणें शक्यच नाही. सारांश काय, की जीवनाचा कुठल्याहि क्षेत्रांत व कोणत्याहि मार्गांत मुद्रणाच्या अस्तित्वाशिवाय रंगत चढत नाही हेंच खरें!

साक्षरताप्रमाणाचें महत्त्व आज समाजाने ओळखलेलें आहे. साक्षरताप्रसाराची मोहीम सर्वदूर जोरांत चालू आहे. उद्याच्या जगांत निरक्षरांना स्थान नाही. साक्षरतेपासून सुसंस्कृततेप्रत जाण्याचें कार्य अक्षराच्या अभावीं लुळें पडणारच. मुद्रणाच्या सामर्थ्यानेच हें कार्य अधिक सुकर, सोपें व गतिमान होईल यांत शंकाच नाही.

●

# एकत्र-कुटुंबपद्धति

प्रा. गं. वि. नेर्लेकर,
एम्. ए., मुंबई

मानवी सृष्टि व प्राणी सृष्टि यांच्या राहणींत, वागण्यांत किंबहुना जीवन व्यतीत करण्याच्या पद्धतींत पुष्कळच फरक आहे. माणसाची व्याख्या 'हसणारा प्राणी' अशी केली जाते. त्याचा 'समाजशील प्राणी' असा उल्लेख केला जातो. म्हणूनच मला वाटतें की मानवी प्राण्याला जबर शिक्षा द्यावयाची म्हणजे त्याला तुरुंगाच्या एकाकी कोठडींत डांबून ठेवतात! माणूस हा एकलकोंडा प्राणी नाही. वाघ, सिंह आदि हिंस्र पशूंना एकाकी

राहणें आवडतें असें समजतात. पण मला वाटतं वाघालाहि वाघिणीचा सहवास मोठा प्रिय वाटत असावा !

माणसाला सामूहिक जीवनाची आवश्यकता फार प्राचीन काळापासून आहे व ती पुढेहि राहणार आहे, कारण तो त्याचा स्वभाव आहे. माणसाला स्वसंरक्षणाकरिता इतर माणसांची जरूर पडते. समजा माणूस जीवन जगत असतां एक दिवस अरण्यांत त्याची आणि हिंस्र पशूची गांठ पडली तर तो एकटा स्वत:चें संरक्षण करीलच याची हमी देतां येणार नाही; म्हणजे स्वत:चें रक्षण करण्याकरिता तो दुसऱ्या मानवावर अवलंबून असतो. स्वसंरक्षण, प्रजा निर्माण करण्याची सहजप्रवृत्ति, आपत्यवात्सल्य इ. गोष्टींकरिताच मानवाने कुटुंबसंस्था निर्माण केली. 'एकमेकां सहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ' अशा प्रकारचीच ही प्रवृत्ति होती.

मानवाचें जीवन सुखी करण्याकरिताच कुटुंबसंस्थेचा जन्म झाला असेंच मी म्हणेन. अनेक कुटुंबें मिळून समाज व अनेक समाज मिळून राष्ट्र होत असतें. तेव्हा कुटुंबसंस्था जर बळकट व सुसंबद्ध असेल तर पर्यायानें राष्ट्र हें सुखी व मजबूत होऊं शकेल. एकत्र कुटुंबपद्धति हा या कुटुंब-संस्थेचाच एक प्रकार होय. माणसांतील उच्चतम गुणांची वाढ ह्याच संस्थेंत होत असते. सेवातत्परता, दुसऱ्याकरिता त्याग करणें, शिस्तबद्ध वागणें, सदाचार व सहकार या सर्व गुणांची जोपासना कुटुंबसंस्थेंत होत असते.

मातृ–पितृ–सत्ताक कुटुंबपद्धति, एकत्र कुटुंबपद्धति, विभक्त कुटुंब-पद्धति वगैरे अनेक प्रकार निरनिराळ्या देशांत रूढ आहेत. आपल्या भारतांत एकत्र कुटुंबपद्धति बऱ्याच काळपर्यंत रूढ होती व तिचीं रसाळ फळेंहि आपणांस चाखावयास मिळालीं.

एकत्र कुटुंबपद्धति ही आजकाल आपल्याला फारशी अस्तित्वांत असलेली दिसत नाही. असें कां घडलें आहे याची कारणमीमांसा होणें आवश्यक आहे.

ज्या कुटुंबांत एक गृहस्थ हा प्रमुख असून बाकी सर्वजण त्याच्या नेतृत्वाखाली वागतात व एकाच कुटुंबाचे घटक म्हणून वागतात अशा

पद्धतीस एकत्र-कुटुंबपद्धति म्हणतात. श्रीधरपंत हे कुटुंबप्रमुख म्हटल्यावर त्यांचीं मुलें, त्यांच्या बायका, त्यांचीं मुलें हे सर्व एकत्र राहून श्रीधरपंतांच्याच इच्छेप्रमाणे वागणार. श्रीधरपंत म्हणतील व सांगतील तें प्रमाण. श्रीधरपंत हे सर्वांच्या जीवन-पोषणाची जबाबदारी घेतात. बाकीच्यांनी मिळवून आणावयाचें व कुटुंबप्रमुखाच्या स्वाधीन करावयाचें. थोडक्यांत मीं या पद्धतीला 'एकचालकानुवर्तितत्र कुटुंबपद्धति' असेंच म्हणेन. या पद्धतींत इस्टेट ही सर्वांची सामायिक असते. अर्थात् प्रत्येकाने अंग मोडून मेहनत करावी व सर्व संपत्ति एकाच्या स्वाधीन करावी. सर्वांना ह्या संपत्तीचा उपभोग घेण्यास मिळे. Work as you can and enjoy as you require. अर्थात् वाटेल तशी मजा मारणें शक्य नसे. त्याच्यावर कुटुंबप्रमुखाचें नियंत्रण अल्प का होईना पण असे.

एकत्र कुटुंबपद्धति फार प्राचीन काळापासून हिंदु समाजांत अस्तित्वांत आहे. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश असल्यामुळे ही पद्धति त्याच्या पचनीं पडली असावी. शेतीकरिता मनुष्यबळ पुष्कळ लागे व ह्या कामाकरिता भाड्याने वा रोजनदारीने माणसें आणणें आर्थिक दृष्टचा परवडणारें नव्हतें. तेव्हा आपलींच माणसें असल्यावर उत्पादनास खर्च कमी येऊन सर्वांना भरपूर पुरेल एवढें उत्पन्न होई. शिवाय एकमेकाची एकमेकांना फारच मदत होत असे. अशा प्रकारच्या कुटुंबपद्धतींत स्त्रियांना फारच गौण स्थान असे. तिला इस्टेटीचा वांटा मिळत नसे. आज हा प्रश्न घसास लागला आहे व स्त्रीला वारसाहक्क मिळावा म्हणून अनेक कायदेहि होऊं घातले आहेत. ह्या कशाचा परिणाम हेंहि आपणास पाहिलें पाहिजे.

आजकाल आपण अनेक विभक्त कुटुंबें पाहतों. त्यांची त्रेधाहि आपल्या दृष्टीस पडते. मियाबिबीचें राज्य असतें. पण जर बायको आजारी पडली तर घरांत लगेच नवरोजीला गृहकारभार (Home deptt.) ताब्यांत घ्यावा लागतो. म्हणजे घरांत व घराबाहेर दोन्हीकडे त्याला लक्ष द्यावें लागतें. पूर्वी असें होत नसे. घरांत सासू, नणंदा, आत्याबाई वगैरे वडील मंडळी असत. दुखणं-खुपणं ह्याकडे पुरुषास फारसें लक्ष द्यावें लागत नसे.

थोडक्यांत म्हणजे एकत्र कुटुंबपद्धतींत इतर व्यक्तींवर फारशी जबाबदारी नसे. शिवाय दुसऱ्याकरिता त्याग करण्याकरिता अनेक घटक तयार असत. एकाच प्रमुखाच्या आदेशानुसार चालणें भाग असल्यामुळे सर्व घटकांत एक प्रकारची शिस्तहि कुटुंबांत असे. त्यागांतून प्रेमाची निर्मिति होते; यामुळे कुटुंबांतील प्रत्येक घटकाला दुसऱ्याबद्दल आपुलकी, प्रेम, जिव्हाळा वाटत असे. सहजीवनाचें धडे शिकण्याचें उत्कृष्ट ठिकाण म्हणजे एकत्र कुटुंबपद्धति. ह्या पद्धतीचा सर्वांत महत्वाचा विशेष म्हणजे जे घटक अधु, पंगु असतील, ज्या स्त्रिया विधवा असतील त्या सर्वांची काळजी घेण्याचें काम ह्या कुटुंबपद्धतींत फार सुलभतेने होई, व एक महत्त्वाचा सामाजिक प्रश्न सुटला जाई. प्रचलित विभक्त कुटुंबपद्धतींत हा प्रश्न बिकट होऊं लागला आहे. एकादा भाऊ दैववशांत बहिरा, लंगडा झाला वा एकादी बहीण विधवा होऊन घरीं आली तर तिला पोसणें जड होऊन बसतें, व मग चरितार्थाकरिता अशांना दारोदारीं--महिलाश्रम, अनाथाश्रम, अंधशाळा--अशा ठिकाणांचा आश्रय घ्यावा लागतो. एकत्र कुटुंबपद्धतींत हे लोक कधीच निराधार होत नसत, पण या चांगल्या गोष्टीचा फायदा कांही आळशी घटक घेत असत. विशेष काम न करतां, एकत्र कुटुंबपद्धतींत कांही घटक ऐषआरामाने राहण्याचा प्रयत्न करीत. अर्थात् इतर घटकांना त्यामुळें त्रास होई. कुटुंबाची कार्यक्षमता कमी होई व आळशीपणास उत्तेजन मिळे. इतर घटकांना आळशी घटकाबद्दल द्वेष वाटूं लागे. विभक्त कुटुंब-पद्धति चालूं झाली त्याला हेंहि एक कारण असूं शकेल. एकत्र कुटुंबपद्धतींत माणसावर फार जबाबदारी एकदम पडत नाही. शिवाय या पद्धतींत श्रम-विभागणीचें तत्त्वहि उत्तम प्रकारें पाळलें गेलें असल्यामुळे घटकावर ताण पडत नाही. शिवाय ही पद्धति अर्थशास्त्राच्या दृष्टीने विचार केला असतां काटकसरीची वाटते. श्रीधरपंतांना चार मुलें असल्यास पुढे एकाचे चार संसार, विभक्त झाल्याने होतात व ते प्रत्येकाला खर्चिक पडतें.

आपण आतापर्यंत एकत्र कुटुंबपद्धति फायदेशीर कशी याचा विचार केला. पण आज ती प्रामुख्याने प्रचलित असलेली दिसून येत नाही. याला अनेक कारणें आहेत. परिस्थिति हें सर्वांत मोठें व व्यापक असें कारण

आपणास सांगतां येईल. मानवी जीवन अधिकाधिक यांत्रिक बनत चाललें आहे. ह्या औद्योगिक क्रांतीमुळे प्रत्येक घटक निरनिराळ्या क्षेत्रांत काम करूं लागला व त्याचें उत्पादनाचें केंद्र बदललें. पूर्वी एकत्र कुटुंब हेंच अर्थोत्पादनाचें केंद्र होतें. खेड्यांतच माणसाच्या सर्व गरजा भागत असत. आता पोटाकरिता त्याला शहराकडे धाव घ्यावी लागते. आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर त्याला व्यक्तिस्वातंत्र्याची जरूर भासली. एकत्र कुटुंबपद्धतींत ऐदी माणसांना प्रोत्साहन मिळे. ते नव्या जमान्यांत टिकणें शक्य नव्हते. पूर्वीच्या कुटुंबपद्धतींत कुटुंबप्रमुखास सर्वाधिकार असत. नव्या व्यक्ति-स्वातंत्र्याच्या युगांत प्रत्येकाला आपणास कांही विशिष्ट अधिकार हवेत असें वाटूं लागलें. सासूच्या हाताखाली राबणें हें आधुनिक काळांतील सुनेला रुचेना! तिलाहि तिच्या अधिकाराची जाणीव होऊं लागली.

प्रत्येकाला वागण्याचें, राहण्याचें, चैन करण्याचें स्वातंत्र्य पाहिजें होतें; अन् त्यावर तर एकत्र कुटुंबपद्धतींत बंधन होतें. त्यामुळे हळुहळू घुसफूस, कुरकूर, भांडणें यांना वाव मिळाला. त्यागाची भावना कमी झाली व प्रत्येक जण अमोप व्यक्तिस्वातंत्र्य व समता याचा उपभोग घेण्या-करिता विभक्त कुटुंबपद्धतीकडे भराऱ्या मारूं लागला.

आज प्रत्येकाला विभक्त कुटुंबपद्धतींत स्वातंत्र्य आहे. पण त्या स्वातंत्र्याबरोबर केवढी तरी मोठी जबाबदारी कुटुंबघटकांवर येऊन पडते. स्त्री व पुरुष आज त्या जबाबदारीखाली चेंगरून गेले आहेत. अपत्यसंगोपन, आजाऱ्याची शुश्रूषा वगैरे प्रसंगीं इतर माणसांची गरज भासते. पण ऐन वेळीं कोण उपयोगी पडणार! नवीन पद्धतींत एकमेकांकरिता त्याग करण्याची भावना कमी झाली व स्वार्थी वृत्ति अधिक बळावली. माणसामाणसांमधील प्रेम, जिव्हाळा कमी होऊं लागला. त्याला कृत्रिम व बेगडी स्वरूप आलें. बरें, आजच्या आर्थिक परिस्थितीकडें पाहिलें तरी विभक्त कुटुंबपद्धती अधिक खर्चिक वाटल्यावांचून राहणार नाहीं. शिवाय ह्या विभक्त कुटुंबपद्धतींत अनाथ, पंगु घटकांचें पोषण करण्यास कोणीच तयार होत नाही. तसं करणं आर्थिक दृष्टयाहि परवडत नाही. प्रत्येकजण जबाबदारी टाळण्याच्या मागे असतो. म्हणजे व्यक्ति-स्वातंत्र्य, समता वगैरे गोष्टी हव्यात पण मग त्याबरोबर येणारी जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ति कां ?

सहकार्याच्या जीवनाकरिता आपण कुटुंबसंस्था निर्माण केली. किंबहुना ती आपली एक आवश्यक गरज् आहे. पण आजकाल ही सहकाराची भावना कमी होऊं लागली आहे असें मला तरी वाटतें. अहो फार कशाला, आपल्या शेजारचा मनुष्य मरण पावला आहे. आता त्याला तिरडीवर घालून फक्त ओंकारेश्वरीं न्यावयाचा आहे. पण अशा वेळींसुद्धा जो तो अंग चोरण्याचा प्रयत्न करतो. खरं म्हणजे मरणासारखा प्रसंग किती गंभीर. पण सहकार व त्याग ह्या गोष्टी आपण विसरत चाललों आहोंत; आणि या यांत्रिक व औद्योगिक क्रांतीच्या युगांत आपणाला अधिकाधिक सहकार्याची आवश्यकता भासणार आहे. आज युनोमध्ये जाऊन आपण राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य झालें पाहिजे ही भाषा बोलूं लागलों आहोंत. पण सहजीवन व सहकार्य याचा पाया जो कुटुंब तेथे आज ही भावना कमी होत चालली आहे. मी असें म्हणत नाही की, एकत्र कुटुंबपद्धतीच सर्वस्वी श्रेष्ठ होय. तिच्यांतहि कांही दोष आहेत. त्याचा उल्लेखहि वर आलाच आहे. ते दोष काढण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. मला हेंहि मान्य आहे की, पूर्वीसारखी एककुटुंबपद्धति निखालसपणें अवलंबणें आजच्या यांत्रिक युगांत अशक्य आहे. पण त्या पद्धतींत ज्या ज्या चांगल्या गोष्टी होत्या त्यांचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. युरोप आदि देशांत अशा रीतीने सहकारी पद्धतीवर कुटुंबव्यवहार करण्याचा प्रयत्न होत आहे. आजचं युग हें सहकाराचं आहे. त्याशिवाय मानवी जीवन अशक्य आहे. आज रक्ताने जोडलेलीं माणसेंहि एकमेकाकरिता त्याग करण्यास तयार होत नाहीत. असें कां घडलें याचा समाजशास्त्रज्ञ व पुढारी यांनी विचार केला पाहिजे. व्यक्तिव्यक्तींत प्रेम निर्माण झालें पाहिजे आणि कुटुंबजीवन हा सामाजिक जीवनाचा पाया असेल, तर हा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थात् नवीन आर्थिक स्वातंत्र्याच्या काळांत कुटुंबसंस्थेची आवश्यकताच नाही असेहि विचार मांडणारी कांही मंडळी आहेत. पण मला त्यांचें हें मत अगदी एकाकी वाटतें. कुटुंबसंस्था जगावयाला पाहिजेच; फक्त तिच्यांत योग्य तो फेरफार करण्याची वेळ आली आहे एवढें मात्र नक्की!

●

# विमानांतील पहिली सफर

प्रा. गं. वि. नेर्लेकर
एम्. ए., मुंबई

ऐन युद्धाचा काळ होता तो. मानवतेचा डांगोरा सर्वत्र पिटला जात होता. पण सर्वत्र कृति मात्र विरुद्ध चालली होती. शांततेची निर्मिति काय लढाईने होणार ? जगाच्या सुरवातीपासून ह्या लढायांचा धुमाकूळ चालू आहे. पण अद्यापि सर्वत्र शांततेची निर्मिति झाली नाही, अन् तरीहि मानव शांततेच्या प्रस्थापनेकरिता लढायांचा अवलंब करीत आहे. 'वदतो व्याधातावेंच' हें उदाहरण आहे; पण वस्तुस्थिति अशी आहे. दुसऱ्या महायुद्धांतून जग बाहेर पडलें आहे, तरीहि जगतास शांततेचा मार्ग सापडलेला नाही. माणासाचें मन जाणण्याचा प्रामाणिक प्रयत्न व्हावयास पाहिजे. गेल्या महायुद्धांत भारताला नाइलाजाने भाग घ्यावा लागला. जुलमाचा रामरामच होता तो; पण करावा लागला ना ? परतंत्र राष्ट्राला कसलें आलें आहे मत !

अशा वेळींहि परतंत्र भारताने आपली इच्छा प्रदर्शित केली अन् त्याचा परिणाम म्हणजे महात्माजी आदि पुढाऱ्यांना चार गजांच्या पाठीमागें जाऊन बसावें लागलें. सरकारनें सैन्यभरतीची चळवळ जोरांत पुरस्कारिली. अनेक तरुण सैन्यांत दाखल होऊं लागले. फौजेंत सामील होणें म्हणजे देशद्रोह करण्यासारखें आहे असें राष्ट्रवादी लोक म्हणत असत. उलट, सैन्यांत जाऊन शिक्षण संपादन करण्यास ही उत्तम संधि आहे, तिचा भारतीय तरुणांनी अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे. मिळालेल्या विद्येचा उपयोग केव्हाहि राष्ट्रविमोचनार्थ करिता येईल असें कांहींचें मत होतें. अन् शेवटीं झालें तसेंच. १९४६ सालीं जेव्हा नाविकांचें बंड झालें तेव्हा मात्र ब्रिटिशांचें धाबें दणाणलें. ज्या सैनिकांवर संपूर्ण भिस्त तेच उलटल्यावर प्रश्नच मिटला. ब्रिटिश मुत्सद्यांनी हळूहळू गाशा गुंडाळण्याचें ठरविलें.

ब्रिटिशांच्या धूर्ततेबद्दल कोणीहि त्यांना शाबासकीच देईल. मी वरील प्रसंग एवढ्याकरिताच सांगितला; कारण ह्या सैनिक भरतीबरोबर अस्मादिकांनीहि एक प्रयोग केला होता. लहानपणापासून विमानांत बसावयास

मिळावें अशी माझी मनीषा होती; पण विमानांत बसणें ही साधी का गोष्ट होती ? पण मनाने ठरविलें होतें व तशी वेळहि आली. मग डरण्याची जरूर काय? सैनिकभरतीची घोषणा होतांच, अस्मादिकांनी विमानदलांत नांव दाखल केलें. विमानांत बसायला मिळेल हाच एक उद्देश माझ्या मनापुढे होता. हो ! शिवाय पायलट झालं की पगारहि ५००-६०० रुपये मिळणार; अन् शिवाय निरनिराळे देश, लोक पाहावयास मिळणार. ' केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेंत संचार ' हा श्लोकहि त्या वेळीं मी मनाशीं ४–५ वेळां जपल्याचें मला स्मरतें. पायलट झालों की आपण बडे ऑफीसर होणार ! अहो हवेंतून उड्डाण करणं म्हणजे काय चेष्टा आहे !

" फिरावयास मिळेल, पगार भरपूर मिळेल, पण रणसंग्रामांत प्राणाशीं गांठ आहे महाराज " माझा एक हितचिंतक म्हणाला.

' अरे मरणाला भीत असतों, तर या भानगडींतच पडलों नसतों. अन् शिवाय घरीं बसलों तर काय अमर थोडाच राहणार आहे ' मी उद्गारलों.

' नाही, तूं अमर नाही हें मी जाणतों रे ! पण उगाच सुखाचा जीव धोक्यांत घाला कां ' हितचिंतक म्हणाला.

' तुझ्या नाही यायचं लक्षांत–अरे जगलों वाचलों तर माझ्या ह्या शिक्षणाचा उपयोग स्वतंत्र भारताच्या निर्मितीकरिता नाही का होणार ? ' मी म्हणालों.

तेव्हा कुठे त्याच्या डोक्यांत प्रकाश पडला. नुकताच नवयौवनांत प्रवेश केला होता ना ! रक्त नुसतें सळसळत होतें. कुणासहि न कळवतां व फारसा गाजावाजा न करितां आम्ही वैमानिक दलांत नांव तर दाखल केलें. १-२ महिने हुडेलहप्पीचें शिक्षण झालें. नंतर अधूनमधून आम्ही विमान-तळास भेट देऊं लागलों. विमान म्हणजे केवढं अजस्र धूड; पण हवेंत कसं उडतं याची शास्त्रीय माहिती हळूहळू मिळूं लागली. मनाला असें वाटायचें की, केव्हा एकदा विमानांत बसावयास मिळेल ! लग्नाला नवरा उभा राहिला व एकदा मंगलाष्टकें सुरू झालीं की वाटतें केव्हा एकदा अंतरपाट दूर होईल ! अखेर २५ तारखेस आम्हाला उड्डाणाचा श्रीगणेशा देण्यांत येणार हें जाहीर झालें.

बऱ्याच दिवसांची सुप्त मनीषा पूर्णतेस जाणार म्हणून मला आनंद झाला. २४ तारखेस अस्मादिक पृथ्वीपासून २ फूट वर चालत होते असें म्हटलें तरी चालेल. सारखा ध्यास लागला होता. सकाळ होते केव्हा व मी विमानतळावर जातों केव्हा? त्या रात्रीं स्वप्नांत सुद्धा विमानच आलें. मी विमानारूढ होत आहे. अनेक नातलग मंडळी विमान-तळावर जमली आहेत. माझें अभिनंदन करीत आहेत—एवढ्यांत भुर्रर्र आवाज करून आमचें विमान आकाशांत भ्रमण करूं लागलें. मला फारच आनंद झाला होता. विमान निघालें तेव्हा विमानतळावर शेजारची कुमुद पण आली होती. रुमाल हालवून माझ्याकडे पाहून ती हसली. कांही विशिष्ट लहर माझ्या अंगांगांतून गेली—इतक्यांत विमानाचें यंत्र बंद पडलें व आता खाली कोसळणार—म्हणजे मरणार की काय—मी घाबरलों व एकदम ओरडलों—अन् मला जाग आला. मरणाला न भिणारा मी स्वप्नांतसुद्धा मरणाला भ्यालों होतों तर!—'मनीं वसें तें स्वप्नीं दिसें' म्हणूनच माझ्या स्वप्नांत विमान आलें; दुसरें काय?

दुसऱ्या दिवशीं अस्मादिक सर्व तयारीनिशी विमानतळावर निघाले. विमान चालवण्यास आम्ही लायक आहोंत की नाही याची परीक्षाच होती त्या दिवशीं. आम्ही मजबूत प्रकृतीचे, तेव्हा पास होणारच. सकाळीं निघतांना मी माझेबरोबर एक हापूसचा आंबा घेतला.

तुम्ही म्हणाल हा आंबा कशाला बुवा? तीच तर गंमत आहे. विमानांत बसून वर गेल्यावर मी तो आंबा खाण्याकरिता घेतला होता. वर गेल्यावर आंबा खाण्याची मजा कांही औरच. अर्थात् वर गेल्यावर आंबा कांही कडू लागणार होता अशांतली गोष्ट नाही. आपण आगगाडींतून प्रवास करितांना नाहीं का फळें, चिवडा खात. निदान् मला तरी प्रवासांत गप्पा मारीत मारीत कांही तरी खात राहण्याचा छंद आहे. हसण्याचें कांहीच कारण नाही. ज्ञानकोशकार केतकर हें रस्त्याने चालले असतांना चण्याचे बकाणे भरीत असत. त्यांनी लोकांची कधीच पर्वा केली नाही. अर्थात् उद्योगप्रियतेमुळे त्यांना खाण्यासहि वेळ नसेल असें म्हणतां येईल. पण ती गोष्ट निराळी. मी तरी गंमती-खातर तो आंबा माझे बरोबर घेतला.

Tiger mouth ह्या दोनच माणसें बसूं शकतील अशा विमानांतून आम्ही वर आकाशांत जाणार होतों. मुख्य पायलट बॅनर्जी होता. तो पुढे बसला व अस्मादिक मागे बसले. विमानाने स्टार्ट घेण्याकरिता १–२ चकरा मारल्या. पंख्याचा वेग हळूहळू वाढूं लागला व निमिषार्धांत आम्ही धरित्रीचा आधार सोडला. विमान उंच उंच जाऊं लागलें. स्पीडोमीटर सारखा पुढे सरकूं लागला. 'गेट वे ऑफ इंडिया', 'ताजमहाल हॉटेल' ह्या भव्य इमारती पण लहान मुलांच्या खेळांतील छोटचा इमारतीप्रमाणे दिसूं लागल्या. ह्या आनंदांत मी मशगुल होतों तों सहज माझा हात माझ्या पॅंटच्या खिशाकडे गेला. हापूसचा आंबा वाटच पाहत होता. चटकन् मी बाहेर काढला व त्याचा आस्वाद घेण्यास सुरवात केली. अहाहा! काय वर्णावी ती 'टेस्ट'!

विमान स्वर्गाच्याच मार्गाने चाललें होतें. त्यामुळे आम्हास स्वर्ग दोन बोटें उरला आहे असें वाटूं लागलें. पुष्कळच उंचावर गेल्यावर बॅनर्जीने उड्डाणाचे निरनिराळे प्रकार करण्यास सुरवात केली. विमान उंचावर जाई व एकदम गरुडाच्या झेपेसारखें खाली येई. पुन्हा वर जाई. असें दोनचार वेळां झालें. माझ्या पोटांतला आंब्याचा रस चांगलाच घुसळून निघाला. मी घाबरलों. डोळचापुढे काजवे चमकूं लागले. चक्कर येऊं लागली अन् ओकारी होईल की काय असें वाटूं लागलें. काय करावें कांही सुचेना. कोठून आंबा खाल्ला असें मला झालें.

मुख्य पायलटचें माझ्या हालचालीवर लक्ष असावें. मी घाबरलों की काय हें त्याला समोर लावलेल्या आरशांत दिसत असे. माझा चेहरा लपविण्याचा मी पुष्कळच प्रयत्न केला, पण व्यर्थ! माझी घाबरगुंडी उडालेली पाहून एकदा तो हसलाहि. त्याचें हास्य जणूं काय मला सांगत होतें की माझें बिंग त्याला समजलें आहे. मी मनांत देवाचा धावा करूं लागलों, व देव खरोखर माझ्या मदतीस धावून आला.

बॅनर्जीने झेप घेण्याचें थांबविलें व एकाच पातळीवर विमान चालूं लागलें. मग माझ्या जीवांत जीव आला. पंख पसरून संथ उड्डाण करणाऱ्या पक्ष्याप्रमाणे आमचा प्रवास चालला होता. मी आजूबाजूस नजर टाकली. खाली दिसणारा

नागमोडी रस्ता पाहून खरोखर नागीणच धावत आहे असें वाटे. मोठाल्या नद्या लहान ओहळाप्रमाणे भासत. हिरवींगार शेतें पाहिलीं की, चौकोनी गालिचाच अंथरला आहे असें वाटे. मोठमोठाले डोंगर समाधिस्थ स्थितप्रज्ञा-प्रमाणे वाटत. बाजूला पाहिलें की, वाऱ्याचा प्रचंड झोत कानांवर येई; पण तोंडावर कातडी मुखवटा असल्यामुळे कांही वाटत नसे. शिवाय पक्षांना आपण कसें दिसत असूं याचें वर्णन 'Birds eye-view' ह्या कवितेंत मी वाचलें होतें. आता प्रत्यक्षच तें दृश्य पाहण्याचा प्रसंग आल्यानंतर कोण टाळणार !

विमानाचा वेग हळूहळू कमी होऊं लागला व ज्या ठिकाणाहून आम्ही उड्डाण केलें त्याच्याजवळ आमचें विमान येऊन पोहोचलें. ओकारी होऊन चक्कर येतो की काय यामुळे मी घाबरलों होतों; पण तसें कांही झालें नाही हें बरेंच झालें. हो, नाहीतर परीक्षेंत अपयश पदरीं पडलें असतें ना ! मी मनाशीं ठरविलें होतें, 'धिटाई खाई मिठाई' धीराने वागावयाचें. पायलटचें लक्ष माझ्यावर होतेंच. आपण पास होणार ह्या आनंदांत मी होतों. शिवाय जीवनांतील एका सुप्त इच्छेची पूर्तीहि झाली होती. त्यामुळे आनंद द्विगुणित झाला होता.

हे विचार माझ्या मनांत चालले होते तोंच रडर गार्ड ओढला गेला. विमानतळावरून सूचना आली व विमानाने घारीप्रमाणे एक झेप घेऊन आपले पाय जमिनीवर टेकविले. आता माझी भीति पार नाहीशी झाली होती. उतरल्यावर मला बॅनर्जीने विचारलें, "काय, कसें कायझालें उड्डाण ? कांही विशेष ?' मी उत्तरलों, 'फारच छान ! मला खूपच मजा वाटली.' पण खरी गोष्ट माझी मलाच माहीत.

पुढे मी अनेक वेळा विमानांत बसलों; पण विमानांतील पहिल्या सफरीचा आनंद केव्हाहि औरच ! पहिलें प्रेम, पहिला नंबर, पहिलें बक्षीस त्याप्रमाणेच पहिलें आकाशांतील उड्डाण, या सर्वांचाच पहिला अनुभव अवर्णनीयच !

●

# प्रौढशिक्षण

प्रा. उत्साहकुमार भेलांडे,
एम्. ए., एम्. एड्., औरंगाबाद.

भारताने परसत्तेशीं झुंज दिली, गुलामगिरीचे पाश तोडून टाकले. राजकीय गुलामगिरीचे परिणाम भयंकर तर खरेच; पण त्याहीपेक्षा भीतिदायक परिणाम अज्ञानाचे असतात. अज्ञानाच्या शृंखला तोडण्याचें महान् कार्य यापुढे भारताला करावयाचें आहे. थोडयाच वर्षांत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सर्व देशांत सुरू करण्याची तरतूद भारताच्या घटनेंत केलेली आहे; पण घटनेचें मार्गदर्शक तत्त्व प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याचें महान् कार्य अजून व्हावयाचें आहे. राजकीय स्वातंत्र्य म्हणजे सर्वस्व नव्हे; तें एक साधन आहे. भारताची पुन्हा सुवर्णभूमि करावयाची असेल, 'सुजलाम् सुफलाम्' हीं विशेषणें सार्थ करावयाचीं असतील तर मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. ज्या देशांतील ८५ टक्के जनता अशिक्षित आहे, तो देश 'सुजलाम्–सुफलाम्' कसा होणार? या अफाट अशिक्षित जनसमुदायाला 'अंधारांतून प्रकाशाकडे' नेण्याचे प्रयत्न जोरांत केले तरच भारताची भूमि संपन्न होईल.

अजून सक्तीचें प्राथमिक शिक्षण सर्व देशांत सुरू झालेलें नाही. कांही कांही भागांत आणि समाज–विकास योजनांच्या कक्षेंतील खेडयांत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचे प्रयत्न होत आहेत. गांधीजींची मूलोद्योग किंवा जीवनशिक्षणपद्धति अजून देशव्यापी झाली नाही. ही पद्धति कृतीवर आधारलेली असल्यामुळे आणि ग्रामीण मूलोद्योगाशीं जास्त संलग्न असल्यामुळे हीच पद्धत देशभर सुरू करण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे. ज्या मार्गावर पाऊल ठेवलेलें आहे तो मार्ग लांबचा आहे. सक्तीचें प्राथमिक शिक्षण, मग तें कोणत्याहि पद्धतीचें असो, देशभर सुरू झालें असें क्षणभर समजलों तरी अज्ञानांधःकाराचा समूळ नाश होईल असें म्हणतां येणार नाही. ८ ते १४ वर्षें ही वयोमर्यादा सक्तीच्या शिक्षणांत गृहीत धरलेली आहे. शिरगणतीप्रमाणे साधारण १५ टक्के लोकसंख्या या वयांत अंतर्भूत झालेली आढळून येते. म्हणजे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाने फक्त १५ टक्के लोकसंख्येचाच प्रश्न सुटेल. १४ वर्षांनंतरच्या असंख्य निरक्षर आणि

अशिक्षित देशबांधवांच्या शिक्षणाचा जो प्रश्न त्यालाच प्रौढशिक्षण असें म्हणतात.

देश पारतंत्र्यांत असतांना लोकांचें अज्ञान हेंच सत्ताधाऱ्यांचें भांडवल होतें. म्हणून प्रौढशिक्षणाच्या प्रश्नाकडे बुद्धिपुरस्कर कानाडोळा करण्यांत आला. अनेक दिवसांचा हा मुरलेला रोग चुटकीसरशी नाहीसा करणें शक्य नाही. रशियन राज्यक्रांतीनंतर रशियाने १५ वर्षांत लोकांचें अज्ञान दूर केलें. ज्ञानाचा दीप घरोघरीं पोचविला. चीनमध्ये मांचू राजवटीनंतर प्रौढ-शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यांत आलें. डॉ. सन्यत्सेन आणि राष्ट्रीय पक्ष (Nationalist party) यांनी प्रौढशिक्षणाच्या पवित्र कार्याला हात-भार लावला. डॉ. जेम्सयेनू याने तर आपलें जीवनच या कार्याला वाहून घेतलें आणि प्रौढशिक्षणाच्या सर्व अंगोपांगांचा विचार करून एक अनुकरणीय पद्धति देशांत रूढ केली. भारतांतहि 'बॉम्बे सोशल सर्व्हिस लीग', 'बॉम्बे प्रेसिडेन्सी अॅडल्ट एज्युकेशन असोशिएशन' यांसारख्या संस्था प्रौढशिक्षणाचें कार्य करीत आहेत. प्रत्येक प्रांतांत प्रौढशिक्षणसमित्या स्थापन झालेल्या आहेत. समाजविकास–योजनेंतहि प्रौढशिक्षणाचे वर्ग सुरू केलेले आहेत. इतकें असूनहि हें कार्य इतकें अपुरें आहे की, या वेगाने सर्व देश सुशिक्षित व साक्षर होण्यास १०० ते १५० वर्षें लागतील.

हें अवाढव्य कार्य पार पाडावयाचें असेल, तर अज्ञानाविरुद्ध देशव्यापी युद्धआघाडी उभारली पाहिजे. सध्या जे वर्ग चालतात त्यांत शिकविणारे आणि शिकणारे यांच्यांत तितकी तन्मयता दिसून येत नाही, असें मत कांही जण मांडतात. शिक्षणखात्याचे संचालक (डायरेक्टर) गांवीं आल्यानंतर वर्ग चालला आहे हें दाखविण्यासाठी वर्ग भरवला जातो; आणि त्याची अनौपचारिक समाप्तीहि संचालकाच्या निर्गमनाबरोबरच होते. अशा अनास्थेने हें सर्व्यव्यापी शिक्षणाचें कार्य कदापीहि होणार नाही. मागे "Each one, Teach one" या तत्त्वाचा पुरस्कार करून पाहिला. मध्यप्रदेश सरकारने उन्हाळ्याच्या सुट्टींत विद्यार्थ्यांना आणि सुशिक्षित वर्गांना साक्षरतेचा कार्यक्रम दिला. हा उपक्रम स्तुत्य आहे. साक्षरतेचे धडे गिरवणारे लोक कागदोपत्रीं साक्षर झालेले दिसतात;

पण पहिल्या वर्षीं साक्षर झालेले लोक दुसऱ्या वर्षीहि तेंच प्रशस्तीपत्र मिळवितात. तेव्हा यापेक्षा अधिक संघटित कार्याची व प्रयत्नांची फार आवश्यकता आहे. हें कार्य पुढच्या पंचवार्षिक योजनेंत अधिक तीव्रतेने हातीं घेतलें जाईल अशी आशा वाटते.

प्रौढशिक्षणाचें ध्येय केवळ साक्षरता नसून सुशिक्षित नागरिक बनविणें हें आहे. हें ध्येय साध्य होण्यास साक्षरता आवश्यक आहे. पळावयास शिकण्यापूर्वी अगोदर चालावयास शिकावें लागतें. या दृष्टीने प्रौढशिक्षणांत साक्षरतेला अग्रस्थान प्राप्त होतें. साधारणतः १३ ते ५० वर्षे वयाच्या प्रौढांना प्रौढ शिक्षण द्यावें याबद्दल एकवाक्यता दिसून येते. या वयांतील प्रौढ सुशिक्षित होईपर्यंत योजना सुरू करतांना ५० वर्षें वय असलेलीं माणसें योजना यशस्वी होण्याचे वेळीं बहुतेक मृत्यूला कवटाळणार म्हणून त्यांच्या शिक्षणाचा विचार करण्याचें प्रयोजन नाही. ज्या प्रौढांना शिकवावयाचें त्यांचें मानसशास्त्र बालमानसशास्त्राहून वेगळें असतें. प्रौढांच्या मानसशास्त्राचें ज्ञान शिक्षकांना असणें आवश्यक आहे. हें काम ट्रेन्ड प्रौढ शिक्षकच करूं शकतील. दिवसभर काम करून प्रौढ विद्यार्थी थकलेले असतात. त्यांचें चित्त वेधून घेणें हें सोपें नसतें. तेव्हा शिक्षणांत चित्रपट, गाणीं, नाटय, कीर्तनें, भजनें यांच्या द्वारें मनोरंजकता निर्माण करणें अत्यावश्यक आहे.

प्रौढ शिक्षणाचें व्यापक ध्येय लक्षांत घेऊन प्रौढांच्या शिक्षणक्रमांत विविध गोष्टींची आवश्यकता आहे. 'शिकून काय करायचें ?' हा प्रश्न प्रौढ नेहमीच विचारतात. म्हणून जीवन आणि शिक्षण यांचा निकट संबंध पदोपदी आणण्याची जबाबदारी शिक्षकावर पडते. ज्या विभागांत प्रौढ शिक्षणाचा वर्ग असेल त्या विभागांतील धंद्याचें शिक्षण त्या वर्गांत दिलें पाहिजे. शेती हा धंदा असल्यास उत्पादन वाढविण्याच्या नवीन पद्धति व नवीन अवजारें यांची माहिती प्रौढांना दिली पाहिजे. त्याची प्रात्यक्षिकें करण्यासाठी प्रौढ शिक्षणवर्गाच्या मालकीची शेतीहि असली पाहिजे. जनावरांचें संगोपन कसें करावें हेंहि त्यांना शिकवलें पाहिजे.

प्रौढाला उत्तम नागरिक बनविणें हें ध्येय एवढ्याने पूर्ण होणार नाही. आरोग्याची काळजी कशी घ्यावी याचें शिक्षण त्याला मिळणें आवश्यक आहे. रोग हा देवाचा कोप आहे ही भोळी समजूत असलेला प्रौढ, उत्तम नागरिक कसा बनणार? संघशक्तीने कार्य करण्याची सवय उत्तम नागरिकाला असलीच पाहिजे. आपल्या खेड्यांत आरोग्य सहकारी संस्था, व्यापारी सहकारी संस्था, कशा चालवाव्यात, त्यांचे हिशेब कसे ठेवावेत, त्यांत फायदेतोटे कोणते हेंहि प्रौढांना कळलें पाहिजे. त्याचीं प्रात्यक्षिकें प्रौढ वर्गांत झालीं पाहिजेत. शिवाय देशाचा कारभार आणि विशेषतः खेड्याचा कारभार कसा चालतो, मत कोणाला द्यावें, आपल्या गैरसोयी, दुःख, जाच, लोकशाहीपद्धतीने कशीं नाहीशीं करतां येतात, या सर्व गोष्टींचें ज्ञान प्रौढांच्या वर्गांत दिलें जावें. या पद्धतीने शिक्षण दिल्या गेल्यास यश दूर नाही. पण कळकळ, कष्ट आणि कल्पक कार्यक्रम यांचा मधुर मिलाफ देशभर झाला पाहिजे.

●

# साहित्याचें मूल्यमापन

## ( बी. रघुनाथ )

प्रा. व. व्यं. धारवाडकर
एम्. ए., डिप्.–इन्.–एड्.
बी. एड्. कॉलेज (औरंगाबाद)

साहित्याचें मूल्यमापन करतांना मराठवाड्याच्या मानकऱ्यांत बी. रघुनाथांना अग्रस्थान द्यावें लागतें. कारण आधुनिक मराठवाड्यांतील कथावाङ्मयाचे ते जनक होत. त्यांनीच या मराठवाड्याच्या माळरानावर शारदेच्या वीणेचा पहिला झंकार घुमविला. आधुनिक वाङ्मयाची ताटी त्यांनीच प्रथमतः उघडली आणि कित्येक शतकांच्या काळोखीनंतर प्रकाशाचें पहिलें पाऊल त्यांनीच आमच्या या मायभूमीवर उमटविलें. पारतंत्र्याच्या अंधाऱ्या रात्रींत त्यांनीच सुरवातीला चांदण्याची बरसात केली. ज्या भूमींत संतश्रेष्ठ एकनाथांनी सामाजिक दंभ आणि दुःख यांविरुद्ध पहिला ललकार पुकारला, त्याच भूमींत बी. रघुनाथांनी मध्ययुगीन सरंजामशाहींतल्या जात्यंध राजवटीमुळे दडपलेल्या नि पिळवटलेल्या मुक्या भावनांना बोलके केले. त्यांच्यापूर्वी मराठवाड्यांत साहित्यिक नव्हते असें नाही. परंतु

बी. रघुनाथांनी आपल्या कुशल कुंचल्याने थोड्याच पण स्पष्ट रेषाचित्रांनी मराठवाडीय समाजाचें नि परिस्थितीचें प्रभावी, प्रामाणिक व जिवंत असें आलेखन केलें आहे.

अशा या श्रेष्ठ साहित्यिकाला आदरांजली वाहत असतांना गोविंदाग्रजांच्या त्या प्रसिद्ध ओळी आठवतात व थोडा फरक करून असें म्हणावेसें वाटतें, 'बी रघुनाथ कसले गेले — बी रघुनाथ गातचि बसले'. आज जरी बी. रघुनाथ अशरीर झाले असले तरी ते आपल्यांतच अक्षर वाङ्मयाने वावरत आहेत. त्यांच्या पुण्यतिथीचा हा आजचा दिवस. हा दिवस शोकाचा नाही. आजचा हा दिवस बी. रघुनाथ आमच्यांतून नाहीसे झाले म्हणून विगलित होण्याचा नाही. किंवा ते जर हयात असते तर त्यांच्या हातून निर्माण झालेल्या कलाकृतीहून अधिक सरस आणि सकस कृति लिहिल्या गेल्या असत्या असें गोड स्वप्नरंजन किंवा स्वैरचिंतन करण्याचाहि दिवस नाही. संकेत असा आहे की, प्रतिभावंताचें किंवा विचारवंताचें कार्य जेथे संपतें तेथूनच पुढे त्यांच्या कार्याला एक तर विस्मयकारक गति मिळते किंवा तिथेच तें थबकतें किंवा नामशेष होतें. बी. रघुनाथांनी जें वाङ्मयीन कार्य आरंभलें तें आवेगाने पुढे जात आहे. तें थांबणारें नव्हे. त्यांनी मांडलेल्या वाङ्मयीन संसारांत आता कुठे फगवा-रंग भरत चालला आहे. त्यांनी घातलेल्या मांडवाला वाङ्मयीन गुच्छ दिसत आहेत. त्यांनी दाखविलेल्या वाटचालींत ध्येयाचे वेध दिसत आहेत. आत्मविश्वासाचे हुंकार आहेत. आशेची अदम्यता आहे. प्रगतीची ओढ आहे. थोरांची थोरवी यांतच असते की दिवंगतांचें कार्य पुढे चालू ठेवण्याची, तें टिकवण्याची किंवा त्याला नवीन वळण लावण्याची जबाबदारी पुढील पिढी आपल्या अंगावर घेते. हें पाहून असें म्हणतां येईल की आजचा दिवस हा बी. रघुनाथांचा मरणदिवस नाही, तर त्यांचा जन्मदिवसच आहे.

बी. रघुनाथ हे कवि होते, कथाकार होते आणि लघुनिबंधकारहि होते, पण सर्वांआधी ते कलावन्त होते. स्वयंतेजाने जीवनाला उजळीत आणि फुलवीत नेणारें अस्सल कलावंताचें हृदय त्यांच्यापाशी होतें. आपल्या प्रियेभोवती रुंजी घालीत डौलांत दाणे टिपणाऱ्या हिमशुभ्र कबुतराप्रमाणे

बी. रघुनाथ आपल्या कलेला प्रसन्न करण्याकरिता जगांतील सौंदर्याचे कण वेचणारे कलावन्त होते. त्यांचें हें सर्व पूजन व आराधन जीवन अधिक सुंदर, सुखी व सात्त्विक व्हावें यासाठी होतें. ते संपूर्ण अर्थानें जीवनवादी व व कलावादी होते; म्हणजे त्या दोहोंतील अभेद्यता व परस्परावलंबित्व त्यांना पूर्णपणें माहित होतें. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यांत कला विरुद्ध जीवन वादाचा धुरळा कधीहि उडविला नाही. त्यांच्या सौंदर्यदृष्टींत दलितांचीं व पतितांचीं दुःखें तरंगतांना दिसतात. असीम करुणेच्या कडांतून ओघळणाऱ्या अश्रूंनें गहिवरलेलें जीवनपुष्पच ते वाचकांच्या ओंजळींत टाकतात. त्यांना आपल्या या भूमींतील पारतंत्र्य, अन्याय, विषमता, दारिद्र्य, दैन्य नि दुःख नष्ट करून मानवतेचा धर्म त्यांना अभिप्रेत होता. बी. रघुनाथांच्या सभोवार अत्यंत असुंदर व असुखी जीवन पसरलेलें होतें. तेंच जीवन त्यांनी आत्मौपम्य वृत्तीनें रंगविलेलें आहे. महाराष्ट्रांतील इतर कलावादी कादंबरीकारांप्रमाणे त्यांनाहि यमुनेच्या काळ्याभोर पाण्यांत पडलेली चांदण्या रात्रींतील आरसपाणी ताजमहालाचीं सुंदर प्रतिबिंबें रेखाटतां आलीं असतीं. परंतु असली ही परदेशी, अनोळखी, खोटी व बेगडी व्यक्ति व परिस्थितिविषयक चित्रणें करण्याच्या मोहापासून ते अलिप्त होते. त्यांचें सर्व साहित्य आत्मप्रत्ययानें व आत्मानुभूतीनें मुसमुसलेलें होतें. जें होतें तें स्वतःचें होतें. त्यांनी जें लिहिलें तें कदाचित् व्यापक नसेल, विशाल नसेल, भव्य नसेल, पण जें आहे तें त्यांच्या पिंडीचें आहे. तसें पाहिलें तर त्यांचें पाश्चात्य वाङ्मयांतील जुन्या व नव्या थोर ललित लेखकांच्या कृतीचें परिशीलन नेहमीच चालू असे. आपल्याकडीलहि कादंबरीचा अभ्यास ते करीत असत. परंतु कोण्याहि लेखकाचा आपल्यावर परिणाम होऊं न देण्याइतकें त्यांचें व्यक्तिमत्व स्वतंत्र व प्रभावी होतें. प्रा. फडके यांचा 'पांढरा केस' व बी. रघुनाथ यांचा 'दाटका कोट' या दोन लघु-निबंधांमध्ये तुलना केली असतां हेंच आढळून येतें की फडक्यांची सावली-सुद्धा त्यांच्या 'दाटक्या कोटाला' शिवली नाही. इतका तो दाटका कोट पंख कापलेल्या पक्ष्याच्या तडफडीनें, कारुण्यानें, उपरोधानें नि महानुभवानें वेगळा आहे. दोघांच्या जीवनविषयक दृष्टिकोनांतून मूलभूत भेद आहे. एक जीवनाकडे सौंदर्यदृष्टीनें पाहतो; तर दुसरा करुणेच्या दृष्टीनें पाहतो. थोडक्यांत असें सांगतां येईल की बी. रघुनाथ यांनी मराठवाड्याच्या

माळरानावरून प्रतिकूल परिस्थितींत जी सहल केली तींत त्यांनी दुसऱ्याची शिदोरी घेतली नव्हती, तर त्यांची स्वतःची होती.

आपण ज्याला प्रादेशिकता म्हणतों तो गुण त्यांच्या वाङ्मयांत प्रकर्षानें दिसून येतो. एका अर्थानें हा त्यांचा गुण म्हणतां येईल; तर दुसऱ्या अर्थानें हा शब्द त्यांच्या वाङ्मयाच्या मर्यादा सुचविणारा आहे. त्यांनीं आपल्या वाङ्मयांत जें चित्रित केलें तें परभणी आणि हैदराबादच्या परिसरांतलेंच. सुप्रसिद्ध टॉमस हार्डी या इंग्रजी कादंबरीकारानें आपल्या सर्व कादंबऱ्यांचीं कथानकें वेसेक्स परगण्याच्या परिसरांत विणलीं आहेत. त्याचप्रमाणें बी. रघुनाथांना प्रतीत झालेलें हें जीवन, त्यांतील सर्व थरांतील पात्रें, विविध प्रसंग, भल्याबुऱ्या घटना, ती विचित्रपणें असणारी शांत आणि क्षोभक परिस्थिति हें सर्व परभणीच्या परिसरांतलेंच होय. नांदेड व परभणी मराठवाड्याचें अंतरंग–मुंबईहून येणाऱ्या खाऱ्या वाऱ्यापासून दूर–त्यामुळे अस्सल मराठवाड्याच्या श्रद्धा, निष्ठा, सुखदुःखें, तृप्ततेंतून उत्पन्न झालेले ते कलंदरी विलास, त्या मध्ययुगीन समजुती नी चालीरीति यांचें यथातथ्य नि वास्तव चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांतून व लघुकथांतून पाहावयास सापडतें. मराठवाडा व मोगलाई यांची संमिश्र संस्कृति व तद्भव परिणाम आमच्या जीवनांत किती खोलपर्यंत गेले होते, ह्याचें जें दिग्दर्शन त्यांनी केलें आहे तें अजोड आहे. त्यांनी निर्माण केलेल्या कोणत्याहि पात्रांकडे पाहा. ती बेगम सकिना, तो मट्टूलाल हलवाई, तो नागू न्हावी, रामजी तांगेवाला, नागझिरीचा पाटील, बाबू दडके हीं सर्व आमच्या भूमीचीं संतानें वाटतात. त्यांचे चेहरेमोहरे, त्यांचे हावभाव, त्यांचें वागणें हें सर्व आमचेंच आहेत, इतकें ते यथार्थ व जिवंत वाटतात. निजामशाहींतील एकतंत्री, लहरी नि जुलमी पोलादी टाचांखाली चिरडून, पिचून गेलेल्या जनतेचीं दुःखें-उसासे, हुंदके-अश्रु, निराशा नि विलासी वृत्ति, जीवनाविषयीची बेफिकरी आणि आसक्ति इत्यादि परस्पर विरुद्ध भावनांचीं चित्रें त्यांनी आपल्या समोर उभी केलीं आहेत. मराठवाड्याचीं सारीं वैशिष्ट्यें आपल्यासमोर टळटळीत उभीं करतांना त्यांनी नव्या युगाच्या चाहुलींचाहि कानोसा घेतला. मराठवाड्याच्या नव्या जाणिवा नि अनुभूतीहि त्यांनी आपल्या कथा व कादंबऱ्यांतून दाखविलेल्या आहेत. मराठवाड्याच्या

मुक्ततेकरिता चालविलेल्या संगराचें हृदयस्पर्शी चित्र पाहा व ती पोलीस अॅक्शनवर रचलेली फडक्यांची कादंबरी वाचा– एकींत हिरवे गुलाब तर दुसरींत काश्मिरी गुलाब आहेत. असें सांगतां येईल की, बी. रघुनाथांचें वाङ्मय प्रादेशिक आहे. त्यांनी आम्हाला प्रथमतः आमच्या मातीचें–आमच्या आईचें दर्शन घडविलें. त्यांनी आमच्या मातीचे सर्व गुणविशेष प्रत्यक्षांत आणून दाखविले. या काळ्या मातींतला कस, दमदारपणा, चिवटपणा आणि प्रसंगविशेषीं दिसणारा भुसभुशीतपणा त्यांनी आम्हाला दाखवून दिला. त्यांनीच आमच्या काळ्या मातीवर व पिवळ्या पिकांवर तरंगणाऱ्या विशाल आकाशाचें अंतरंग दाखवून दिलें. जें आमच्या हातून हरवलें होतें, तें त्यांनी दिलें. ज्याची आम्हाला आठवण होती, त्याची त्यांनीं आम्हाला जाणीव करून दिली. उच्च मध्यमवर्गीय–सुखासीन समाजाचें रंग लेखन करीत असतांना कलासक्त फडक्यांच्या वृत्ति तल्लीन होतात. तद्वतच दलित व पतित अशा समाजाचीं सुख–दुःखें रंगवितांना बी. रघुनाथ तादात्म्य होतात. ते तुम्हाला प्रसंग व वेळ पाहून वेश्येकडे घेऊन जातील. तिच्या अंगप्रत्यंगांतून निथळणाऱ्या लावण्याचें वर्णन त्यांच्या तोंडचें ऐकतांना क्वचित् प्रसंगीं उत्तान नि मादक वाटेल. पण असें जरी असलें तरी देहविक्रय करणाऱ्या त्या पतितेच्या हृदयांत पतिव्रतेची निष्ठा व भावना दिसून येईल. त्यांनी केलेल्या पापाविषयींचा तुमचा उबग नाहीसा होईल; आणि आपली सहानुभूति त्यांच्या चरणीं अर्पण करून आपण तेथून परताल. ते तुम्हाला फकिराच्या कांबळींतील सुख–दुःखाचे धागे दाखवितील आणि सांगतील, तुम्ही याला माणूस म्हणून वागवा. आणि हाच त्यांचा जीवनसंदेश आहे. त्यांनी कधीच प्रेषिताची किंवा विभूतीची भूमिका घेतलेली नव्हती. ती त्यांच्या प्रकृतींत नव्हती. सारांश, त्यांनी दलित व पतित समाजाचीं चित्रें जवळून आणि जिव्हाळ्याने रेखाटल्यामुळे तीं ठसठशीत, भरीव व भरदार वाटतात.

आज त्यांच्या नांवावर दहाबारा पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आढळून येतात. त्यांपैकी एक कवितासंग्रह आहे. 'आलाप व विलाप' हें त्या काव्यसंग्रहाचें नांव. रविकिरणमंडळांतील एक प्रथितयश कवि श्री. यशवंत

यांची या काव्यसंग्रहाला दीड पानी प्रस्तावना लाभलेली आहे. यांत एकूण वीसबावीस कविता आहेत, पैकी आठदहा कविता प्रीतीचीं विविध स्वरूपें दाखविणाऱ्या आहेत. त्यांच्या सर्वच कवितांबद्दल असें म्हणतां यईल की, त्या फारच त्रुटिक वाटतात. भावनांच्या आवेगानें होणारा कल्लोळ किंवा भरघोसपणा किंवा त्यांतील उत्कटता कवितेंत तीव्रतेनें प्रत्ययास येत नाही. एखाददुसरी कमनीय कल्पना व पुष्कळ ठिकाणीं दिसून येणारा भाषा-विलास हें या काव्यसंग्रहाचें विशेष गुण म्हणून सांगतां येतील. क्षणैक चमकून अवकाशांत लोप पावणाऱ्या शलाकारेषे-सारखी त्यांची कविता वाटते. 'टिचकी' या कवितेंत काळ्या अंधाऱ्या रात्रीं दारावर टिचकी पडल्यानंतर प्रेयसीच्या हृदयांत उसळणारें चांदणें, मनांत उठलेलें मधुमक्षिकांचें मोहळ, डोळ्यासमोर उभे राहणाऱ्या काजव्याच्या प्रकाशांत दरवाजा उघडतांना खांद्यावरून तिचा सरकलेला पदर व दरवाजा उघडल्याबरोबर आंत आलेलें विकारांचें वादळ अंगावर घेत असतां तिचा झालेला संभ्रम व बेफाम मनःस्थिति यांचें जें मनोरम आणि भुरळ पाडणारें वर्णन केलें आहे तें अविस्मरणीय आहे. अशा कांही कविता अतिशय सुंदर आहेत. कांही कवितांतून त्यांनी सामाजिक सहानुभूतीहि व्यक्त केली आहे. पण अशा कविता फारच थोड्या आहेत. बहुसंख्य कविता भावगीतात्मक आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा दुसरा एक काव्यसंग्रह 'पुन्हा नभाच्या लाल कडा' या नांवानें प्रसिद्ध होणार असें ऐकूं येत आहे.

'अलकेचा प्रवासी' हा त्यांचा लघुनिबंधसंग्रह होय. त्यांचे सर्व निबंध धगधगीत व पेटलेल्या अनुभूतींतून आविष्कृत झाल्यामुळे बी. रघुनाथांच्या हृदयाचें स्पंदन त्यांत स्पष्टपणें ऐकूं येतें. मोठे झाल्यावरहि केवळ हातांत पैसा नाही म्हणून, लहानपणचा कोट घालून आंतील फाटलेला सदरा लपविण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असतांना, लेखकाच्या मनांतील होणारी तडफड 'दाटका कोट' या निबंधांत प्रतीत होते. प्रतिकूल परिस्थितीच्या भिंतीवर धडक घेणारें तें बी. रघुनाथांचें हृदय जेव्हा फाटतें तेव्हा त्याच्यांतून निघणाऱ्या रक्ताच्या चिरकांड्यांनी रंगलेली भिंतच आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. जगांतील विषमता जणूं कांहीच नाहीशी

होणार नाही की काय असा विदारक विचार लेखकाच्या व वाचकांच्या मनाला स्पर्शून जातो.

याप्रमाणेच 'रस्त्यावरील नळ' हा लघुनिबंध त्यांनी अंतर्मुखतेनें लिहिला आहे. पाण्याचेंहि दुर्भिक्ष झाल्यानंतर माणसाने जगायचें कशासाठीं व कां? असा ते भेदक प्रश्न विचारतात. ज्यांच्या जीवनाचा घडा पाण्यानें कधीच भरलेला नाही व भरण्याची कधीच शक्यता नाही असे मनूचे पुत्र लक्षाने मोजतां येतील. ज्यांना आयुष्यांत आत्मविकासनाकरता कधी संधी लाभलेली नाही, पुढे जाण्याकरिता उत्तेजन नाही, वाटेने दिवे नाहीत अशांनी काय धुळींतच एक दिवस नाहीसें व्हावयाचें काय? मला असं म्हणावयाचं आहे की, त्यांच्या या लघुनिबंधाच्या स्वरूपावरून ते पेटलेले पलिते आहेत हें दिसून येतें.

●

# सवयी व मानवी जीवन

प्रा. ना. न. मांडे, बी. ए., बी. एड्.
विनयनकुल, औरंगाबाद.

"Cultivation of Proper habits is the sole aim of Education" —Sir James

मोटार-ड्रायव्हर भरवेगांत गर्दीतून आपली मोटार हाकतो, गवई सुरेल तानांनी श्रोतृसमुदायास भारून टाकतो किंवा 'ली' सारखा पटाईत पोहणारा मुंबईच्या नागरिकांना कौशल्याने चकित करून सोडतो. थोडा विचार केल्यास असें आढळून येईल की, ह्या सर्व क्रिया सवयीच्या जोरावरच होऊं शकतात.

मानवांकडून ज्या अनेक क्रिया दैनंदिन व्यवहारांत घडतात, त्यांचे मुख्य दोन वर्ग पडतात. पहिली अहेतुक क्रिया. जांभई देणें, शिंक येणें, पापण्यांची हालचाल होणें ह्या अहेतुक क्रिया होत. तसेंच नाटक पाहणें, भाषण ऐकणें, पुस्तक वाचणें ह्या सहेतुक क्रिया होत. विशिष्ट हेतु मनांत धरून सहेतुक क्रिया केल्या जातात. ह्या क्रियांवर मोठ्या मेंदूचें नियंत्रण

असतें. कितीतरी सहेतुक व अहेतुक क्रिया मनुष्याकडून दररोज घडतात. सहेतुक क्रिया करतांना मात्र त्यास अधिक लक्ष द्यावें लागतें. म्हणून अनेक सहेतुक क्रिया स्वयंगतिक व्हाव्यात अशी मनुष्याची इच्छा असते. एकच क्रिया एकापेक्षा अनेक वेळा त्याच परिस्थितींत झाल्यास ती सहज व सफाईने होऊं लागते. नंतर तिकडे लक्ष देण्याची अधिक गरज भासत नाही, कारण तिची संवय होते.

बालपणीं मुलांचा मेंदू व शरीर अत्यंत लवचिक असतें; व जसें वय वाढतें तसा त्यांत ताठरपणा येतो. ह्याच सुमारास ज्ञानतंतूच्या निरनिराळ्या संघांत दळणवळणाचे प्रथमच मार्ग तयार होतात व नंतर ते संस्कार सुरक्षित राहून पुन्हा जेव्हा ती क्रिया केली जाते त्या वेळीं तिचें स्वरूप पुनरावृत्तिक क्रियेसारखें होतें. एकाच रस्त्याने अनेक गाड्या गेल्यास शेतांत चाकोरी पडते; त्याचप्रमाणे एकच एक क्रिया त्याच परिस्थितींत केली गेल्यास अधिक श्रम न पडतां सहज होऊं लागते व सवय ह्या संज्ञेस पात्र ठरते.

लहान मुलाला बऱ्याचशा सवयी सुरवातीला नकळत जडतात. उदा. बोलणें, चालणें, उठणें, बसणें इत्यादि. नंतर जरूर भासेल त्याप्रमाणे मूल त्यांत सुधारणा करतें. या सुधारणेंत त्याची हुशारी, जन्मजात देणगी व इच्छेची तीव्रता यांचाहि बराच भाग असतो. लांब बोटें असणाराला चित्रकला लवकर साध्य होते, तर तीव्र श्रवणशक्ति असणारांना स्वरज्ञान चटकन होतें. बहुधा समाधानासाठी धडपड व असमाधानाची टाळाटाळ करण्याचा कल प्रत्येक व्यक्तींत दिसून येतो. आपली प्रत्येक सहेतुक क्रिया संकल्पशक्तींच्या जोरावर होत असते व या संकल्पशक्तीचें कार्य आपणांस होणाऱ्या समाधानावर व असमाधानावर अवलंबून असतें. समाधान होत असलेल्या क्रिया करण्यास स्नायूंची हालचाल अधिक तत्परतेने होते, तर ज्या क्रियेपासून असमाधान जाणवतें ती क्रिया बंद पाडण्याची स्नायूंची प्रवृत्ति दिसते. थंडी वाजूं लागली म्हणजे आपण शेकोटी पेटवितों. बुद्धिपुरस्सर ही गोष्ट आपल्याकडून घडते. त्यापासून आपणांस समाधानहि लाभतें. इच्छाशक्तीची तीव्रता ह्या ठिकाणीं दिसून येते. म्हणजेच संकल्पशक्तीची गरज भासूं लागते. पण हीच क्रिया दररोज अखंडितपणें आपणाकडून होऊं लागली तर त्या क्रियेंत

सहजता येते. नंतर संकल्पशक्तीची गरज उरत नाही. संकल्पशक्तीचें रूपांतरच सवयींत होतें. सायकल, मोटर, हार्मोनियम ह्या गोष्टी शिकतांना प्रथम संकल्पशक्तीची गरज भासते. पुढे एकदा सवय झाली म्हणजे संकल्पशक्तीची आवश्यकता राहत नाही आणि अवधानहि द्यावें लागत नाही. तेव्हा कोणतीहि सवय म्हटली म्हणजे तीन गोष्टींची आवश्यकता भासते. संकल्पशक्तीची मदत घेऊन मनाची एकाग्रता साधणें, त्या कृतीची अनेक वेळां पुनरावृत्ति करणें आणि पुनरावृत्तींत खंड न पडूं देणें. एखाद्या गोष्टीची सवय लावून घ्यावयाची असल्यास तिचें महत्त्व पटून काम भागतें असें नाही; तर त्यासाठी पुनरावृत्तीची कास धरावी लागते. 'गाता गळा व शिंपता मळा' ही म्हण वरील म्हणण्याची यथार्थ कल्पना आणून देईल.

सवयीचें स्वरूप हें असें आहे. अशा सवयीपासून फायदेहि अनेक होतात. बोलणें, चालणें, जेवणें, निजणें इ. क्रिया सवयीमुळे यंत्रवत होऊं लागतात. त्यामुळे आपल्या इच्छाशक्तीची अधिक बचत होते; आणि महत्त्वाच्या व अवघड अशा गोष्टींवर आपण लक्ष केंद्रित करूं शकतों. असें जर न झालें तर मनुष्याच्या हातून कांहीच महत्त्वाचें कार्य होऊं शकणार नाही. यावरून सवयीमुळे मानसिक शक्तीचा निरर्थक व्यय वांचतो हें सहज कळून येईल. दुसरी गोष्ट म्हणजे सवयीमुळे कार्यक्षमता व नैपुण्य वाढतें. टाईप करणें, पोहणें इत्यादि क्रिया सवयीमुळे चांगल्या व सहज होऊं लागतात. लहानपणीं कष्ट सहन करण्याची सवय जडली म्हणजे भावी आयुष्यांत खडतर प्रसंगाशीं देखील मनुष्य धैर्यानें तोंड देऊं शकतो. संकटग्रस्तांना मदत करावयाच्या सवयीमुळे एखादा आर्तस्वर कानीं पडल्याबरोबर काळोखांत देखील मनुष्य धावून जातो. त्यामुळे नैतिक प्रयत्नांचीहि बचत होते. संकटग्रस्तांना किंवा पूरपीडितांना सहाय्य द्यावें किंवा नाही ह्या संभ्रमांत मनुष्य राहत नाही. शिवाय केवळ सवयीमुळेच आपण एकापेक्षा अधिक कामें करूं शकतों. कान व डोळे पुराणिकाकडे असूनहि स्त्रिया वाती करतांना दिसतात तें सवयीमुळेच.

पण फायद्याप्रमाणेच सवयीपासून तोटे होत नाहीत असें नाही. सवयी ह्या यांत्रिक स्वरूपाच्या व ठराविक साच्याच्या असल्यामुळे नवीन नवीन परिस्थितींत निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करून इच्छित ध्येय गाठणें कठिण जातें, म्हणून सवयी लावाव्यात किंवा लावूं नयेत ह्यासंबंधीं मानसशास्त्रज्ञांत

मतभेद आहेत. कांहींच्या मतें मनुष्य व सवयी ह्या एकरूप व एकसंध बनावयास पाहिजेत. तर ग्रॅहॅम, वॉलस, ड्युई, किलपॅट्रिक यांच्या मतें सवयी ह्या स्वतंत्र विचार करण्याच्या क्रियेस घातक ठरतात, म्हणून त्या मुळीच लावल्या जाऊं नयेत असें आहे. रुसोने तर असें म्हटलें आहे की, "तुम्हास सवय लावून घ्यावयाची असेल तर कोणतीहि सवय लावून न घेण्याची सवय निर्माण करा." सवयीच्या आहारीं जाणें म्हणजे मनुष्याने आपलें स्वत्व गमावून पशुवत् बनणें होय. शिवाय सवयीमुळे कामांत अभिरुची, नाजुक भावना इत्यादींना कांही स्थान राहत नाही. दवाखान्यांत काम करणाऱ्या लोकांना, तसेंच डॉक्टरांना रोग्यांचे हाल पाहून अधिक वाईट वाटत नाही तें यामुळेच. मात्र एकदा का वाईट सवय जडली व ती दृढ झाली तर मग तिचे दोष कळूनहि तिच्या कचाटयांतून सुटणें कठिण जातें. अशा वेळीं 'कळतें पण वळत नाही' असें म्हणण्याची पाळी येते.

सवयींचे, वरील प्रमाणे कांही तोटे असले तरी, त्यांचें मानवी जीवनांत फार मोठें महत्त्व आहे. आपल्या दैनंदिन कार्यक्रमांपैकी शेकडा ९९ गोष्टी आपण सवयीमुळे करीत असतों. निजणें, बसणें, उठणें ह्यासारख्या जीवनांतील अनेक क्रिया यंत्रवत् होत राहतात. म्हणून 'मनुष्य हा सवयींचा समूह आहे' असें प्रो. जेम्स यांनी म्हटलें आहे. मनुष्याचा स्वभाव व त्याचें व्यक्तिमत्व यांतून जर सवयींना वगळण्यांत आलें तर त्यास ओळखणें कठिण जाईल. सवयीला स्वाभाविक वृत्ति (Second nature) म्हणतात तें यामुळेच. सवयीच्या सामर्थ्यामुळेच मनुष्य इतरांना आश्चर्यचकित करणाऱ्या क्रिया करूं शकतो. यावरून मनुष्याला नराचा नारायण अथवा नराचा वानर बनविणारी यक्षिणीची कांडी म्हणजे सवय होय. 'आपणच आपले हितकर्ते व आपणच आपले शत्रू' ह्या गीतेच्या वचनाचा उलगडा सवयीमुळे होतो. म्हणून योग्य काळीं चांगल्या सवयींचें बीजारोपण व वाईट सवयींचें निर्मूलन करणें हें शिक्षणाचें महत्त्वाचें काम होय.

बालपण हा शिक्षणाच्या व सवयींच्या बीजारोपणाचा योग्य काल होय. म्हणून उत्तम प्रकारच्या सवयी लागेपर्यंत मुलाचें शिक्षण पूर्ण होऊं शकत नाही. भट्टींतून बाहेर पडलेल्या मडक्यावर नवीन ठसा उमटविणें जसें अशक्य, किंवा घडया पडलेल्या कागदावर नवीन घडी पाडणें जसें कठिण, तसें मुलाचा

मेंदू व शरीर लवचिक असेपर्यंतच चांगल्या सवयी मुलामध्ये जडविल्या व रुजविल्या पाहिजेत. सर्वसाधारणपणें आठ ते बारा वर्षांचा काल हा सवयी रुजवण्याचा उत्तम हंगाम होय. याच वयांत मुलांना स्वच्छता, नीटनेटकेपणा, सावकाश व न घाबरतां बोलणें, असत्याची चीड, सत्यासंबंधीं आवड, सभ्यपणा इ. प्रकारच्या अनेक सवयी लावावयास पाहिजेत. लो. टिळक, म. गांधीं, विनोबाजी यांसारख्या थोर व्यक्तींना लहानपणापासूनच चांगल्या वातावरणामुळे व मार्गदर्शनामुळे योग्य सवयी जडल्या व ह्या सवयींच्या जोरावरच असामान्य व्यक्ति म्हणून त्यांचा लौकिक गाजला.

प्रो. बेन ह्यांनी नैतिक सवयींसंबंधीं केलेल्या सूचना आपण अवश्य लक्षांत ठेवावयास पाहिजेत. नीटनेटक्या आरंभानेच अर्धे कार्य पदरांत पडतें ( Well begun is half done ) ह्या तत्त्वाचें परिशीलन नेहमी व्हावयास पाहिजे. शिक्षणाच्या दृष्टीने तर हा आरंभ फार महत्त्वाचा ठरतो. शिक्षकाच्या जीवनांत त्यामुळेच पहिल्या पाठाला फार महत्त्व असतें. त्या पाठाच्या परिणामावरच शिक्षकाचें मोजमाप ठरतें. निरपेक्षतेने दररोज कांहीतरी काम करण्याची सवय ठेवली म्हणजे अशक्य गोष्टीहि साध्य होतात. त्यामुळेच नैतिक वागणूक उन्नत होते.

यासाठीच मुलांना बाल्यापासून चांगल्या सवयी लावल्या पाहिजेत. कोणतीहि सवय ही पुनरावृत्तीमुळेच अंगभूत होते. म्हणून जरूर त्या सवयींची पुनरावृत्ति होणें आवश्यक आहे. यालाच थॉर्नडाइकने अभ्यासाचा नियम ( Law of Exercise ) असें म्हटलें आहे. मुलांना सवयींची उपयुक्तता पटली की ते त्याप्रमाणे वागतात. सवय लावतांना मुलामध्ये प्रभावी इच्छाशक्ति निर्माण करणें आवश्यक आहे. ह्या इच्छाशक्तीच्या जोरावरच वाईट सवयी तुटतात. बक्षिसासारखें उत्तेजन दिल्यासहि वाईट सवयी सुटूं शकतात. त्याचप्रमाणे चांगल्या सवयी दृढ होतात.

सारांश, सवयींना मानवी जीवनांत महत्त्वाचें स्थान आहे. मनुष्यानें चांगल्या सवयी अवश्य लावावयास पाहिजेत. पण त्याचबरोबर तो सवयींचा गुलामहि बनतां कामा नये. यासाठी त्याने आपल्या सवयींचे वेळोवेळीं परिशीलन करून त्यांत आवश्यक तो बदल घडवून आणला पाहिजे.

●

# माझे शेजारी

ना. ना. मुळे, बी. एस् सी.
शिक्षक, अमरावती.

आमचें पहिलें घर थोडें गांवाबाहेरच होतें. फुरसतीच्या वेळीं चार घटका बसून चारचौघांशीं सुखदु:खाच्या चार गोष्टी करूं म्हटलें तर शेजाराला कोणी चिटपाखरू देखील नव्हतें. म्हणून त्या गांवाहून आमची बदली होऊन आम्ही उमरावतीला आलों. तेव्हा ५–६ बिऱ्हाडें शेजाराला असलेल्या वाड्यांतील एक घर आम्ही पसंत केलें.

परंतु गेल्या ४ वर्षांत आमच्या शेजाऱ्यांचा मला जो अनुभव आला, त्यावरून मी होतों तोंच बरा होतों असें म्हणण्याची पाळी माझ्यावर आली आहे. आपण आगींतून उठून फुफाट्यांत आलों असें मला वाटूं लागलें आहे. त्यांची एकेक कृति आठवली म्हणजे अंगावर काटा उभा राहतो व तळपायाची आग मस्तकास पोहोचते व अशा शेजाऱ्यांपेक्षा वनांतील वस्ती शतगुणें बरी असे विचार येऊं लागतात. नगाधिराजाच्या उत्तुंग शिखरावरील निर्जन स्थळ त्रिनेत्र शंकराने आपल्या निवासासाठी पसंत केलें, किंवा शेषशायी भगवान् श्री विष्णु साता समुद्रापलीकडील क्षीरसागरावर राहायला गेले ते मत्कुणाच्या भीतीने अशी शंका 'ढेकणांनी पिसाळलेल्या' एका कवीने व्यक्त केली ती साफ चुकीची असून, ते खात्रीने शेजाऱ्यांच्या जाचालाच कंटाळून पळून गेले असावेत असें माझें ठाम मत झालें आहे. माझ्या वरील विधानांत असत्याचा अंशहि नाही किंवा अतिशयोक्ति अलंकारहि नाही. संशयात्म्याने शंकानिरसनार्थ पुढील मजकूर वाचावा व आपला प्रांजळ अभिप्राय द्यावा.

आमच्या वाड्याचा दिंडी दरवाजा ओलांडून आंत प्रवेश केल्याबरोबर उजव्या हाताला घेला शेटजीचें घर होतें. शेटजीची घरीं येण्याची वेळ दररोज रात्रीं १२ची व तीच त्यांच्या पत्नीची गाढ झोपेची वेळ असे. त्यामुळे दररोज त्यांना 'अड्डुचो खोलो'चा शंखध्वनि करावा लागत असे. त्यांच्या त्या 'अड्डुचो खोलो'च्या आवाजाने आम्हा सर्व शेजाऱ्यांच्या झोपेचें खोबरें होत असे; पण त्यांच्या पत्नीची पापणी देखील वर होत नसे.

दिंडी दरवाजाच्या डाव्या बाजूला 'गांधर्व महाविद्यालया'चे चालक व मालक संगीतशास्त्र विशारद 'चित्ररथ गंधर्व' यांचें निवासस्थान होतें. उपनांव गंधर्व असलें तरी 'नांव सोनूबाई हातीं कथलाचा वाळा' अशीच परिस्थिति होती. कारण ह्या स्वरकिन्नराचें कंठमाधुर्य रासभध्वनीलाहि लाजवील इतकें उत्तम होतें. त्यामुळे वेळींअवेळीं त्यांचे आलाप (बहुतेक ते विलापासारखेच भासत होते) सुरू झाले म्हणजे आमच्या कानांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाच केलेली बरी! आमच्यापैकी कांहींनी तर ह्या 'स्वर्गीय संगीतापासून' (स्वर्गीय म्हणजे स्वर्गाला पोहचविणारा असा शब्दार्थ नसला तरी रूढार्थ आमच्या वाड्यांत सर्वत्र झाला होता) आपली मुक्तता करून घेण्यासाठी त्यांना गांवाबाहेर अरण्यामध्ये स्वखर्चानें घर बांधून देण्याचा बूट काढला. त्यायेगें त्यांचें अरण्यरुदन आमच्या कर्णपथावर पडण्याची सुतराम् शक्यता नव्हती.

दरवाज्याच्या समोर आमचेंच घर होतें. 'आपली आपण करी स्तुति तो एक मूर्ख' असें समर्थांनी म्हटलें असल्यामुळे मी आमच्या घराबद्दल अवाक्षरहि लिहीत नाही.

आमच्या डाव्या बाजूला एक कवि होते. जुन्या वृत्तामध्ये किंवा छंदामध्ये काव्य करणें यांना कधीच न जमल्यामुळे यांनी स्वतःचाच एक नवीन छंद तयार केला. या छंदामधील काव्य कसें गेय होतें हें ज्याला त्याला साभिनय दाखविण्याचा त्यांना एक छंदच लागला होता. तुम्ही कोणत्याहि महत्त्वाच्या कामाला जात असलांत किंवा कोण्याहि मनःस्थितींत असलांत तरी कविबुवांनी तुम्हाला अडवून नुकतेंच प्रसविलेलें आपलें काव्य म्हणून दाखविलें नाही असें व्हायचेंच नाही. 'चुकलें ग बाई, सुख कपाळीं माझ्या नाही' ही कविपत्नीची तक्रार आता आम्हा शेजाऱ्यांनी करण्याची पाळी कवींनी आमच्यावर आणली. त्यामुळे ह्या काव्यपंडितांना टाळतां येईल तितके टाळण्याचेच प्रयत्न सर्वजण करीत असत.

आमचा पांचवा शेजारी होता एक साधा कारकून. परंतु शब्दकोडें सोडविण्याचा त्याचा हव्यास कांही और होता. ऑफिसची वेळ सोडून दिवसरात्र कवि की रवि, तन की धन, कर की मर अशा जोडगोळ्या

त्यांच्या तोंडांत असायच्या. सकाळ झाली की हातांत लोकमान्याचा अंक घेतलेली स्वारी दारांत दत्त म्हणून उभीच. " काहो नानासाहेब ! टाळ की काळ, काय वाटतें तुम्हाला ? " अशा तऱ्हेचा त्यांचा प्रश्न ठरलेलाच. मनांत म्हणत असूं " ब्रस्तसमंधा, काळें करतोस की देऊं टाळक्यांत ठेवून?"

अशा ह्या वैचित्र्यपूर्ण वाड्यांतील मासलेवाईक लोकांची एकेक करणी मी तुम्हाला सांगूं लागलों तर रात्र संपेल, पण आमच्या कथा संपायच्या नाहीत. त्या असंख्य आहेत; त्यांची गोडी अवीट आहे व त्या तितक्याच अद्भुत आहेत.

आम्ही ह्या वाड्यांत पाय ठेवला त्याच्या दुसऱ्याच दिवशीची गोष्ट. आमचें सामानहि पुरें लागलें नव्हतें. सकाळींच शेजारचीं मंदाची आई चहाची भुकटी मागायला हजर. त्यांचा चहा नेमका कालच संपला होता ! आमच्या आईने तेवढ्या गर्दीत डबे धुंडाळून चहा दिला. यानंतर उसन्यासाठी आमचेकडे कोण गर्दी असायची ! कोणाला पीठ, कोणाला मीठ, कोणाच्या बाळाला दूध, तर कोणाच्या पाहुण्यांसाठी लोणकढें तूप असें एकसारखें चालूं असे. आमच्या आईच्याने कांही नाही म्हणवत नसे. कारण भीड !

एकदा घेला शेटजीच्या पत्नि आजारी होत्या, म्हणून शेटजींनी थर्मामीटर मागून नेलें. बरेच दिवस तें त्यांच्याकडे होतें. एक दिवस मला काम पडलें म्हणून मी तें घेऊन आलों, तों पारा खाली व नळी हातांत अशा स्थितींत तें माझ्या हातीं पडलें. थर्मामीटरमधला पारा जरी निघून गेला असला, तरी त्याबद्दल मी शाब्दिक नाराजी दाखवितांच शेटजीचा मात्र पारा वर चढला. 'फुटलें तर काय झालें? भरून देऊं आम्ही ' शेटजींनीच दाटून दम दिला. त्यालाहि आज कित्येक दिवस लोटले. शेटजी अजून भरून देतातच आहेत.

माझ्याजवळ एक बाजाची पेटी होती. फुरसत असली म्हणजे पेटीवरून बोटें फिरवून असावरी, अडाण्याच्या स्वरांचे आरोह, अवरोह मी वाजवीत असे. एके दिवशीं आमच्या अर्वाचीन तानसेनच्या घरीं गाण्याची

बैठक होती. म्हणून त्यांनी माझी पेटी मागितली. देण्याची इच्छा होईना पण नाही म्हणवेना. मागचा अनुभव जमेस धरूनहि भीड मोडवेना. 'भीड भिकेची बहीण' म्हणतात तें कांही खोटें नाही. शेवटीं त्यांनी पेटी नेलीच. पुढे आज देतों, उद्या देतों, असें करत करत, कित्येक दिवस त्यांनी पेटी दिली नाही. शेवटीं 'गांधर्व महाविद्यालयाला' देणगी दिल्याबद्दल धन्यवादाचें पत्र माझ्या हातांत पडलें. मी सर्दच झालों.

किर्लोस्कर किंवा अमृतचे अंक आमच्या डोळयांनी दिसतात न दिसतात तोंच लंबे होत असत. आम्ही कशासाठी वर्गणी भरत होतों कुणास माहीत? शेजारच्या शब्दकोडेवाल्या बंडोपंतांनी तर आमचा लोकमान्याचा अंक स्वतःच्याच घरीं टाकायला पोऱ्याला सांगितलें व महिन्याच्या शेवटीं बिल मात्र आमच्या हातीं.

आमचा रेडिओ आमच्यापेक्षा आमच्या शेजाऱ्यांच्याच उपयोगी पडायचा. सुरुवातीला शेजारधर्म म्हणून मी फारसा बोलत नसे; पण पुढे पुढें मला फारच त्रास होऊं लागला. मला झोप येत असेल तेव्हा आमच्या 'बुवांना' लता मंगेशकरच्या रेकॉर्डर्स् ऐकण्याची लहर यायची, तर घेला शेटजींना सोन्याचांदीचे भाव ऐकण्यासाठी त्याची जरूर भासे.

'निंदकाचें घर असावें शेजारीं' असें संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी म्हटलें आहे. शेजाराला निंदकाचें घर असलें म्हणजे स्वतःच्या डोळयांतील मुसळ न दिसणाऱ्या गृहस्थाला तो निंदक त्याचे दोष दाखवून देतो. खरोखरच निंदक शेजारी परवडतील. पण मला मिळाले तसे शेजारी असतील तर? अशा शेजाऱ्यांच्या सहवासांत मी चार वर्षे कशीं काढलीं असतील याची कल्पना न केलेलीच बरी.

●

# शीलं परं भूषणम्

जी. एल्. कुऱ्हेकर,
बी. ए., बी. टी.
समर्थ हायस्कूल, अमरावती.

'If Character is lost, every thing is lost'

शील हा मानवाचा सर्वश्रेष्ठ अलंकार आहे. खरें पाहतां वस्त्राभरणांच्या किंवा भूषणांच्या शोभेपेक्षा अंगभूत गुणांनीच माणसाचें मोल होत असतें; परंतु शील हा अलंकार असा आहे की तो कोणीहि वापरावा आणि आपल्या कीर्तीच्या सुगंधाने दाही दिशा दरवळून सोडाव्या. शील म्हणजे सज्जनाचें परम असें निधान आहे. फुलाच्या सुगंधाने फुलाची कीर्ति जशी कायम होते तसेंच शीलचारित्र्याने माणसाचें मोजमाप होतें. सुगंधरहित फुलाने कोणी देवाची पूजा बांधीत नाही; किंवा दिसावयास सुंदर असतात एवढ्याच-साठी कोणी अप्सरांची पूजा करीत नाही. तद्वतच पराक्रमी पण शीलहीन माणसांना जगांत किंमत नाही. शील ही पराक्रमी आणि सौंदर्याची मर्यादा आहे. पराक्रमाचें तेज आहे. जीवनाचा परिमल आहे, प्राण आहे. प्राणाशिवाय शरीर जसें निर्जीव, तसें शीलाविरहित आयुष्य म्हणजे सुकलेलें फूलच.

म्हणूनच शील गेलें की सर्वस्व गेलें असें मानलें पाहिजे. शीलाची जपणूक ही प्रत्येकाने प्राणापलीकडे केली पाहिजे. सर्व सद्‌गुणांचें सार म्हणजे शील. सज्जनांना त्याची अपार किंमत वाटते. शील हेंच त्यांचें ब्रीद होय. तें आहे म्हणून इतर प्राण्यांपेक्षा मानव हा वेगळा शोभून दिसतो. मनुष्याच्या शरीरसौष्ठवांत त्याचें खरें सौंदर्य नसून शील हेंच त्याच्या ठिकाणचें आकर्षण आहे. गरीब असो की श्रीमंत असो, कुणालाहि हा अलंकार घालून मोठ्या अभिमानाने मिरवतां येतें. इतर अलंकारांप्रमाणे हा अलंकार मनुष्य संपादित असला तरी कुणापासूनहि ह्या अलंकाराला दखल पोचण्याची भीति नाही. श्रीच्या दिमाखाने अनेक लक्ष्मीपुत्र ह्या जगांत मिरवीत असले तरी महात्मा-जींच्या शीलाची ऐट ते बाळगूं शकत नाहीत. म्हणूनच शीलाचें मोल हें श्री ने होऊं शकत नाही.

शील हा अलंकार मानल्यानंतर तो आकाराला आणण्यासाठी अनेक संस्कारांची व चांगल्या शिक्षणाची आवश्यकता असते. इतर अलंकारांप्रमाणें

ह्याहि अलंकार स्वयंभू नाही. तो घडवावा लागतो. बालकाच्या मनोभूमींत शैशवापासूनच अनेक संस्कार रुजवावे लागतात. विद्येची अभिरुची निर्माण करावी लागते; आणि ह्या सगळ्या गोष्टी बालकाच्या अंतरंगांत जेव्हा झिरपत जातात तेव्हाच त्याची मनोभूमि उत्तम प्रकारें कार्यक्षम होते. सुविचाराचीं बीजें त्या मनोभूमींत अंकुरतात, आणि नंतरच शीलाची घडण बनत जाते; कृतींतून सदाचरण प्रगट होतें; बोलण्यांतून सद्विचार उफाळून येतात; शीलाची पवित्र कांति चेहऱ्यावर उमटते–डोळ्यांत प्रतिबिंबित होते. मात्र ही तेजःपुंज कांति सदोदित रक्षण करावी लागते. आयुष्यांत अनेक प्रसंग असे येतात की त्यामुळे मनुष्याच्या शीलाची परीक्षाच होते; परंतु ह्या कसोटींतून मनुष्य उतरला की तापून निघालेल्या सोन्याप्रमाणे तो अधिक कांतिमान दिसतो. शीलासाठी प्रभु रामचंद्राने वनवास भोगला, सीतेचा त्याग केला, सीतेने अग्निदिव्य केलें, सत्यवचनी हरिश्चंद्राने विश्वामित्राचा अनन्वित छळ सहन केला, चांगुणेने यतिवेषधारी शंकराला संतुष्ट करण्यासाठी स्वतःच्या मुलाचा बळी दिला, पण शील सोडलें नाही. प्राचीन वाङ्मयांतच कशाला, अर्वाचीन इतिहासांतहि असे कितीतरी दाखले आपणांस दाखवितां येतील. सम्राट अकबराने देऊं केलेला मानमरातब पायदळीं तुडवून राणा प्रताप रानोमाळ भटकला, पण त्याने मानहानी पत्करली नाही. चितोडच्या स्वातंत्र्याचें अखेरपर्यंत रक्षण केलें. रजपूत रमणींनी प्रसंगविशेषीं जोहार पत्करून आपल्या शीलाचें रक्षण केल्याची साक्ष इतिहास देत आहे. छत्रपति शिवाजी महाराजांचें शील हें स्फटिकाप्रमाणे शुद्ध होतें; म्हणूनच मराठ्यांनी शिवाजींना शंभ महादेवाचा अवतार मानलें आणि स्वराज्याच्या कार्यात भक्तिभावाने त्यांना साथ दिली.

यावरून हाच बोध निघतो की पराक्रमी पुरुषांची प्रतिष्ठा त्यांच्या शीलचारित्र्यामुळेच होते. मनुष्य केवळ पराक्रमीच पण शीलहीन असला तर त्याच्या पराक्रमाला कालावर मात करतां यावयाची नाही. तो असे तोंपर्यंतच त्याचा नांवलौकिक. एकदा त्याचा 'अवतार' संपला की कालौघांत त्याचें नांवहि पुसलें जावयाचें. उलट प्रभु रामचंद्र, राजा भोज, हरिश्चंद्र, ज्ञानेश्वर, एकनाथ इत्यादि राजे आणि परोपकारी संत ह्यांनी

कालसिकतेवर आपलीं पावलें स्पष्ट उमटवलीं आहेत. त्यांचें कीर्तिमंदिर 'यावच्चंद्रदिवाकरौ' अबाधित असेंच राहणार आहे. याचें कारण त्यांच्या पराक्रमाला आणि सामर्थ्याला मिळालेला शीलाचा उजळा हेंच होय. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की खरें सामर्थ्य शस्त्राच्या खणखणाटांत नाही; तर शीलाच्या निर्मळ तेजांत आहे. शीलवान पुरुष म्हणजे सद्‌गुण, सदाचार, सद्‌विवेक, सुनीति, सहृदयता ह्या सात्त्विक गुणांचा झराच म्हटला पाहिजे.

लो. टिळक, आगरकर, न्या. रानडे, गोखले, महात्मा गांधी ह्या विभूतींच्या ठिकाणीं शीलसामर्थ्य होतें म्हणूनच त्यांची लेखणी व वाणी प्रभावी ठरली. अनेक संकटें आलीं, प्रकरणें उद्भवलीं, पण ह्या महान् व्यक्तींनी प्रथम आपल्या शीलाची जोपासना केली. ह्यांपैकी सगळ्यांचेंच शील हिमालयापेक्षा उत्तुंग होतें; गंगेप्रमाणे निर्मळ होतें आणि म्हणूनच जनतेने त्यांचा शब्द वेदोक्तीप्रमाणे उचलला. ब्रिटिश राज्यसत्ता शरण आली ती महात्माजींच्या शारीरिक सामर्थ्याला भिऊन की काय? तर नाही. महात्माजींच्या शब्दाशब्दांत जें सामर्थ्य सांठलें होतें, ज्या सामर्थ्या-मुळे ते नोखालीला एकटेच पायीं गेले आणि ज्या सामर्थ्यापुढे अनेक दंगेखोर आपलीं हिंसात्मक कृत्यें विसरले त्या बापूजींच्या नजरेंत अपार कारुण्य, विश्वाला पुरून उरणारी दया, मृत्यूलाहि कांपरें भरवणारी निर्भयता भरली होती म्हणूनच ब्रिटिश सत्ता त्यांच्या पायीं नमली. महात्माजींचें आत्मिक बल हेंच त्यांचें शील होतें व ह्याच शीलाने त्यांनी काळावरहि विजय संपादन केला. हीच आत्मिक बलाची प्रेरणा आज भूदानप्रवर्तक विनोबाजींच्या ठिकाणीं आहे आणि जगांतल्या सर्वच राष्ट्रांना आपला मार्ग दिसावा ह्या हेतूने पंडित जवाहरलाल नेहरूंनी जी शांततेची मशाल पुढे धरली आणि जगांत भारताचा गौरव वाढविला तो त्यांच्या आत्मिक बलाचा–शील-चारित्र्याचाच–विजय नव्हे का?

सारांश शीलाचें सामर्थ्य हें शारीरिक सामर्थ्यापेक्षा अधिक सरस मानलें पाहिजे. 'शरीरमाद्यं खलुसर्वसाधनम्' ह्या संस्कृत वचनाने शरिराला निरोगी ठेवण्याची ताकीद जरी आपल्याला दिली असली तरी

शील हा आपल्या शरिरांतील प्राणवायु आपण मानला पाहिजे. म्हणून विद्यार्थीदशेपासूनच शरिराबरोबर शीलाचेंहि योग्य संगोपन करून त्याचें संवर्धन केलें पाहिजे. शील म्हणजेच जीवनपुष्पाचा परिमल होय असें म्हटल्यास खास अतिशयोक्ति होणार नाही.

●

# विद्येचें सामर्थ्य

हिंमत चव्हाण, बी. ए.,
शिक्षक, औरंगाबाद.

'Knowledge is Power'—ज्ञान ही एक अद्भुत शक्ति आहे असं आपण मानतों. मानवी मन जेवढें गूढ तेवढीच त्या मनाला साध्य होणारी ही शक्तीहि गूढच असणार. आपल्या ज्ञानबलाच्या सामर्थ्यावर मानवाने समुद्र जिंकला, आकाश ठेंगणें केलें आणि आता ग्रहगोलांवर आपल्या सामर्थ्याचा झेंडा फडकविण्याचा त्याने निश्चय केला आहे. अणुस्फोटाचा प्रतिसूर्य पृथ्वीवर क्षणैक निर्माण करून मानवाने सृजनाची वा संहाराची प्रचंड ताकद तयार करून ठेवली आहे. विधात्याला हेवा वाटावा अशी आपल्या कल्पकतेच्या साहाय्याने मानवाने सुंदरशी साहित्यसृष्टि सजविली आहे. फुलाफुलांतून परागकण गोळा करून मध साठविणाऱ्या मधमाशांप्रमाणे या सृष्टीतील इकडे तिकडे विखुरलेल्या सुंदर वस्तूंची साखळी जोडून मानवाने मोहक ललितकलांची एक रम्य जादूच निर्माण केली आहे. एरव्ही, मानवाइतका दुसरा दुबळा तरी कोण? मानवाला विद्या मिळवून देणारी ही बुद्धि वगळून या पृथ्वीतलावर किती काळ जगतां आलें असतें? सहाशे फूट लांबीचे अन् शंभर फूट उंचीचे ते अजस्र प्राणी आज कुठे आहेत? मानवांना विद्याशक्ति नसती तर ते प्रतिकूल निसर्गावर आपलें अधिराज्य स्थापूं शकले नसते. याचाच अर्थ मानवाची ज्ञानशक्ति निसर्गाच्या कोणत्याहि एका शक्तीपेक्षा बलवत्तर आहे असाच नाही का?

अजून माणसाला कितीतरी अफाट विद्या आत्मसात् करायची आहे. अजूनहि बहुसंख्य मानवांना आपल्या कुवतीच्या निरनिराळ्या विद्या आत्मसात् करायला संधि कुठे सापडते? आजहि बहुसंख्य मानव खाणेंपिणें

इत्यादि प्राथमिक स्वरूपाच्या गरजा भागविण्यासाठीच अहोरात्र राबत आहेत- समाजांत सुबत्ता होऊन थोडया श्रमांत सगळयांच्या प्राथमिक गरजा भागल्या, कामाचे तास कमी झाले आणि संस्कृति सर्व थरापर्यंत पोचली, म्हणजे आज कल्पनाहि न करतां येण्यासारखें अमर्याद विद्यासामर्थ्य मानव-जातीच्या सेवेला प्राप्त होईल यांत शंका नाही.

पण ही विद्येची शक्ति म्हणजे दुधारी तलवार आहे. ती अडचणींचा संहार करूं शकते, तशीच ती खेळणाऱ्यांच्या जीवावरसुद्धा उठते. शंकरा-जवळून ' भस्मविद्या ' मिळविणारा भस्मासुर आपल्याच नाशाला कारणीभूत झाला. तसाच मानवी विद्येचा आधुनिक भस्मासुर अणुशस्त्रधारी मानव स्वतःच्या संहारासाठीच तयार झाला की काय असा प्रश्न पडतो. मानव-जातीचें अस्तित्वच धोक्यांत आणणारी ही विद्या 'शाप की वरदान ? ' ज्या विद्येच्या सहाय्याने मानवाने निसर्गावर मात केली तीच विद्या या पृथ्वीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करण्याचा उपक्रम तर करणार नाही ना, अशी शंका येऊन मन विषण्ण होतें.

' विद्या विनयेन शोभते । ' असें आपण म्हणतों. पण या बाजारू जगांत ' Honesty is the Best Policy ' या जाहिरातीसार-खीच त्याहि म्हणण्याची किंमत झाली आहे. विद्या आणि विनय यांची सांगड घालण्याचा प्रयत्न फार पुरातन काळापासून मानव जात करीत आहे. पण त्यांची सांगड घातली गेली असती तर विद्येच्या सामर्थ्याने एकमेकांना अधिक पिळण्याची, एकमेकांचा अधिक संहार करण्याची रीत केव्हाच थांबली असती. वेदविद्यासंपन्न ब्राह्मणांनी स्वतःकडे श्रेष्ठत्व घेऊन शूद्रांना धिःकारण्याचा प्रयत्न केला नसता, आणि आधुनिक विद्यासंपन्न–शास्त्रसंपन्न पाश्चिमात्यांनी जगावर आपल्या साम्राज्यशाहीचें जोखड लादलें नसतें. ' विद्या विनयेन शोभते ' हें महान् सत्य अजून अंमलांत यायचें आहे; आणि तोंपर्यंत मानवी विद्याशक्तीपासून वेळोवेळीं उत्पन्न होणारे भस्मासुर जगाला भेडसावणार आहेत, यांत शंका नाही.

विद्येचें सामर्थ्य या विश्वाहूनहि श्रेष्ठ आहे. मानवाच्या महतीपेक्षा दुसरें कांही श्रेष्ठ नाही या म्हणण्यांत अतिशयोक्ति आहे. जीवनाचें अफाट-

क्षेत्र हेंच सर्वांत मोठें विश्वविद्यालय आहे. मानव हा या विश्वविद्यालयांतला जन्मभर विद्या प्राप्त करणारा विद्यार्थी आहे. सृष्टीचें जीवन नित्य विकासशील असल्यामुळे तिचें संपूर्ण ज्ञान कुणालाहि होणें अशक्य आहे. वर्तमान काळाला आपण क्षणभरहि थांबवूं शकत नाही. त्याच्याच बरोबर भविष्याच्या दिशेनें धावणाऱ्या ज्ञानाला मग आपण कसें कुंपण घालणार? मग विश्वाच्या ज्ञानापेक्षा कितीतरी पटीने मागे राहणारें मानवी ज्ञान प्रमत्त कां व्हावें? संहारक कां व्हावें? विनयशील अन् सृजनशील कां होऊं नये?

याला कारण एकच. ज्ञानाचें पावित्र्य आम्ही विसरलों. ज्ञान हीच ह्या जगांतील पवित्रतम गोष्ट आहे ही गीतेची शिकवणूक आम्ही अवमानली. विद्येचा व्यापार केला. राक्षसी कृत्यांसाठी तिला राबवली. विनयाची चाळणी केली. युद्धांत रमलों. पशूंप्रमाणे वागलों.

आज जगाला आपली चूक कळून आली आहे. अणुशक्तीनें जग काबीज करतां येईल, पण शांतता प्रस्थापित होणार नाही हें आता जगाच्या निदर्शनास येत आहे. शांतीसाठी अवघ्या जगाची धडपड चालूं आहे. शांति-दूतांच्या भेटीगाठी होत आहेत. ज्ञानाच्या प्रकाशाने दिशा उजळल्या आहेत. विनय, सलोखा, प्रेम ह्यांचीं बीजं ह्या प्रकाशांत अंकुरित होत आहेत. 'हें विश्वचि माझें घर' ही स्थिर बुद्धि निर्माण झाल्यानंतर मग युद्ध कसलें? सगळीकडे शांतीचेंच साम्राज्य. त्यासाठी विद्येचं पावित्र्य मात्र राखतां आलं पाहिजे. साक्रेटिस म्हणतो त्याप्रमाणे, "I know nothing but the fact of my ignorance," अशी आपली वृत्ति विनय-शील झाली पाहिजे.

●

# अणुबॉम्ब व अहिंसा

पी. जी. देशपांडे, बी. एस् सी.
अध्यापक, स. भुवन-औरंगाबाद.

आपल्या कल्पकतेने मनुष्याने रानटी अवस्थेपासून तों आजच्या यंत्रयुगांतील सुधारलेल्या अवस्थेपर्यंत अनेक पायऱ्यापायऱ्यांनी प्रगति करून घेतली. प्रथमतः रानटी अवस्थेंत मनुष्य स्वसंरक्षणार्थ पाषाणाचीं आयुधें वापरूं लागला. त्यापुढे लोहयुग व नंतर अनेक चमत्कारयुक्त असें यंत्रयुग ह्या टप्प्याने माणसाची प्रगति झाली. माणसाने विज्ञानांतील संशोधनानें निसर्गांतील अनेक कोडीं उलगडून पाहण्याचा प्रयत्न केला व त्यांतूनच विद्युत्शक्तीचा शोध लावून, तिला राबवून आपलें जीवन अनेक दृष्टींनी, सुखसोयींनी पूर्ण केलें. आजच्या युगाला एका अर्थाने 'विद्युत्युग' असें म्हटलें तर तें योग्यच ठरेल.

विज्ञानांतील संशोधन जोंपर्यंत विधायक स्वरूपाचें होतें, व त्यायोगें माणसांच्या जीवनावर इष्ट असाच परिणाम होत होता तोंपर्यंत विज्ञान हें एक प्रकारें 'वरदान'च होतें; पण प्रत्येक शक्ति ही विधायक व विनाशक अशा दोन्ही रीतींनी उपयोगांत आणतां येते. मनुष्याने जरी भौतिक सुधारणा घडवून आणून निसर्गावर विजय मिळविला होता, तरी त्यांतील रानटी प्रवृत्तींचा समूळ नाश झाला नाही. प्रसंगोपात्त त्या अनेक मार्गांनी प्रकट होतातच. एकमेकावर वर्चस्व गाजवून दुसऱ्यास गुलाम बनविण्याची स्वार्थी प्रवृत्ति प्रकर्षाने प्रकट होत आहे. ह्या प्रवृत्तींतून युद्धें निर्माण झालीं. संहारक शस्त्रें करण्याकडे विज्ञानाचा ओघ वळविण्यांत आला. परमेश्वरानें माणसाला दिलेल्या बुद्धीचा अनीतिकारक रीतीने उपयोग करून माणसाच्या नैतिक अधोगतीला सुरुवात झाली.

युद्धांतील गरजा भागविण्यासाठी एकापेक्षा एक वरचढ अशीं संहारक अस्त्रें शोधून काढण्यासाठी जगांतील श्रेष्ठ वैज्ञानिकांत भयप्रद अशी चढाओढ सुरू झाली. थोड्या अवधींत जास्तींत जास्त मनुष्यसंहार कसा करतां येईल अशीं अस्त्रें शोधून काढण्यांत वैज्ञानिकांची शक्ति खर्ची पडूं लागली व ह्या संशोधनाचें विषारी फळ म्हणजेच अनिर्बंध रीतीने भयानक

प्राणहानी घडवून आणणारा आजचा अणुबॉम्ब व हायड्रोजन बॉम्ब होय. पण एवढ्या संशोधनानेहि आजच्या मानवाचें समाधान झालेलें दिसत नाही, म्हणूनच एखाद्या सैतानाप्रमाणे त्याहिपेक्षा संहारक अस्त्रसंशोधन सुरूच आहे.

ह्या नवीन अस्त्राचें भयानक स्वरूप सर्व जगाला दिसलेलें आहे. जगाचा प्रलयकाल तर जवळ आला नाही ना ? ह्या प्रश्नाने प्रत्येक जण साशंक झालेला आहे. अणुबॉम्बने जपानांत नागासाकी व हिरोशिमावर घडवून आणलेली अगणित प्राणहानी व नवीन निघालेल्या हायड्रोजन बॉम्बच्या प्रात्यक्षिकाचें भयानक स्वरूप हें पृथ्वीवरील मानववंशच अस्तंगत करणार की काय अशी भीति मोठमोठ्या विचारवंत लोकांतहि निर्माण झालेली आहे. सामान्य माणसाचें जीवित असुरक्षित झालें आहे. भीति व अविश्वास ह्यांचेंच साम्राज्य सर्व जगावर पसरलें असून जगांतील शांति नष्ट झाल्यासारखी वाटत आहे. नवीन हायड्रोजन बॉम्बचा युद्धांत उपयोग होण्यापूर्वीच त्याच्या प्रात्यक्षिकानेच सर्व जगाला हादरा दिला. अशा भीतिव्याप्त परिस्थितींत जगांतील विचारवंतांची मति कुंठित झाली आहे. जग आज एखाद्या ज्वालामुखीच्या तोंडावर बसल्यासारखें झालें असून, अंतर्गत स्फोट केव्हा घडून येईल व जगाचा नाश केव्हा होईल हें सांगता येत नाही.

गेल्या महायुद्धांत संयुक्त राष्ट्रसंघटना निर्माण झाली. आपसांतील प्रश्न शांततेने सोडविण्याचा निर्धार केला गेला; पण परस्परांतील स्पर्धा निराळ्याच थराला पोहचून आज जगांत शीतयुद्ध सुरू झालें आहे. शांतता कशी प्रस्थापित करतां येईल हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शांतता हवी म्हणून प्रत्येकजणच बोलत आहे; पण प्रत्यक्ष कृती मात्र विरोधी होत आहे.

मनुष्याच्या जीवनांत नीतीचें म्हणून कांही निराळें स्थान आहे हें मनुष्य विसरत चालला आहे. कांहींना शांतता पाहिजे; मग ती दहशतीच्या पोटांतून निर्माण झाली तरी चालेल असें ते मानतात. दहशतजन्य शांतता क्षणजीवी असते हें ते विसरतात. शांततेच्या मार्गावरील मनुष्याचा विश्वास अविरत कायम पाहिजे. दोन सत्ताभिलाषि गट परस्परांपेक्षा प्रबल होण्याचा

जो प्रयत्न करतात त्यामागे दुसऱ्या गटाला स्वतःच्या शक्तीने भेडसावून आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याचाच हेतु असतो. अशा प्रकारच्या परस्पर द्वेष व अविश्वासाच्या वातावरणांतून टिकाऊ शांतता कधीहि निर्माण होणार नाही. आमूलाग्र अशी मानसिक क्रांतीच ह्या भयानक अशा अस्त्रांपासून मनुष्याला वाचविण्यास समर्थ आहे. ती क्रांति घडवून आणण्यास सामाजिक प्रयत्नांची शिकस्त होणें अत्यावश्यक आहे. युद्धप्रवृत्तीची अभिलाषा असणारे गट आज जगांत आहेत; पण शुद्ध शांततेच्या मार्गाचा निर्भेळ पुरस्कार करून ती प्रत्यक्ष अमलांत आणणारा प्रबळ गट जर जगांत निर्माण झाला तर त्या गटाचें नैतिक वर्चस्व दुसऱ्या गटावर पडून जगांत शांतता प्रस्थापनेसाठी आवश्यक ती पार्श्वभूमि तयार होऊं शकेल.

'युद्धें नकोत, शांतता हवी' असें आज प्रत्येकजण म्हणत आहे; व अखेर युद्ध अपरिहार्य आहे म्हणून तेच राष्ट्रगट युद्धाचा केव्हा भडका उडवतील हेंहि सांगतां येत नाही. युद्धें टाळून शांतता प्रस्थापनाची खरोखरच तळमळ असेल तर प्रत्येक प्रश्न शांततेच्या मार्गानेच सोडविला जाऊं शकतो. अशा प्रकारच्या शांततेच्या मार्गावर अढळ विश्वास पाहिजे. अर्थात् अशा प्रकारचा विश्वास, एवढा संयम असण्यासारखें वातावरण प्रत्येक राष्ट्रांत असेलच असें नाही. कांही राष्ट्रगटांत जर असें वातावरण खरोखरच असेल, तर त्याचा निश्चित परिणाम दुसऱ्या राष्ट्रांवर होईल. जगांतील राष्ट्रें आज एकमेकांशीं निगडित झालेलीं आहेत. एका ठिकाणच्या घडामोडीचा परिणाम चटकन् दुसऱ्या भागावर झाल्याशिवाय राहत नाही.

भारताची भूमिका या बाबतींत आदर्श आहे. प्राचीन काळापासून भारतीय तत्त्वज्ञान शांततेची थोर शिकवणूक देत आहे. महात्माजींनीं सत्य व अहिंसा हीं तत्त्वें भारतीय राजनीतींत भिनून गेल्यामुळेच भारताचे सर्वच नेते सदैव शांतीचा पुरस्कार करीत आहेत. पंतप्रधान पंडित नेहरूंचीं निरनिराळीं वक्तव्यें पाहिलीं तर त्यांनी वेळोवेळीं हिंसाप्रवृत्तीचा निषेध करून शांततेच्या मार्गावर भारताचा विश्वास प्रगट केला. कोरिया व इंडोचायनामध्ये भारताने केलेल्या शांतिदूताच्या भूमिकेमुळे जागतिक राजकारणांत भारताचें महत्त्व वाढलें आहे. 'यूनो' संघटनेंत सुद्धा भारतीय प्रतिनिधि

सदैव शांततेचा पुरस्कार करीत आहेत. भारताबरोबरच आणखी कांही राष्ट्रें शांततेचा पुरस्कार करण्यांत सामील झालीं तर ह्या गटाचें नैतिक बळ निश्चित वाढून जगांत वाढत चाललेल्या हिंसात्मक व युद्धपिपासू वृत्तींना आळा बसण्यास मदत होईल.

सारांश, जगाला ग्रासूं पाहणाऱ्या परमाणु बॉम्बचें किंवा हायड्रोजन बॉम्बचें संकट आज समस्त मानवसमाजाला आव्हान आहे. त्या अस्त्रांच्या संहारक शक्तीविषयी आता संशय उरला नाही. उद्या जर ह्या महाभयंकर अस्त्रांचा उपयोग झाला तर पृथ्वीवर मृत्यूचें तांडवनृत्य सुरू होईल. म्हणून मूर्तिमंत असा संहार होण्यापूर्वीच तो टाळण्यासाठी अहिंसात्मक व नैतिक बळाशिवाय दुसरे कोणतेहि उपाय व्यर्थ होत. जगांत शांतीचा पुरस्कार करणारा व युद्धप्रवृत्त राष्ट्रांशीं सर्व प्रकारें असहकार करून त्या राष्ट्रांना शांतिप्रवृत्त करणारा फार मोठा गट आवश्यक आहे. आज सर्वत्र जर असे प्रयत्न सुरू झाले तर शांतताप्रधान मार्गानें अणुबॉम्ब व हायड्रोजन बॉम्ब ह्यांचासुद्धा पाडाव करून जगांत शांतीचें साम्राज्य सर्वत्र पसरेल. अखिल मानवतेला शांततेचा संदेश देणाऱ्या भगवान बुद्धाच्याच खालील शब्दांत शांतीचें मर्म भरलें आहे.

"Not at any time are enmities appeased through enmity, but they are appeased through non-enmity. This is the eternal law."

●

# भाषावार प्रांतरचना

बी. के. भाटीया, बी. ए. (ऑनर्स)
औरंगाबाद

हिंदुस्थान जिकल्यानंतर राज्यकारभाराच्या सोयीनुसार ब्रिटिशांनी प्रांतांची रचना केली व सरहद्दी कायम केल्या. ही प्रांतरचना करतांना त्यांनी जित लोकांच्या भावनांचा मुळीसुद्धा विचार केला नाही. परंतु 'वाघिणीचें दूध' जसजसें लोकांना पचूं लागलें तसतसा लोकांनी आपला प्रांतरचनेसंबंधीचा असंतोष अनेक मार्गांनी प्रकट केला. इ. स. १९२१ सालीं

काँग्रेससभेच्या व्यासपीठावरून भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य असल्याचें घोषित झालें व विशेषतः दक्षिण भारताचे बाबतींत ह्या तत्त्वाचा प्रामुख्याने विचार व्हावा असेंहि मान्य झालें. आता हिंदला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर राज्यपुनर्रचना व्हावी व प्रांतांतील शिक्षणापासून तों राज्य-काराभारापर्यंतचे सर्व व्यवहार प्रांतीय भाषेंत व्हावेत अशी मागणी करण्यास लोकांनी सुरुवात केली. परंतु संपूर्ण देश हा तूर्त संक्रमणाच्या अवस्थेंत आहे. अनेक निकडीच्या समस्या देशापुढे प्रश्नचिन्ह ठेवून उभ्या आहेत. संरक्षण, पुनर्वसाहत, चलनवाढ, अन्नधान्य हे गरजेचे प्रश्न राष्ट्रापुढे असतांना, आणि पंचवार्षिक योजना व समाजविकासाचा कार्यक्रम पूर्णपणें यशस्वी होण्याकडे भारताचें लक्ष केंद्रित झालें असतांना प्रांतरचनेच्या प्रश्नावर भारताने आपलें लक्ष स्थिर करूं नये अशा तऱ्हेचें निवेदन १९४८ सालीं सल्लागार समितीने केलें. भारतांतील राज्यांची पुनर्रचना करणें व त्यानुसार आंध्र, केरळ, कर्नाटक व महाराष्ट्र ह्या प्रांतांची भाषेनुसार घडण करणें हें तत्त्व समितीने मान्य केलें; पण ह्या संक्रमणाच्या काळीं राष्ट्राची शक्ति तूर्त ह्या प्रश्नावर खर्च होऊं नये असें समितीने प्रतिपादिलें.

अर्थात् सल्लागार समितीने सादर केलेल्या अहवालावर टीकेच्या फैरी झडल्या. जनता प्रक्षुब्ध झाली. महामंत्री नेहरु, भारताचे अध्यक्ष आणि गृहमंत्री ह्यांचें खास मंडळ पुन्हा ह्या प्रश्नाचा फेरविचार व्हावा म्हणून एकत्रित आलें. परंतु सल्लागार समितीने दिलेला अगोदरचा निर्णयच त्यांनी ग्राह्य मानला. परंतु ह्या निर्णयाने आंध्रप्रांत खवळून उठला. आंध्रनेते स्वामी सीताराम ह्यांनी उपोषण केलें. सभा, संप आणि हरताळ ह्यांची एकच गर्दी आंध्रमध्ये झाली. ऑगस्ट १९५३ मध्ये विधानसभेंत प्रा. रंगारेड्डी ह्यांनी हा प्रश्न सोडविण्याचे बाबतींत सरकार पक्षाचा निर्णय विचारला असतांना महामंत्री नेहरु ह्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. भारतांतील राज्यांची पुर्नरचना करण्याचा प्रश्न निकडीचा आहे याची जाणीव भारत सरकारला आहे; परंतु कोणत्याहि प्रांताची उभारणी करतांना अनेक नाजुक मुद्दे उपस्थित होत असतात. अशा विवाद्य मुद्यांवर प्रांतीय जनतेच्या पुढाऱ्यांचें एकमत होणें आवश्यक आहे; आणि नवी व्यवस्था करतांना कोणत्याहि

एका प्रांतापुरता विचार करून भागणार नाही. भारतांतील एकंदर घटक-राज्यांच्या व्यवस्थेचा पायाशुद्ध विचार होणें अवश्य आहे; अशा अर्थाचें मत पंडित नेहरूंनी व्यक्त केलें. आंध्रनेते पोट्टी राम्मलूचें बलिदान झाल्यामुळे व आंध्रप्रांत खवळून उठल्यामुळे नेहरूंना त्या गंभीर परिस्थितीचा विचारच करावा लागला, आणि आंध्रप्रांतनिर्मितीची घोषणा त्वरित करावी लागली; व त्या दृष्टीने प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली. त्यानुसार १९५३ च्या आक्टोबरमध्ये आंध्रराज्याचा उदय झाला. अर्थातच एका प्रांताची निर्मिती झाल्याबरोबर भाषावार प्रांताची मागणी करणाऱ्या इतर प्रदेशांनाहि त्यामुळे स्फुरण चढलें. परंतु पंडित नेहरूंनी आंध्रराज्य निर्माण करण्याची घोषणा केली त्या वेळींच भारतांतील राज्यघटकांची पुनर्रचना करणें जरूर आहे व त्यासाठी उच्चाधिकार समिती भारत सरकारकडून नेमण्यांत येईल असें जाहीर केलें. शेवटीं १९५३ च्या डिसेंबरमध्ये ह्या समितीची नेमणूक झाली. श्री. फाजलअली, श्री. पणिक्कर व पं. कुंझरू ह्या तिघांची सल्लागार समिती नेमण्यांत येऊन समितीचें अध्यक्षपद श्री. फाजलअली यांचेकडे देण्यांत आलें. समितीच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात १९५४ फेब्रुवारी पासून झाली. "भारताच्या सामुदायिक संसाराची नीट अंतर्व्यवस्था लावून भारतीय राष्ट्रकुटुंबांतील निरनिराळे घटक परस्पर गुण्यागोविंदाने नांदून स्वतःचा व त्याचबरोबर भारतीय राष्ट्रकुटुंबाचा उत्कर्ष घडवून आणतील अशी नवी राज्यव्यवस्था निर्माण करण्याची महत्त्वाची कामगिरी या माननीय सदस्यांवर असून एका अर्थाने ते भारताचे शिल्पकार ठरणार आहेत" असे डॉ. सोवनी यांनी आपल्या राज्यपुनर्रचनेच्या लेखांत म्हटलें आहे.

खरें पाहतां, भाषेनुसार पुनर्रचना करण्यांत अनेक फायदे आहेत. मातृभाषा हें माध्यम शिक्षणक्षेत्रांत फार उपयोगी आहे. मातृभाषेंतूनच संस्कृतीचें खरें संगोपन व संवर्धन होतें. प्रांतीय भाषेंत प्रांताचा कारभार चालणें हें भाषेच्या विकासाच्या दृष्टीने व उन्नतीच्या दृष्टीने फार महत्त्वाचें आहे. प्रांतभाषेंत राज्यकारभार चालला तर प्रांतांत हरघडी घडणाऱ्या घडामोडीचे ज्ञान जनतेला सहज होऊं शकेल. परकीय भाषा वापरण्यांत

खर्च होणारी शक्ति वाचवितां येईल; आणि राष्ट्रीय शक्तीचा ऱ्हास अनाठायी होणार नाही. बोलभाषेंतूनच विषय शिकविले तर मुलांना ते सहज उमजूं लागतात, असें शिक्षणशास्त्रज्ञांचें मत आहे; व त्यानुसार कांही विश्वविद्यालयांनी प्रांतभाषेंतून शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला.

पण, ह्या प्रश्नावर टीका करणाऱ्यांचें मत असें की अशी प्रांतरचना एकदा निर्माण झाली तर प्रत्येक जण आपआपलें घरच सांभाळूं लागेल; व व्यक्तीचे संबंध विशिष्ट क्षेत्रापुरतेच मर्यादित होतील. असें झालें तर मध्यवर्ती सरकार दुबळें पडेल आणि जणू कांही लहानमोठीं राज्येंच स्वतंत्रपणें निर्माण होतील. प्रांताप्रांतांत म्हणावा तेवढा सलोखा राहणार नाही; वैमनस्य वाढेल; आणि असें झालें तर भारत विकलांग होईल. राज्याला त्यामुळे स्थिरता येणार नाही.

टीकेची बाजू कांही अंशीं विचार करण्यासारखी असली तरी असें म्हणतां येईल की प्रादेशिक विविधतेची जोपासना करूनहि भारताची सांस्कृतिक व सामाजिक एकता राखतां येणें शक्य आहे. बहुभाषिक राज्यांचा कारभार किती बिकट असतो हें हैदराबाद राज्याचें उदाहरण घेऊन आपणांस सिद्ध करतां येईल. तेव्हा लोकशाही समाजरचना व्हावी असें वाटत असलें तर प्रांतपुनर्रचना होणें अत्यावश्यक आहे. भारतीय एकत्व प्रांतपुनर्रचनेमुळे भंग पावेल असें समजण्याचें कारण नाही.

●

# विद्यार्थी आणि शिस्त

के. व्ही. पंडित,
शिक्षक, अमरावती.

आजकालच्या विद्यार्थ्यांत शिस्त नसल्याबद्दल जो तो तक्रार करतो. घरींदारीं, शाळाकॉलेजांत, सभासंमेलनांत, नाटकसिनेमांत कुठेहि पाहिलें तरी विद्यार्थ्यांच्या नांवाने बोटें मोडण्यांत येतात. भारताचे प्रधान मंत्री नेहरु यांचेपासून तो थेट राजकमल चौकांत उभा असलेल्या शिपायापर्यंत कोणीहि विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीबद्दल आक्षेप घेतांना दिसतात. तात्पर्य हेंच की इतर बाबतींत हिंदुस्थानांतील लोकांत मतभेद दिसून येत असले तरी

या बाबतींत मात्र कोणत्याच प्रकारें मतभेद नाही. सर्वजण एकमताने व एकदिलाने विद्यार्थ्यांच्या विरुद्ध ओरड करीत असतात.

ज्या एखाद्या गोष्टीबद्दल सर्व लोकांचें एकमत आहे ती गोष्ट खोटी असणें शक्यच नाही. विद्यार्थ्यांत शिस्त नाही ही गोष्ट अर्थातच कोणालाहि नाकबूल करतां येणार नाही. विद्यार्थ्यांच्या गैरशिस्त व असभ्य वर्तणुकीचे प्रकार इतके वाढत्या प्रमाणावर होत आहेत व त्याबद्दलच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रांतून इतक्या वारंवार येत असतात की ते प्रकार पाहून व वाचून कोणत्याहि सात्त्विक व विचारी माणसाला विद्यार्थ्यांच्या भवितव्याबद्दल काळजीच वाटेल. राष्ट्रांतील मोठमोठे पुढारी व समाजांतल्या विचारी लोकांना विद्यार्थ्यांमधील या दोषावर काय उपाय करावा हेंहि सुचेनासें झालें आहे. विद्यार्थ्यांतील गैरशिस्तपणाच्या व गुंडगिरीच्या वृत्तीचीं कारणें कोणतीं व त्यावर उपाय काय योजावे याबाबत पुष्कळ वर्तमानपत्रांतून लेखहि लिहिले जात आहेत.

या बाबतींत कोणी पालकांना जबाबदार धरतात तर कोणीं शिक्षकांना जबाबदार समजतात. मुलांना नीट वळण लावणें हें मुख्यत: आईबापांचेंच काम आहे. पण आजकाल आईबाप आपल्या मुलांकडे जितकें लक्ष द्यायला पाहिजे तितकें देत नाहीत, म्हणून विद्यार्थी बिघडले असें कांही लोक समजतात.

वयाच्या सहाव्या वर्षापासून तों वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत मुलांचा बहुतेक वेळ शाळाकॉलेजांत जात असतो आणि त्या वेळीं त्यांच्या वागणुकीला वळण देण्याचें काम शिक्षकांकडे असतें. पण आजकालचे शिक्षक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक विकासाचे व प्रगतीचे बाबतींत पूर्वीच्या शिक्षकां-इतकें लक्ष देत नाहीत म्हणूनच विद्यार्थी बिघडले असें कांही लोक, विशेषत: पालक समजतात. कांही लोक यापेक्षा थोडे अधिक विचारी असतात. ते शिक्षक व पालक यांपैकी कोणालाच जबाबदार न धरतां आजकालची शिक्षणपद्धतीच बरोबर नाही, धर्म, नीति वगैरेचा शिक्षणांत समावेश होत नसल्यामुळे मुलांचें शील व चारित्र्य बिघडत चाललें असें म्हणतात. पण गेल्या दीडशे वर्षांपासून चालत आलेल्या शिक्षणपद्धतींतहि धर्माचा व नीतीचा समावेश नसूनहि रानडे, टिळक, गांधी, नेहरु, बोस यांच्यासारखे लोक

निर्माण झाले व म्हणून पूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या पिढीचें वर्तन आजच्या इतकें गैरशिस्त नव्हतें म्हणून शिक्षणपद्धतीच जबाबदार आहे असें म्हणतां येणार नाही. म्हणून कांही लोक पालक, शिक्षक, शिक्षणपद्धति यांना जबाबदार न धरतां आजकालच्या समाजांतील वातावरणच याला कारणीभूत आहे असें समजतात. गेल्या २०–२५ वर्षांपासून सिनेमाचा अधिकाधिक प्रसार होत गेल्यामुळे समाजांतील एकंदर वातावरणच बिघडलें आणि विद्यार्थ्यांचीं मनें अधिक संस्कारमय असल्यामुळे त्यांच्यावर या दूषित वातावरणाचा इतरांपेक्षा अधिक दुष्परिणाम होत असल्यामुळे विद्यार्थ्यांची ही स्थिति झाली आहे असें कांही लोकांना वाटतें; आणि त्यांचें म्हणणें कांही बाबतींत थोडें-फार खरें आहे असें म्हणतां येईल. आजकालच्या सिनेमांतील गोष्टी, कथानकें, संवाद, अभिनय, गाणीं यांकडे लक्ष दिल्यास त्यांत उडाणटप्पूपणा आणि गुन्हेगारीपणा वगैरे समाजविघातक प्रवृत्तींचाच बडेजाव केलेला दिसतो ही गोष्ट खरी आहे. सिनेमाइतकी स्वस्त व सुलभ करमणूक दुसरी कोणतीच नसल्यामुळे सिनेमाचें आकर्षण समाजांतील यच्चयावत् सर्व आबाल-वृद्ध स्त्रीपुरुषांना फार वाटूं लागलें आहे, आणि त्याचा परिणाम विशेषतः तरुण पिढीवर होणें साहजिक आहे.

पण खरोखरच सिनेमा इतका वाईट आहे काय? इतर देशांत सिनेमा-मुळे हेच परिणाम झाले आहेत काय? इतर देशांत सिनेमामुळे इतके दुष्परिणाम झालेले नाहीत. उलट, लोकशिक्षण व लोकरंजन या कामीं सिनेमा-इतकें प्रभावी व परिणामकारक साधन नाही असें युरोप, अमेरिका, रशिया इत्यादि राष्ट्रांत आढळून आलें आहे.

तात्पर्य, विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीचा अभाव वाढत्या प्रमाणांत होत आहे, याबद्दल सर्वांचें एकमत असलें तरी त्याला कारणें काय याबद्दल मात्र फारच मतभेद आहेत. कारणांबद्दल जर इतके मतभेद तर त्यावर उपाययोजनेच्या बाबतींत तर किती तरी आहेत. रोगाचें कारण बरोबर समजल्याशिवाय त्याच्या-वर उपाय केला तर फायदा होण्याचे ऐवजी नुकसानच होण्याचा संभव अधिक आहे. क्वचित् प्रसंगीं रोगी दगावण्याचाहि संभव असतो; म्हणून

विद्यार्थ्यांमधील शिस्तीच्या अभावाचें खरें कारण काय याचा विचार करणेंच अधिक आवश्यक व फायदेशीर आहे.

आतापर्यंत जीं जीं कारणें या बाबतींत सांगण्यांत येतात त्यांपैकी कांही अजिबात चुकीचीं आहेत. पण संपूर्णपणें सत्य असें कारण अजून कोणालाच आढळलेलें नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व मुंबईपासून कलकत्त्यापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीचा अभाव आढळून येत असेल तर त्याचीं कारणें वरवर पाहून सापडणार नाहीत. त्याचीं मुळें फार खोलवर गेलेलीं असलीं पाहिजेत. आईबाप, शेजारीपाजारी, दोस्तमित्र, शिक्षक, शिक्षणपद्धति किंवा नाटकसिनेमादि शौक हे याला कारणीभूत आहेत असें मानणें चुकीचें होईल. वास्तविक पाहिलें तर विद्यार्थी ज्या समाजांत राहतात त्या समाजांतच शिस्त किंवा धरबंध राहिलेला नाही; म्हणूनच आजचे विद्यार्थी उच्छृंखल व बेफाम झालेले आहेत. आजच्या समाजाकडे दृष्टि फेकल्यास आपणांस असें दिसून येईल की, समाजांतील सर्व वर्गांत व क्षेत्रांत गोंधळ, बजबजपुरी, अनाचार, अत्याचार व धांगडधिंगा चाललेला आहे. नफेबाजी, सट्टेबाजी, काळा-बाजार, लांचलुचपत, वशिलेबाजी, बेकारी, दारिद्र्य, उपासमारी व रोगराई इत्यादींमुळे समाजाची शिस्त व सुव्यवस्था बिघडलेली आहे. विशेषतः बेकारी, उपासमारी व रोगराई यांचा परिणाम विद्यार्थ्यांना चटकन जाणवतो. एका चपराशाचे जागेकरिता शंभर सुशिक्षित व पदवीधरांचे अर्ज येतात. एखादा एम्. ए. झालेला मनुष्य रिक्षाचा किंवा हमालीचा धंदा करतो आणि तें न जमल्यास आत्महत्या करतो, असें जेव्हा विद्यार्थ्यांच्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येतें तेव्हा आपलीहि अशीच स्थिति होईल काय अशी शंका व भीति प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनापुढे उभी राहिल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे अभ्यासाकडे व शिक्षणाकडे त्यांचें जितकें लक्ष असावयास पाहिजे तितकें न लागलें तर त्यांत नवल नाही. शिक्षणांत त्यांचें लक्ष न लागल्यामुळे तें इतरत्र लागतें. विद्यार्थ्यांमध्ये स्वाभाविकपणेंच उत्साह अधिक असतो आणि त्या उत्साहाला योग्य वाट न मिळाली तर अनिष्ट मार्गांनी तो बाहेर पडतो. विद्यार्थ्यांचा वात्रटपणा, खोडकरपणा, गुंडगिरी, वगैरे सर्व, उत्साहाला योग्य मार्ग न मिळाल्याचें लक्षण आहे. विद्यार्थ्यांच्या

या उत्साहाला योग्य वाव देण्याची जोंपर्यंत आजच्या समाजांत व्यवस्था नाही व त्यांच्या जीवनाला शाश्वति नाही तोंपर्यंत विद्यार्थ्यांची शिस्तीच्या बाबतींत सुधारणा होणें शक्य नाही. राष्ट्रांतील व समाजांतील नेते म्हणविणाऱ्या लोकांनी या बाबतींत कांही उपाय केल्याशिवाय त्यांनी विद्यार्थ्यांच्या नांवानें ओरड करणें व्यर्थ आहे. विद्यार्थ्यांमधील शिस्तीचा अभाव म्हणजे समाजांतील शिस्तीच्या अभावाचेंच प्रतिबिंब व प्रतिध्वनि होय. विद्यार्थीवर्ग म्हणजे समाजापुढे व समाजधुरीणापुढे ठेवलेला आरसा आहे. त्यांत त्यांना आपलेंच स्वरूप वाईट दिसलें तर त्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांला दोष न देतां स्वतःचेंच परीक्षण करावें म्हणजे झालें.

●

## हिंदी शेतकऱ्याचें जीवन

के. व्ही. पंडित
शिक्षक, अमरावती.

मानवी जीवनाला आरंभ झाला तेव्हापासून शेती या धंद्याला अतिशय महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. मानवाच्या ज्या विविध गरजा आहेत त्यांत अन्नविषयक गरज अत्यंत प्रमुख आहे. रानटी स्थितींतील मानव आणि आजचा अत्यंत सुधारलेला मानव या दोघांमध्ये इतर दृष्टींनी कितीहि फरक असला तरी अन्नविषयक गरजेच्या बाबतींत मात्र त्यांच्यांत फारसा फरक नाही. वस्त्र, निवारा, रोगनिवारण आणि शिक्षण इत्यादि बाबतींतच आजचा मनुष्य आपल्या पूर्वजांपेक्षा सुधारलेला आहे असें म्हणतां येईल. अन्न ही मनुष्याचीच नव्हे, तर सर्व प्राणिमात्रांची प्रमुख आणि प्राथमिक गरज आहे आणि म्हणून अन्नोत्पादन करणारा धंदा म्हणून शेतीचें महत्त्व समाजजीवनांत केव्हाहि अद्वितीयच राहील. शेतीचा धंदा हा जिथे जिथे म्हणून मनुष्यवस्ती असते तिथे तिथे कोणत्या तरी स्वरूपांत असलेला आपणांस आढळून येईल.

जेव्हापासून शेतीचा शोध मनुष्याला लागला तेव्हापासून तों गेल्या शंभर वर्षांपूर्वीपर्यंत शेतीचें स्वरूप साधारणपणें एकसारखेंच असलेलें आपणांला आढळून येईल. पांडवांच्या काळीं ज्या नांगरानें शेती करीत

असत त्याच प्रकारच्या नांगराने आतापर्यंत शेती करण्यांत आली. पण गेल्या शतकापासून यंत्रयुगाचा शोध लागल्यामुळे शेतीच्या पद्धतीमध्येंहि अलीकडे क्रांति होऊं लागलेली आपणांस दिसत आहे. हिंदुस्थानांत देखील ट्रॅक्टरने प्रवेश केला असून यापुढे त्याचेंच अधिराज्य आपल्या देशांत चालूं होईल असें दिसतें.

आपल्या भारतांत तर शेती हा प्रमुख धंदा आहे. आपल्या देशांतील बहुसंख्य लोक शेतीवरच प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणें उपजीविका करीत असतात. जवळ जवळ ८५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. म्हणूनच आपल्या राष्ट्राचें खरेंखुरें दर्शन घ्यावयाचें असेल तर आपणाला शेतकऱ्याकडेच पाहावें लागेल. राष्ट्राचें वैभव, सामर्थ्य व सौंदर्य आपणांला आधुनिक साधनांनी व सुखसोयींनी समृद्ध असलेल्या शहरांत न आढळतां तें खेड्यांतच दृष्टोत्पत्तींस येईल. हिंदी शेतकऱ्याचें जीवन म्हणजेच हिंदी राष्ट्राचें जीवन असें समीकरण सहज मांडतां येईल. शेतकरी म्हणजेच राष्ट्र असेंहि म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाही. 'शेतकरी सुखी तर राष्ट्र सुखी' असें म्हणतात तें याच कारणामुळे आणि म्हणूनच "हिंदी शेतकऱ्याच्या जीवना"चा विचार करणें अगत्याचें झालें आहे.

शेतकरी हा राष्ट्राचा प्राण असला तरी त्याच्या अंगांत कांहीच त्राण राहिलेला नाही. शेतकरी राष्ट्राचा कणा असला तरी त्याच्या पाठीचा कणा मात्र कष्ट, काळज्या आणि कर्जबाजारीपणामुळे पार वाकून गेला आहे. समाजाला अन्न पुरविणारा अन्नदाता शेतकरी मात्र अन्नान्नदशेला लागला आहे. कोणत्याहि खेड्यांत जाऊन, थोडा वेळ घालविल्यास कोणासहि ही परिस्थिति आढळून येईल. हिंदी शेतकरी म्हणजे दारिद्र्य, दैना, रोगराई, अज्ञान यांचा मूर्तिमंत पुतळा आहे असेंच शेतकऱ्यांच्या जीवनाचें थोडक्यांत वर्णन करतां येईल.

हिंदी शेतकऱ्याच्या ह्या स्थितीला काय कारणें आहेत व ती सुधारण्याचे उपाय कोणते यावर या ठिकाणीं जास्त खोलांत जाऊन विचार न करतां आपण फक्त त्यांच्या स्थितीचें थोडें जवळ जाऊन फक्त निरीक्षण

करूं या. हिंदुस्थानांतील शेतकऱ्याबद्दल ठळकपणें दिसणारी एक गोष्ट म्हणजे ही की, त्यांची शेतीची पद्धति जुनी व परंपरेने चालत आलेली आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांजवळ जमीनच नाही. दुसऱ्याच्या जमिनी लागवणीने अथवा खंडाने ते करतात आणि आपला उदरनिर्वाह करतात. अशा भूमिहीन शेतकऱ्यांचीच संख्या आज भारतांत जास्त आहे. ज्यांच्या-जवळ स्वतःच्या मालकीची जमीन असून जे स्वतः शेतीवर खपतात अशा शेतकऱ्यांची संख्या त्या मानाने कमी असून ती उत्तरोत्तर कमी कमी होत चालली आहे. ज्यांच्या जवळ जमीन आहे ते जमिनींत राबत नाहीत व जे अंगाने राबतात त्यांच्या जवळ स्वतःची जमीन नाही अशी परिस्थिति अगदी स्पष्ट दिसते. या भूमिहीन किसानांचा प्रश्न सोडविण्यासाठीच आचार्य विनोबा भावे यांनी भूदानयज्ञाच्या चळवळीला सुरवात केली आहे.

हिंदी शेतकऱ्यांचें दैनंदिन जीवन पाहिलें तर तें अत्यंत कष्टाचें व खडतर असलेलें दिसून येतें. भारतांतील बहुतेक सर्व शेतकरी निसर्गावर अवलंबून असतात. वरुणराजाच्या कृपेवरच त्यांचा धंदा अवलंबून असतो. भारतांत बहुतेक सर्व ठिकाणीं पावसाळा चार महिनेच असल्यामुळे हिंदी शेतकरी आपल्या जमिनींतून एकदाच पीक काढतो. पावसाळा आणि हिवाळा हे दोनच ऋतु मुख्यतः त्याच्या कामाचे. या आठ महिन्यांत त्याला रात्रंदिवस काम करावें लागतें. त्याला डोकें खाजविण्यालाहि फुरसत सांपडत नाही. हंगाम आटोपल्यानंतर त्याला विशेष काम नसतें. अशा वेळीं खेड्यांतील पुष्कळ लोक, विशेषतः मजूर, शहरांत येऊन कांही तरी दुसरा रोजगार पाहतात, आणि पेरणीच्या वेळेला पुनः खेड्यांत परत जातात. खेड्यांतील लोकांना हा जो अर्धवट फुरसतीचा व बेकारीचा वेळ मिळतो त्याचा सदुपयोग करण्याकरितां म्हणून महात्मा गांधींनी चरखा व ग्रामोद्योग यांना चालना दिली ती याच कारणामुळे.

शेतकऱ्याने कितीहि कष्ट करून पीक काढलें व तें घरांत आणलें तरी त्याला समाधान मिळत नाही. पिकाला भाव बरोबर आला नाही तर त्याचें पुष्कळ नुकसान होतें. पिकाचा भाव ठरविणें त्याचे हातीं नसतें. इंग्लंड-अमेरिका यासारख्या बाजारपेठांमध्ये येथल्या शेतकऱ्याचें नशीब ठरत असतें.

आर्थिक दृष्टया हिंदी शेतकऱ्याची परिस्थिति समाधानकारक नसल्यामुळे सांस्कृतिक व आरोग्य दृष्टयाहि त्याची परिस्थिति यथातथाच असते. शेतकऱ्याला मोकळी हवा, सूर्यप्रकाश व निसर्गाचा सहवास मिळत असल्यामुळे व तो अंगमेहनत करीत असल्यामुळे त्याचें शरीर काटक, धडधाकट व मजबूत असलें तरी, साथीच्या रोगामुळे आणि इतर रोगांपुढे तो टिकाव धरूं शकत नाही. कारण त्या ठिकाणीं सरकारी किंवा खाजगी दवाखाने नसतात व त्याला वैद्यकीय मदत मिळूं शकत नाही.

शिक्षणाच्या बाबतींतहि तीच परिस्थिती. शेतकऱ्याला आंगठा देण्यापलीकडे शिक्षण नाही की ज्ञान नाही. त्याच्या या अज्ञानाचा फायदा सावकार, अधिकारी वगैरे लोक घेऊन त्याला नागवितात हें सर्वांना माहीतच आहे.

शिक्षण, आरोग्य, दळणवळणाचीं साधनें, पाणीपुरवठ्याची सोय इत्यादि बाबतींत शेतकऱ्याची सुधारणा झाल्याशिवाय हिंदी राष्ट्राचें जीवन सुखी व संपन्न होणार नाही हें जाणून सामूहिक विकास योजनेसारख्या योजना सुरू झाल्या आहेत. भारत सरकारच्या पंचवार्षिक योजनेमध्येहि याच्याकडे जास्त लक्ष दिलें आहे. या योजनांना यश येवो आणि हिंदी शेतकरी सुधारण्याच्या मार्गाला लागो असेंच कोणाहि राष्ट्रप्रेमी मनुष्याला वाटेल यांत शंका नाही.

●

# ती रम्या नगरी !

अ. रा. सुसलादकर, बी. ए.,
औरंगाबाद.

'सा रम्या नगरी' म्हणून जी देवगिरी आपल्या कीर्तिसौरभानें एके काळच्या इतिहासप्रसिद्ध शहरांत वैभवशाली म्हणून गणली जात होती, ती देवगिरी आज अस्ताव्यस्तपणें धरणीवर कोसळली आहे. इतस्ततः पडलेले, फुटलेले, दुभंगलेले तिचे ते अवशेष पाहून मन उद्विग्न होतें. देवगिरीचा अजिक्य गड चढण्यास जेव्हा आपण आरंभ करतों तेव्हा अनेक स्मृति अंतरंगांत गोळा होतात. 'यदुवंशविलासु श्रीरामचंद्र' म्हणून ज्या रामराजाचा गौरव संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी ज्ञानदेवींतून केला त्या देवगिरीचें

त्या वेळचें स्वर्गतुल्य वैभव कसें असेल ह्या विचाराने मन कांही क्षण भूत-कालांत रमल्याशिवाय राहत नाही; पण हा गड जसजसा आपण वर चढून जातों आणि गडाचें जर्जर स्वरूप आपल्या दृष्टीला पडतें, तसतसें मात्र भूतकाळांत रमलेल्या आपल्या मनाला हादरे बसल्याशिवाय राहत नाही. वस्तुस्थिति जेव्हा आपण आपल्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहतों तेव्हा 'कालाय तस्मै नमः' असे उद्गार तोंडून निघाल्याशिवाय राहत नाहीत.

"श्रीमद्देवगिरी जनार्दनपुरी वैकुंठलोकापरी" असा देवगिरीचा पुरातन लौकिक आहे. यादवराजांच्या कारकीर्दीने देवगिरीवर वैभवाचा कळस चढविला. ज्ञानदेव-एकनाथादिकांच्या संतवाणीने देवगिरीचा भाग पुनीत झाला. जनार्दनस्वामींच्या प्रत्यक्ष सहवासाने देगगिरीचें अध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व कायमचें अमर झालें. यादवकालांतच हेमाद्रि आणि बोपदेव ही अजोड जोडी ह्याच देवगिरीच्या परिसरांत आपल्या कौशल्याने चमकून गेली. हेमाद्रि हा वास्तु व शिल्पसंशोधक असून मोडी लिपीचा जनक होता. तसेंच, पैठणच्या ब्रह्मवृंदांनी ज्ञानदेवादि भावंडांना दिलेलें शुद्धिपत्र बोपदेवाने ह्याच देवगिरीवर लिहिलें. ह्याच गडावर महानुभावपंथीयांना मराठी रचना प्रथम स्फुरली. देवगिरीच्या वैभव-कालांतच महानुभावांचे 'साती ग्रंथ' महाराष्ट्राला मिळाले; पण आज ह्या सर्व गोष्टी स्मृतिरूप झालेल्या आहेत. इतिहासांत जमा झालेल्या आहेत. एके काळची 'उभी असलेली ही भारतीय संस्कृति' आज प्रत्यक्षच 'दे माय धरणी ठाय' झालेली आहे.

ह्या पूर्वस्मृति जेव्हा आठवतात तेव्हा मन गोंधळतें. हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ किल्ल्यांत ह्या देवगिरीची गणना होते. ह्या किल्ल्याचा उभा खडक १५० फूट उंच आहे. एकूण किल्ल्याची टेकडी ६०० फूट उंच आहे. पिण्याच्या पाण्याची टाकी गडावरचे भागावर असून त्यांतील पाणी जिवंत आहे. हत्तीहौद, चांदमिनार, भारतमातेचें प्राचीन मंदिर, पंचरसधातूच्या मेंढा आणि दुर्गा तोफ ह्या गोष्टी पाहून मनुष्य थक्क होऊन जातो. 'बारादारी' म्हणून ओळखल्या जाणारा यादवांचा महाल अजून गडावर पूर्वीच्या वैभवाची साक्ष देत उभा आहे. किल्ल्याभोवती खंदक असून ते पूर्वी

पाण्याने पूर्ण भरलेले असत. ह्या खंदकाभोवती सात तट होते असें इतिहास सांगतो. ह्या तटांचे आंत अमरपुरीला लाजविणारी देवगिरी नगरी वसली होती. पण आज ती नगरी नामशेष झाली आहे. पूर्ववैभवाचे अवशेष म्हणून कांही मोडक्या इमारती तटांचे आंत दिसतात, एवढेंच. आजचें देवगिरी शहर (?) तटाबाहेर असून संख्येने क्षुद्र आहे. ज्या यादवांच्या काळांत सुवर्णकारांचीं तीनशें घरं देवगिरींत होतीं असें बोलल्या जातें त्याच देवगिरींत आज सोनाराचें एखादें तरी घर सापडेल किंवा नाही याची शंकाच आहे. गजान्तलक्ष्मी जिच्या पायाशी लोळण घेत होती अशी पूर्वीची देवगिरी गडाचे आंत वसली होती. जीर्ण अवशेषानं उभा असलेला किल्ला आपल्या गत-वैभवाची साक्ष आजहि आपल्याला देत आहे. फितुरी झाली नसती तर ह्रा किल्ला खरोखर अजिक्य राहिला असता; कारण सात तट ओलांडून शत्रूला आंत प्रवेश मिळणार. गडाचीं दारेंहि अजस्र व एकामागे एक अशीं नाहीत. लष्करी डावपेंच त्या ठिकाणीं पूर्णपणें दिसून येतात. प्रत्येक द्वारांतून आंत प्रवेश करतांक्षणींच शत्रूला तोफांच्या भडिमाराला बळी पडावें लागे. या माऱ्यांतूनहि शत्रू निसटून आला तर खंदकांत त्याला कायमची विश्रांति ठेवलेली; आणि चुकून यांतूनहि तो पुढे सरसावला तर अंध:कारमय आणि धोक्याच्या मार्गांतून त्याला आंत जावें लागे. कांही फसव्या वाटा अशा ठेवल्या होत्या की वर धगधगत्या तव्याच्या शेकाने शत्रू थंड ह्वेसाठी धडपडला की नेमका खोल खंदकांतच पडायचा. आज जेव्हा ही अजिक्य रचना आपण पाहतों तेव्हा ज्या बुद्धिसामर्थ्याने ह्रा किल्ला निर्माण केला ती विलक्षण बुद्धिमत्ता पाहून विज्ञानयुगांतील मनुष्यहि थक्क होऊन जातो.

एके काळीं वैभवांत नांदणाऱ्या आणि 'सोनेकी चिडिया' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या देवगिरीच्या ऐश्वर्याने लोभावून अल्लाउद्दिन खिलजी १२९० मध्ये दक्षिणेंत येऊन धडकला. पंचवीस दिवस किल्ल्याला वेढा पडला. फितुरी झाली. मिठाचीं पोतीं धान्याऐवजी भरल्या गेलीं. हा अजिक्य गड शत्रूनें सर केला. त्याचबरोबर स्वधर्म, स्वभाषा आणि स्वसंस्कृति ह्यांचा लोप झाला. सन १३३९ मध्ये महंमद बिन तघ्लग, दिल्लीची राजधानी हालवून

देवगिरी राजधानी बनविण्याच्या इराद्याने देवगिरीवर चाल करून आला. देवगिरीची अपार दौलत पाहून त्याने देवगिरीचें 'दौलताबाद' हें नांव ठेवलें. ज्या देवगिरीच्या झाडांना आणि पाषाणांना ज्ञानदेवांनी 'चिंतारत्नाची' उपमा दिली होती, दुधाच्या आहारावर ज्या देवगिरींतल्या द्राक्षांच्या वेली विकसित होत होत्या, मराठी भाषेचा सुगंध ज्या देवगिरीच्या परिसरांत दरवळला होता, त्या देवगिरीला परकीय सत्तेचा स्पर्श होतांच तिच्या ऐश्वर्याचे बुरुज धडाधड खाली कोसळून धरणीवर लोळूं लागले; धरणीवर उभा असलेला स्वर्ग कोसळून जमीनदोस्त झाला.

आज स्वातंत्र्याची मंगल पहाट उजळली आहे. प्रभातकालच्या किरण-स्पर्शाने देवगिरी पुनीत झालेली आहे. एके काळीं कुबेरऐश्वर्याला लाजविणारी पण आज गलितगात्र झालेली देवगिरी पाहिल्यानंतर पूर्वस्मृति जागृत होऊन मन विषण्ण होतें.

# स्त्री विभाग

# बालकमंदिरांची आवश्यकता

सौ. नलिनी भेलांडे
बी. ए., बी. एड्.
अध्यापिका, औरंगाबाद.

" तुम्ही तुमच्या बाळाला बालकमंदिरांत कां नाही पाठवत ? "

" अं, एवढी फी कोठून भरायची ? आणि जरूर तरी काय आहे त्या बालकमंदिराची ? कांही शिकवत नाहीत. नुसतं खेळायला शिकवितात. आम्हाला येतात आमचीं मुलं सांभाळायला. "

मध्यम वर्गातल्या एका साधारण शिक्षित महिलेचे वरील उद्गार ऐकून मी बरीचशी सर्द झालें. खरेंच का बालकमंदिरें अनावश्यक आहेत? कोणताहि शिक्षणतज्ज्ञ व मानसशास्त्रज्ञ हेंच उत्तर देईल की बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी बालकमंदिरें अत्यंत आवश्यक आहेत. आज प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता जगन्मान्य झाली आहे. सुधारलेल्या देशांत तें सक्तीने व मोफत देण्यांत येत आहे. पण जीवनाचा पाया असलेल्या पूर्वप्राथमिक शिक्षणाकडे मात्र अजून समाज दुर्लक्ष करतांना दिसतो. याचें कारण एकच की अडीच ते सहा या काळांतील बालकाला शिक्षणाची, वळण लावण्याची आवश्यकता आहे हेंच अजून लोकांना पटत नाही. दुसरें कारण म्हणजे हीं चिमुरडीं मुलें शिकणार तरी काय हा एक प्रश्न पुष्कळांच्या पुढे उभा राहतो. साधारणतः बालकमंदिरामध्ये २॥ ते ६ वर्षांचीं मुलें असतात. सहा वर्षेपर्यंत बालक आपल्या जीवनाचा विकास निसर्गाने दिलेल्या अंतःप्रेरणेनुसार करीत राहतें; किंबहुना या अंतःप्रेरणेचा हेतूच असा असतो की बालकाने सारखे यत्न करून स्वतःचा विकास करून घेतला पाहिजे. बालकाच्या आयुष्याचा हा सुरवातीचा कालखंड फार महत्त्वाचा आहे. कारण या काळांत बालमनावर उठणारे ठसे फार परिणामकारक असतात. मॉंटेसोरीने या कालखंडाला रचनात्मक किंवा संवेदनाक्षम कालखंड ( Constructive Age ) हें नांव दिलें आहे. या काळांत बाळाला पुढील आयुष्याला पोषक असें वळण लावण्याचें महत्त्वाचें काम करावयाचें असतें.

दोन ते अडीच वर्षांच्या बालकाच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला घराचें मर्यादित क्षेत्र कमी पडतें. त्याला आता घराची ओळख झालेली असते; आणि आता तें घरापासून थोडा वेळ तरी दूर जाऊं लागतें. घरांतून अंगणांत आल्यावर त्याला इतर मुलांत मिसळावें व खेळावें लागतें. यांतूनच त्याच्या भावी समाजजीवनाचा पाया घातला जातो. या काळांत जर बालक आईला चिकटून राहिलें तर तें जगाला भिऊं लागतें व एकलकोंडें होतें. या वेळींहि त्याचें भाषा शिकण्याचें काम चालू असतेंच. याशिवाय त्याच्या कर्मेंद्रियांचा विकास होत असतो. इतर मुलांबरोबर खेळणें, उड्या मारणें, लोंबकळणें, घसरणें, वाळूशीं खेळणें या सर्वांतून तें आपल्या स्नायूंचा उपयोग करण्यास शिकत असतें; आणि या त्याच्या क्रियाशीलतेला स्वयंपाकघरापासून बाहेरच्या फाटकापर्यंत कोणतीच गोष्ट पुरत नाही.

कर्मेंद्रियांप्रमाणे ज्ञानेंद्रियेंहि या काळांत अधिक संस्कारक्षम होतात. बालकाची जिज्ञासा वाढूं लागते. त्याला या जगांतलें सर्वच नवें. सर्व पाहायला, उचलायला, हात लावायला बालक धावतें. ज्ञानेंद्रियांच्या मदतीने जगाचें आकलन करून घेण्याचा तें प्रयत्न करतें.

आणि आपण मोठीं माणसें मात्र आपल्याच सोयीगैरसोयींचा विचार करीत असतों. बालकावर आपण बंधनांवर बंधनें घालीत असतों. निसर्ग त्यांना गप्प बसूं देत नाही, निष्क्रिय राहूं देत नाही. आपण त्यांना काम देत नाही. या वेळीं आपण हें विसरतों की बालकाचा स्वभाव त्याच्या कृतीने व जिज्ञासातृप्तीने बनत असतो. त्याची जिज्ञासा मारली, त्याला त्याच्या कलाप्रमाणे कांही करूं दिलें नाही तर तें स्वतः होऊन कोणतेंच काम करणार नाही. त्याच्या सहजप्रवृत्तींचा योग्य विकास होणार नाहीं. तें भित्रें, उद्धट व चिडकें होईल.

हें ज्यांना कळतें असे म्हणजे सुशिक्षित आईबाप असले तरी चोवीस तास आईबापाजवळ राहून मुलें कंटाळतात. २ ते ६ वर्षांच्या काळांतील त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीला अनुकूल वातावरण, साधनें व त्याच कामाकरिता नेमलेल्या पण आईची जागा घेणाऱ्या, पण आईपेक्षा जरा दूरच्या अशा व्यक्तीच्या देखरेखीची आवश्यकता आहे. मुलाला ज्या ठिकाणीं बाहेर

पाठवावयाचें तें ठिकाण सुरक्षित हवें; पण त्याचबरोबर या ठिकाणीं मुलांना इतर मुलांत मिसळण्याची संधि मिळाली पाहिजे. मात्र ही संगत चांगली पाहिजे. जगाचा परिचय करून घेण्याची जिज्ञासा तृप्त होईल अशी साधन-सामुग्री व ती घेऊन खेळण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असलेली जागा आवश्यक आहे. या सर्व वस्तु आपल्यासाठी आहेत असें बालकांस वाटलें पाहिजे. बालकाच्या सळसळणाऱ्या क्रियात्मकतेला व विकासाला मुबलक वाव देणारी जागा म्हणजे बालकमंदिर होय. बालकाच्या शारीरिक व मानसिक गरजांनुसार योजना करण्यांत आलेली ही जागा अनावश्यक कशी म्हणतां येईल ?

बालकमंदिर हें घर व शाळा यांच्यामधील साखळी आहे. घरांतील 'घरपण' व शाळेंतील 'शाळापण' यांचा सुंदर मिलाफ या ठिकाणीं झालेला असतो, आणि या ठिकाणींच बालकाच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास साधावयाचा असतो.

प्रत्यक्षांत हीं बालकमंदिरें सोयीचीं वाटतात. विशेषत: टीचभर मोकळी जागा मिळणें मुष्किल असलेल्या शहरांत आणि नोकरीसाठी बाहेर जाणाऱ्या गृहिणीला दिलासा देण्यास बालकमंदिराची फार गरज आहे. ज्या काळांत चांगल्या व वाईट जीवनाचा पाया घातला जातो त्या काळांत त्यांचा योग्य विकास करणारीं बालकमंदिरें अत्यंत आवश्यक आहेत, आणि तीं सार्वत्रिक करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

●

# स्त्रीशिक्षण

कु. विमल शुक्रे, बी. ए.
अध्यापिका, नांदेड.

'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' ही कल्पना पेशवाईकालांत अधिक दृढ झाली. 'चूल आणि मूल' हें स्त्रियांचें ध्येय ठरून गेलें; परंतु ब्रिटिश राजवट भारतांत सुरू झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणाचा प्रसार सर्वदूर झाला. शिक्षणासंबंधीचे दृष्टिकोण बदलत गेले. स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाला महाराष्ट्रांत ज्वलंत स्वरूप प्राप्त झालें. स्त्रीशिक्षणासंबंधीं निरनिराळ्या पक्षोपपक्षांत मतभेद होऊन बरेच दिवस नियतकालिकांना एक चांगला विषय चर्चेला

मिळाला होता. सामाजिक कार्यकर्ते, राजकारणधुरंधर व त्या काळांतील प्रथितयश साहित्यिक ह्या सर्वांनी स्त्रिशिक्षणावर सभासंमेलनांतून आणि वर्तमानपत्रांतून साधकबाधक चर्चा करून स्त्रीशिक्षणाची महती लोकांना पटवून दिली. आज विसाव्या शतकांत हजारो स्त्रिया उच्च पदव्या मिळवीत असतांहि तो प्रश्न शिल्लक राहिलाच; कारण ज्यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घातला त्यांच्या अपेक्षा आजच्या शिक्षणाने पुऱ्या होऊं शकत नाहीत; आणि म्हणूनच आता पुन्हा त्याचा फेरविचार करावा लागत आहे. त्या दृष्टीने स्त्रीशिक्षणाचा प्रश्न कसा व केव्हा निर्माण झाला ह्याचा थोडासा इतिहास पाहणें आवश्यक आहे.

स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत विचार केल्यास तें तीन अवस्थांतून प्रगत झाल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. अति प्राचीन किंवा पौराणिक कालांत स्त्रियांना अत्यंत उच्च दर्जाचें स्थान दिलें जात असे. त्या सर्व विद्या व सर्व कलांनी परिपूर्ण असत. इतकेंच नव्हे तर 'ब्रह्मचर्येण कन्या युवान् विन्दते पतिम्' म्हणजे ब्रह्मचर्येच्या काळांत मुलींना योग्य शिक्षण मिळाल्यास तिला योग्य असा पति मिळतो अशी त्या काळची दृढ समजूत होती. यज्ञयागादि पवित्र कर्में देखील स्त्रीवांचून त्या कालांत होत नसत. राजदरबारांत व न्यायालयांत तिला न्यायदानाचा व मतदानाचा हक्क होता. सीता, सावित्री इत्यादि स्त्रियांच्या उदाहरणांवरून तिला स्वयंवराचाहि पूर्ण अधिकार होता हें स्पष्ट दिसतें. एकूण, प्राचीन कालांत स्त्रीची सर्वांगीण उन्नति झाली होती.

त्यानंतर मध्ययुगीन कालांत स्त्रियांच्या ह्या अत्यंत उन्नत अवस्थेला एकदम ओहोटी लागली. तिच्या शैक्षणिक, मानसिक व इतर सर्वच गोष्टींना एक जबरदस्त कलाटणी मिळाली. स्त्री सर्वस्वी गुलाम बनली. इतकेंच नव्हे तर मनूने स्त्रियांसाठी अनेक तऱ्हेचे निर्बंध घालून दिले. पुरुषी प्रभावापुढे व हुकूमशाहीपुढे ती निस्तेज व फिकी बनूं लागली. आमच्या धर्ममार्तंडांनी तिला घरांत डांबून ठेवलें; आणि ह्या सर्व परिस्थितीचा विपरीत परिणाम तिच्यावर होऊन मानसिक दौर्बल्याचा व हीनत्वाचा न्यूनगंड तिच्यांत कायमचा रुजला गेला. 'अष्टावर्षा भवेत् कन्या' ह्या नियमाने मुलगी आठ वर्षांची होत नाही तोंच विवाह व पर्यायाने वैधव्याचे आघात तिला

सहन करावे लागले. सुटकेचा मार्ग न सुचल्यामुळे किंवा पुरेसें पाठबळ न मिळाल्यामुळे ती पूर्णपणाने पुरुषांच्या 'पायाची दासी' बनली. 'चूल नि मूल' हेंच एक क्षेत्र तिला दिसूं लागलें. पुरुषांच्या दडपशाहीमुळे तिच्या अंगच्या अभिजात कला मारल्या गेल्या.

पण काळाचा ओघ एकसारखा पुढे धावत असतो. त्या नियमानुसार स्त्रियांच्या ह्या दास्यशृंखलांतून ह्या अर्वाचीन युगांत तिची सुटका करण्यासाठी अनेक महाभाग पुढे सरसावले. महात्मा ज्योतीबा फुले, देवल, आगरकर, महात्मा गांधी, हरीभाऊ आपटे, पूज्य अण्णासाहेब कर्वे, मामा वरेरकर इत्यादि निरनिराळ्या क्षेत्रांतल्या थोर व्यक्तींनी निरनिराळ्या स्वरूपांत स्त्रियांच्या उद्धाराचा प्रश्न हाताळला.

'जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगातें उद्धारी' ह्याची सार्थकता पटून स्त्रीशिक्षणाला पायंडा घालण्याचें सर्वश्रेष्ठ कार्य महात्मा फुले यांचेंच. इ. स. १८५१ सालीं पुण्याला मुलींची शाळा काढून समाजाच्या तीव्र विरोधाला न जुमानतां स्त्रीशिक्षणाचा प्रसार करून देण्याचा मान कै. महात्मा ज्योतीबा फुले यांचाच आहे. त्यानंतर कै. आगरकरांनी आपल्या अनेक सामाजिक लेखांतून स्त्रियांच्या सुधारणेची सत्यता पटवून दिलेली आहे. कै. हरीभाऊ आपटे यांनी 'पण लक्षांत कोण घेतो' ह्या कादंबरींत तर व्यसनी पुरुष स्त्रियांचा कसा अमानुष छळ करतो ह्याचें हृदयद्रावक चित्र रेखाटलें आहे. समाजांतील राक्षसी रूढीला बळी पडून असहाय झालेल्या बालविधवांवर ओढवलेला प्रसंग त्यांनी ह्या कादंबरींतून चित्रित केलेला आहे. 'यमुना' हे हरीभाऊंनी निर्माण केलेलें पात्र प्रातिनिधिक स्वरूपाचें झालेलें आहे. त्यानंतर जरठकुमारीविवाह ह्या प्रश्नावर आधारलेल्या कै. देवल यांच्या 'शारदा' नाटकाने नवमतवादी लोकांचेंच नव्हे, तर पुराणमताभिमान्यांचें अंतःकरण काबीज करून घेतलें होतें. बहुजनसमाजाला सत्यता पटेल असा 'शारदा' नाटकाचा प्रभाव होता. मामा वरेरकरांनीहि आपल्या 'विधवा कुमारींतून' स्त्रियांची शोचनीय अवस्था रंगविली आहे. परंतु स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी व उन्नतीसाठी आपली संपूर्ण हयात जर कोणी खर्च केली असेल तर ती पूज्य अण्णासाहेब कर्वे

यांनी. स्त्रियांच्या प्रश्नांसाठीच कर्वे यांनी आपलें आजपर्यंतचें जीवन झिजविलें आहे. अनंत यातना सोसल्या, पण स्त्रियांच्या उद्धाराचें काम तडीला नेलें. त्यांनी स्थापलेल्या हिंगण्याच्या संस्थेंतून आजपर्यंत हजारो स्त्रियांचें जीवन पवित्र करण्याचें पुण्यकर्महि त्यांनी केलेलें आहे. अपूर्व त्याग, आंतरिक तळमळ, स्त्रीजीवनासंबंधीं अनुकंपा, कार्याची अखंडता या दृष्टीनें पूज्य अण्णासाहेबांची कामगिरी अद्वितीय आहे. महात्मा गांधींनीहि राजकारण सांभाळूनहि ह्या प्रश्नाला हातभार लावला आहे.

गेल्या पाऊण शतकांत स्त्रियांचा उद्धार व्हावा, त्यांची शैक्षणिक प्रगति व्हावी म्हणून ज्यांनी झीज सोसली त्यांच्याच कार्याचीं मधुर फळें आम्ही आज चाखीत आहोंत. समाजांत स्त्रियांना आज मानाचें स्थान मिळूं लागलें आहे. कोणत्याहि क्षेत्रांत स्त्री पुरुषाच्या मागे राहिली नाही. जुन्या रूढींना झुगारून देऊन ती पुढे चालली आहे. आर्थिक दृष्टीने ती पूर्ण स्वावलंबी बनत आहे. इतकेंच नव्हे तर राजकारण आणि सामाजिक क्षेत्र तिला अपुरें वाटूं लागलें आहे. विजयालक्ष्मी पंडित आणि कै. सरोजिनी नायडू ह्या स्त्रिया तर आंतरराष्ट्रीय कीर्तीला चढल्या आहेत; पण इतकंहि असलं तरी स्त्रीशिक्षणाचा प्रश्न अजून कायम राहिला आहे व त्याला अनेक कारणें आहेत. वैचारिक भूमिकेवरून पाहतां आजची स्त्री जरी सुशिक्षित ठरली, तरी तिला हल्ली मिळणारें शिक्षण पोषक आहे किंवा नाही हा प्रश्नच आहे. आज तिला मिळणारें शिक्षण पुस्तकी ज्ञानापलीकडे तिच्या ज्ञानांत कांहीच भर घालीत नाही. तें केवळ व्यावहारिक ज्ञान आहे. परंतु स्त्री ही समाजाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ती आदर्श गृहिणी, उत्तम माता व स्फूर्तिदेवता आहे. ह्या दृष्टीने तिच्यावर दुहेरी वा तिहेरी जबाबदारी आहे. आजच्या शिक्षणाच्या तालमींत तयार झालेली स्त्री वरील सर्व जबाबदाऱ्या पार पाडायला समर्थ आहे काय ? तर ' नाही ' हेंच उत्तर नाइलाजाने द्यावें लागेल.

पाश्चात्य देशांत स्त्रीशिक्षणांत वरील तिन्ही अंगांचा समावेश होतो. तिला गृहशास्त्र, आजाऱ्याची शुश्रूषा, शरीरसंगोपन व शिशुसंगोपन इत्यादि विषयांचें संपूर्ण ज्ञान दिलें जातें. पण आपल्या देशांत हे विषय दुर्लक्षिले

जातात. ह्याचा अर्थ असा नव्हे की तिने 'चूल नि मूल' हेंच ध्येय आपल्यापुढे ठेवावें. परंतु तिच्या गृहक्षेत्रांत मात्र त्यांची आवश्यकता आहे ह्यांत संशय नाही. त्याशिवाय संगीत, नृत्य, चित्रकला, इत्यादि कलांचा विकास करण्यास तिला समाजाने वाव दिला पाहिजे. कित्येक स्त्रिया आर्थिक सामर्थ्य नसल्यामुळे इच्छा असूनहि प्रगति करून घेऊं शकत नाहीत. त्याकरिता शिवणकाम, भरतकाम, वगैरे घरगुती धंद्यांचें दालन तिच्याकरता उघडण्यांत आलें पाहिजे.

हल्ली हजारो स्त्रिया उच्च पदवी प्राप्त करून बाहेर पडतांना दिसतात. म्हणजेच त्या आजच्या अर्थाने 'सुशिक्षित' झालेल्या असतात. पण त्यांच्यापैकी किती स्त्रिया आपल्या समाजांतील मागासलेल्या स्त्रियांच्या कल्याणासाठी झटतात? मुलगी एकदा उच्च पदवी घेऊन बाहेर पडली की ती स्वतःचें जीवन स्थिर करण्याच्या पा मागे लागते. मग आपल्या डोळ्यांसमोर होणाऱ्या एका प्रवाहपतित स्त्रीची करुण कहाणी ऐकण्याची तिला फुरसत नसते. ती स्वतःपुरतेंच एक निराळें क्षेत्र निर्माण करून त्यांतच रममाण होते. हिंदुस्थानांत अजून किती स्त्रिया निरक्षर आहेत, आपली सामाजिक परिस्थिति काय आहे, किंवा अजूनहि स्त्रियांचें जीवन कसें कष्टप्रद आहे ह्याचा विचार तिच्या मनाला कधीच स्पर्श करीत नाही. उलट अशा प्रश्नांची ती हेटाळणी करते. ह्या सर्वाला कारण तिची संकुचित वृत्ति होय. ह्या सगळ्या प्रश्नांकडे तिने विशाल दृष्टिकोनांतून पाहावयास शिकलें पाहिजे; व त्या दृष्टीने आपली भूमिका ठरविली पाहिजे. आपल्या शिक्षणाचा फायदा इतर स्त्रियांचें अज्ञानपटल दूर सारून देण्याकडे तिने केला पाहिजे; आणि जर आपल्या समाजांतील सर्वच सुशिक्षित स्त्रियांनी हे राष्ट्रोद्धाराचे प्रश्न हातांत घेण्याचा विडा उचलला तर महात्मा गांधींचें 'रामराज्याचें स्वप्न' मूर्त स्वरूपांत यायला कितीसा उशीर लागणार?

# स्त्रिया आणि आर्थिक स्वातंत्र्य

सौ. तारा परांजपे बी. ए.
अध्यापिका
शालीभांडार विद्यालय, हैदराबाद

आज ह्या लोकशाही युगांत सारें जग अनेक प्रकारच्या स्वातंत्र्याच्या घोषणांनी निनादून गेलें आहे. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राची नवीन घटना प्रथम भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य आणि अशाच प्रकारच्या अनेक स्वातंत्र्यांचा पुरस्कार करते. या सर्व हक्कांत मानवाच्या दैनंदिन जीवनाशीं अत्यंत निगडित असा जर कोणता मूलभूत हक्क असेल तर तो म्हणजे आर्थिक स्वातंत्र्याचा. लोकशाहीप्रधान राष्ट्रें या हक्काची अत्यंत जागरूकतेने जपणूक करतात. या हक्कांत स्थूलमानाने अर्थार्जन करण्याचा, त्याच्या सुरक्षिततेचा व करारमदारांचा हक्क येतो. आपल्या भारताने स्त्रीला समाजाची 'स्वतंत्र घटक' म्हणून मानलें आहे; आणि अर्थातच इतर अनेक नागरिक हक्कांबरोबर आर्थिक स्वातंत्र्याचाहि हक्क तिला मिळालाच आहे. प्रश्न एवढाच राहतो की आजच्या सामाजिक परिस्थितींत ती त्या हक्काची अंमलबजावणी करूं शकते काय? त्यासाठी तिला कोणकोणत्या सवलतींची आवश्यकता आहे? आणि याचें उत्तर पाहण्यासाठी आपणांस प्रथम गतेतिहासाच्या पार्श्वभूमीचें सिंहावलोकन करावें लागेल.

भारताच्या अति प्राचीन इतिहासकाळीं म्हणजे वैदिक काळांत स्त्री स्वत: जरी अर्थार्जन करीत नव्हती तरी तिला भरपूर आर्थिक स्वातंत्र्य होतें असें आपल्याला ऋग्वेदांतील अनेक ऋचांवरून दिसून येतें. नवविवाहिता वधू जेव्हा गृहप्रवेश करी तेव्हा ती 'गृहस्वामिनी' म्हणूनच. तिला जो उपदेश केला आहे त्यांत "तूं या गृहाची स्वामिनी हो, सासूसासऱ्यांची सेवा कर आणि साऱ्या घरावर अधिकार गाजव" असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणे वधूपसंती करतांना तिच्या गुणदोषविवेचनांत ती "व्यवहारक्ष व हात राखून खर्च करणारी असावी" असें म्हटलें आहे. त्यावरूनहि घरांतील खर्चाचा सर्वाधिकार तिच्याच हातीं होता असें दिसून येतें. पण मनुस्मृति आली आणि तिने स्त्रीस्वातंत्र्यालाच मुळी सुरुंग लावला. "पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने । रक्षन्तिस्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति"

ह्या श्लोकाने पुरुषाच्या एकतंत्री राज्याची द्वाही फिरविली व " अष्ट वर्षा भवेत् कन्या " म्हणून आठव्या वर्षी कन्यादान करावयास लावून या राज्याच्या सनदेवर शिक्कामोर्तब केला.

मुसलमानी राजवटींत तर हिंदी स्त्री 'असूर्यपश्या' बनली. ती स्वतःच संपत्तीचा एक भाग समजली जाऊं लागली. राजेरजवाडे निर्जीव खंडणीबरोबर सजीव कन्याभगिनींनाहि शत्रूंच्या हवाली करून तह करूं लागले; आणि तेव्हापासून स्त्रीला गुलामापेक्षाहि हीन असें जीवन जगावें लागलें.

ब्रिटिशांच्या राजवटीने मात्र भारताच्या इतिहासांत नवें पर्व सुरू झालें. इंग्रज येथे आले; आणि त्यांनी जाहीर केलें की 'एतद्देशीय लोकांना शाहणे करून सोडायचें ?' इंग्रजी शिक्षणपद्धतीमुळे आपल्याभोवतीचे जुन्या विचारप्रणालीचे, आचारविचारांचे आणि अंधश्रद्धेचे कोट धडाधड ढासळून पडूं लागले. इंग्रजांनी पाजलेलें " वाघिणीचें दूध " पिऊन आचारप्रधान धर्मामुळे शेळपट झालेली जनता वाघाच्या शौर्याने आणि क्रौर्यानेहि दुष्ट रूढींवर तुटून पडली. या साऱ्या घालमेलींतूनच स्त्रीच्या उद्धाराचा प्रश्न घसास लागला. ज्योतिबा फुले, आगरकर, न्या. रानडे, पू. अण्णासाहेब कर्वे इत्यादि सुधारकाग्रणींनी स्त्रीशिक्षण, प्रौढशिक्षण, विधवाविवाह वगैरे अनेक स्त्रीजीवनविषयक प्रश्न हातीं घेतले. अनेक सुधारणा, कधी गोड बोलून, कधी रागावून आणि प्रसंगीं कायद्याचाहि आधार घेऊन लोकांच्या गळीं उतरविल्या. राजा राममोहनराय यासारख्या धुरीणांना सतीबंदीचा प्रश्न कायद्याचा आश्रय घेऊनच सोडवावा लागला. या सर्व सुधारणांतूनच स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण झाला.

टिळक–आगरकर युगांत वरील सर्व प्रश्न प्रामुख्याने नव्हे, तर पूर्णतया मध्यमवर्गीय स्त्रीचेच प्रश्न होते! तसाच आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्नहि मध्यमवर्गीय स्त्रीपुरताच मर्यादित आहे; कारण अगदी खालच्या वर्गांत स्त्री अर्थार्जन करतेच. तरीहि ती आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र आहे की नाही, नसल्यास काय उपाय योजावेत हा एक स्वतंत्र विषयच होऊं शकेल. आपल्यापुढे प्रामुख्याने मध्यमवर्गीय स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न आहे

सुधारकांच्या प्रयत्नाने स्त्रीला शिक्षण मिळालें. तिचा विवाह योग्य वयांत होऊं लागला. तिला तिचे स्वतःचे विचारहि बोलतां येऊं लागले. पण. . . ; पण एक पैसा खर्च करावयासहि तिला पुरुषाची परवानगी पाहिजे यांतूनच तिला आर्थिक स्वातंत्र्याची आस लागली.

दुसरें अत्यंत महत्त्वाचें आणि परिस्थितींतून निर्माण झालेलें कारण म्हणजे एकत्र कुटुंबपद्धतीचा ऱ्हास होय. जरी भारत आजहि शेतकीप्रधान असला तरी इथे इंग्रजी राजवटीने आगगाडी आणून यंत्र–युगाची सुरुवात करून दिली. इंग्रजांनी त्यांच्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे त्यांची राजवट यशस्वी करण्यासाठी बरेचसे 'कारकून' निर्माण केले; आणि त्याची परिणती शहरें वाढण्यांत व पर्यायाने मोठमोठीं एकत्र कुटुंबें मोडण्यांत झाली. पूर्वी म्हाताऱ्या बायका असें म्हणत की, मुलगी अशा घरांत द्यावी की जिथे तिचें चित्राहुती खाऊनहि पोट भरेल. याचाच अर्थ असा की एकत्र कुटुंबांत जर एखादीवर दुर्दैवाचा घाला आलाच तर तिची सहज गुजराण व्हावी. पण जसजशीं शहरें वाढलीं, कुटुंबें लहान झालीं आणि घरच्या धान्याऐवजी महिन्याच्या पगाराकडे डोळे लागले तसतसें एक माणूसहि पोसणें लोकांना जड जाऊं लागलें. यामुळेच मध्यमवर्गीतील विधवा प्रथम गरज म्हणून नोकरींत शिरली. त्यानंतर मध्यमवर्गाची स्थिति दिवसानुदिवस अधिकाधिक हलाखीची होत चालल्याने हळूहळू स्त्रिया अधिक प्रमाणांत द्रव्यार्जन करूं लागल्या. दुसऱ्या महायुद्धाने तर अशी परिस्थिति नि णि केली की प्रत्येक कार्यालयांत सूटबुटांच्या बरोबरीने रंगीबेरंगी साड्या दिसूं लागल्या.

स्त्रियांनी नोकरी केल्याने कुटुंबाला आर्थिक सहाय्य होतें, स्त्रीची अस्मिता वाढते आणि पर्यायाने देशाची संपत्ति वाढते असे अनेक फायदे दिसत असूनहि या प्रश्नावर एवढीं रणें कां माजतात ? सध्याच्या सामाजिक परिस्थितींतच कांही दोष असल्याने स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य–नोकरी करणें– हा टीकेचा विषय बनला.

महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सौ. कमलाबाई फडके यांनी आपल्या एका लेखांत नमूद केल्याप्रमाणे स्त्रीने नोकरी केल्याने बेकारी वाढते. आपला देश उद्योगधंद्यांच्या बाबतींत इतर देशांच्या मानाने खूपच मागासलेला

आहे. त्यामुळे आधीच कमी असलेल्या नोकऱ्यांमधून पुष्कळदा पुरुषांपेक्षा स्त्रियांचीच निवड होते आणि पुरुष बेकार बनतात. अर्थात् स्त्रियांना नोकरीवरून कमी करणें हा ह्यावर उपाय नसून देशांतील उद्योगधंदे वाढविल्यानेच हा प्रश्न सुकर होईल.

नोकरी केल्याने स्त्रीच्या आरोग्यावर फार परिणाम होत असल्याने डॉ. म्हसकरांसारखे विचारवंतहि स्त्रियांनी नोकरी करण्याच्या विरुद्ध आहेत. पिढ्यान्‌पिढ्या मध्यमवर्गीय स्त्रीचें कार्यक्षेत्र 'चूल अन् मूल' हेंच ठरून गेलेलें असल्याने आपला समाज तिच्याकडून या क्षेत्रांत झालेली एखादी लहानशी चूकहि क्षम्य मानीत नाही. स्त्रीलाहि जात्याच त्याची आवड असल्याने ती त्यांत जास्तीत जास्त लक्ष देते. याचा परिणाम म्हणजे एकतर ती नोकरींत चांगलें काम करूं शकत नाही, किंवा सर्वच करण्याची धडपड करून आरोग्य गमावून बसते. तिची व तिच्या मुलांची आबाळ झाली तर साऱ्या राष्ट्रालाच तें धोक्याचें आहे. यावर एक उपाय असा सुचवितां येईल की नोकऱ्या कमी वेळाच्या म्हणजे Part time असाव्यात. दुसरें म्हणजे पाश्चात्य देशांप्रमाणे मुलांसाठी 'क्रेचेस नर्सरी स्कूल्स' वगैरेची सोय असावी. आधुनिक यंत्रसामुग्रीचा तिला घरांत भरपूर उपयोग घेतां येण्याइतकी देशाची आर्थिक परिस्थिति सुधारली पाहिजे.

मध्यंतरी कांही विचारवंतांनी स्त्रीला घरांतील कामाचा मोबदला देऊन आर्थिक दृष्टया स्वतंत्र करावें असे विचार मांडले. ज्यांना खरोखरीच स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य द्यावयाचें असतें ते कामाचा मोबदला म्हणून थोडेसे पैसे स्त्रीच्या हातांत न देतां सर्वच पैसा तिच्या हातीं देतात; आणि तीहि तितक्याच दक्षतेने खर्च करते; आणि ज्यांना नुसता आभासच निर्माण करावयाचा असतो ते दिलेला मोबदला परतहि घेऊं शकतात. तेव्हा हा प्रश्न व्यक्तिनिष्ठ असल्यामुळे सर्व समाजाचा यांत विचार केला जाणार नाही.

कायद्याच्या दृष्टीने जर पाहिलें तर आज हिंदु स्त्रीला काडीचेंहि आर्थिक स्वातंत्र्य नाही. तिला ना वडिलांच्या मालमत्तेंत हक्क ना पतीच्या. मुसलमान स्त्रीला लग्नाच्या वेळीं वडिलांनी दिलेल्या हुंड्याच्या रकमेचा तरी आधार असतो; पण आपल्यांतला हुंडा मात्र पतिराजांच्याच खिशांत

पडतो. यासाठी कायद्यांत तिच्यासाठी थोडी तरतूद हवी, आणि समाधानाची गोष्ट म्हणजे हिंदु कोड बिल ती करीत आहे.

महात्मा गांधींच्या तत्त्वाप्रमाणे प्रत्येकाला ' भाकरीसाठी श्रम ' करणें भाग आहे. तेव्हा स्त्रीने नोकरी करणें आजच्या परिस्थितींत अपरिहार्य आहे. आजची आर्थिक परिस्थितीच तिला नोकरी करावयास लावते.

सारांश, देशांतले उद्योगधंदे वाढून सामान्यांतल्या सामान्य स्त्रीलाहि घरकामांत जास्तींत जास्त यंत्रसामुग्री वापरतां येण्यासारखी आर्थिक पातळी उंचावून, मुलें ही राष्ट्राची संपत्ती समजून, सर्व राष्ट्रच ज्या वेळेस मुलांची काळजी घ्यावयास लागेल त्या वेळेस स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल आणि त्याच वेळीं हिंदी स्त्रीच्या भाग्याबरोबर भारताचेंहि भवितव्य उजळेल.

●

# माझी शाळा

कु. उषा गोडबोले
बी एस्‌सी., अमरावती.

माझेपणांत काय जादू असेल ती असो; परिसाचा स्पर्श होतांच लोहाचें देखील सोनें होतें, तद्वतच ' माझा ' हा स्पर्श ज्या वस्तूला होईल त्या वस्तुसंबंधीं अपार आपुलकी आपल्याला वाटं लागते. आज मी महाविद्यालयाच्या ' यक्षभूमींत ' वावरत आहे; पण ज्या शाळेंत मी वयाचीं सतत सात वर्षे काढलीं, ज्या ठिकाणीं माझ्या मनावर संस्कार रुजले, महत्त्वाकांक्षेचं संगोपन आणि संवर्धन ज्या ठिकाणीं झालं त्या माझ्या विद्यालयासंबंधीं मला अधिक आदर वाटतो; प्रेम वाटतें. शाळेवरून जरी मी गेलें तरी बालपणच्या आठवणींचा एक मनोरम चित्रपट माझ्या दृष्टीपुढून सरकतो. त्या स्मृतिरूप चांदण्यांत रमतांना माझ्या मनाला हुशारी वाटते; मन आनंदानं फुलतं आणि ज्या माझ्या गुरुजनांनी आपल्या अतुल त्यागानं, परिश्रमानं, प्रेमानं आणि शुद्ध चारित्र्यानं विद्यार्थ्यांना ज्ञानामृत आणि बोधामृत पाजऊं त्या गुरुजींचा आठव होतांच माथा आदरानें लवतो. गुरुजनांच्या चरणकमलीं आदरांजली अर्पण करण्यांत मला धन्यता वाटते.

तसं पाहिलं तर माझी शाळा इतर शाळेप्रमाणे भव्य नाही. आजच्या शिक्षणतंत्राला अनुसरून शाळेची बांधणी नाही. इमारत अगदी साधी. मैदानाच्या मध्यभागीं पिंपळाचा पार आहे; आणि जवळच एक निंबाचें झाड आहे. दोन्ही झाडांची छाया अगदी गर्द असते. ह्याच निंबाच्या झाडाखाली फावल्या वेळांत आम्ही विसावा घेत होतों. कॉलेजांत असणारी फुलांची आकर्षक बाग इथं नाही. पण ह्या झाडांच्या गर्द छायेचं आकर्षण मात्र त्या बागेपेक्षा अधिक आहे. ह्याच छायेंत मधल्या सुट्टींत होणारा विद्यार्थ्यांचा गोंधळ आणि किलबिल पाहिली म्हणजे एक आनंदी जग आपण पाहत आहोंत असा भास होतो. गतकालच्या सर्व आठवणी गोळा होऊं लागतात. वर्गांत असणारे बेंच, भिंतीला लटकविलेलीं छायाचित्रें, अंगावर प्रकाश घेऊन कोपऱ्यांत उभा असलेला फलक ही सारी निर्जीव सृष्टि सजीव होऊन जणूं आमच्याशीं बोलून राहिली असा भास होतो. ह्या साऱ्या निर्जीव सृष्टीबद्दलहि आपुलकी वाटते आणि बाहेरच्या ज्या दृश्यफलकावर ‘ सुवर्णकण ’ ह्या सदराखाली आपण लिहीत होतों तशीच सामान्य माहिती लिहिण्याची प्रथा अजूनहि चालूंच आहे हें पाहिलं म्हणजे समाधान वाटतं.

आज प्रांतांतील एक आदर्श शाळा म्हणून करांगुली ह्या शाळेच्या नांवानेच पडते. आत्मीयतेच्या वातावरणांत शाळेचा वृक्ष आज बहरला आहे. अनेक शक्तींना एकत्रित करून त्यांची कुशलतेने योजना करणारे शाळेचे मुख्याध्यापक अत्यंत प्रांजळ आणि प्रेमळ आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्याबद्दल अपार आदर आहे. त्या आदरांतूनच शाळेंत शिस्त निर्माण झालेली आहे. मुख्याध्यापक आणि इतर शिक्षक ह्यांच्यांतील संबंधहि अत्यंत आपुलकीचे आहेत. अधिकार गाजवून काम करून घेण्याची लालसा इथं नाही. प्रत्येकजण आपलें काम जाणतो; आणि तें ओळखून त्याप्रमाणे वागतो. संस्कृतच्या अध्यापकांनी तर आम्हा विद्यार्थ्यांत संस्कृतची इतकी गोडी निर्माण केली होती की आम्हा विद्यार्थ्यांत ह्या विषयांत पहिला कोण येतो ह्याबद्दल स्पर्धा होत असे. अजूनहि संस्कृत विषयाचें नांव ज्या वेळीं निघतें त्या वेळीं कृश पण सत्त्वशील, विषयाशी तन्मय होणारी, ज्ञानसेवेंत निरलस रमणारी ती गंभीर मूर्ति डोळ्यांपुढं उभी राहते. जी गत संस्कृतची

तीच विज्ञानाची. पांढरी टोपी, स्वच्छ धोतर व कधी कोट तर कधी सदऱ्यांतच असलेले ते गुरुजी वर्गांत आले की आम्ही आपसांत कुजबुजत होतों की 'हा थाट तर सारा संस्कृत शिक्षकाचा!' पण एकदा ते वर्गांत शिरले आणि प्रथम त्यांची नजर विद्यार्थ्यांवरून फिरली की सारी कुजबूज एकदम शांत. भरती आलेला दर्या एकदम निश्चल व्हावा किंवा वाऱ्यानं हालणाऱ्या झाडाची हालचाल एकाएकी बंद पडावी म्हणजे जसं वाटतं तसंच वाटायचं त्या वेळीं; पण हें क्षणभरच. नंतर विज्ञानासारखा रुचिहीन विषयहि घरगुती दाखले देऊन सुगम आणि सुबोध करून शिकवण्याची त्यांची पद्धत कांही अपूर्वच वाटायची. ते एकदा शिकवायला लागले की वर्गांत विज्ञान आणि रसिकता ह्यांची अद्‌भुत हालचाल होऊन राहिली असं वाटायचं आम्हाला.

शाळेचं नांव ज्या वेळीं निघतं त्या वेळीं अशा अनेक आठवणी लागोपाठ जाग्या होतात. मन विचार करूं लागतं की पांचव्या इयत्तेंत आपण शाळेंत शिरलों त्या वेळचं शाळेचं स्वरूप आणि मॅट्रिकची परीक्षा पास होऊन बाहेर पडलों तेव्हाचं स्वरूप यांत किती महदंतर आहे! आमचे एक कीर्तनप्रेमी गुरुजी आम्हाला मजेनं सांगत की शाळा प्रथम निघाली त्या वेळीं मुख्याध्यापक, मी स्वतः आणि तासांच्या घंटा मारणारा रामप्रसाद असा त्रिवेणी संगमच शाळेंत घडून आला होता. ह्या प्रयागतीर्थाचा महिमा आज पुष्कळच वाढला आहे. परीक्षांचे निकाल हें तर शाळेचें फार मोठें आकर्षण आहे. वर्तमानपत्र चाळतांना शाळेंतून प्रथम श्रेणींत उत्तीर्ण होणाऱ्या आणि प्रावीण्य संपादणाऱ्या विद्यार्थ्यांची रांगची रांग पालकांना दिसते त्या वेळीं त्यांनाहि शाळेबद्दल कौतुक वाटते. शिक्षक आणि पालक ह्यांच्यांतील संबंध ह्यामुळे अधिकच जवळचे झालेले आहेत. बरें, केवळ निकालावरच शाळेची दृष्टि आहे असें म्हणावें तर तसेंहि नाही. विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नति ज्या ज्या उपायाने साधतां येईल ते ते उपाय शाळेंत योजले जातात. मैदानी खेळ, बौद्धिक चढाओढी, विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन ह्या गोष्टी अभ्यासाइतक्याच तत्परतेनं शाळेंत घडतात. विद्यार्थ्यांच्या अडचणी शिक्षक हेरतात. एका गरीब पण हुशार विद्यार्थ्याला चष्म्याची आवश्यकता होती. आमच्या गुरुजींनी स्वतःच्या

पैशानें त्याला चष्मा घेऊन दिल्याचें मला चांगलें आठवतें. गुरु आणि शिष्य ह्यांचे इतके आपुलकीचे संबंध असल्यानंतर कोणत्या विद्यार्थ्याला शाळेबद्दल आकर्षण निर्माण होणार नाही आणि माझेपणा वाटणार नाही ? 'ही माझी शाळा' असं म्हणतांना अनेक सुखद स्मृति त्याच्यासमोर गर्दी करून उभ्या राहतील. अभिमानाची झाक त्याच्या डोळ्यांत उठेल. अंतिम सामन्यांत जिंकलेल्या ढाली विजयोन्मादानं दौडत त्याच्या नजरेसमोर येतील; आणि शाळेंत गाजलेल्या संमेलनाचे प्रसंग चित्रपटाप्रमाणे त्याच्या अंत:सृष्टीपुढून सरकतील. वडिलांचं बोट धरून घरभर हिंडणाऱ्या लहान बालकाचा आनंद काय वर्णावा ? गुरुजींचा आपुलकीचा हात धरून त्याच आनंदानं अनेक प्रसंग आम्ही साजरे केले. संमेलनासारखे समारंभ शहरभर गाजविले.

शाळेसंबंधीं अजूनहि आम्हाला इतकी सहानुभूति वाटते ती शिक्षकांनी पित्याच्या वत्सलतेनं आमच्याकडं पाहिलं म्हणून. चुकण्याचे आणि रागावण्याचे प्रसंग कांही थोडे घडले नाहीत, पण शिक्षकाची वत्सलता मात्र सुटली नाही. 'गुड बाय मि. चिप्स्' मधील मि. चिप्स सारखे शिक्षक माझ्या शाळेंत आहेत. 'एकमेकां साह्य करूं' ह्या प्रेरणेने ते सदैव जागृत आहेत. त्यांचं जीवन शाळेसाठी झिजत आहे. आमचे नातू, पणतू या शाळेंत येतील तेव्हा त्यांना 'मि. चिप्स'चें दर्शन होईल. अशा शाळेविषयी कोणाला अभिमान वाटणार नाही ? म्हणूनच 'माझी शाळा' ह्या शब्दोच्चाराबरोबर जी कांही एक आल्हादजनक खळबळ उत्पन्न होते तिचा पुन: प्रत्यय घेण्यांत मनाला आनंद वाटतो; आणि आपलें बालपण ह्या शाळेच्या छत्राखाली गेलेलें पाहिल्यावर 'रम्य तें बालपण' ह्या उक्तीची सार्थकता पटल्याशिवाय राहत नाही.

# संगीत-साधना

सौ. मंगला बेनोडेकर, संगीत विशारद,
औरंगाबाद

संगीतकला ही अत्यंत कष्टसाध्य कला आहे. तें एक शास्त्र आहे. कोणत्याहि शास्त्राची साधना करायची म्हणजे त्याला तपश्चर्या, बालपणापासून इंद्रियांची शक्ति एकवटून अभ्यास आणि आंतरिक आवड ह्या गोष्टींची आवश्यकता असते. गायनकलेंत तर परंपरेला किंवा पठडीला मान दिल्या जातो. ह्या कलेंत 'घराण्याच्या गायकीची' जपणूक जीवापलीकडे करावी लागते. रागांतील स्वरांचें आंदोलन, त्यांतील मार्मिक तुकडे, चिजेंतील विशिष्ट खटके आणि तानांची पैलुदार व पल्लेदार ठेवण ह्या गोष्टींची जपणूक शिष्याला फार काळजीपूर्वक व सतत 'रियासानें' करावी लागते. घराण्याचा लौकिक संभाळावा लागतो. म्हणून ह्या कलेच्या वाटेला जाण्याचें धाडस सामान्य माणूस करूं शकत नाही. प्रतिभा व प्रयास ह्यांशिवाय ही कला प्रसन्न होत नाही. योगमार्गाप्रमाणेच संगीत-साधना अतीव कठिण आहे. म्हणूनच संगीतांतील जे योगी असतात अशांनाच ही कला वश होते. आणि ही कला ज्यांना वश झालेली असते त्यांच्या गाण्याच्या मैफलीपासून मिळणारा सात्त्विक आनंद काय वर्णावा ? मैफलीच्या धुंदींत राहण्याचा आनंद कांही वेगळाच असतो; पण अत्यंत परिणामकारक रीतीनें मैफल रंगविणें व मैफलींत वाढता रंग भरणें हें सामान्य गायकाचें काम नव्हे. म. अल्लादियाखाँ, फैयाजखाँ, अबदुल करीमखाँ, मंजीखाँ, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, सवाई गंधर्व, रोषनाराबेगम, सौ. हिराबाई, गंगूबाई हनगळ, सुरश्री केसरबाई, मोघूबाई, भीमसेन जोशी इत्यादि अद्वितीय कलावंतच मैफली जिंकू शकतात. ह्या अलौकिक कलावंतांच्या बैठकीचा लाभ ज्या श्रोत्यांना झाला ते खरोखरच धन्य म्हटले पाहिजेत; कारण संगीताचे अनेक आचार्य आज आपणामधून निघून गेलेले आहेत. तेव्हा ही कला पोरकी होईल की काय अशी भीति वाटायला लागली होती.

परंतु गेल्या तीन-चार वर्षांपासून संगीतकलेचें पुनरुज्जीवन होणार असें सुचिन्ह दिसूं लागलें आहे. 'संगीत हें कौटुंबिक जीवनाचा अविभाज्य

घटक झालें पाहिजे ' असे उद्गार केंद्रिय नभोवाणी मंत्री डॉ. केसकर यांनी पहिल्या राष्ट्रीय संगीत महोत्सवाचे वेळीं काढले. तेव्हा महाराष्ट्रांत लोकांमध्ये गाण्यासंबंधीं जी उथळ स्वरूपाची आवड निर्माण होत आहे ती बंद झाली पाहिजे; आणि 'मागणी तसा पुरवठा' ह्या अर्थशास्त्राच्या तत्त्वाचा पाठपुरावा न करितां संगीतशास्त्र काय आहे हें ओळखलें पाहिजे. आमची पूर्वपरंपरा जर आम्ही पाहिली तर ती संगीत जाणणारी होती. रामपूर, जयपूर, ग्वाल्हेर हीं शहरें म्हणजे हिंदुस्थानी संगीताच्या राजधान्या होत्या. 'ग्वालियर में बच्चा भी स्वर से रोता है' ही म्हण भूगंधर्व तानसेनाच्या कीर्तीमुळेच प्रचारांत आली. मोंगली राजवटींत ह्या कलेला राजाश्रय असल्यामुळे ह्या कलेची परमावधि झालेली आपणांस दिसून येते. परंतु काळ जसा बदलला तशी ह्या कलेसंबंधीं लोकांत हीन भावना निर्माण झाली. उच्च घराण्यांतील लोकांनी ही कला शिकूं नये अशी (गैर) समजूत प्रचारांत आली. संगीतकलेने हिंदु लोकांचा उंबरठा ओलांडला व ती 'खाँ' साहेबांच्या आश्रयाला आली. मुसलमान लोकांत आजपर्यंत ह्या कलेचे अनेक आचार्य निर्माण झाले. पण आज आमची चूक आम्हाला कळून चुकलेली आहे. संगीतकलेचें महत्त्व आम्हाला पटूं लागलें आहे. संगीताविषयी समुदायांत आस्था निर्माण होऊं लागली.

गेल्या दीड तपाचें जर आपण अवलोकन केलें तर बोलपटसंगीत व भावगीत ह्यांचा पगडा लोकांच्या मनावर पूर्णपणें बसला होता. श्रमपूर्वक जतन केलेल्या रागदारीकडे श्रोते कान देईनासे झाले. लोकांना स्वस्त संगीत मिळूं लागल्यामुळे कमावलेल्या रागदारीला निवडक रसिक श्रोतेच लाभूं लागले. भावगीतांचा ढंग थोडया परिश्रमांत व सुरेल आवाज असला म्हणजे साधूं शकतो; तसें रागदारीचें नाही. रागदारी आळवितांना त्यांतील रंग, ढंग, चीजेंतील मुरक्यांची ठेवण व रागाला विलासाची शोभा प्राप्त करून देणें ह्यासाठी फार परिश्रम करावे लागतात. आवाजाची देणगी जरी एखाद्याला असली तरी शास्त्रशुद्ध अभ्यासाने त्या आवाजाला विविध तऱ्हेचे पैलू पाडून संगीतकला वाढविणें म्हणजेच खरी संगीतकला साध्य करणें होय. संगीताच्या अनेक आचार्यांनी हीं उपासना एकनिष्ठेने केली आहे. ही

उपासना करतांना आपण परमेश्वराचीच उपासना करतों आहोंत ही संगीताचार्यांची पूर्ण निष्ठा होती. वर ज्यांचा उल्लेख केलेला आहे ते अल्लादियाखाँ यांची गायकी ज्यांनी ऐकली असेल त्यांना कळून येईल की त्यांची गायकी हिंदुस्थानांतल्या सर्व पद्धतींत अति बिकट होती. आज त्यांची ही मिर्मळ गायकी सुरश्री केसरबाईंच्या गाण्यांत विशेष खुलून दिसते. दिवसांतून नऊ नऊ तास रियास केल्यामुळे केसरबाईंच्या गायनांत एक प्रकारचा जोरकसपणा, विशिष्ट तऱ्हेचा ढंग, बोल–ताना घेतांना खटक्यांची विशिष्ट लकब ह्या गोष्टी आढळून येतात. गानहिरा सौ. हिराबाई बडोदेकर यांची मैफल म्हणजे संगीताची एक स्वर्गीय मेजवानीच. सुरेल आवाज, करीमखाँसाहेबांची दमदार गायकी, त्यांच्या गायकींतील मुलायमपणा आणि भावनेचा हळुवारपणा, स्वरांचें विशिष्ट आंदोलन, गानकलेशीं समरस होऊन चीज आळविण्याची पद्धत ह्या गोष्टींमुळे हिराबाईंच्या मैफलीचा कधी बेरंग झाला असें घडून आलें नाही. हीच पद्धत आणि अभिजात संगीतांतील ख्याल, ठुमरी, भावगीत हे प्रकार तयारीने व रसज्ञतेने अलिकडील गायिकांमध्ये सौ. माणिक वर्मा ह्यांनी उचलले आहेत.

पण त्याबरोबर प्रचारांत असलेल्या स्वस्त संगीतामुळे आपण ह्या भरदार आनंदाला आज कांहीसें पारखे झालों आहोंत. शास्त्र जाणणारे लोक थोडे असल्यामुळे त्यांचें सारें चित्त भावगीतांच्या श्रवणासाठी अधीर झालें असतें. शास्त्र न कळल्यामुळे पहाटे आळविल्या जाणाऱ्या भैरवीच्या मृदु स्वरांनी होणारा आनंद त्यांना कळत नाही. मर्यादित जाणकारांनाच ही ‘असली भैरवी’ डोलायला लावते. म्हणून ही रसिकप्रिय असलेली कला लोकप्रिय कशी होईल व घरोघरीं उच्च संगीताची आवड कशी निर्माण होईल इकडे आज सरकारचें लक्ष लागून राहिलेलें आहे. नभोवाणीचीं पाउलेंहि त्या पद्धतीने पडत आहेत. अभिजात कलावंतासाठी उत्साहाचें वातावरण निर्माण झालेलें आहे. कारण संगीतकलेचें स्थान आज आम्ही ओळखलें आहे. संगीतकला नसती तर मनुष्याचें जीवन अर्थशून्य व रुक्ष झालें असतें. सुखदुःख, आशानिराशा, यशापयश ह्यांच्या द्वंद्वांत फिरणाऱ्या जीवनाला संगीतकला ही मरुभूमींतील विश्रांतीच्या

ठिकाणासारखी झालेली आहे. संगीताचा स्पर्श होतांच दुःखाचा फणकारा कमी करण्याचें तिचें सामर्थ्य आमच्या प्रत्ययाला येऊं लागलें आहे.

संगीतावर आज अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. पंडित भातखंडे व पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी हिंदुस्थानी संगीताचा उद्धार करण्याचा मोठाच प्रयत्न केला आहे. अनेक शाळांतून ह्या कलेची पद्धतशीर आराधना सुरू करण्यांत आलेली आहे. संगीतकलेचें महत्त्वमापन करण्याचे आजचे दिवस आहेत. ज्या स्त्रीजातीला आवाजाची देणगी निसर्गाने बहाल केली आहे त्या स्त्रियांनी तर ही संगीत–साधना फार प्रयत्नपूर्वक करावयास पाहिजे.

●

# स्त्री आणि राजकारण

सौ. माई केसकर
वर्णी

तीसचाळीस वर्षांपूर्वी जर वरील दोन शब्द जोडीने उच्चारले असते. तर ती एक हास्यास्पद कल्पना ठरली असती. पण आज त्यांत नवल असें कांही राहिलें नाही; कारण आज स्त्रिया सर्व तऱ्हेचें शिक्षण घेतात. कांही उच्च शिक्षण घेऊन परदेशीं जातात. त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढलेला आहे. मोठमोठ्या मानाच्या हुद्यावर त्या आरूढ झालेल्या आहेत. राजकारणांत त्या भाग घेतात आणि मानाचें स्थान पटकावतात. उदाहरणच दाखवायचें झालें तर विजायालक्ष्मी पंडीत, सरोजिनी नायडू, राजकुमारी अमृत कौर, कॅप्टन लक्ष्मी इत्यादि स्त्रियांचें कार्य तर सतत आपल्या डोळ्यांसमोर आहेच. बुद्धीने त्या पुरुषांपेक्षा कमी नाहीत, हें त्यांनी आपल्या कर्तृत्वाने जगाला पटवून दिलें आहे. अशा तऱ्हेचीं उदाहरणें डोळ्यासमोर असल्यामुळे आणि स्वतः सुशिक्षित बनल्यामुळे आजकाल स्त्रियांना नुसतें चूलमूल करीत बसणें रुचत नाही. त्यांनाहि राजकारणांत पडून आपण कांही नांव मिळवावें अशी इच्छा साहजिकच उत्पन्न होते आणि घर हें आपळं जग समजून त्यांतच रमणें हें त्यांच्या बुद्धीला पटत नाही. पुरुषांच्या बरोबरीने आपणहि राजकारणांत भाग घेऊन आपला पराक्रम प्रकट करावा ही आकांक्षा त्यांच्या ठिकाणीं कालानुसार निर्माण होऊं लागली आहे.

राजकारण हा सर्वच स्त्रियांना झेपणारा लढा आहे असें नाही. स्त्रीचें खरें सामर्थ्य घर हेंच आहे. घर हेंच तिचें खरें जग आहे. जगांतील प्रत्येक क्षेत्रांतील संचार पुरुषाप्रमाणे स्त्री-जीवनाला न पचणारा, न झेपणारा व न मानवणारा असा आहे. विधात्याने स्त्रियांत आणि पुरुषांत शारीरिक विरोध निर्माण करून ठेवला आहे. त्यामुळे तिच्यावर एक प्रकारचें बंधन पडलें आहे. तिला अपत्यसंगोपनासारखी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडावी लागते आणि प्रसूतीच्या दिव्यांतून जावें लागतें. हे शारीरिक विरोध आणि अवयवांची नाजुकता जर स्त्रीच्या ठिकाणीं नसती तर तिने पुरुषाबरोबर अहमहमिकेने भाग घेणें, लढाईंत पराक्रम दाखविणें हें सर्व भूषणावह ठरलें असतें. पण तिच्यांत असलेले हे भेद विसरतां येत नाहीत. आज जरी पुष्कळशा स्त्रिया बुद्धिबलाने पुरुषांची बरोबरी करीत आहेत तरी शारीरिक बलाने त्या त्यांच्याबरोबर टिकाव धरूं शकत नाहीत. संसार सोडून जर राजकारणाचाच विचार स्त्रिया करायला लागल्या तर संसाराचा ग्रंथच आटोपला. विधात्याने जगांतील स्त्री-पुरुषांच्या कर्तव्यांची वांटणी केलेली आहे. स्त्रीची शारीरिक नाजुकता लक्षांत घेऊन तिच्यावर प्रजोत्पादन आणि संसार चालविणें ह्या जबाबदाऱ्या टाकल्या आणि बाहेरच्या जगांतील सर्व जबाबदाऱ्या पुरुषाच्या शारीरिक सामर्थ्यामुळे पुरुषांवर सोपवल्या आहेत. तेव्हा आपलें कर्तव्य व्यवस्थितपणें पार पाडायचें सोडून दुसऱ्याचेंच कर्तव्य पार पाडण्याची हौस काय म्हणून बाळगावी ?

आजकाल चूलमूल संभाळणें म्हणजे फार खेडवळ कल्पना वाटते. पुरुषाशीं संसार करणें म्हणजे त्यांची गुलामगिरी वाटते. हे सर्व धुडकावून लावून करायचें काय? तर राजकारण ! पण माझें तरी असें स्पष्ट मत आहे की राजकारण अशा स्त्रियांनी खेळावं की, ज्यांना कांही संसार उरला नाही; किंवा ज्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असून त्यांचा संसार संभाळण्याकरता त्यांच्या पाठीशीं इतर कळकळीचे लोक उभे आहेत. पण मध्यमवर्गांतील स्त्रीने जर संसार, मुलेंबाळें सोडून राजकारणाचा मोह धरला तर तिच्या संसाराचा बोजवाराच उडाला म्हणून समजावें. आणि ज्या तरुण मुलींना खरोखर राजकारणाविषयी तळमळ असेल त्यांनी प्रथमच संसार वगैरेच्या

भानगडींत न पडतां आपलें ध्येय शेवटाला न्यावें. आजकाल राजकारणांत पडलेल्या ज्या स्त्रिया आहेत त्या सर्वच अविवाहित आहेत असें नाही. पण त्यांची गृहस्थिति आणि सांपत्तिक स्थिति त्यांच्या कार्याला पोषक असते. जी स्त्री ह्या दोन्ही गोष्टींचा विचार न करतां राजकारणांत उडी घेईल तिचें सांसारिक ओढाताणीमुळे एकहि ध्येय शेवटाला जाणार नाही. प्रत्येक स्त्री म्हणजे कांही झाशीची राणी किंवा कॅप्टन लक्ष्मी नाही; किंवा प्रत्येक स्त्री विजयालक्ष्मीसारखी परदेशीं वकिलात करूं शकणार नाही. म्हणून राजकारणांत भाग घेणें हें जरी अवघड असलें तरी स्त्रियांनी अगदी कांही करूंच नये असें नाही. ज्या स्त्रियांना पराक्रम दाखवायचा असेल त्यांनी आपल्या घराचें सौंदर्य वाढवावें; घराचें नंदनवन करावें, आदर्श गृहिणी होण्याचा प्रयत्न करावा. स्त्रियांना वाङ्मयीन क्षेत्रांत पराक्रम दाखवायला भरपूर वाव आहे. कारण वाङ्मयीन तपस्या घरांत राहूनहि करतां येते. इतकेंच काय पण घर संभाळून थोडं समाजकारणहि संभाळतां येण्यासारखें आहे. पण पूर्णपणें राजकारणांत पडतों म्हटलें तर घराकडे दुर्लक्ष होऊं लागेल. राजकारणी माणसाला पुष्कळदा घर सोडून बाहेर राहण्याचा प्रसंग येतो. घराबाहेरच्या गोष्टींचाच नेहमी जास्त सहवास घडतो. आणि एकदा 'उखळांत डोकं घातलं की, घाव सोसावेच लागतात;' त्याप्रमाणे राजकारणाचे घाव सोसतांना माझं घर, माझीं मुलं, माझा संसार असें म्हणून चालणार नाही. म्हणूनच राजकारण आणि स्त्री (म्हणजे अर्थात् संसारी) यांत विरोध आहे.

म्हणून ज्या स्त्रियांना खरोखरच राजकारणांत शिरायचं असेल त्यांनी संसारांतून पूर्णपणें मन काढून टाकून आपलें सर्व तनमनधन तिकडे केंद्रित करावें; कारण आजकाल कीर्तीच्या आशेने पुष्कळ स्त्रिया राजकारणांत शिरतात; पण त्याला कांही खरं राजकारण म्हणतां येणार नाही. त्यांची धड ना इकडे ना धड तिकडे अशी अवस्था होते आणि कोणत्याच कार्यांत आत्मीयता राहत नाही. ज्यांना खरोखरच संसार संभाळायचा आहे त्यांनी राजकारणाच्या वाटेला न जाणंच बरं. स्त्रीला मूर्तिमंत काव्य म्हणतात. पण

मराठी
अनुक्र

हे केव्हा ? तर ती जेव्हा आपली स्त्रीसुलभ कर्तव्यें पार पाडील तेव्हा. पण ती जर पुरुषांचींच कर्तव्यें पार पाडायला निघेल तर तिच्यांतलं काव्य आटलच म्हणून समजावं.

●

## आदर्श गृहिणी

सौ. सुनंदा कोटेश्वर, नागपूर.

गृहिणी ह्या शब्दाचा शब्दशः अर्थ म्हणजे घर, संसार संभाळणारी स्त्री. पण येवढ्याने आदर्श गृहिणीचा अर्थ पूर्ण होत नाही. तिला इतर ब्याचशा गुणांची आवश्यकता असते. तिचें क्षेत्र चूल आणि मूल येवढ्यापुरतेंच मर्यादित राहत नाही; तर आणखी पुष्कळशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या तिच्यावर असतात. सर्वच संसारी स्त्रियांना आदर्श गृहिणी म्हणतां येणार नाही; कारण आदर्श एका गोष्टीचा अनेकांनी ठेवावयाचा असतो; त्यामुळे ती गोष्ट थोड्या प्रमाणांतच आढळणार. खाली वर्णन केल्याप्रमाणे जी सर्व गुणांनी परिपूर्ण असेल तिलाच आदर्श गृहिणी म्हणतां येईल.

'स्त्री आणि पुरुष हीं संसाराचीं दोन चाकें आहेत' असें आपण समजतों आणि त्यांपैकी एक जरी चाक नादुरुस्त असेल तर संसाररथ आपला मार्ग सुरळीत आक्रमू शकणार नाही. तरीहि पुरुषापेक्षा स्त्रीचें आयुष्य हें घराशीं जास्त निगडित असतें; कारण पुरुष हा नोकरीधंद्याच्या निमित्ताने दिवसाचे बरेच तास बाहेर घालवतो, तर स्त्री ही दिवस-रात्रीचे बहुतेक तास घरांत घालवते. त्यांतच प्रजोत्पादन, संगोपन ह्यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या तिच्यावर असल्यामुळे ती जास्त घरांतच गुरफटल्या जाते. आज अनादि कालापासून आपल्याकडे अशी परंपरा रूढ आहे की पुरुषाने बाहेरच्या जगांत जाऊन पराक्रम करून पैसा मिळवावा आणि स्त्रीने घरांत बसून स्वयंपाकपाणी वगैरे गृहकृत्यें करून घरांतील लोकांस संतुष्ट ठेवावे आणि पतीच्या ऐपतीप्रमाणे संसार करावा. हें तत्त्व अजूनहि बरेचसें रूढ आहे. पण आजचें कार्यक्षेत्र बदललें आहे, आणि जग बरेंच पुढे गेलें आहे. आज असें एकहि क्षेत्र राहिलें नाही

की ज्योत स्त्री चमकली नाही. आजकाल बऱ्याच स्त्रिया नोकरी करतात कांही स्त्रिया वेळ जात नाही म्हणून हौसेखातर करतात, तर कांही आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिति सुधारण्याकरता करतात. कारण आजकाल शाहणीचें मान फार वाढलें आहे; परंतु संसार आणि संतति ह्यांबद्दल प्रत्येक स्त्रीच्या मनांत नैसर्गिक आवड असते. ज्यांना अशी आवडच नाही अशा स्त्रिया फारच थोड्या. कांही स्त्रियांच्या मनांत आपण आयुष्यांत कांहीतरी विशेष करावें अशी महत्त्वाकांक्षा असते. त्या वातावरणाचा फायदा घेऊन पुढे येतात; पण मध्यमवर्गातल्या स्त्रीला असें विशेष करण्याची संधी फार थोडी मिळते. ती आपल्या संसाराशीं एकजीव होऊन आदर्श गृहिणी होण्याचा प्रयत्न करते.

गृह म्हटलें म्हणजे तिथे चूल आणि मूल हें आलेंच. कारण गृह-राज्यांतील ती प्रमुख अंग असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पाकशास्त्रांत पूर्णपणें पारंगत असणें हें एक सुगृहिणीचें लक्षण आहे. आजकाल हॉटेलमधून सर्व पदार्थ मिळतात; पण तेच पदार्थ जर घरीं बनवून खाल्ले तर वेगळीच रुची लागते. बाजारांतून आणलेल्या फळांपेक्षा स्वतःच्या हाताने लावलेल्या झाडाचें फळ खाण्यांत विषेश समाधान वाटतें. रोज ताजें, रुचकर आणि साधें अन्न शिजवून आपल्या कुटुंबांतील लोकांना घालणें हें तिचें एक महत्त्वाचें कर्तव्य आहे.

त्याचप्रमाणे दुसरें महत्त्वाचें कर्तव्य म्हणजे आपल्या मुलांची जोपासना करणें हें होय. आपलीं मुलें हीं राष्ट्राची संपत्ती आहे. तेव्हा त्यांचा नीट काळजीपूर्वक संभाळ करणें म्हणजे राष्ट्रकार्यास हातभार लावण्या-सारखेंच होय. कारण प्रत्येक तरुण पिढीवरच राष्ट्राची मदार असते. मूल हें बापापेक्षा आईच्याच सहवासांत जास्त असतें. तेव्हा मुलाचा पहिला गुरु म्हणजे आई. त्यामुळे ती जे संस्कार करील ते त्या बालमनावर रुजल्या जातात. त्यांच्या आयुष्याचा पाया घालणें हें तिच्यावरच अवलंबून असतें. लहानपणा-पासून नीति, धर्म ह्यांविषयी जर चांगले संस्कार त्यांच्या मनावर झाले तर मुलांचें पाऊल सहसा वांकडे पडणार नाही. लहान मुलें अनुकरणशील असतात. मुलीचें बाहुली घेऊन खेळणें आणि बापाचा जो धंदा असेल तो

खेळ मुलाने खेळणें हें त्याचेंच प्रतीक आहे. तेव्हा त्यांच्यासमोर आपलें वागणें हें अत्यंत शुद्ध, सात्त्विक, प्रेमळ असें पाहिजे. कोणतीहि गोष्ट सामोपचाराने जर सांगितली तर ती बालमनावर चांगली रुजते. आपल्या मुलांना संगत कुणाची आहे आणि ते काय शिकतात आणि बाहेर कसे वागतात ह्यावर बारीक लक्ष ठेऊन त्यांना योग्य वळण लावायला पाहिजे.

त्याचप्रमाणे तिची पतीविषयी वागणूक सौजन्याची, प्रेमळपणाची आणि आदराची असावी. पण पति कसाहि असला तरी देवच असें मानण्याची कमकुवत मनोवृत्ति आजच्या स्त्रियांनी सोडली पाहिजे. तो जर दुर्व्यसनी, दुराचारी असेल तर त्याला ताळ्यावर आणण्याची धडाडी तिच्या अंगीं असावयास पाहिजे. त्याचा नेहमी पाणउतारा करूनच तो सुधारेल असें नाही; तर युक्तीने त्याला त्याच्या व्यसनांपासून परावृत्त करावयास पाहिजे. आजची स्त्री जरी विनयी, प्रेमळ, सात्त्विक असली तरी ती महत्त्वाकांक्षी आणि धडाडीची पाहिजे. प्राप्त गरिबींत किंवा श्रीमंतींत आनंदाने संसार करण्याइतकी समाधानी मनोवृत्ति तिने बाळगली पाहिजे. त्याचप्रमाणे कुटुंबांतील इतर मंडळी, शेजारीपाजारी ह्यांच्याशीं तिचें वर्तन चांगलें असावयास पाहिजे.

तसेंच तिचें घर हें अगदी स्वच्छता, व्यवस्थितपणा यांचें माहेरघर असावयाला पाहिजे. स्त्रीला मूर्तिमंत काव्य म्हणतात. बहुतेक स्त्रींत कलाप्रियता आणि सौंदर्यदृष्टि पुष्कळ असते. त्या दृष्टीने जर घर सजविलेलें असेल तर त्या घरांत जाणाऱ्याला एकदम प्रसन्न वाटेल; आणि प्रथमदर्शनींच त्या स्त्रीविषयी त्याचें मन चांगलें होईल. ह्याशिवाय भरतकाम, विणकाम, शिवणकाम ह्यांसारख्या संसारोपयोगी आणि गायन, वादन ह्या मन रंजविणाऱ्या कला तिच्या अंगीं असतील तर तिचा संसार हेंहि एक सुरेल संगीत होईल.

हे सर्व गुण जरी तिच्या अंगीं असले तरी आज परिस्थिति फार झपाट्याने बदलत आहे. कालच्या सुशीक्षित स्त्रीपेक्षा आजच्या स्त्रीचें एक पाऊल पुढेच पडतें. आजकाल मुली परिस्थितिनुसार शिक्षण घेतात. कांही उच्च शिक्षणाकरता परदेशीं जातात. मोठ्या हुद्याच्या नोकऱ्या करतात.

पुष्कळ शिक्षण घेऊन त्यांना नुसतें घरांत बसणेंहि आवडत नाही. देशालाहि आज अशा स्त्रियांची जरूर आहे. पुरुषांबरोबर त्या बरोबरीने कामहि करतात. स्त्रीपुरुषांतील कृत्रिम भेद त्यामुळे बरेच कमी झाले आहेत. परंतु इतकें सर्व करणाऱ्या सर्वच स्त्रिया कांही अविवाहित नसतात. उलट बहुतेक विवाहित असतात. अशा परिस्थितींत जीं कामें दुसऱ्याकडून करवून घेण्यासारखीं असतील तीं दुसऱ्याकडून करवून घ्यावींत पण ज्यांत स्वतः लक्ष घालायला पाहिजे तें काम स्वतःच करायला पाहिजे. कर्तबगार स्त्रीचीं मुलेंहि कर्तबगार निघतील. कारण त्या घरांतील वातावरणहि तसेंच राहील. तरी पण जर हक्कापेक्षा कर्तव्याकडे जास्त लक्ष ठेवलें तर जीवन सुखमय आणि तडजोडीचें होईल. अगदी ५० वर्षांपूर्वीच्या काळांत स्त्रीला घराचा उंबरा ओलांडायचा म्हणजे महत्प्रयासाचें होतें. मग नोकरी आणि शिक्षण तर दूरच. त्या काळांत आणि आजच्या काळांत जमीनअस्मानचा फरक असला तरी गृहिणी या शब्दाची व्याख्या बदलणार नाही. येवढेंच की तिच्यावरील जबाबदाऱ्या ती सुधारलेल्या पद्धतीने आणि कालानुरूप योग्य तऱ्हेने पार पाडील. शिक्षणाने माणसाचें मन सुसंस्कृत होतें. सुशिक्षित स्त्रीचा समाजाशीं जास्त संबंध येतो आणि दुनियेचा अनुभव जास्त येतो. मनाचा समतोलपणा येतो. अशिक्षित स्त्रीपेक्षा सुशिक्षित स्त्री हीच आपल्या ह्या सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थितपणें पार पाडू शकते. तेव्हा जी स्त्री सुशिक्षित, कर्तव्यदक्ष आणि वर वर्णिलेल्या स्त्रीसुलभ अशा सर्व सद्गुणांनी युक्त असेल तिलाच 'आदर्श गृहिणी' हें नांव सार्थ आहे.

८६३९
मराठी ... पुणे
अनुक्र. ९०२७३ वि
क्रमांक ९०२७३ दि. २८।३।...

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १० | १९ | परिवतन | परिवर्तन |
| १३ | ८ | संबंधीच | संबंधीचें |
| ३१ | १२ | मदिरच | मंदिरच |
| ३२ | ६ | यमूना | यमुना |
| ३७ | २५ | मेव | मेघ |
| ३७ | २५ | वायलहरी | वायुलहरी |
| ४१ | २५ | लोकांन | लोकांना |
| ५१ | १२ | तत्त्वज्ञानाचे | तत्त्वज्ञानाच्या |
| ५३ | १३ | स्थिती | स्थिति |
| ५६ | २५ | नीतीमता | नीतिमत्ता |
| ५८ | १ | ह्या दृष्टीने ह्या ऐवजी | म्हणून |
| ६७ | २८ | चारहि बाजूंनी वेढलेल्या | चारहि बाजूंनी पाण्याने वेढलेल्या |
| ७० | ६ | वाढल | वाढेल |
| ७५ | ८ | अधात्म | अध्यात्म |
| ८८ | ३ | बाटत | वाटत |
| ८८ | १० | पतिकूल | प्रतिकूल |
| १०१ | २ | त्यांच्या बायका त्यांचीं मुलें | त्यांचीं मुलें हे शब्द वगळून वाचणें |
| १०३ | १५ | अमोप | अमाप |
| ११९ | ७ | आत्मविकासनाकरिता | आत्मविकसनाकरिता |
| १२४ | ९ | काटा | कांटा |
| १२५ | २८ | दवसरात्र | दिवसरात्र |
| १२८ | ९ | पराक्रमी | पराक्रमाची |
| १२९ | २१ | शंभ | शंभु |
| १३५ | १६ | सांगत | सांगता |
| १३८ | ३ | प्रामख्याने | प्रामुख्याने |
| १३८ | २६ | ताची | प्रांताची |
| १३९ | २२ | पुर्नरचना | पुनर्रचना |
| १४० | ८ | परिस्थिती | परिस्थिति |
| १६४ | १३ | वाटं | वाटू |

●

REFBK-0008531